**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : आपण नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावाला सुरुवात करायची का ? कारण सभागृहात माननीय मंत्री उपस्थित नाहीत

श्री. शंभुराज देसाई : माननीय मंत्र्यांना निरोप दिला आहे. ते सभागृहात येत आहेत.

**उप सभापती** : ठीक आहे. आपण आता नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावाला सुरुवात करीत आहोत.

----

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे.

**मु.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ. रणजित पाटील, प्रवीण पोटे-पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रवीण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरिशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री. रवींद्र फाटक (ठाणे तथा पालघर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, आपल्या महाराष्ट्र राज्यातील मागासलेला व अनेक वर्षे

विकासापासून वंचित राहिलेला जिल्हा म्हणजे गडचिरोली जिल्हा आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर माननीय नगरविकास मंत्री यांनी स्वत:हून गडचिरोली जिल्ह्याचे ....

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, मला जाणून घ्यायचे आहे की, सभागृह सुरु असताना गणपूर्तीची आवश्यकता राहत नाही का ? सभागृहात फक्त ४ सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत.

श्री. रवींद्र फाटक : सभापती महोदया, आपल्याला सामंजस्याने करुन घ्यायचे आहे.

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदया, आपल्याला सामंजस्याने करुन घ्यायचे आहे.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, मला जाणून घ्यायचे आहे.

**उप सभापती** : विरोधी पक्षाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी सजगतेने विचारला आहे. चांगली बाब आहे. परंतु कामाची निकड लक्षात घेऊन आपण अनेक वेळा विधेयकांच्या संदर्भात देखील गणपूर्ती नसताना सभागृहाचे कामकाज चालवितो. कारण वेळेचा सदुपयोग झाला पाहिजे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, सभागृहाच्या संमतीने झाले पाहिजे

**उप सभापती** : होय. निश्चितपणे तसेच आहे.

श्री. रवींद्र फाटक : सभापती महोदया, माननीय नगरविकास मंत्री यांनी स्वत:हून गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारले आहे. त्यांनी पालकमंत्री पद घेऊन शांत न बसता अनेक विकासाची कामे वेगाने सुरु केली. गडचिरोलीमध्ये आरोग्य केंद्र सुरु केले. आयसीयू व ऑक्सिजन प्लँट गडचिरोलीसारख्या आदिवासी भागात बनविले. अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यासाठी १० कोटी रुपयांची योजना देखील तयार केली. जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले मायनिंग प्रकल्प देखील सुरु केले. इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये वाढ होत असल्याने

श्री. रवींद्र फाटक ....

विकासाच्या दिशेने जिल्हा वेगाने चालला आहे आणि हाच विकास नक्षलवाद्यांना खटकू लागला आहे. नक्षलवाद्यांनी माननीय नगरविकास मंत्री व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेबांना कुटुंबियांसह जिवे मारण्याची धमकी दिली आणि याबाबत ठाण्यात गुन्हा देखील दाखल झाला आहे.

सभापती महोदया, मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विचारावयाचे आहे की, शासनाने या धमकीबाबत काय कारवाई केली आहे, त्यांच्या जीवितास धोका असल्याने कोणती सुरक्षा गृह विभागाकडून पुरविण्यात आलेली आहे ?

सभापती महोदया, माननीय नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेबांना व त्यांच्या कुटुंबियांना नक्षलवाद्यांकडून असणारा जीविताचा धोका लक्षात घेता त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी शासनाने स्वीकारावी ही विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत

**उप सभापती** : आपण विधानपरिषद नियम २६० अन्वये असलेल्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा करीत आहोत. मला असे दिसत आहे की, काही कारणामुळे ज्यांची प्रस्तावावर नावे आहेत, ते कोणीही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. मी सभागृहाच्या नियमाप्रमाणे पुढे जात आहे. माननीय मंत्री सभागृहात आले आहेत. तुम्हाला काही निवेदन करावयचे आहे का ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, मला वाटते की, सकाळी ११ वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे. कारण प्रस्तावावर बोलणारे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मी निर्णय घेते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर सुरु करावे आणि नंतर थांबवावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी पुढील नावे पुकारते. विरोधी पक्षाच्याच सर्व सन्माननीय सदस्यांची नावे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवेसना पक्ष, पुरोगाम गट, काँग्रेस पक्ष या सर्वांच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाली आहेत. सन्माननीय सदस्य ॲड निरंजन डावखरे, श्री. प्रसाद लाड सभागृहात अनुपस्थित आहेत. त्यांची सचिवांकडे न येण्याबाबत काही पत्रे आलेली आहेत का ? पत्रे आलेली नाहीत. सन्मननीय सदस्य सर्वश्री. भाई गिरकर, रमेशदादा पाटील, सदाभाऊ खोत, महादेव जानकर अनुपस्थित आहेत. शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र दराडे यांनी नाव दिले होते, तेही अनुपस्थित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य सर्वश्री. विक्रम काळे, अनकित तटकरे अनुपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय दौंड उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी बोलावे. आपल्याला बोलायचे असेल तर बोलावे नसेल तर आपली इच्छा आहे.

सभापती महोदया, सभागृहात स्वत: माननीय गृह राज्यमंत्री आहेत, माननीय गृहनिर्माण मंत्री आहेत. सभागृहात ५ सन्माननीय सदस्य असोत किंवा १० सन्माननीय

**उप सभापती ....**

सदस्य असोत, जनता पाहत, ऐकत असते. सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांनी बोलावे नाही तर आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना बोलायचे आहे, त्यांनी थोडक्यात बोलावे.

----

असुधारित प्रत

श्री. अरुण लाड (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. हा मोठा विषय असून यावर २/३ दिवस चर्चा सुरु आहे. त्यामुळे शासनाने त्यावर ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. आरक्षण हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. तोच पुढे येत आहे. त्यावर एकदा अंतिम निकष ठरवून निर्णय घेऊन टाकावा. टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षांत घोटाळे झाले आहेत, या घोटाळयांसाठी किती दिवस थांबायचे ? आपण एका बाजूला मुलांना नोकऱ्या नाहीत असे म्हणत आहोत आणि दुसऱ्या बाजूला घोटाळयांमुळे परिक्षाच थांबत आहेत, त्यामुळे निवड थांबत आहे. मुलांचे वय देखील संपत चालले आहे. आपण हा घोटाळयांतून एकदा बाहेर पडले पाहिजे. परिक्षेचा कालखंड आहे. आपण परिक्षेची पध्दत एकदा सोडवून घ्यावी आणि या सोडवणुकीतून त्यांना संधी मिळून परीक्षा वेळच्या वेळी व्हाव्यात आणि शासनाच्या किंवा वेगळया कार्यालयांत त्यांची भरती ताबडतोब व्हावी.

सभापती महोदया, आपण एका बाजूला भरती नाही असे म्हणत आहोत. लोकांची कामे होत नाहीज. कार्यालयात गेल्यावर ते म्हणतात की, आमच्याकडे माणसे नाहीत. त्यामुळे आमच्याकडे फक्त अत्यावश्यक कामे होत आहेत, आम्ही बाकीच्या कामांना हात लावत नाही. मग असे असताना, अशी अनास्था असताना, खेडोपोडी असलेल्या लोकांची कोणतीही कामे होत नसताना, परीक्षा पध्दतीमुळे आपण हे थांबवत आहोत हे काही चांगले नाही. त्यामुळे सदर बाबतीत निर्णय होऊन परीक्षा पध्दत मोकळी व्हावी, लोकांचा, युवकांचा भरतीचा हक्क आहे, तो त्यांना द्यावा आणि लोकांना कामाची संधी मिळावी, कामाला माणसे मिळावी, शासन तशी संधी लोकांना देईल, अशी अपेक्षा आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत

**उप सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांची उत्तर देण्याची तयारी आहे का ?

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदया, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपापले मुद्दे उपिस्थत केले आहेत. विशेष सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दे उपिस्थत केले आहेत. आम्ही उत्तर देण्याची तयारी करुन आलो आहोत. उत्तर ऐकण्यासाठी ते उपस्थित असते तर बरे झाले असते. कारण पुन्हा आम्ही नसताना रिकाम्या सभागृहात उत्तर दिले असे ऐकून घ्यावे लागेल. माझी या संदर्भात विनंती राहील. मी उत्तर देण्यास तयार आहे. परंतु आपण सकाळी ११ वाजता उत्तर सुरु करावे अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : माझी हरकत नाही. आपण सभागृहाचा विचार घेऊनच निर्णय घेत असतो. सकाळी ११ वाजता सन्माननीय विरोधी पक्षनेते, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांनी येऊन आम्हाला सर्वांना बोलायचे आहे असा आग्रह धरल्यावर प्रश्न येणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तराला सुरुवात करावी आणि नंतर त्यांना थांबावावे.

**उप सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तराला सुरुवात करावी आणि ५ मिनिटे बोलावे. आपण आपल्याला ऑनलेग ठेवू या, मग अर्ध्या किंवा पाऊस तासाने पुन्हा उत्तराला सुरुवात करु या.

श्री. शंभूराज देसाई (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदया, म.वि.प.नियम २६० अन्वये सन्माननीय विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, सर्वश्री. भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ. परिणय फुके, सर्वश्री. सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री प्रवीण पोटे-पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक, सर्वश्री. चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रवीण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरिशभाई पटेल या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावावर गेल्या आठवड्यातील ४ दिवस सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री. गोपिचंद पडळकर, अभिजीत वंजारी, विनायक मेटे, जयंत प्र. पाटील, अंबादास दानवे, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, शशिकांत शिंदे, सुरेश धस, रवींद्र फाटक, अरुण लाड यांनी विचार व्यक्त केले आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.शंभूराज देसाई....

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी अनेक मुद्दयांवर मते व्यक्त केली आहेत. कायदा व सुव्यवस्थेवर त्यांनी भाष्य केले आहे.

**उप सभापती** : म.वि.स.नियम २६० अन्वये प्रस्तावावरील मंत्री महोदयांचे उत्तर आज पूर्ण करायचे आहे. ज्यांनी प्रस्ताव मांडलेला असतो त्यांना राईट टू रिप्लायचा अधिकार असतो. विधानपरिषदेच्या वरिष्ठ सभागृहाच्या गौरवाच्या अनेक परंपरा आहेत. यामध्ये कोणतेही बंधन नसले तरी राईट टू रिप्लाय हा विरोधी पक्ष नेत्यांचा अधिकार असतो. विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्य अद्यापही सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाची बैठक १०.४५ वाजेपर्यंत स्थगित करु या. त्यानंतर सभागृहाची बैठक सुरु झाल्यावर विरोधी पक्ष नेते व इतर विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात आले नाहीत तर माननीय सभापती यांच्या अधिकारात निर्णय घेता येईल. त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर व्यवस्थित पूर्ण होईल. सभागृहाची बैठक आता १०.४५ वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.११ ते १०.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोरले.....

अप्रकाशित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छिते की, शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांना म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन करावयाचे आहे. तत्पूर्वी ॲड.निरंजन डावखरे यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे. मंत्री महोदयांच्या निवेदनामुळे आपल्या शंकांचे निरसन होईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, आपण मला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेत.....

**उप सभापती** : मी आपल्याला नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही. नियम २६० अन्वये प्रस्तावावर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु आहे. आपण पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, परवा सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस नियम २६० अन्वये प्रस्तावावर ऑनलेग होते. परंतु त्यांच्या मातोश्रींचे निधन झाल्यामुळे ते आज सभागृहात उपस्थित राहू शकत नाहीत. मी हे मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

-------

असुधारित प्रत

**रसायनशास्त्राचा पेपर फुटल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, इयत्ता १२ वी चा केमिस्ट्रीचा पेपर फुटलेला आहे. या संदर्भात विलेपार्ले येथे कारवाई सुद्धा झालेली आहे. प्रत्येक परीक्षेच्या वेळी पेपर फुटल्याच्या घटना निदर्शनास येतात. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. पेपर फुटीचे विशिष्ट रॅकेट आहे काय ? शासनाने परीक्षा फुलप्रुफ कशा होतील याबाबत धोरण निश्चित केले पाहिजे.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** इयत्ता १२ वी चा रसायनशास्त्राचा फेपर फुटल्याबाबत

**मु.शी.:** इयत्ता १२ वी चा रसायनशास्त्राचा फेपर फुटल्याबाबत माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन.

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम ४६ अन्वये पुढील निवेदन करते :-

सभापती महोदया, मी आपल्याला निवेदन करण्याबाबत विनंती केली होती. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भातच मला निवेदन करावयाचे आहे.

सभापती महोदया, शनिवार, दिनांक १२.०३.२०२२ रोजी इयत्ता १२ वी परीक्षेची रसायनशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या बातम्या समाज माध्यमातून प्रसारीत होत होत्या. सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातून या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहाच्या व जनतेच्या निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदया, इयत्ता १२ वी च्या रसानशास्त्राची प्रश्नपत्रिका एसएससी बोर्डाच्या नियमानुसार १० मिनिटे अगोदर दिली जाते. सकाळी १० वाजून २० मिनिटांनी प्रश्नपत्रिका वाचनासाठी वाटप केली जाते आणि उत्तरपत्रिका लिखान १० वाजून ३० मिनिटांनी सुरु करण्यास सांगितले जाते. विलेपार्ले केंद्र क्रमांक ३६०१ मुंबई येथील केंद्रावर एका विद्यार्थीनीच्या मोबाईलवर सकाळी १० वाजून २४ मिनिटांनी म्हणजे प्रश्नपत्रिका वाचनासाठी दिल्यानंतरच्या काळात प्रश्नपत्रिकेतील काही भाग आढळून आला. सदर विद्यार्थीनीच्या मोबाईमधील प्रश्नपत्रिकेच्या भागाची छाननी केली असता व्हॉट्सॲपद्वारे काही भाग प्राप्त झाल्याचे दिसून आले. याबाबत स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन पोलिसांच्या माध्यमातून सखोल तपास करण्यात आला आहे. एसएससी बोर्डाने केलेल्या चौकशीनुसार विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाटप केल्यानंतर म्हणजे सकाळी १० वाजून २० मिनिटानंतर मोबाईलवर प्रश्नपत्रिकेतील काही भाग आढळून आलेला आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका

प्रा.वर्षा गायकवाड.......

फुटलेली नसून प्रश्नपत्रिकेतील काही भाग विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे वाटप झाल्यानंतर व्हॉट्सॲपद्वारे प्रसारीत झालेला आहे. परंतु सदर प्रकरण नक्कीच गंभीर आहे. कोणीतरी मोबाईलच्या माध्यमातून हे केलेले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून एका आरोपीला पकडण्यात आले आहे. मी सांगू इच्छिते की, सदर पेपर फुटलेला नाही. विद्यार्थ्यांना सकाळी १० वाजून २० मिनिटांनी प्रश्नपित्रका वाचन करण्यासाठी दिल्यानंतर कोणाच्या तरी माध्यमातून प्रश्नपत्रिकेतील काही भाग बाहेर गेला. या संदर्भात संपूर्ण तपासणी होऊन संबंधितावर कडक कारवाई केली जाईल. आम्ही या संदर्भात बोर्डाबरोबर चर्चा करणार आहोत. आता आरोपी पकडला गेल्यामुळे प्रश्नपत्रिकेतील काही भाग मोबाईलच्या माध्यमातून बाहेर कसा गेला याबाबत माहिती मिळेल. भविष्यात अशा घटना घडू नयेत याची आम्ही काळजी घेऊ.

**उप सभापती** : मंत्री महोदया, पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा कोणाविरुद्ध दाखल करण्यात आलेला आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, संबंधित विद्यार्थीनीला पोलीस स्टेशनमध्ये नेऊन तिच्याकडे हा भाग कसा आला, कोणत्या माध्यमातून आला याबाबत पोलिसांनी संपूर्ण चौकशी केलेली आहे. सदर पेपर फुटलेला नाही. सकाळी १० वाजून २० मिनिटांनी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचन करण्यासाठी दिली होती. त्यानंतर विद्यार्थी १० वाजून ३० मिनिटांनी उत्तपत्रिका लिहिण्यास सुरुवात करतात. परंतु दरम्यानच्या काळात प्रश्नपत्रिकेतील काही भाग बाहेर गेला. सदर विद्यार्थीनी परीक्षा केंद्रावर उशिरा आल्यामुळे तिचा मोबाईल तपासण्यात आला. त्यावेळी तिच्या मोबाईलमध्ये प्रश्नपित्रकेतील काही भाग आढळून आला. या संदर्भात चौकशी करण्याचे काम सुरु आहे.

यानंतर श्री.सांगळे......

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, अनेक शाळा किंवा सेंटर असो, शिक्षक विद्यार्थ्यांना डायरेक्ट प्रश्नांची उत्तरे सांगत असल्यासंबंधी अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. यावर माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, कोविड परिस्थिती असल्यामुळे विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी जास्त अंतर जाण्यासाठी लागू नये यासाठी आपण अपवादात्मक परिस्थितीमध्ये शासनाने अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. तसेच राज्यात दोन वर्षे करोना परिस्थिती असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक प्रकारे दडपण व टेंशन होते. त्यामुळे आपण प्रत्येक शाळेला परीक्षा केंद्र केलेले आहे. तेथील पूर्णपणे काळजी घेण्याची जबाबदारी ही राज्य शासनाची राहील. पुढील वर्षापासून हा प्रश्न निर्माण होणार नाही.

**उप सभापती** : ठीक आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे.

**मु.शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परिक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ. रणजित पाटील, प्रवीण पोटे- पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते- पाटील, ॲड. निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रवीण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरिशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु.....

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छिते की, आज सकाळी १०.०० वाजता सदनाची विशेष बैठक सुरु झाल्यानंतर सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आपल्या पैकी सदनात कोणीही सदस्य उपस्थित नव्हते. सदर प्रस्तावावर बोलण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडील ज्या सन्माननीय सदस्यांची नावे होती ते देखील सदनात उपस्थित नव्हते. सदरहू प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बोलावे अशी आमची इच्छा असल्यामुळे मी सदनाचे कामकाज ४० मिनिटे तहकुब केले. आता आपण सदनात उपस्थित झाला आहात. मी याबाबत आपले स्वागत आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, सदरहु प्रस्तावावर बोलण्यासाठी काही सन्माननीय सदस्यांची संधी गेली त्यांना पुढील एखाद्या प्रस्तावावर बोलता येईल

असुधारित प्रत

**उप सभापती...**

अशी मी त्यांना शुभेच्छा देते. आज सकाळी १०.०० वाजता आपण सदनात उपस्थित राहिला असता तर आपल्याला या प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळाली असती. आता सदर प्रस्तावावर माननीय गृह राज्यमंत्री यांच्या उत्तराला सुरुवात झाली असून ते ऑनलेग असल्यामुळे आपण आता पुढे गेलो आहोत. त्यामुळे या प्रस्तावावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही. तसेच सदनाचे कामकाज पुढे गेल्यानंतर ते मागे येऊ शकत नाही. आपले सदन शिस्त मानणारे आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर राईट टू रिप्लाय होणार आहे. त्यावेळी आपण त्यावर बोलावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सदरहू प्रस्तावावर माननीय गृह राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर माझा राईट टू रिप्लाय होणार आहे. त्यासमवेत काही सन्माननीय सदस्यांच्या १-२ सूचना करायच्या आहेत. आपण त्याकरिता त्यांना संधी द्यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी एक-एक मिनिट मिळू शकेल. मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांनी मघाशी धमक्याच्या विषयासंबंधी जो उल्लेख केला होता त्याबाबत आपण उत्तर द्यावे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदया, ठीक आहे. आज सकाळी नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर माझे उत्तर सुरु केल्यानंतर या प्रस्तावावरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या होत्या त्यांच्या नावांचा मी उल्लेख केला होता. माननीय विरोधी पक्षनेते सदनात उपस्थित आहेत. नियम २६० च्या प्रस्तावावर मागील ४ दिवस सदनामध्ये चर्चा झाली त्यात कायदा व सुव्यवस्था विशेषत: गृह विभागावरील राज्यातील संपूर्ण कामकाजासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. काही सन्माननीय सदस्य विशेषत: माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पोलिसांकरिता काही सकारात्मक सूचना केल्या आहेत, मी त्याचे स्वागत करतो. गृह विभागाच्या प्रस्तावावर बोलत असताना मी अनेक वेळा सांगितले होते की, जवळपाल पावणेदोन वर्षे कोविड काळात गेली. कोविड काळात आरोग्य यंत्रणेवर

श्री.शंभूराज देसाई....

जेवढा ताण पडला तेवढाच ताण राज्यातील पोलीस यंत्रणेवर देखील पडला होता. कोविड काळात पोलिसांना १८-१८ तास काम करावे लागले. त्यात नाकाबंदी, रात्र गस्ती, पेट्रालिंग, लोकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवणे अशा विविध कामांचा ताण पोलीस यंत्रणेवर पडला. परिणामी पोलीस दलातील अनेक अधिकारी /कर्मचारी कोविड काळात डयुटी करीत असताना कोविडमुळे बाधित झाले व त्यात त्यांचा मृत्यू झाला. राज्य शासनाने त्यांच्या वारसांना ५० लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला. सभापती महोदया, पोलिसांच्या बाबतीत फार कमी वेळेस चांगले बोलले जाते. पोलीस दलातील १-२ कर्मचाऱ्यांकडून चूक केली जाते किंवा त्याच्यांकडून कळत नकळत काही तरी घडते. त्यावर बोट ठेवून संपूर्ण पोलीस दलाला टारगेट करुन टीकेचे लक्ष केले जाते. त्यामुळे संपूर्ण पोलीस दलाची बदनामी होते. हे निश्चितपणे थांबले पाहिजे असे माझे मत आहे. पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी महिला पोलीस कर्मचाऱ्यांना फक्त ८ तास डयुटी देण्याचा शासनाने निर्णय घेतला. कामाचे स्वरुप लक्षात घेता पोलिसांना देण्यात येणाऱ्या किरकोळ रजा १२ वरुन २० पर्यंत वाढविण्यात आल्या. साप्ताहिक सुट्टीमध्ये पोलिसांना पूर्ण आरामा मिळावा यासाठी कर्तव्यावर असताना त्यांना अगोदरच्या दिवशी रात्रपाळी देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला. तसेच पोलीस शिपायांना सब इन्स्पेक्टर होता यावे याकरिता महाविकास आघाडी सरकारने माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली निर्णय घेतला. पोलिसांच्या घरांसंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यात काही सन्माननीय सदस्यांनी पोलिसांची घरे ब्रिटिशकालीन असून ती गळत असल्यासंबंधी उल्लेख केला. सभापती महोदया, ही वस्तुस्थिती आहे. मी एक बाब आपल्या माध्यमातून सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, सन २०१९ मध्ये माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार आणि माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे शासन सत्तेवर आले. सन २०१९ पूर्वी पोलिसांच्या घरांकरिता २५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. महाविकास आघाडीचे शासन सत्तेवर आल्यानंतर पहिला अर्थसंकल्प तयार करीत

श्री.शंभूराज देसाई.....

असताना माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी तत्कालीन गृह मंत्री यांना बोलावून असे सांगितले की, पोलिसांच्या घरांची अवस्था अतिशय दयनीय आहे. पोलीस राज्यातील जनतेच्या हिताचे रक्षण करीत असतात. त्यामुळे पोलिसांनी कामावरुन घरी गेल्यानंतर किमान त्यांचे घर तरी चांगले असावे याकरिता शासनाने सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पामध्ये पोलिसांच्या घरांकरिता २५० कोटी रुपयांवरील तरतूद ४०० कोटी रुपयांपर्यंत वाढविली. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात सदर तरतूद ८०० कोटी रुपयांपर्यंत करण्यात आली. यावर्षी अर्थसंकल्पावरील चर्चा अद्याप झालेली नाही. यावर्षी गृह विभागाने तयार केलेल्या आराखडयात पोलिसांच्या घरांसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. पोलिसांवरील ताण कमी करणे, त्यांना चांगल्या सुविधा देणे याकरिता आम्ही प्रयत्न केला आहे.

सभापती महोदया, माननीय शिक्षण मंत्री यांनी पेपर फुटीच्या संदर्भात आताच सदनामध्ये निवेदन केलेले आहे. आरोग्य विभाग, म्हाडा तसेच टीईटीची परीक्षा घेत असताना पेपर फुटले असल्यासंबंधी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला होता. तिन्ही पेपर फुटीच्या संदर्भात गुन्हा रजिस्टर नंबर आणि त्यातील कलमे सांगून मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही. तिन्ही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केलेले आहेत. आरोग्य विभागातील पेपर फुटीच्या घोटाळयामध्ये १७ लोकांना अटक करण्यात आली. म्हाडाच्या पेपर फुटीच्या घोटाळयामध्ये गुन्हा दाखल करुन कारवाई केलेली आहे. तसेच टीईटी परीक्षेतील घोटाळयासंबंधी ८ जणांना अटक करण्यात आली आहे आणि त्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याला सेवेतून कमी करण्यात आले आहे. सभापती महोदया,असे घडू नये या मताचे सरकार आहे. म्हाडा किंवा आरोग्य विभाग असो, आपल्याकडे परीक्षा घेण्यासाठी एक यंत्रणा असते त्यानुसार आपण एका चांगल्या कंपनीला परीक्षा घेण्यासाठी बोलवतो. तसेच त्यांच्याशी निगोशिएट करुन दर घेतले जातात. ज्या कंपनीकडून कमी दर दिला जातो त्यांना परीक्षा घेण्यासाठी सांगितले जाते. अशा परीक्षासंबंधी विभागामध्ये तसेच

श्री.शंभूराज देसाई...

अप्रकाशित प्रत

मंत्रिमंडळामध्ये सखोल चर्चा केली. तसेच ज्या कंपनीचे रेप्युटेशन चांगले आहे त्यात टीसीएस, टाटा कन्सलटन्सी, आयबीपीएस कंपनी, बँकाची परीक्षा त्यांच्याकडून घेतली जाते. अशा ३-४ कंपन्या आपण शॉर्टलिस्ट केलेल्या आहेत. शासनाकडील कोणत्याही विभागांमधील परीक्षा असो, उक्त ३-४ कंपन्याशिवाय इतर कोणत्याही कंपन्यांकडून सदर परीक्षा घ्यावयाच्या नाहीत अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आला आहे. त्यावर शासन लवकरच अंतिम निर्णय घेणार आहे.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई .....

सभापती महोदया, मी पॉझीटीव्ह सजेशन्स सांगितल्या आहेत. मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आमच्याकडील काही त्रुटी दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत, मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, याच्या खोलात मी जाार नाही. परंतु एकूण ६ गुन्हे माननीय केंद्रीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्यावर दाखल झालेले आहेत. विविध गटांमध्ये तेढ निर्माण होईल, शांतता भंग होईल, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल यासाठी प्रिव्हेंटीव्ह मेजर्स म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहे. कायद्यातील व पोलीस नियमातील तरतूदीच्या बाहेर जाऊन कोणतीही कारवाई झालेली नाही.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी श्री.रमेश बोरनारे, वि.स.स. यांच्याबाबत मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी शिवीगाळ व मारहाण केली. मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगतो की, श्री.रमेश बोरनारे, वि.स.स. हे स्वत: त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यावर न्यायालयात हजर झाले. न्यायालयाने त्यांना तत्काळ जामिनावर सोडलेले आहे. ते सत्ताधारी पक्षाचे आमदार आहेत हे न पाहता त्यांनी कायद्याचे व नियमाचे पालन केले आहे. मी गृहराज्यमंत्री म्हणून सांगू इच्छितो की, न्यायालयाने त्यांना जामिनावर सोडलेले आहे पण निपक्षपातीपणे तपास केला जाईल. यामध्ये कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितले की, साक्री, धुळे येथील महिलांच्या मृत्यूचे भांडवल करुन भाजपाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. मी वारंवार सांगितले आहे की, महाविकास आघाडीचे सरकार सुडबुध्दीने कोणावरही कारवाई करीत नाही व करणार नाही. परंतु या प्रकरणात माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उल्लेख केलेल्या प्रकरणात ज्यांना अटक झालेली आहे व कारवाई झालेली आहे तेथील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या नोंदविलेल्या जबाबात सांगितले आहे की, ज्या व्यक्तींवर गुन्हे दाखल झालेले आहेत, त्या व्यक्ती तेथे प्रत्यक्ष हजर

श्री.शंभुराज देसाई .....

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई .....

होत्या. याचा अर्थ साक्षीदारांच्या जबाबानुसार व तेथील स्थानिक वस्तुस्थिती व माहितीच्या आधारे ही कारवाई झालेली आहे. पक्ष पाहून कारवाई झालेली नाही.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जत, सांगली मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याच्या अनुषंगाने स्थानिक राजकारण केले जाते असा उल्लेख केला आहे. पुतळा बसविणेबाबत वस्तुस्थिती सांगतो. पूर्वी जत येथे एक पुतळा होता, १०-१२ वर्षापूर्वी एका वाहनाच्या धडकेत पुतळयाच्या चबुतऱ्याला धोका निर्माण झाला म्हणून नवीन पुतळा बसविण्याचा प्रस्ताव तयार केला जात होता. संबंधित नगरपालिका, नगरपंचायत, पोलीस यंत्रणांची एनओसी घेतल्यानंतर अंतिम मंजूरी जिल्हाधिकारी पुतळा बसविण्यास देत असतात. कारण राष्ट्रपुरुष व महापुरुषांचे पुतळे उभारले जातात पण त्यांची सुरक्षा, देखभाल, मेंटेनन्स, परिसर स्वच्छता हे तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने करणे अभिप्रेत आहे. अद्यापही या जागेवर पुतळा बसविण्याच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी यांची अंतिम मंजूरी मिळालेली नाही. या कामाला गती देणे व लवकर सर्व एनओसी घेऊन जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्तावास मान्यता मिळेल. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा राज्यात कोठेही बसविला जात असला तरी नियमाचे पालन करुन बसविला तर कोणालाही किंवा राज्यकर्त्यांना आक्षेप असण्याचे कारण नाही.

सभापती महोदया, मुंबई व नवी मुंबईतील गुन्हयांमध्ये वाढ झाली हा माननीय विरोधी पक्ष नेते यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. यामध्ये काही प्रमाणात वाढ झाली आहे हे नाकारता येणार नाही. परंतु महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासून पोलीस ठाण्यात एखादी तक्रार आल्यास त्या तक्रारीची तत्काळ शहानिशा करा, ठाणे प्रभारी अधिकाऱ्याला तक्रारीत थोडे तथ्य आढळले तरी गुन्हा दाखल करुन घ्यावा लागतो, गुन्हा दाखल करुन घ्यायचा नाही असे कधीही धोरण महाविकास आघाडीचे नाही, पिडीत व्यक्तीच्या प्राथमिक तक्रारीवरुन त्यात तथ्य असेल तर प्रि-रजिस्ट्रेशन होते. म्हणजे क्राईम रेट कमी दाखवायचा, गुन्हयांचे प्रमाण कमी दाखवायचे व आम्ही गुन्हेगारी रोखली असे म्हणायचे अशा प्रकारचे धोरण

श्री.शंभुराज देसाई .....

महाविकास आघाडीचे नाही. येईल त्याला न्याय मिळाला पाहिजे व अशा प्रकारचे प्रि-रजिस्ट्रेशन असल्यामुळे गुन्हयांचे प्रमाण आपणास वाढल्याचे दिसेल.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितले की, काही गुन्हयांच्या प्रमाणात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. मानवी तस्करीमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. गुन्हयांच्या वर्गीकरणाबाबत केंद्र सरकारच्या स्तरावर आयपीसी अंतर्गत १ ते ५ निकष आहेत, त्या अनुषंगाने एकत्रितपणे राज्यांची वर्गवारी केली जाते, मी सांगू इच्छितो की, १ ते ५ निकषामध्ये महाराष्ट्र राज्याची क्रमवारी ११ व्या क्रमांकावर आहे. याचा अर्थ आपल्यापेक्षा पुढे दिल्ली, तामिळनाडू, गुजरात, पाँडेचरी, केरळा, तेलंगणा, आंध्रप्रदेश, हरियाना, मध्यप्रदेश, आसाम ही राज्ये आहेत, यानंतर ११ वा क्रमांक महाराष्ट्राचा आहे. आयपीसी १ ते ५ पॅरामीटरमध्ये महाराष्ट्राचा अकरावा क्रमांक आहे. अकरावा क्रमांकसुध्दा नसावा. पण एकच कोणता तरी पॅरामीटर घ्यायचा ज्यामध्ये राज्य पहिल्या क्रमांकावर असल्याचे सांगायचे, एकच कोणता तरी पॅरामीटर घ्यायचा ज्यामध्ये राज्य दुस-या क्रमांकावर असल्याचे सांगायचे. यामुळे आपल्याच राज्याची बदनामी होत आहे. शेवटी केंद्र सरकार सर्व राज्यांच्या गुन्हयांचे विश्लेषण करुन एकत्रितपणे त्याची क्रमवारी ठरवत असते. महाराष्ट्र यामध्ये अकराव्या क्रमांकवर आहे पण आमचे असे धोरण असणार आहे की, अकराव्या क्रमांकावरसुध्दा महाराष्ट्र असू नये. गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाले पाहिजे. त्यासाठी जे करावे लागेल ते करण्याची मानसिकता आमची आहे.

सभापती महोदया, शासनाने पोलिसांच्या घरांची अवस्था सुधारण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या कामकाजाचे तास कमी करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. या २०२० व २०२१ वर्षामध्ये आजपर्यत कधीही पोलिसांनी एवढी चांगली वागणूक दिली जात नव्हती. प्रत्येक जिल्हा नियोजन समितीमधून पोलिसांकरीता आपण ११२ साठी वाहने दिलेली आहेत. ग्रामीण असो किंवा शहरी असो अशा ठाणे प्रभारीला सुस्थितीतील किमान एक वाहन पोलीस स्टेशनमध्ये दिलेले आहे. अरुंद रस्त्यांमध्ये चारचाकी वाहन जात नाही, तेथे दुचाकी वाहने देण्याचा निर्णय घेतला

श्री.शंभुराज देसाई .....

आहे. बीट मार्शल वाहने देण्याचा निर्णय घेतला, जेणेकरुन अत्याचार होतात, गुन्हेगारी आहे, तेथे पोलीस पोहचला पाहिजे. याकरीता लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर, सुविधा या दोन वर्षात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोठया प्रमाणात देण्यासाठी आम्ही निर्णय घेतला आहे.

सभापती महोदया, अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख आलेला आहे की, महिलांकरीता पायलट प्रोजेक्ट साताराच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात चालू करण्याचा निर्णय घेतला आहे. आपणास माहिती आहे की, महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, महिलांकडून येणाऱ्या तक्रारी याकरीता सातारा जिल्हयात आम्ही हा प्रकल्प सुरु केलेला आहे हे मी आपणास सांगू इच्छितो. दिनांक १६.७.२०२१ रोजी माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते या पथदर्शी प्रकल्पाचे ऑनलाईन उदघाटन झाले. ५-६ महिने लॉकडाऊनमुळे शाळा, महाविद्यालये व खाजगी शिकवण्या बंद होत्या.

यानंतर श्रीमती नाफडे.....

श्री.शंभुराज देसाई.....

तरीसुध्दा ऑनलाईन पध्दतीने तेथपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. सातारा जिल्हयामध्ये शाळा-कॉलेज सुरु झाल्यानंतर १,३०,००० महिलांपर्यंत पायलट प्रोजेक्टच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शासन पोहोचलेले आहे. अनेक कार्यक्रमांमध्ये शिबिरातून दिलेल्या प्रशिक्षणाची प्रशस्ती पत्रे दिली गेलेली आहेत. अनेक मुलींमध्ये मला या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास पाहायला मिळालेला आहे. चौथ्या सत्राच्या समारोपाला मी सातारा येथे गेलो होतो. एका मुलीला प्रशस्ती पत्र देऊन परत जाताना मी विचारले की, कॉलेज परिसरात तुझ्यावर जर काही प्रसंग आला तर तू काय करशील, अचानक विचारलेल्या प्रश्नाला त्या मुलीने अतिशय बोल्डली उत्तर दिले की, काय करेन म्हणजे, आता या प्रशिक्षणामध्ये शिकविल्याप्रमाणे मी प्रतिकार करेल, समोरच्या माणसावर मी काऊंटर हल्ला करेल. एवढा आत्मविश्वास या पायलट प्रोजेक्टच्या माध्यमातून मुलींमध्ये तयार केला गेलेला आहे. जिल्हा नियोजनमधून, महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून या करिता निधी दिला गेलेला आहे. आता शासनाचा असा प्रयत्न आहे की, या नियमित अर्थसंकल्पामधून पोलीस विभागाकरिता जी तरतूद आहे, त्यातून प्रत्येक जिल्हयाला हा प्रकल्प लागू केला जाईल, त्यावेळी याकरिता तरतूद करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे.

सभापती महोदय, पीडित महिला, अत्याचार झालेल्या महिला ज्या असतात, त्यांना शासनाकडून जी काही मदत दिली जाते, त्या प्रकरणांचा निपटारा व्हायला वेळ लागतो. आपण देखील रेंज आय.जी.यांच्या व्ही.सी.मध्ये सांगितले होते की, तातडीने कालबध्द वेळेत नुकसान भरपाई देण्यात यावी. सातारा जिल्हयामध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली याकरिता स्वतंत्र कमिटी केलेली आहे. दर पंधरा दिवसातून त्या कमिटीने रिव्हयू घ्यायचा ,असे निश्चित केलेले आहे. त्याचा परिणाम असा झाला की, या प्रकरणांची जी पेण्डन्सी पूर्वी निम्म्यापेक्षा जास्त होती, आता ती पेण्डन्सी दहा-पंधरा टक्क्यांपेक्षा जास्त राहिलेली नाही. तातडीने त्या कमिटीच्या दर महिन्याला-पंधरा दिवसाला मिटींग्ज होत आहेत, मदतीचा

श्री.शंभुराज देसाई......

पहिला हप्ता, दुसरा हप्ता, तिसरा हप्ता जो मिळणे अपेक्षित आहे, तो लवकर देण्याकरिता शासन प्रयत्न करीत आहे. यामध्ये बऱ्याच गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, परंतु त्या सांगून मी सदनाचा वेळ घेणार नाही. मला या गोष्टीचे समाधान आहे की, या विभागाचा राज्यमंत्री म्हणून आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी माझ्याकडे जबाबदारी दिल्यानंतर महिलांच्या सुरक्षेकरिता चांगले काम स्वत:च्या जिल्हयामध्ये सुरु केलेले आहे. याकरिता आमच्या सर्व अधिकाऱ्यांचे चांगले सहकार्य आम्हाला लाभलेले आहे. तो कार्यक्रम यशस्वी झाल्यामुळे संपूर्ण राज्याला लागू होईल. संपूर्ण राज्यातील महिलांच्या सुरक्षेकरिता हे महाविकास आघाडीचे सरकार, माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार महिलांच्या सुरक्षेला केवळ बोलून प्राधान्य देत नाही तर कृतीमधूनही ते प्राधान्य दाखवून देण्यात आलेले आहे.

सभापती महोदया, मागील अधिवेशनात डान्सबारच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, राज्यमंत्री महोदय तुम्हाला याबाबतीतील ठिकाण, पत्ता याची यादी देतो, अचानक शासनाने तेथे छापे मारावे. अद्यापपावेतो तरी त्यांनी मला या संदर्भातील ठिकाणांची यादी व पत्ते दिलेले नाहीत. माननीय विरोधी पक्ष नेते शासनाने मागील अधिवेशनामध्ये याबाबतची बैठक घेतली होती. सदर बैठकीला वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले. त्या प्रमाणात या ठिकाणांवर, पत्त्यांवर छापे मारुन कोम्बिंग ऑपरेशन, अचानक तपासण्या करीत असता समजा एखाद्या पोलीस स्टेशनच्या परिसरात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचा छापा मारला, आणि त्यात काही आढळून आले तर त्याकरिता संबंधित ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांना त्याकरिता जबाबदार धरण्यात यावे, अशा पध्दतीच्या सूचना देखील याबाबत दिल्या गेलेल्या आहेत.

सभापती महोदया, सन २०२१ मध्ये मसाज पार्लर व हुक्का पार्लरवर अनुक्रमे ५८ व २३५ कारवाया केल्या. सन २०२० पेक्षा या मसाज पार्लरवरील कारवाया आठने वाढलेल्या आहेत. हुक्का पार्लरवरील कारवाया २९ ने वाढलेल्या आहेत.

श्री.शंभुराज देसाई......

डान्स बार आणि ऑर्केस्ट्रा बारमध्ये २०२१ मध्ये १२८ कारवाया करण्यात आल्या. सदर कारवाईमध्ये २०२० पेक्षा ८३ ने कारवायांमध्ये वाढ केलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता, त्याला अनुसरुन शासन या सर्व गैरप्रकारांना आळा बसण्याकरिता पोलीस दलाला मोठया प्रमाणात, फोर्समध्ये, ॲक्शनमध्ये आणून या प्रकारांवरील कारवाई वाढलेल्या आहेत, असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, अंमली पदार्थ, गांजा तस्कारी, हिरॉईन, एम.डी., चरस, ज्या ज्या गोष्टींवर निर्बंध आहेत, त्याबाबत देखील प्रत्येक घटकामध्ये शासनाने कारवाया वाढविलेल्या आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, अंमली पदार्थाच्या कायद्यान्वये एकूण १०,६६० गुन्हे २०२१ मध्ये झालेले आहेत. सन २०२० पेक्षा या गुन्हयांवरील कारवायांची संख्या ५९५१ ने वाढविलेली आहे. सदर कारवाईअंतर्गत १२१५५ इतर गुन्हेगारांना अटक केलेली आहे. सदर कारवाई अंतर्गत १९१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. ही आकडेवारी माझ्याकडे आजही आहे, ती मी केव्हाही माननीय विरोधी पक्ष नेते यांना, सदनातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना देऊ शकेल.

सभापती महोदया, जुगाराच्या कलमांतर्गत कारवायांमध्ये देखील वाढ केलेली आहे. जुगारासंदर्भातील घटनांविरुध्द असलेल्या कारवायांमध्ये ४७५५ने वाढ केलेली आहे. दारुबंदीच्या अधिनियमान्वये केलेल्या गुन्हयांवरील कारवायांमध्ये ११९१३ ने वाढ केलेली आहे.

सभापती महोदया, मी याबाबत हाऊसिंगचा मुद्दा देखील सांगितलेला आहे. बीड च्या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. जमिनींच्या गैरव्यवहारासंबंधी उत्तर देताना मी सांगितले होते की, याबाबत जे काही गैरव्यवहार घडले असतील, तेथे महसूल यंत्रणेची मोठया प्रमाणात आम्हाला आवश्यकता भासणार आहे. पोलिसांची जी एसआयटी याबाबत केलेली आहे, त्यामध्ये उप जिल्हाधिकारी दर्जाचा किंवा तहसीलदार दर्जाचा एखादा अधिकारी

श्री.शंभुराज देसाई.....

असुधारित प्रत

त्या एसआयटीमध्ये नेमून महसूल संदर्भातील माहिती लवकर प्राप्त करुन त्या चौकशींना देखील निश्चितपणे गती दिली जाईल.

सभापती महोदया, पोलीस भरतीचा विषय माननीय विरोधी पक्ष नेते यांनी मांडलेला आहे. मध्यंतरी कोविडमुळे भरती बंद होती. आता शासनाने पोलीस भरतीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. सन २०१९ मध्ये भरती केलेल्या उमेदवारांना काही ठिकाणी प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात आलेले आहे. एकूण १२५२८ नवीन पदे भरण्याला मान्यता दिलेली आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात ७२२१ पदांच्या भरतीची प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

सभापती महोदया, त्याचबरोबर सन्माननीय आमदार श्री.विनायक मेटे यांनी तेच मुद्दे उपस्थित केले होते. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. या ठिकाणी राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे, त्याची आकडेवारी यापूर्वी या ठिकाणी सांगितलेली आहे. राज्यातील पोलिसांनी चांगले काम केलेले आहे, याचाही त्यांनी उल्लेख केलेला आहे. केंद्रीय मंत्री माननीय श्री.नारायण राणे यांच्याविरुध्द सुडबुध्दीने कारवाई केलेली आहे, असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी केलेला आहे. मला असे सांगायचे आहे की, "ही वस्तुस्थिती नाही.".

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी देखील अनेक मुद्दे या निमित्ताने उपस्थित केलेले आहेत. ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. तरीदेखील त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर साहेबांनी पुणे जिल्हयातील एक विषय प्रकर्षाने सभागृहात उपस्थित केला होता. त्याबाबत मागील आठवडयात प्रश्न आला होता. त्या प्रश्नाला देखील सभागृहात शासनाने उत्तर दिले होते. त्याच अनुषंगाने पुणे जिल्हयातील विशिष्ट अधिकाऱ्यांच्याविरुध्द, विशिष्ट पोलीस स्टेशनच्या कारभारावर सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी सभागृहात त्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. परंतु यासंदर्भातील मला वस्तुस्थिती सांगायची आहे . तहसील कार्यालयामध्ये **** ****

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई......

यापूर्वी देखील ते हा विषय एकदा बोलले होते. सातत्याने तेथील सर्व सीसीटीव्ही फुटेज आम्ही पाहायला लावलेले आहे. तेथील जवळच्या सर्व कर्मचाऱ्यांची, त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या बाहेरच्या लोकांची.....(अडथळा)

**उप सभापती :** सन्माननीय गृहराज्यमंत्री महोदय, आपल्या सभागृहामध्ये ज्यावेळी महिलांवरील अत्याचाराबाबत मुद्दा मांडत असताना शक्यतोवर काय प्रकारचा लैंगिक अत्याचार केला, याचे वर्णन करु नये, असा आपण संकेत सर्वसाधारणत: पाळतो....(अडथळा).... माझे पूर्ण ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी देखील याबाबतचा उल्लेख केला होता. त्यावेळी त्यांची संभाषणे काय झाली, काय नक्की प्रसंग झाला, हे सर्व त्यांनी सभागृहात मांडले होते. परंतु त्यावेळी मी एवढयासाठी यावर काहीही म्हटले नव्हते, कारण त्यावेळी अगोदरच सभागृहात खूप गडबड, गोंधळ चालला होता. सभागृहात अगोदरच वाद झाला होता. सन्माननीय गृह राज्यमंत्री मला येथे आता मुद्दा नमूद करायला पाहिजे की, स्व.आर.आर.पाटील ज्यावेळी गृहमंत्री होते, त्यावेळी छोटया मुलींवर कसा अत्याचार झाला,

यानंतर श्री.सोनावणे.....

**उप सभापती**......

त्याचे वर्णन बातम्यांमध्ये केले होते आणि स्वाभाविकपणे सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम ९३ मध्ये किंवा लक्षवेधी सूचनेमध्ये उपस्थित केले होते. अत्याचार होत असून, त्याचे वर्णन करावयाचे किंवा कसे यासंबंधी प्रत्येक सन्माननीय सदस्यांची वेगवेगळी मते असू शकतात. मी पीठासीन अधिकारी यानात्याने सदनाला सांगू इच्छिते की, प्रत्यक्षात काय घडले याचा जो तपशील असतो तो जेवढा सांकेतीक पध्दतीने पुनश्च शाब्दिक हनन होणार नाही असे बंधन पाळले तर ते अधिक चांगले होईल असे मला वाटते. आपण तपशीलामध्ये गावाचे किंवा पीडित महिला भगिनीचे नाव घेऊ शकत नाही. ही सुध्दा बंधने सन्माननीय सदस्यांनी पाळली पाहिजेत आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर, प्रवीण दरेकर, डॉ. रणजित पाटील इत्यादी मान्यवरांनी मोठ्या पदांवर कामे केलेली आहेत. यांच्याकडून आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडूनसुध्दा माझी अशी अपेक्षा आहे की, एखादा मुद्दा मांडल्यानंतर थोडेसे मार्गदर्शन करुन संयम आणि विवेक सांभाळला गेला पाहिजे. माननीय गृह राज्यमंत्री महोदयांच्या भाषणात माझा व्यत्यय आणण्याचा हेतू नव्हता. मी ते रेकॉर्डवर आणण्यासाठी प्रयत्न केलेला असल्यामुळे त्यांनी काय बोलले ते आपण पुनश्च तसेच्या तसे उल्लेख करु नये.

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदया, होय. मी ते शब्द मी मागे घेतो. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी ज्या प्रकरणाचा उल्लेख केलेला आहे, असा कोणताही प्रकार तहसील कार्यालयात घडलेला नाही. हे प्रकरण खाजगी टॅव्हल कंपनीमध्ये घडलेले असून, तसे प्रकरण त्या ठिकाणी घडणे हे देखील योग्य नाही. सरकारी कार्यालयात महिला भगिनी सुरक्षित नाहीत असे भासविण्याचा प्रयत्न केलेला असून, ते मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. मी या प्रकरणाची दोन दिवस सीसीटीव्हीच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करण्यासाठी सांगितले होते. असा प्रकार घडलेला नाही. हे प्रकरण खाजगी टॅव्हल कंपनीमध्ये घडलेले आहे. याबाबतीत कोणीही तक्रार केलेली नाही. संबंधित खाजगी टॅव्हल कंपनीने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली नाही. त्यांनी तक्रार केल्यानंतर संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे मी सांगू इच्छितो.

असुधारित प्रत

श्री. शंभुराज देसाई..........

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी बारामती शहर पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक श्री. नामदेव शिंदे यांच्याबद्दल तक्रार केलेली आहे. त्यांनीसुध्दा महिलांप्रती गैरवर्तण केले, व्हिडीओ रेकॉर्डिंग प्रसिध्द झाले, ते सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी नेहमीच्या सवयीनुसार तावातावाने भाषण केलेले आहे. ही केवळ एका पोर्टलवर बातमी छापून आलेली आहे. यामागची सत्यता सन्माननीय सदस्यांनी पडताळलेली नाही. व्हिडीओ रेकॉर्डिंग नाही आणि कोणीही ते पाहिलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी रेकॉर्डिंग आहे, अमुक लॉजवर तो प्रकार घडला असे यांच्या नेहमीच्या सवयीनुसार तावातावाने सांगितलेले आहे. असे असले तरी विभागाने संबंधित कर्मचाऱ्याची कंट्रोल रुममध्ये बदली केलेली आहे. अशा प्रकारे सरकारची प्रतीमा खराब करण्याचा प्रयत्न होत असून, तो बरोबर नाही.

सभापती महोदया, सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी दुसरी एक तक्रार केलेली आहे. डीवायएसपीने संबंधित महिला भगिनीचा अवमान केला होता. संबंधित महिलेची तक्रार दाखल करुन घेतली नाही. त्यामुळे त्या महिला भगिनीने मंत्रालयासमोर येऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी उपस्थित केला होता. श्री. संदीप वामन लगड हा त्रीदल सेवा संघ नावाची संघटना चालवितो. तो असा म्हणतो मी, सैन्य दलातील सेवानिवृत्त अधिकारी आहे. याबाबत माझ्याकडे इथ्यंभूत माहिती आहे. श्री. लगड यांनी अनेक खोट्या तक्रारी केलेल्या आहेत. माहिती अधिकारात अर्ज देऊन अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. संबंधित महिला ॲडव्होकेट होती. अशाच एका प्रकरणात डीवायएसपीकडे संबंधित महिला भगिनी तक्रार करण्यासाठी गेली होती. सदर महिलने तिच्या दिराच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणून संबंधित एसडीपीओच्या कार्यालयात गेल्या होत्या. त्यावेळी संबंधित महिलेने त्या ठिकाणी असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसमवेत उद्धट वर्तण केले आणि सरकारी कामामध्ये

श्री. शंभुराज देसाई..........

अडथळा निर्माण केल्याबद्दल तिच्या विरोधात तेथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच श्री. लगड यांच्या विरोधात एकूण ६ वेगवेगळे गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच संबंधित महिलेच्या विरोधात एकूण ३ वेगवेगळे गुन्हे दाखल झालेले आहेत. महिलेचा विनयभंग आणि चारित्र्य हनन केल्याचे सांगितले आहे. याची दखल न घेतल्यामुळे म्हणून त्या महिलेने मंत्रालयासमोर महिलेने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. यामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारे सत्यत्ता नाही. संबंधित महिलेचे बॅकग्राऊंड काय आहे ते यावरुन दिसून येत आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी एका प्रकरणात असे सांगितले होते की, एका पोलीस उपनिरीक्षकाने एमपीएसची परीक्षा देणाऱ्या एका विवाहित महिलेला पळवून नेले होते. या प्रकरणाची इथ्यंभूत माहिती माझ्याकडे आहे. वेळेची मर्यादा असल्यामुळे मी संपूर्ण प्रकरण सांगणार नाही. या प्रकरणी संबंधित महिलेचा जबाब आमच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षकांनी नोंदवून घेतलेला आहे. त्यावेळी संबंधित महिलेने कोणतीही तक्रार केलेली नव्हती. असे असले तरी या प्रकरणारत माननीय विरोधी पक्षनेते किंवा इतर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर या प्रकरणाची पुनश्च फेर तपासणी आम्ही करण्यासाठी तयार आहोत. विरोधी पक्षाकडे या प्रकरणाची अधिकची माहिती द्यावी. फेर चौकशी आवश्यकता असल्यास ती केली जाईल. परंतु, नाहकपणे सरकारला आणि पोलीस दलाला जाणीवपूर्वक टार्गेट करुन बदनाम करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते सहन केले जाणार नाही.

सभापती महोदया, अनेक सन्माननीय सदस्यांनी तक्रारी दिलेल्या आहेत. त्याबाबतीत मी माहिती देणार आहे. आटपाटीमध्ये श्री. ब्रम्हानंद पडळकर यांच्या प्रकरणाची सविस्तर माहिती माझ्याकडे आहे. वाळू बेकायदेशीरपणे नेत असताना आमच्या पोलीस अधिकाऱ्याने अडवून त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई केली. तसेच अडविलेले वाळूचे वाहन सोडून द्या असे सांगण्यासाठी श्री. ब्रम्हानंद पडळकर

अस्धारित प्रत

श्री. शंभुराज देसाई..........

यांचा फोन आला होता. हे आमच्या पोलीस अधिकाऱ्याने ऐकले नाही म्हणून त्याच्या विरोधात तक्रार दिलेल्या आहेत. एका प्रकरणावरुन सभागृहात दोन दिवसांपूर्वी गोंधळ झाला होता. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी सदनाची दिलगिरी व्यक्त केली होती. त्यावेळी मी गुन्हेगार आहे असे ते म्हणाले होते. अहिल्यादेवी होळकरांचा पुतळा बसविण्याच्या आदोलनात मला अटक झाली म्हणून मी गुन्हेगार आहे. टेंभू योजनेचे पाणी शेतकऱ्यांना मिळावे म्हणून मी आंदोलन केले म्हणून मी गुन्हेगार आहे असे सांगितले होते. मी या दोन गुन्ह्यांचा उल्लेख केलेलाच नव्हता. मी कोणाच्याही गुन्ह्यांची जंत्री वाचण्यासाठी या ठिकाणी उभा नाही. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांच्या विरोधात एकूण ३२ गुन्ह्यांची नोंद आहे. या गुन्ह्यांपैकी मी गंभीर गुन्ह्यांची माहिती सदनला देऊ इच्छितो.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांच्यावर सांगली जिल्ह्यातील आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये १७/१२/२००९ रोजी गर्दी-मारामारी प्रकरणी गुन्हा दखल झालेला आहे. त्यानंतर १५/०४/२०१० रोजी दरोडा व बेकायदा जमाव प्रकरणी कलम ३९५, १४३, १४७, १४८, १४९, ३४१, ३२४ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. त्यानंतर पुन्हा गर्दी-मारामारी प्रकरणी कलम १४३ व १४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सरकारी नोकरांवर हल्ला प्रकरणी कलम ३४१ ,३३२ व ३५३ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. त्यानंतर पुन्हा गर्दी-मारामारी प्रकरणी कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ५०४ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ०४/०१/२०२२ रोजी ठगबाजी आणि ॲट्रोसिटीचा देखील गुन्हा दाखल झालेला आहे. फिर्यादीची जमीन खरेदी केल्यानंतर ठरल्याप्रमाणे खरेदीची रक्कम दिली नाही.. मी महत्त्वाचे असलेले केवळ ८-९ गुन्हेच या ठिकाणी वाचले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर ज्या गुन्ह्यांबाबत सांगत होते ते गुन्हे मी वाचलेलेच नाहीत. ते गुन्हे अजून न्यायप्रविष्ट आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी उल्लेख केल्यानुसार अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा बसविण्याप्रकरणी जेजुरीमध्ये आणि टेंभू योजनेच्या पाणी प्रकरणी कराड येथे गुन्हा दाखल आहे. हे गुन्हे मी वाचलेले नाहीत. मी केवळ सांगली जिल्ह्यातील व आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्हांचाच उल्लेख केला आहे.

सभापती महोदया, अशा पद्धतीने गर्दी जमविणे, मारामारी, दरोडा, जमाव जमविणे, ॲट्रोसिटी, फसवणूक करणे प्रकरणी सन्माननीय सदस्यांवर गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांबरोबरच त्यांच्यावर परराज्यात दाखल झालेला गुन्हा मला सभागृहात ऑन-रेकॉर्ड सांगता येत नाही. कर्नाटक राज्यात सुद्धा अशा पद्धतीचे प्रसंग घडल्याची आमच्याकडे माहिती आहे. परंतु या घटना दुसऱ्या राज्यातील असल्यामुळे त्या राज्याच्या सरकारकडून अधिकृतपणे आपल्या सरकारला जोपर्यंत

श्री.शंभुराज देसाई.....

कळविण्यात येत नाही तोपर्यंत मी त्या घटनेप्रकरणी भाष्य करु शकत नाही. त्या सरकारकडून या घटनेप्रकरणी जरुर माहिती मागविण्यात येईल.

सभापती महोदया, सभागृहात केवळ आवाज वाढवून बोलण्याचे, आवेशाने बोलण्याचे आणि चांगले काम करणाऱ्या यंत्रणेला नाहक बदनाम करण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांच्याकडून केले जाते. परवा सुद्धा त्यांनी पुणे ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांना निलंबित करा, सोलापूरच्या पोलीस अधीक्षकांना निलंबित करा, अमुक पोलीस अधीक्षकांना निलंबित करा, अशा प्रकारची मागणी केली. ज्यांच्यावर ३२ गुन्हे आहेत, जे स्वत: ३२ गुन्ह्यांमध्ये आरोपी आहेत त्यांनी आरोपींना शोधणाऱ्या आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी करणे ही हास्यास्पद बाब आहे. मी सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था निश्चितपणे अबाधित राखण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केलेला आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक यांनी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आणि त्यावर आपण सुद्धा निर्देश दिले की, उक्त बाब प्रकरणी राज्य सरकारने निर्णय घ्यावा. राज्याचे सार्वजनिक बांधकाम तथा नगर विकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद असताना त्यांनी स्वर्गीय आर.आर.पाटील यांच्याप्रमाणे स्वत:हून माननीय मुख्यमंत्र्यांकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळण्यासाठी आग्रह धरला होता. मी दोन-तीन महिन्यापूर्वी गडचिरोली येथे जाऊन आलो. मी दिवसभर तेथील रिमोट एरियातील पोलीस चौक्यांमध्ये गेलो होतो. माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी पालकमंत्री या नात्याने गडचिरोली जिल्ह्यात फार चांगले काम केले आहे. त्यामुळे नक्षवाद्यांच्या चळवळीने त्यांच्या बोली भाषेत पत्र लिहून माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे, त्यांचे चिरंजीव माननीय खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, मंत्री महोदयांच्या सौभाग्यवती यांना धमकीचे पत्र पाठविले. त्यांनी

श्री.शंभुराज देसाई.....

असुधारित प्रत

ते पत्र आमच्या विभागाकडे दिले. ते पत्र प्राप्त झाल्यानंतर मी तातडीने गृह विभागाची बैठक घेतली. मी इंटेलीजन्स अधिकाऱ्यांना बोलावून माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षेचा आढावा घेतला. या प्रकरणी मी दोन बैठका घेतल्या आहेत. राज्याचे मंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री.एकनाथ शिंदे व त्यांच्या कुटुंबियांना अधिकची सुरक्षा देण्याचा निर्णय आम्ही त्या बैठकीत घेतला. आज आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षेबाबत अधिवेशन संपण्यापूर्वी पुन्हा एकदा आढावा घेतला जाईल. त्यांना जी अधिकची सुरक्षा पुरविण्यात आलेली आहे त्यात अजून वाढ करावी लागली तर ती सुद्धा पोलीस विभागाकडून करण्यात येईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर क्राईम वाढला असल्याचे संगितले. नागपूरचा क्राईम रेट जास्त असून तो कमी करण्याबाबत प्रयत्न करावेत, अशी चांगली सूचना त्यांनी केली. मागील पाच वर्षात हाच प्रकार सातत्याने पुढे येत होता. तत्कालीन गृह मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी नागपूरसाठी काही विशेष योजना तयार केल्या होत्या. नागपूर, पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड, अमरावती, संभाजी नगर या सारख्या मोठ्या शहरांमध्ये जेथे लोकसंख्या जास्त आहे, वर्दळ जास्त, व्यवसाय जास्त आहे, जेथे गैरप्रकार करणाऱ्या लोकांच्या टोळया आहेत त्या संदर्भात मोठा ड्राईव्ह विभागाच्या माध्यमातून घेण्याच्या सूचना राज्याच्या पोलीस महासंचालकांना निश्चितपणे दिल्या जातील.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी पोलीस भरतीचा मुद्दा मांडला होता, त्यावर मी उत्तर दिले आहे. गुन्हेगारीच्या प्रमाणात किती वाढ झाली हे त्यांनी निदर्शनास आणून दिले, त्याचा सुद्धा मी उल्लेख केला आहे.

श्री.शंभुराज देसाई.....

त्यांनी सांगितले की, महाविकास आघाडीचे सरकार आल्यापासून पोलिसांमध्ये सुसूत्रीकरण पाहण्यास मिळत आहे. या बाबतचा देखील मी उल्लेख केला आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा मुद्दा किंवा इतर अनेक मुद्दे आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी या मुद्यांचा उल्लेख केला. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या वर्षी सरकारने आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासाठी अधिकची तरतूद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सारथी असेल, बार्टी असेल या संस्थांच्या धर्तीवर आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला निधी उपलब्ध करुन दिला आहे. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांमार्फत सुशिक्षित बेरोजगारांना व्याज परतावा देण्याचे काम करण्यात येते. यासाठी पुरेशी तरतूद महामंडळाकडे उपलब्ध झालेली आहे. महामंडळाला जेवढ्या निधीची गरज लागेल तेवढी गरज पूर्ण केली जाणार आहे.

सभापती महोदया, ओबीसी आरक्षणाचा विषय सुद्धा या प्रस्तावामध्ये आहे. कोणत्याही ओबीसींचे राजकीय वा इतर आरक्षण असेल तर ते टिकले पाहिजे. यासाठी महाविकास आघाडीला जे काही करावे लागेल ते करण्याची सरकारची तयारी आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे साहेब, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार साहेब आणि माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात या तिघांचे या प्रश्नाकडे सातत्याने लक्ष आहे. इम्पीरिकल डाटा गोळा करण्यासाठी डेडीकेटेड कमीशन स्थापन करण्याची सुद्धा मंत्रिमंडळामध्ये चर्चा झालेली आहे. या कमीशनसाठी जेवढा निधी लागेल तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. या कमीशनला पूर्ण वेळ काम करावयाचे असेल तर ते पूर्ण वेळ काम करु शकतात. यासाठी जादा मनुष्यबळ, जादा यंत्रणा लागली, जादा सामुग्री लागली किंवा जे काही लागेल ते सर्व निधीसह देण्याची तयारी राज्य सरकारने केलेली आहे.

श्री.शंभुराज देसाई.....

सभापती महोदया, मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने वसतिगृहांचा प्रश्न सातत्याने या ठिकाणी उपस्थित केला गेला. महाविकास आघाडी सरकारने १४ वसतिगृहे तातडीने सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासाठी राज्य सरकारचे कसोशीने प्रयत्न सुरु आहेत. नव्याने जागा उपलब्ध करुन इमारत बांधण्यापेक्षा ज्या

इमारती उपलब्ध आहेत किंवा ज्या भाडे तत्त्वावर मिळणार आहेत त्या जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. लवकरात लवकर ही वसतिगृहे सुरु करण्यात येतील.

सभापती महोदया, मराठा समाजातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती असेल, स्पर्धा परीक्षा सवलत असेल, परीक्षा शुल्क माफी असेल, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती असेल, या सर्वांसाठी ज्या ज्या विभागांत आर्थिक तरतूद करण्याची गरज असेल ती करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांनी नेहमी सांगितले आहे की, या सर्व योजनांसाठी जेवढी वित्तीय तरतूद लागेल तेवढी उपलब्ध करुन देण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार सकारात्मक राहील.

सभापती महोदया, मला उत्तरासाठी दिलेल्या वेळेत जवळजवळ सर्व मुद्यांचा ऊहापोह करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. तरी सुद्धा काही सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना उत्तर द्यायचे राहीले असेल तर त्या बाबत जरुर विभागाकडून माहिती घेण्यात येईल. जे काही सकारात्मक करता येईल किंवा या तिन्ही विषयांच्या बाबतीत ज्या चांगल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी सरकारकडे दिल्या असतील त्यावर निश्चितपणे सकारात्मक विचार करण्यात येईल, एवढीच ग्वाही या निमित्ताने देतो.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. शंभूराज देसाई ....

एवढी ग्वाही मी या निमित्ताने देतो. माझ्या उत्तराचा समारोप करताना मी एवढेच सांगेन की, महाविकास आघाडी सरकारने राज्यातील जनतेच्या सुरक्षेला प्राधान्य दिले आहे आणि तसे करीत असताना या जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी ज्या पोलीस दलावर आहे, त्या पोलीस दलाला देखील बळकट करणे, सक्षम करणे, लागणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे याही बाजूकडे महाविकास आघाडी सरकारचे, आदरणीय मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे साहेबांचे विशेष लक्ष आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आणि क्राईम रेट कमी करणे यालाच महाविकास आघाडी सरकारचे प्राधान्य राहील आणि त्या पध्दतीने आमची वाटचाल असेल एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि ज्या सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत, त्या चांगल्या सूचनांचे स्वागत करतो. धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदया, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी नियम २६० च्या प्रस्तावाला उत्तर देताना मी विचारलेल्या अनेक प्रश्नांना बगल देण्याचा अत्यंत नियोजनबध्द प्रयत्न केल्याचे दिसत आहे. त्यांच्या उत्तरात सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांच्या केसेसचा उल्लेख नाही असे जर झाले असते तर आम्हाला कदाचित आश्चर्य वाटले असते. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांच्यावर जे गुन्हे आहेत, त्या संदर्भात न्यायालयाला जो काही निर्णय घ्यायचा असेल तो घेईल. गुन्हा दाखल झाला म्हणजे तो आरोपी होत नाही. परंतु गंभीर गुन्ह्यांचा उल्लेख करीत असताना बॉंबस्फोटाच्या आरोपीशी संबंध असलेले, आर्थिक व्यवहार करणारे माननीय मंत्री अजून मंत्रिमंडळात आहेत, त्याचे उत्तर काय, त्यांचा राजीनामा का घेतला नाही यावर भाष्य करण्यात आलेले नाही. दुसरे अनेक प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांचा उल्लेख करीत असताना मी अनेक नावे देईन. शेवटी त्यांनी काढल्यावर आम्हालाही काढले पाहिजे.

सभापती महोदया, एका पक्षाचे श्री. रघुनाथ कुचिक नावाचे नेते आहेत. मी आपल्याला व्हॉट्स ॲपचे चॅट पाठवितो, त्या व्हॉट्स ॲपचे चॅट मी वाचणे आपण

श्री. प्रवीण दरेकर ....

दिलेल्या सूचनेप्रमाणे योग्य होणार नाही. त्या महिलेच्या संदर्भात, श्री. रघुनाथ कुचिक यांनी त्या पीडित महिलेच्या संदर्भात जो प्रकार केला आहे, तो आपल्याला माहीत आहे. आपण पुण्याच्या आहात. मी ते आपल्याकडे पाठवितो. आपण ते समजून घ्यावे. आपण जाणीवपूर्वक गुन्हे दाखल करीत आहात असा माझा स्पष्ट आरोप आहे. मेहबूब शेख यांच्या बाबतीत देखील काय झाले हे महाराष्ट्रातील जनतेने पाहिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांच्यासारखे सदस्य आहेत, त्यांचे चूक, बरोबर हा न्यायालयामध्ये निकाल लागेल, तेव्हा ठरेल. परंतु धनगर समाजातील तरुण नेतृत्व पुढे येत आहे, त्याचेच पोटशूळ महाविकास आघाडी सरकारला असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसत आहे. मी त्यांच्या माध्यमातून गुन्हेगारांची यादीच वाचतो.

सभापती महोदया, एक गुन्हेगार तर मंत्रिमंडळात आहेत. मेहबूब शेख यांच्या विषयी काही उल्लेख झाला नाही. माननीय पंतप्रधानांना शिव्या दिल्या. माननीय पंतप्रधानांना मी मारु शकतो असे वक्तव्य एक नेता करतो. त्यांच्यावर कारवाई करीत नाही. माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांच्याकडून आयटम गर्ल म्हणून सन्माननीय किरीट सोमय्या यांना बोलले जाते. त्यांच्यावर कारवाई होत नाही. कारवाया सिलेक्टेट होतात.

**उप सभापती** : मी सभागृहाची वेळ १० मिनिटांकरिता वाढवित आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदया, कारवाया सिलेक्टेड होत आहेत हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणायचे आहे. आपण क्राईम सिटी म्हणून नागपूरचा उल्लेख करता. कारण त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री नागपूरचे होते. आता आपण पुण्याच्या आहात. पुण्याला क्राईमची काय परिस्थिती आहे, किती क्राईम झाले याचा लेखाजोखा मांडावा. बीडला काय झाले पहा. बीडला जिल्हाधिकारी कार्यालयात एकमेकांवर गोळीबार केला. हा क्राईम नाही का ? क्राईमला जात नसते, धर्म नसतो, पक्ष नसतो हे आपण उत्तर देताना समजून घेण्याची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळे

श्री. प्रवीण दरेकर ....

मी क्राईमच्या संदर्भात क्रमांक दिले आहेत. मला काही आनंद होत नाही. आपल्या राज्याचे गुन्हेगारीमध्ये वर नाव असणे हे आपल्याला शोभा देणारे नाही. पहिले एक ते पाच निकष होते. एक किंवा दोन निकष होते. कुठेही असो पण आपले राज्य गुनहेगारीमुक्त असले पाहिजे अशी भूमिका तुमची, आमची सर्वांची असली पाहिजे.

सभापती महोदया, मराठा आरक्षणाच्या संदर्भात उल्लेख केला. आपण अण्णासाहेब पाटील महामंडळाला किती तरतूद केली, सारथीला किती तरतूद केली ? आपण मौलाना आझाद मंडळासाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून ७०० ते ८०० कोटी रुपयांची तरतूद करता. सामाजिक असंतुलन योग्य नाही. मराठा, धनगर समाज आहे. धनगर समाजासाठी १ हजार काटी रुपयांची त्यावेळी तरतूद होती. आपण धनगर समाजाला आरक्षण देऊ शकत नाही. परंतु तत्सम सवलती धनगर समाजासाठी आहेत, त्या पाहिजेत. ....(अडथळा).... घोषणा केली होती, त्यानंतर तुम्ही सरकारमध्ये आला. आम्ही, तुम्ही करण्यापेक्षा मी सरकार म्हणून बोलत आहे. तुम्ही सत्तेवर बसल्यावर तुमची जबाबदारी आहे. तुम्ही सत्तेत होता. तुम्ही सहभागी होता. धुतल्या तांदळासारखे आपण विभक्त झालो म्हणजे आपली जबाबदारी संपली असे होत नाही. आपली देखील तेवढीच जबाबदारी आहे. समाजांमध्ये मोठ्या प्रमाणत असंतोष दिसत आहे. आपण सांगितले की, मी आपल्याला नावे देणार होतो. मी ठिकाणे सांगितली होती.

सभापती महोदया, मी नवी मुंबईचे ठिकाण सांगितले होते. एपीएमसी मार्केटच्या बाजूला, दहिसर चेकनाक्याला खुलेआम डान्स बार सुरु आहेत. मुलुंड, ठाणे अशी ठिकाणे आहेत. त्या बारचे नाव, मालकाचे नाव, त्याचा नंबर ही माझी जबाबदारी आहे का ? ही जबाबदारी सरकार म्हणून आपली आहे. आम्ही आपल्या निदर्शनास एखादी गोष्ट आणल्यानंतर त्याचे उत्तर किंवा त्यावर उपाय शोधण्याची जबाबदारी आपली आहे. हे खरे आहे की, आपण पोलिसांच्या वसाहतीसाठी चांगल्याप्रकारे तरतूद करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांसाठी ही रक्कम कमी आहे. तथापि आपण त्यांच्यासाठी रक्कम वाढवित आहात ही देखील जमेची बाजू

श्री. प्रवीण दरेकर ....

आहे. मी त्याबाबत आपले अभिनंदनही करेन. परंतु आज पोलिसांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. आपण पोलिसांसाठी तरतूद करीत असतो, तेव्हा झुकते माप असले पाहिजे. मुंबईच्या पोलीस वसाहती आहेत. शिवडी पोलीस वसाहत आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री. कालिदास कोळंबकर सातत्याने त्याच्या पुनर्विकासासाठी प्रयत्न करीत आहेत. मुंबईतील पोलीस वसाहती संदर्भात एकदा बैठक घेऊन त्यांचा पुनर्विकास करण्याबाबत पहावे. तेथे भेट द्यावी, समजून घ्यावे आणि बैठक घेऊन पोलिसांच्या वसाहतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न देखील मार्गी लावावा, अशी विनंती करतो आणि तसे आपण कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, नियम २६० च्या प्रस्तावात परिवहन विभागाचा विषय आहे. आपण एसटीच्या प्रश्नाला स्पर्श केलेला नाही. आजही एसटी कर्मचारी आंदोलन करीत आहेत. आजही आत्महत्या करीत आहेत. काल, परवा देखील एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या. तुम्ही उत्तर देताना, महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात संवदेना कशा राहिल्या नाहीत ? आपले भाष्य आले नाही. माझी या संदर्भात विनंती राहील. संपाच्या संदर्भात परवा माननीय सभापतींनी हस्तक्षेप करीत त्यातून मार्ग काढला होता. एक समिती देखील नेमली. आमची बैठक झाली. अत्यंत सकारात्मक बैठक झाली. त्यावेळी माननीय सभापती होते, माननीय परिवहन मंत्री होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांशी, माननीय उप मुख्यमंत्र्यांशी बोलून विलिनीकरणसदृश लाभ देण्यासंदर्भात एकमत झाले होते. सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात एकमत झाले होते. कुठे माशी शिंकली माहीत नाही. माझी माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांना विनंती आहे की, आपण परिवहनच्या संपामध्ये स्वत: लक्ष घालावे. कारण माननीय परिवहन मंत्र्यांची मानसिकता होती, ते "होय" म्हणाले होते, नंतर माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे साहेबांनी देखील सकारात्मक भूमिका घेतली होती, असे त्यांनी मला सांगितले होते.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.प्रवीण दरेकर....

परंतु वित्त विभागाकडे ती फाईल का अडकली, किती रकमेचे बर्डने येते त्याचा विचार करुन टप्पे ठरविण्यात यावेत. एस.टी.कर्मचारी आत्महत्या करीत आहेत त्या थांबविण्याची जबाबदारी सरकारची आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा होत नाहीत, दुय्यम निवड मंडळाच्या परीक्षा होत नाहीत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही विश्वासार्ह संस्था आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सशक्त करुन त्यांच्या माध्यमातून परीक्षा घेतल्या तर अशा प्रकारचे घोटाळे निश्चितपणे होणार नाहीत.

**उप सभापती** : विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांचे म्हणणे थोडक्यात सांगावे, आणखी दोन तीन सदस्यांना बोलायचे आहे त्यानंतर मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मी प्रस्तावात जे मुद्दे उपस्थित केले त्या मुद्यांची उत्तरे मंत्री महोदयांकडून मिळालेली नाहीत. तेच मुद्दे मी पुन्हा मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे. मी एक ते दोन मिनिटात मुद्दे सांगतो. सभापती महोदया, बदल्यांच्या रॅकेटमध्ये अहवाल सादर झाला होता, त्यांच्यातील दोषी लोकांवर वर्षभरात काय कारवाई करण्यात आली. उलट ज्यांनी बदल्यांच्या रॅकेटचा पर्दाफाश केला त्या विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांना शासनाने नोटीस पाठविली आहे. चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे काम हे सरकार करीत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांना नोटीस पाठविण्यात आली. पुन्हा असे सांगतात की, आम्ही अशा सहा नोटीसी पाठविल्या आहेत. पहिल्या नोटीसी पाठविल्या त्याबाबत या गुन्ह्यात मदत व्हावी अशा प्रकारची प्रश्नावली होती. आता काय जादूची कांडी झाली. मंत्री महोदय श्री.नवाब मलिक यांचा राजीनामा मागतो, सरकारला वेगवेगळ्या प्रकारे हैरान करतो म्हणून दंडेलशाही पध्दतीने विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांना नोटीसा पाठवून ते आरोपी आहेत असे चित्र उभे करण्याचा प्रयत्न हे सरकार करीत आहे. अशी नोटीस पाठविण्यात आली त्यावेळी मुंबईसह महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या मनात संताप निर्माण झाला. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व महाराष्ट्राला माहिती आहे. गेल्या पाच वर्षात स्वत:ची प्रतिमा स्वच्छ ठेऊन त्यांनी कारभार केलेला आहे. अशा प्रकारे हे

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

महाविकास आघाडी सरकार कारभार करीत असून केंद्रीय यंत्रणा आमच्यावर दबाव आणते असा उल्लेख केला जात आहे. मंत्री महोदयांकडे मी मागणी केली होती की, भ्रष्टाचार कमी करायचा असेल तर आयएएस व आयपीएस यांच्या संपत्तीची माहिती पोर्टलवर टाकण्यात येते. लोकप्रतिनिधी त्यांच्या संपत्तीची माहिती प्रतिज्ञापत्र देऊन सादर करतात. राज्यातील संवर्ग एक व त्यावरील सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या कुटुंबाच्या मालमत्तेचा तपशील वेबसाईटवर प्रकाशित करण्याचे बंधन घालावे अशी मागणी केली होती. आयएएस,आयपीएस व लोकप्रतिनिधी संपत्तीची माहिती जाहीर करतात, त्यामुळे वर्ग एक संवर्गातील अधिकाऱ्यांनी त्यांची व त्यांच्या कुटुंबाची संपत्ती वेबसाईटवर जाहीर करावी याबाबत मंत्री महोदयांनी भाष्य करावे. पोलिसांच्या भत्त्यात वाढ करावी. त्यांच्या कामाचे तास कमी करावेत. त्यांना ओव्हरटाईम भत्ता देण्यात यावा. अनुकंपा तत्वावरील भरती तातडीने करा. सेवानिवृत्ती नंतर आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. ही बाब मंत्री महोदयांनी मान्य केली होती. याबाबींचा उल्लेख मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात केला नाही. त्याबाबत खुलासा करण्यात यावा. मी वारंवार सांगतो की, मंत्री महोदय संवेदनशील आहेत. एखादा विषय आम्ही सांगतो त्यावेळी आपणाकडून त्याबाबत प्रामाणिक कृती होते. जे आता सुरु आहे त्याबाबत पोलीस प्रशासनाला ताकद देऊन दुरुस्त करावे लागेल. आमचे व तुमचे सरकार असे न करता कोणत्या सरकारचा क्राईम रेट कमी की जास्त होता याचा विचार न करता महाराष्ट्र राज्य सुरक्षित म्हणून देशात ओळख आहे ती कायम रहावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.धन्यवाद.

**उप सभापती** : म.वि.प.नियम २६० प्रस्तावावरील मंत्री महोदयांचे उत्तर व एखाद्या सदस्यांचा प्रश्न व पुन्हा मंत्री महोदयांचे उत्तर होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन तीन महत्वाचे मुद्दे एस.टी.कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत उपस्थित केले आहेत. विरोधी पक्ष नेत्यांना याबाबत कल्पना आहे की, मागील आठवड्यात चर्चेच्या वेळी सभापती

श्री.शंभूराज देसाई....

महोदयांकडे या विषयाबाबत बैठक झाली. या बैठकीत परिवहन मंत्री व इतर सन्माननीय सदस्य होते. त्याबैठकीत संघटनेच्या लोकांसोबत सकारात्मक चर्चा करुन धोरण ठरले आहे. राज्य सरकारच्या धोरणानुसार व स्लॅबनुसार ४१ टक्के पगारवाढ एस.टी.कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. आजपर्यंत एवढी पगारवाढ कधीही देण्यात आलेली नाही. परिवहन मंत्री महोदयांनी सभागृहात व मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगितले की, एक परिपत्रक व्हायरल झाले त्यानुसार कामावर हजर केल्यानंतर कारवाई करा. ते महामंडळाचे अधिकृत परिपत्रक नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली होती की, आम्हाला हजर व्हायला सांगतील व नंतर आमच्यावर कारवाई करतील. त्या परिपत्रकाचा महामंडळाशी कोणताही संबंध नाही असे मंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे. सरकार व परिवहन मंडळ एस.टी.कर्मचाऱ्यांसोबत सहानुभूतीने वागले आहे व यापुढेही वागणार आहे. वित्त विभागाशी संबंधित ज्या बाबी असतील त्याबाबत वित्तमंत्री महोदय व मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. हा संप मिटावा, सामान्य ग्राहक व प्रवाशांचे हाल होऊ नये या दृष्टीने सरकार सकारात्मक पावले उचलित आहे. त्याचबरोबर विरोधी पक्ष नेत्यांनी विधानसभेच्या विरोधी पक्ष नेत्यांना नोटीस का दिली व त्यांना अशा पध्दतीने का बोलविले असा उल्लेख केला.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य आपण खाली बसावे मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे त्यानंतर मी आपणाला बोलण्यास संधी देणार आहे. आपण त्यांना मध्ये अडवू नका. सकाळी आम्ही ४० ते ४५ मिनिटे विरोधी पक्ष सदस्यांची वाट पाहिली होती. आता पुन्हा प्रश्नोत्तरे विचारुन वेळ घेणे बरोबर नाही.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना असे म्हणायचे आहे की, मंत्री महोदय, उत्तर देत असताना ते सरकार म्हणून उत्तर देत आहेत. ते अर्थ राज्यमंत्री आहेत. पुन्हा या प्रकरणाबाबत वित्त विभागाकडे जाऊन

श्री.प्रवीण दरेकर...

चर्चा करु. सभागृह सुरु असते तेव्हा सरकारकडून उत्तरे देण्यात येतात. याबाबत त्यांनी भूमिका स्पष्ट करावी असे सन्माननीय सदस्यांना म्हणायचे आहे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदया, मी असे म्हणालो की, वित्त विभागाशी निगडीत जे प्रश्न असतील त्याबाबत वित्तमंत्री महोदय व आम्ही एकत्र बसून संप मिटण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करु.

**उप सभापती** : मी येथे असे नमूद करु इच्छिते की, परिवहन मंत्री ॲड.अनिल परब यांनी सभागृहात सांगितले होते की, अधिवेशनापर्यंत मला वेळ द्या. त्या कालावधीत या संदर्भातील निर्णय घेण्यात येतील. अधिवेशन संपण्याच्या दोन तीन दिवस समजा काहीच प्रगती झाली नाही तर आपण सभागृहात विषय उपस्थित करावा. त्यानंतर निर्देश देण्यात येतील.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदया, त्या बैठकीला आपणही होत्या. त्या बैठकीत सर्व ठरले होते, त्यानंतर फक्त निवेदन करायचे होते. माझी अशी माहिती आहे की, निवेदनाच्या ६०० प्रती तयार होत्या. असे असताना मध्येच काय झाले याची माहिती आपण घ्यावी अशी माझी सभागृहामार्फत आपणाला विनंती आहे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदया, विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले की, विधानसभा विरोधी पक्ष नेत्यांना नोटीस देण्यात आली. त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी बोलविले होते. या अगोदर त्यांना पाच पत्रे देण्यात आली होती. काल सहावे पत्र देण्यात आले होते. गोपनीय दस्तावेज राज्य शासनाच्या गुप्तचर विभागाकडे आहे तो कसा लिक झाला व बाहेर कसा गेला.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई..........

या अनुषंगाने सायबर सेलला काही माहिती अपेक्षित होती. यापूर्वी विधानसभेच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना ५ पत्रे पाठविण्यात आली होती. त्यापैकी त्यांनी एका पत्राचे उत्तर दिले होते की, मी आपल्याला माहिती देत आहे. परंतु ती मिळाली नाही. याच प्रकरणाशी संबंधित असलेल्या जवळपास २४ लोकांकडून माहिती घ्यावयाची होती. विभागाने त्या सर्व लोकांकडून माहिती घेतली होती. विधानसभेच्या माननीय विरोधी नेत्यांकडील माहिती प्रलंबित असल्यामुळे त्यांना पत्र देऊन त्यांच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अशा पद्धतीने जाणीवपूर्वक त्रास द्यावयाचा असे नाही तर सरकारी दस्तावेज, राज्य गुप्तचर विभागाकडील संवेदनशील माहिती अशा पद्धतीने बाहेर जात असेल तर त्यामध्ये कोण आहे, तो संबंध कोठपर्यंत आहे ही माहिती घेण्याच्या प्रामाणिक हेतूनेच पत्र देण्यात आले होते, यामध्ये कोणताही राजकीय हेतू नाही. ती माहिती तपासून घेतली जाईल. आणखी माहिती पाहिजे असेल तर त्यांच्याकडून पुन्हा माहिती घेतली जाईल. परंतु यामध्ये कोणताही राजकीय हेतू नाही.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सारथी संस्थेला व अण्णा साहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला किती निधी उपलब्ध करुन दिला याबाबत उल्लेख केला. मी मघाशीच सांगितले की, अण्णा साहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला व्याज परतावा देण्यासाठी या मार्च अखेरपर्यंत जेवढ्या निधीची आवश्यकता आहे तेवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. एप्रिल महिन्यानंतर म्हणजे अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी अण्णा साहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला जो निधी आवश्यक आहे तो दिला जाईल. कोणतेही प्रकरण प्रलंबित ठेवले जाणार नाही.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पोलिसांच्या बाबतीत तरतूद कमी असल्याचे सांगितले. परंतु मागील वेळेपेक्षा निश्चितपणे जास्त तरतूद करण्यात आलेली आहे. पोलिसांचे इन्फ्रास्ट्रक्चर, सुविधा चांगल्या ठेवण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाणार आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. गृह राज्यमंत्री महोदयांनी राईट ऑफ रिप्लायच्या माध्यमातून उत्तर दिलेले आहे. त्यांच्या कामाबद्दल आम्हाला शंका नाही. परंतु त्यांनी सागितले की, एखादा पोलीस चूक करतो आणि त्यांचा भूर्दंड संपूर्ण पोलीस विभागाला सहन करावा लागतो. पोलिसांची चूक आहे असे आम्ही कधीही म्हटलेले नाही. पोलीस भरतीमध्ये भ्रष्टाचार झाला. माजी गृहमंत्री आज तुरुंगात आहेत. त्या बदल्यांमुळे पोलिसांवर सातत्याने परिणाम होतो आणि ही चूक संपर्ण महाराष्ट्राने देखील मान्य केलेली आहे. काळबादेवी पोलीस स्टेशनमध्ये झोन-२ च्या माध्यमातून ३ पोलिसांना अटक करण्यात आली. राज्यात पोलिसांनी पुन्हा एकदा हवाला करणाऱ्या व्यक्तीकडून खंडनी मागण्याचे काम केले. पोलीस उपायुक्त यांना कायम स्वरुपी सुट्टीवर पाठविण्यात आले. पोलिसांच्या बाबतीत हे वेळोवेळी का होते हे सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला कळले पाहिजे. जोपर्यंत पोलिसांच्या बदल्यांमधील भ्रष्टाचार थांबत नाही तोपर्यंत अशा प्रकारच्या गोष्टी थांबणार नाहीत.

सभापती महोदया, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी पोलिस हाऊसिंग संदर्भात सांगितले. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. आपण सांगितल्याप्रमाणे १५० कोटी रुपयांनी तो आकडा वाढविण्यात आलेला आहे. परंतु मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी हा प्रश्न सभागृहात दोन-तीन वेळा उपस्थित केला होता. विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.कालीदास कोळंबकर विधानसभेत सातत्याने हा प्रश्न मांडतात. ज्यावेळी दत्ता पडसळगीकर मुंबईचे पोलीस आयुक्त होते, त्यानंतर संजय बर्वे होते, त्यावेळी मुंबईतील संपूर्ण हाऊसिंग सोसायटीचा प्लॅन तत्कालीन पोलीस आयुक्तांकडे सादर करण्यात आला होता. गृह राज्यमंत्री महोदय आपण माहीम, माटुंगा, ताडदेव किंवा अंधेरी येथील पोलीस कॉलनीमध्ये गेलात तर आपल्याला तेथे भयावह परिस्थिती बघावयास मिळते. त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी पोलिसांच्या घराचे छत कसे पडते, त्यांचे कुटुंब तेथे कसे राहते ही परिस्थिती दाखविली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी पोलीस हाऊसिंगसाठी वेगळा निधी देण्याची काम केले होते आणि पोलीस हाऊसिंग म्हाडाच्या धर्तीवर तयार करण्याचा प्रस्ताव देखील तयार

श्री.प्रसाद लाड.......

केला होता. मला सांगताना अतिशय वाईट वाटते की, पोलीस हाऊसिंगच्या डीजी यांना ज्युनिअर इंजिनिअर यांच्या एवढे पैसे खर्च करण्याचा देखील अधिकार नव्हता. पोलीस हाऊसिंगचे रिपेअरिंग करावयाचे असेल तर त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घ्यावी लागते. पोलीस विभाग स्वतंत्र आहे. आपण पोलीस विभागात आयपीएस अधिकाऱ्याची नेमणूक करतो, एसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करतो. मग वेगळी यंत्रणा देऊन त्यांना रिपेअरिंगसाठी वेळा निधी का उपलब्ध करुन दिला जात नाही ? आपण मुंबई शहरात म्हाडाच्या माध्यमातून पत्रा चाळी सारख्या सोसायट्या विकसित करतो. मग पोलीस हाऊसिंग का विकसित होत नाही? मी सांगू इच्छितो की, आता पर्यंत बदल्यांच्या रॅकेट संदर्भातील अहवाल का सादर झाला नाही, हे देखील मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले पाहिजे. माननीय गृह राज्यमंत्री अशा प्रकारे सभागृहाची दिशाभूल करु शकत नाहीत.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, नागपूर शहरात मागील महिन्याभरात एकही खुनाची घटना घडलेली नाही. आयुक्तांनी चांगले काम केलेले आहे. मी माननीय गृहराज्यमंत्री व आयुक्तांना धन्यवाद देतो.

सभापती महोदया, नागपूर शहरातील तरुणांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे. तसेच गरीब, मध्यम वर्गीय नोकरदार लोकांनी प्लॉट घेतलेले आहेत त्यांचे प्लॉट हडपण्याचा धंदा नागपूर शहरात सुरु झालेला आहे. विशेषत: बेलतरुळी, अजनी, इमामवाडा पोलीस स्टेशन भागात गरीब लोकांचे प्लॉट हडप करण्याचा धंदा सुरु झालेला आहे. याकडे लक्ष द्यावे अशी माझी गृह राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदया, मोक्का लागलेले आरोपी रस्त्यावर फिरतात. वर्तमानपत्रात तशा बातम्या, फोटो छापून आलेले आहेत. ते नागपूरच्या पालकमंत्री महोदयांच्या बंगल्यासमोर दिसले हा चिंतेचा विषय आहे. पोलीस अधिकारी प्लॉट हडपणाऱ्या

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके.......

टोळ्यांसोबत काम करीत आहोत. त्यामध्ये एसीपी, डीसीपी, पीआय यांचा समावेश आहे. गरीब लोकांचे प्लॉट हडपण्यात येत आहेत. गरीब लोकांना त्रास होत आहे. माननीय गृह राज्मंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातून महत्वाच्या विषयाकडे सभागहाचे लक्ष वेधू इच्छितो. ७ डिसेंबर रोजी भुलेश्वर येथील अंगडीया असोसिएशनने तक्रार केली होती की, तेथील डीसीपी त्यांच्याकडे महिन्याला १० लाख रुपये हप्ता मागत आहेत. या संदर्भात एलटी मार्ग पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करण्यात येऊन ३ अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदविण्यात आला. असिस्टंट इन्स्पेक्टर श्री.नितीन कदम, सब इन्स्पेक्टर श्री.समाधान जामदडे व पोलीस इन्स्पेक्टर श्री.ओम वांगडे यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला. श्री.ओम वांगडे यांना अटकही झाली. परंतु मूळ तक्रार डीसीपी यांच्याबाबत होती. डीसीपी संदर्भात विभागाकडून अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. त्यांची पोस्टींग चेंज करुन, झोन चेंज करुन साईट ब्रँच करुन त्यांना रजेवर पाठविण्यात आले. स्पेसिफिक ज्या डीसीपींविरुद्ध एफआयआर दाखल झाला त्या संदर्भात अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. पोलीस इन्स्पेक्टर यांनी स्वत:च्या ॲंटिसिपेटरी बेलमध्ये कोर्टाकडे जो जबाब दिला होता त्यामध्ये सांगितले की, माझ्या बद्दल तक्रार नाही, डीसीपी यांच्या बद्दल तक्रार आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई न होता माझ्यावर कारवाई होत आहे हे गैर आहे. या संदर्भात कारवाई करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. तसेच, गृह राज्यमंत्री महोदयांनी ६ नोटीसेस संदर्भात उल्लेख केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्यापूर्वी जे जबाब नोंदविण्यात आले त्याच्यावर कोणती कारवाई करण्यात आली याबाबत सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याची शासनाने नोंद घेतलेली आहे.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

**उप सभापती..........**

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२ वाजून ९ मिनिटांनी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर .सांगळे......

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** प्रश्नोत्तरे.... प्रश्न क्रमांक १२०६६....

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आपल्याकडे काश्मीर फाईल्स नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला आहे....

**सभापती** : आपण प्रश्नोत्तरे झाल्यानंतर आपला पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन उपस्थित करावा.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, तारांकित प्रश्नासंबंधी संबंधित सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे मी माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन उपस्थित करीत आहे.

**सभापती** : ठीक आहे.

असुधारित प्रत

## काश्मीर फाईल्स चित्रपटासंबंधी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, आपल्या राज्यात काश्मीरमधील विषयासंबंधी काश्मीर फाईल्स नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. हा अतिशय उत्तम चित्रपट आहे. परंतु चित्रपटगृहाचे मालक त्या चित्रपटाचे पोस्टर्स चित्रपटागृहाबाहेर लावत नाहीत. तसेच चित्रपटगृह रिकामे असताना देखील चित्रपट हाऊसफुल असल्याचे सांगत आहेत. सर्वांना हा चित्रपट बघण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. महाराष्ट्र शासनाने आपल्या राज्यात सदर चित्रपट सुरु करण्यास अनुमती दिलेली आहे. जम्मू काश्मीरमध्ये बळी पडलेल्या हिंदूचे विषद वास्तव्य दाखविणारा हा चित्रपट आहे. हा चित्रपट नसून सत्य परिस्थिती आहे. परंतु ही बाब काही सेक्युलर मंडळींना आवडलेली दिसत नाही. काश्मीर फाईल्स चित्रपटाचे पोस्टर्स काढून टाकणे, चित्रपट सुरु असताना जाणीवपूर्वक आवाज बंद करणे, चित्रपटगृहामध्ये प्रवेश करणाऱ्या प्रेक्षकांना विरोध करण्याचे प्रकार सुरु आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, तातडीने काश्मीर फाईल्स या चित्रपटाला संरक्षण देण्यात यावे. तसेच चित्रपट प्रदर्शनात अडथळा करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करावी. हिंदूहृदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी वेळोवेळी काश्मीरमधील पंडितांना सहानुभूती दर्शविली होती. त्यामुळे आमची अशी मागणी आहे की, महाराष्ट्रात काश्मीर फाईल्स या चित्रपटाला शासनाने करमुक्त करावे. तसेच हा चित्रपट बघण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये. प्रेक्षकांना हा चित्रपट सोप्या पद्धतीने बघता यावा अशी आपल्याकडून अपेक्षा आहे.

**सभापती** : शासनाने याबाबत नोंद घ्यावी.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

---------

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**पाथरी (जि.परभणी) येथील गुंडांवर कारवाई करणेबाबत**

**(१) * १२०६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील कुख्यात गुंड मोहम्मद बीन सईद बीन किलेब व त्याचा मुलगा हे गरीबांना शस्त्रे दाखवून, धमक्या देऊन दहशतीचे वातावरण निर्माण करुन त्यांची मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले असून, सदर प्रकरणांची चौकशी करुन त्यांच्यावर MPDA कायद्यानुसार कारवाई करावी अशी मागणी परभणी येथील स्थानिक प्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे व नागरिकांनी मौखिकरीत्या विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र, नांदेड यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी नोंदविल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुख्यात गुंड किलेब व त्याच्या मुलाच्या विरूध्द असलेल्या तक्रारीवरुन त्यांच्याविरुध्द MPDA कायद्याप्रमाणे गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात आली आहे काय, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र, नांदेड यांना दिनांक २२/११/२०२१ रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे. तथापि, सदर तक्रार अर्जात एम.पी.डी.ए. कायद्यानुसार कार्यवाही करण्याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच नागरिकांनी याबाबत तोंडी तक्रार केल्याबाबत पोलीस स्टेशन अभिलेखात नोंद आढळून येत नाही.

(२) व (३) मोहम्मद बीन सईद बीन किलेब व त्याचा मुलगा यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने सीआरपीसी ११० अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)**

-----------------

**कोकणातील समुद्राच्या वाढत्या जल प्रदुषणामुळे मत्स्य**

## उत्पादनात घट झाल्याबाबत

**(२) * १२१७८ श्री.जयंत प्र.पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामधील कारखान्यांचे रसायनयुक्त पाणी समुद्रात व नद्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे, तसेच मागील दोन वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती व कोरोना प्रतिबंधामुळे समुद्र व नद्यांचे जल प्रदुषणात वाढ झाली असून त्याचा परिणाम कोकणातील मत्स्य उत्पादनावर झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जल प्रदुषणात वाढ झाल्यामुळे रायगड जिल्ह्यात सन २०१६-२०१७ ते सन २०२०-२०२१ या पाच वर्षात सुमारे साडे तीन हजार मे.टन मत्स्य उत्पादनात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोकणातील विशेषत: रायगड जिल्ह्यातील मत्स्य उत्पादनात वाढ होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) नैसर्गिक आपत्ती व कोरोना प्रतिबंधामुळे मत्स्योत्पादनात सन २०२०-२१ मध्ये घट झाली हे खरे आहे.

(२) रायगड जिल्ह्यातील सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या पाच वर्षातील मत्स्योत्पादनाच्या आकडेवारीवरून प्रत्येक वर्षात मत्स्योत्पादनात वाढ/घट झाल्याचे दिसून येते. सन २०१९-२० च्या प्रमाणात सन २०२०-२१ या वर्षात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मच्छिमार बांधवांना सक्षम पध्दतीने मासेमारी न करता आल्याने ३७७८ मे. टनानी घट झाल्याची दिसून येते.

(३) मासेमारी व्यवसायातील विविध गटांचे विशेषत: पारंपारिक मच्छीमारांचे हितसंबंध जपणे व शाश्वत मासेमारी व्यवस्थापनाद्वारे भविष्यकालीन मत्स्यसाठयाच्या जतनासाठी शासन आदेश दिनांक ०५/०२/२०१६ व इतर आदेशाद्वारे मासेमारीचे नियमन राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात केले आहे. शिवाय अवैध मासेमारीस आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र.१२१७८ ....

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज कोकणपट्टीमध्ये मत्स्य दुष्काळ आहे. केमिकल झोनमधून मोठया प्रमाणात प्रदूषण सुरु आहे. केमिकलयुक्त रासायनिक द्रव्ये समुद्रात सोडले जातात यासंबंधी राज्य शासन व आपल्या विभागाने किती अभ्यास केलेला आहे ? कोकण कृषी विद्यापीठ व शास्त्रज्ञ यांनी याबाबत कोणते संशोधन केलेले आहे ? रासायनिक द्रव्ये समुद्रात सोडल्यामुळे मासे मरत आहेत. परिणामी मत्स्य उत्पादन कमी होत आहे. ही बाब खरी आहे का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, मागील ५ वर्षांचा विचार केल्यास मत्स्य उत्पादनामध्ये घट आणि वाढ झाली असल्याचे आपल्याला दिसून येईल. विशेषत: सन २०२० आणि २०२१ मध्ये मत्स्य उत्पादनात घट होण्याचे मूळ कारण असे आहे की, करोना काळात मच्छीमारांना मासेमारी करता आली नाही. रायगडमध्ये मोठया प्रमाणात मासेमारी केली जाते. त्याप्रमाणे तेथे इंडस्ट्रीज देखील आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांडपाण्यासंबंधी उल्लेख केलेला आहे. या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे त्यावर नियंत्रण असते. तसेच कंपन्याकडून पाण्यावर प्रायमरी ट्रिटमेंट करुनच पाणी सोडले जाते. परंतु एखादी कंपनी अशा प्रकारे काही उल्लंघन करीत असल्यास त्यांच्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई केली जाते. त्यामुळे सदर कारणामुळे तेथे मच्छीची घट झालेली आहे असे म्हणणे योग्य होणार नाही.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१७८.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन या संस्थेने मुंबई परिसरातील किनारपट्टीच्या परिसरातील मत्स्य व्यवसाय संशोधन केले असता या संस्थेच्या अहवालाप्रमाणे मुंबई व रायगडच्या सागरी खाडी परिसरात १२५ माशांच्या जाती आढळून येत होत्या. पण आता फक्त ७८ जाती शिल्लक राहिल्या आहेत ही गोष्ट खरी आहे का. ज्या पध्दतीने ड्रेनेजचे पाणी किनाऱ्यावर सोडले जाते, किमान २५ नॉटीकल माईल्स पुढे ते सोडले गेले पाहिजे हा निकष ठरलेला आहे. आपण न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोपमध्ये गेला आहात. किनारपट्टीवर ४० किलोमीटरच्या पुढे कोठेही अशुध्द पाणी नाही. मी पोटतिडकीने का बोलत आहे, कारण मंत्री महोदय स्वत: व त्यांची फॅमिली मच्छिमार आहेत, त्यांच्या स्वत:च्या होडया होत्या, आता त्यांनी त्या सोडल्या आहे. त्यांचे वडील होडी चालवत होते. म्हणून ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. मोठमोठे प्रकल्प होत आहेत, एमआयडीसी प्रकल्प आणते त्यांना ड्रेनेजची पाईपलाईन ही आपल्या केवळ १२ नॉटीकल माईल्सपर्यंत ठेवण्याची शिफारस मत्स्यव्यवसाय विकास विभाग करेल का?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी फार गंभीर प्रश्न विचारला आहे. ही वस्तुस्थिती खरी आहे की, पर्यावरणबाबत आपला देश कोठे तरी मागे राहात आहे. ही वस्तुस्थिती महाराष्ट्रापुरती नाही तर बाकीच्या राज्यातसुध्दा तशीच आहे. ज्या पध्दतीने माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी या विभागाचा रिव्हू घेतल्यानंतर लक्षात आलेले आहे की, पर्यावरणामध्ये कोठे काही कमी झाले आहे किंवा वाढवायचे आहे, त्यावर अभ्यास सुरु आहे. आपण सांगितले की, रिपोर्टमध्ये आलेले आहे की, काही जाती कमी झालेल्या आहेत, आपले म्हणणे योग्यच असणार. त्याची कारणे वेगवेगळी आहेत. केवळ पर्यावरणामुळे या जाती कमी झाल्या आहेत असे नाही. अवैध मासेमारी, एलईडी, पर्सेशन जाळीधारकांना दिलेल्या वेळेव्यतिरिक्त मासेमारी करतात अशी बरीच कारण आहेत. आपणास माहिती आहे की, शासनाने गोपाळकृष्ण कमिटी

श्री.अस्लम शेख.....

नेमली आहे. त्याचा रिपोर्ट बहुतेक तयार झाला असेल, त्यांच्या सबमीशननुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदय, औद्योगिकीकरण फार मोठया प्रमाणात झालेले आहे. ठाणे, पालघर, रायगड येथे मोठया प्रमाणावर मत्स्यव्यवसायसुध्दा होत आहे. परंतु प्रदुषण बोर्डावर शासनाचे नियंत्रण नाही. प्रदुषणाबाबत अनेक तक्रारी झालेल्या आहेत. पेणमध्ये जेएसडब्ल्यू मोठी कंपनी आहे. तेथे मोठया प्रमाणावर कोळसा आयात होतो. कोळशामुळे मोठया प्रमाणावर प्रदुषण होते, समुद्रात हे पाणी जात आहे. या कोळशामुळे मासळीचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. खरेतर मंत्री महोदयांनी सांगितले की, या कंपन्यांवर आम्ही कारवाई करीत आहोत. पण आपण सांगावे की, आजपर्यंत किती कंपन्यांवर आपण कारवाई केलेली आहे, याची नावे द्यावीत. प्रदुषणामुळे मत्स्य दुष्काळ आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, फार मोठया प्रमाणात मत्स्यदुष्काळ होत आहे. आपण जोपर्यंत तेथे प्रदुषण नियंत्रण करत नाही, बोर्डावर नियंत्रण ठेवत नाही तोपर्यंत असेच चालणार आहे, आपण त्यावर नियंत्रण करणार का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मत्स्यव्यवसाय विभागाकडे काही तक्रार प्राप्त झाली तर विभाग शहानिशा करतो. एमपीसीबी बोर्डाला सोबत घेऊन कार्यवाही करतो. जिल्हाधिकारी यांचेकडे एकच लेखी तक्रार आली होती त्या अनुषंगाने पाहणी करण्यात आली. तेथे कोठेही मासे मेलेले आहेत असे दिसून आले नाही, तसा पंचनामा देखील आहे. पण व्हायलेशन होत नाही असेही नाही. २०२० मध्ये १९ कंपन्यांना क्लोजरची नोटीस देण्यात आलेली आहे, ८० कंपन्यांना प्रपोज केले होते. कारणे दाखवा नोटीस ३७ कंपन्यांना देण्यात आलेली आहे. २०२०-२१ मध्ये १८ कंपन्यांना क्लोजर नोटीस दिलेली आहे. ३७ कंपन्यांना प्रपोज केलेले आहे. ५१ कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात

ता.प्र.क्र.१२१७८.....

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख.....

आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेली उर्वरित माहिती सध्या माझ्याकडे नाही, ती पटलावर ठेवली जाईल.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, मी तीन प्रश्न विचारु इच्छितो. शेतकऱ्यांना मदत केली जाते, तशा प्रकारे मत्स्यउत्पादनात घट झाल्याने शासन मच्छिमारांना मदत करणार का. ही आर्थिक मदत कधी व किती करणार. परराज्यातील मच्छिमार बोटी राज्यात येऊन मासेमारी करतात त्यामुळे आपल्या मच्छिमारांचे नुकसान होते ते तुम्ही थांबविणार का किंवा आपल्या बोटींना परराज्यात जाण्याची परवानगी देणार का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांना मी सांगू इच्छितो की, एकमेव महाराष्ट्र सरकारने या मच्छिमारांना पॅकेज देण्याचे काम केलेले आहे. मासेमारीला कृषीचा दर्जा द्यावा अशी मागणी सर्वांची आहे व तशी सरकारची मानसिकताही आहे. शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमारांना दर्जा मिळण्याची मागणी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे पाठवली आहे.

सभापती महोदय, बाहेरुन येणाऱ्या ट्रॉलर्सवरील कारवाईबाबत सांगू इच्छितो की, याबाबतचा आधीचा कायदा फार सौम्य होता. आपण नवीन सुधारीत कायद्यामध्ये दंड व जप्ती करण्याची मोठी तरतूद केलेली आहे. नवीन कायदा लागू झाल्यावर मागील पाच वर्षात जेवढया कारवाया झालेल्या नाहीत तेवढया आता झालेल्या आहेत. मोठया प्रमाणात कारवाई करुन जप्ती करण्यात आलेली आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मासेमारीला कृषीचा दर्जा मिळावा असा प्रस्ताव मागील सरकारच्या काळात पाठविला होता, त्याबाबतची कार्यवाही कोठपर्यंत आली आहे. अजून दर्जा मिळाला नाही. समुद्रातील वाढत्या प्रदुषणामुळे मत्स्यउत्पादन घटत आहे, याकरीता शासनाकडून कोणती उपाययोजना करणार आहात. शेतकऱ्यांना मदत करतो तशी मच्छिमारांना आर्थिक मदत करणार का ?

ता.प्र.क्र.१२१७८.....

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, शेतकऱ्यांसाठी नैसर्गिक आपत्तीमुळे पॅकेज जाहिर केले होते. पॅकेजच्या हिशोबाने मदत देण्याचे काम सुरु आहे. सुमारे ४० कोटीपर्यंत निधी दिलेला आहे, उर्वरित पॅकेजबाबत कायद्यात आणखी स्थिरता आणण्याची लोकांनी मागणी केली होती. त्यांना पूर्ण पॅकेज मिळण्याकरीता यामध्ये आम्ही बदल करण्यास प्रयत्नशील आहोत हे आपणास माहिती आहे.

सभापती महोदय, समुद्रात पाणी सोडल्यानंतर प्रदुषणाबाबतचे निकष पाहण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळ काम पाहात आहे, पर्यावरण समिती त्यावर कायदे करीत असून त्या कायद्याच्या अनुषंगाने आपण कारवाई करीत असतो. भविष्यात असे होता कामा नये, या कामास अधिक गती देण्यासाठी, कडक कायदा करण्यासाठी आपण पुढे जात आहोत. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन कंपन्यांनी पाणी सोडण्याचे निकष आहेत, या निकषाचे पालन केले जात नसेल तर कारवाई केली जाते. याबाबत अधिक कडक कायदा करण्याची गरज आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे याबाबत नियम तर होतेच पण सक्ती केली जात नसल्याने लोक त्याचा दुरुपयोग करीत होते, आता पर्यावरण विभाग यावर अधिक काम करीत आहे.

असुधारित प्रत

यानंतर श्रीमती नाफडे .....

ता.प्र.क्र.१२१७८.........

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, या विषयाची संशोधक म्हणून मला काही प्रश्न विचारायचे आहेत. मत्स्य जैव-विविधता ही धोक्यात आलेली आहे. याचे उदाहरण मागील आठवडयात वर्तमानपत्रात वाचलेले आहे. प्लास्टिकचे कण हे माशांच्या शरीरात आहेत, मुंबईजवळील मासे खाण्यालायक राहिलेले नाहीत. जैव-विविधता आणि मत्स्यव्यवसाय या विषयातील अभ्यासकांच्या नियुक्त्या कमी झालेल्या आहेत. त्यामुळे माशांचे संवर्धन, माशांना अंडी घालण्याकरिता विशिष्ट जागा लागते. प्रदूषणामुळे त्याचा ऱ्हास होत आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणत्या गोष्टीमुळे नेमका कसा परिणाम होत आहे. माननीय मंत्रीमहोदय या संदर्भातील तज्ज्ञांच्या नियुक्तयांबाबतचा प्रश्न आपल्या अखत्यारित असेल तर आपण उत्तर द्यावे, अन्यथा संबंधित विभागाला माझा हा प्रश्न वर्ग करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे आपल्याला माहिती असेल की, यासंदर्भात शासनाने एक गोपालकृष्णन् कमिटी स्थापित केली होती. त्यामध्ये मच्छिमारांच्या संदर्भात या कमिटीमध्ये जे मेंबर्स घेतलेले आहेत, जे सायंटिस्ट किंवा या विषयातील तज्ज्ञ असतील त्यांना यामध्ये नेमलेले आहे.मच्छिमारीमध्ये वाढ कशी करता येईल, आताच्या काळात मच्छिमारीत घट होत आहे, प्लास्टिकच्या कणांमुळे मच्छिमारी कमी होत आहे, या प्रदूषणांमुळे मच्छिमारी कमी होत आहे. यासंदर्भातील अहवाल शासनाकडे आला असेल किंवा येणार आहे, तो अभ्यासून त्याची शहानिशा केली जाईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदय मच्छिमारांकरिता प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत, बैठका घेत आहेत, हे मी पाहिलेले आहे. परंतु आजही जे पारंपारिक मच्छिमार आहेत, ते आजही आंदोलनाकरिता बसलेले आहेत. मी याकरिता परवाच गीता नगर येथे गेलो होतो. यासंदर्भात कायदा बनवून त्या अनुषंगाने शासनाने जी.आर. देखील काढलेला आहे. परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. यामुळे पारंपारिक मच्छिमार अडचणीत आहे. शासनाने या संदर्भात कायदा बनवूनही पारंपारिक मच्छिमारांचे तेच प्रश्न असतील तर कायद्याचा उपयोग काय ? या संदर्भात मंत्रीमहोदयांनी भाष्य करावे. कायद्याची अंमलबजावणी होत नाही, आजही पारंपारिक मच्छिमार आंदोलनाला बसलेले

ता.प्र.क्र.१२१७८.........

श्री.प्रवीण दरेकर.....

आहेत, यावर शासनाची भूमिका काय आहे.

सभापती महोदय, आज मच्छिमारीला शेतीची दर्जा देण्याची आवश्यकता आहे. मच्छिमारीला मत्स्यशेती म्हणून दर्जा दिला जाणे अत्यावश्यक आहे. मच्छिमाराला शेतकरी म्हणून दर्जा दिला तर शेतकऱ्याला जे लाभ आणि सवलती मिळतात, ते मच्छिमाराला देखील मिळणार आहेत. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेची नोंदणी होऊ शकत नाही, ती शहरात होते. वसंतदादा पाटील साहेब होते, त्यांनी मत्स्यशेती या पार्श्वभूमीवर नोंदणी केलेली आहे. मुंबईत मत्स्यशेती होते, त्या आधारे नोंदणी झालेली आहे. यामुळे हे करणे शक्य आहे. मच्छिमारीला मत्स्यशेतीचा दर्जा शासन देणार आहे का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मागील अधिवेशनात देखील हा प्रश्न विचारला होता, त्यावेळी मी सांगितले होते की, कृषी संदर्भातील दर्जा मच्छिमार लोकांना मिळाला पाहिजे, असा शासनाचा देखील मानस आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांनी प्रस्ताव पाठविला होता. त्यानंतर आमच्या विभागाने याचा पाठपुरावा करीत आहे. खरे म्हणजे हा प्रस्ताव दिल्लीमध्ये गेलेला आहे. असे जे निर्णय आहेत, ते दिल्लीत करण्यात येतात, आपला तेथे दबाव व ओळख चांगली आहे. आपली ओळख तेथील मंत्रीमहोदयांसमवेत चांगली आहे. आपण जरा याकरिता गती दिली तर चांगले होईल.

सभापती महोदय, दुसरा जो प्रश्न आपण विचारला होता, त्याबाबत मी उत्तर देत आहे. कुलाबाचे मच्छिमार आंदोलनाला बसलेले आहेत, त्यासंदर्भात मी उत्तर देत आहे. कुलाबा येथे नवीन डेव्हलपमेंट होणार आहे, नवीन कोस्टल रोडची कनेक्टिव्हीटी होणार आहे, त्या संदर्भात ते माझ्याकडे भेटण्याकरिता आले होते. यावर मी असे सांगितले होते की, याबाबत ताबडतोब बैठक लावण्यात आली. तरी देखील ते आंदोलनाला का बसले, हे मला माहिती नाही. खरे म्हणजे त्यांची याबाबत बैठक लावून समाधान झाले असते, त्यानंतर जरी ते या विषयावर माझ्यासमवेत चर्चेला बसले असते तर मी समजू शकलो असतो. याबाबत मी त्यांना असे सांगितले की, आपण यावर चर्चेला बसू या.

**सभापती :** माननीय मंत्रीमहोदयांनी याबाबत पुन्हा बैठक लावावी.

ता.प्र.क्र.१२१७८.........

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, धरमतर खाडीमध्ये जे मच्छिमार

आहेत, ज्यांच्या होडीचे नुकसान होते, ज्यांच्या जलवाहतूकीमुळे त्यांचे नुकसान होत आहे, म्हणून यापूर्वी ज्यावेळी श्रीमती मिनाक्षीताई पाटील मंत्री महोदय असताना ३०० मच्छिमारांना भरपाई दिली होती. या बाबत सहयाद्रीवर मंत्रीमहोदयांसमवेत मी एक बैठक घेतली होती. त्या ठिकाणी ज्या कंपन्या आहेत, त्यांच्यावर वर्पेजमध्ये थोडा चार्ज जास्त घेऊन संबंधित मच्छिमारांची यादी बंदर खात्याने फायनल करावी, अशी आम्ही मागणी केली होती. या यादीप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, याचा सरकारवर कोणताही बोजा पडणार नाही. सभापती महोदय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे, याकरिता आम्ही गेली दहा वर्षे झगडत आहोत. ज्या कंपन्या आहेत, त्या कंपन्यांकडून ही नुकसान भरपाई वसूल करायची आहे, या दोन्ही खात्याचे जे मंत्रीमहोदय आहेत, ते याबाबतचा निकाल ताबडतोब लावतील का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर एक बैठक लावतो, त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांना बोलावून घेण्यात येईल. या बैठकीमध्ये एमएमबी आणि फिशरीज डिपार्टमेंट यांना बोलावून यामधून कसा मार्ग काढता येईल, याकडे पाहिले जाईल.

---------------------------

**ठाणे व नवी मुंबई मध्ये अवजड वाहनचालकांकडून "प्रोटेक्शन मनी" जमा करण्यात येत असल्याबाबत**

**(३) * १२७१० श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय**

**फुके, श्री.सुरेश धस, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व नवी मुंबई मध्ये अवजड वाहनचालकांकडून वाहतूक पोलीस, टोईंग एजन्सी व स्थानिक गुंडांद्वारे "प्रोटेक्शन मनी" म्हणून दरमहा अंदाजे रुपये ७ ते ११ कोटींची खंडणी जमा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नारपोली, माणकोली, कळवा, खारेगाव, कापूरबावडी, मुंब्रा टोलनाका, कल्याण फाटा, माजिवडा, पनवेल, महापे, कळंबोली आणि तळोजा या ठिकाणी अवजड वाहनचालकांकडून दर दिवशी किमान २७०० ते ३००० पावत्या आकारण्यात येवून दरदिवशी रुपये २० ते २२ लाख म्हणजे दरमहा रुपये ७ ते ११ कोटी जमा करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावत्यांद्वारे जमा करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा होत नसून, सदर पावत्यांवर टोईंग एजन्सीचे नाव, पत्ता, जीएसटी व पॅन नंबर नमूद नसतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २८ जुलै, २०२१ रोजीच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्त, ठाणे व नवी मुंबई यांच्याकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतूक पोलीस विभागातील संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी, टोईंग एजन्सी व स्थानिक गुंडांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ता.प्र.क्र.१२७१०.....

श्री.सतेज ऊफ बंटी डी.पाटील.......

(३) हे खरे नाही.

ठाणे वाहतूक शाखेने विहित केलेल्या नमुन्या प्रमाणे पावती अदा

करण्याबाबत तसेच सदर पावतीवर क्रेन क्रमांक, शुल्काची रक्कम, मालकाचा पत्ता, कार्यालयाचा पत्ता, मोबाईल नंबर देणेबाबत सूचित केलेले असून, तडजोड शुल्क ऑनलाईन/ कार्ड पेमेंट किंवा रोख स्वरुपात स्विकारण्यात येत असून टोईंग पावतीवर एजन्सीचे नाव, पत्ता, जीएसटी नंबर नमूद केला जातो.

(४) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी पोलीस आयुक्त, ठाणे व पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडे तक्रार केली आहे.

(५) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या सखोल चौकशीमध्ये कर्षित वाहनांची कार्यपध्दती तपासण्यात आलेली असून चौकशीअंती आक्षेपार्ह बाब निदर्शनास आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

असुधारित प्रत

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७१०.....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये उत्तरालाच माझी हरकत आहे. क्रमांक ०३ चा प्रश्न असा आहे की, पावत्यांद्वारे जमा करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा होत नसून सदर पावत्यांवर टोईंग एजन्सींचे नाव, पत्ता, जीएसटी व पॅन नंबर नमूद नसते. हे खरे आहे काय, याचे उत्तर "हे खरे नाही." असे दिलेले आहे. माझ्याकडे काही पावत्या आहेत. माझ्याकडे बोगस पावत्या आहेत. त्यावर जी.एस.टी.आणि रजिस्ट्रेशन नंबर नाही. या कंपन्यांनी जी.एस.टी. भरलेली नाही. हा बोगस कारभार आहे, हे सिध्द झालेले आहे. उत्तरात मात्र शासन "हे खरे नाही", असे म्हणत आहे. पोलीस आयुक्तांनी या संदर्भात केलेल्या चौकशीचा अहवाल शासन सभागृहात ठेवणार आहे का, ज्यांचा विरुध्द चौकशीची मागणी केली, त्याच यंत्रणेने त्याच पोलीस आयुक्तालयाने यासंदर्भातील चौकशी केलेली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झालेली नाही. या प्रकरणाची न्यायालयीन किंवा सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करणार का ? माझ्याकडे या संदर्भातील बोगस पावत्या ज्या आहेत, त्या मी आपल्याकडे अवलोकनार्थ पाठवित आहे. बोगस पावत्यांच्या माध्यमातून महिन्याला सात-आठ कोटी रुपये प्रोटेक्शन मनी म्हणून अधिकारी जमवित असतात. या ठिकाणी गंभीर घोटाळा सुरु आहे. या संदर्भातील माहिती शासनाकडे दिली गेलेली आहे, यावर काय कारवाई शासन करणार आहे, हे शासनाने सांगावे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी पाटील : सभापती महोदय, याबाबतच्या तक्रारी आल्यानंतर त्वरित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमून, ज्यांनी ही तक्रार दिलेली आहे, ते या व्यवस्थेतील श्री.सुनील टोके म्हणून आहेत. ज्यांनी याबाबत आता हायकोर्टात पीआयएस देखील दाखल केलेली आहे. माझे विरोधी पक्ष नेते यांच्या भूमिकेवर माझे कोणते म्हणणे नाही. विधीमंडळातील सदस्य म्हणून अनेक मंडळी वेगवेगळी निवेदने देत असतात, त्याला फॉरवर्डिंग लेटर करुन ही निवेदने दिली जातात. अनेकदा या लोकांची पार्श्वभूमी देखील तपासणे आवश्यक आहे. या व्यक्तीबद्दल सांगायचे झाले की, सन २०१५ पासून सातत्याने वरिष्ठांच्या

विरुध्द तक्रारी करणे, सन २०१८ मध्ये ते उच्च न्यायालयात गेले, उच्च न्यायालयाने त्यांची तक्रार बाजूला केली. विशिष्ट ठिकाणी बदली मिळाली की, तक्रारींचा ओघ वाढवून काहीतरी घडले असे दाखवायचे, असा या व्यक्तीचा मूळ स्वभाव आहे.

ता.प्र.क्र.१२७१०.....
श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील......

या पावत्यांच्या संदर्भात बोलायचे झाले तर मी असे म्हणेल की, त्या पावत्या आपण सभापती महोदयांच्या माध्यमातून द्याव्यात, त्यावर योग्य कारवाई केली जाईल. याबाबत एक एसओपी केली जात आहे. या टोईंगच्या बाबत काय केले पाहिजे, नो पार्किंग आणि टोईंगचे पैसे वेगळे क्रेन ऑपरेटरकडे जातात. नो पार्किंगचे पैसे शासनाकडे डायरेक्ट जमा होतात. ही व्यवस्थाच व्यवस्थित व्हावी, याकरिता एसओपी व्यवस्था शासन जाहीर करीत आहे. जेणेकरुन सामान्य माणसाला देखील कळेल की, हे टोईंग शासनाच्या वतीने केले गेलेले आहे. अशा पध्दतीची कोणती घटना घडू नये, अशा पध्दतीचे आरोप-प्रत्यारोप करण्याची देखील संधी मिळू नये, या पध्दतीची भूमिका शासनाची निश्चितपणे असेल.

---------------

असुधारित प्रत

**कोकणातील कोळीवाड्यांचे सीमांकन करुन त्यांना "आद्य-गावठाण" चा विशेष दर्जा देण्याबाबत**

**(४) * १२११३ श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०५२४ ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळीवाड्यातील गावठाणाचा प्रश्न केंद्र शासनाने सीआरझेड कायद्यात शिथिलता आणल्यानंतरही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या विकास आराखड्यात सर्व कोळीवाड्यांचे सीमांकन करण्यात आलेले नसल्याने, महाराष्ट्र महसूल कायद्यान्वये मच्छीमारांच्या राहत्या जागेची नोंद करण्याची मागणी अखिल भारतीय कोळी समाज संस्कृती संवर्धन संघ, नवी मुंबईच्या वतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील कोळीवाड्याचे सीमांकन केले नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले असून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कायदा पारित होण्याच्या आधीपासूनच कोळीवाडे अस्तित्वात असूनही या कायद्यात स्वतंत्र अस्तित्व असतानाही कोळीवाड्याची नोंद गावठाण म्हणून न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोळीवाड्यांना "आद्य-गावठाण" चा विशेष दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई मधील ४१ कोळीवाड्यांपैकी ३१ कोळीवाड्यांचे सीमांकन पूर्ण झालेले असून ४ कोळीवाड्यांचे सीमांकन प्रगतीपथावर आहे. उर्वरित ठिकाणी स्थानिक विरोधामुळे सीमांकन झालेले नाही. कोकणातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण न झालेल्या गावठाणांचे सर्वेक्षण करण्याच्या सुचना दिनांक २४/०२/२०२२

रोजी देण्यात आलेल्या आहेत.

(४) असा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ता.प्र.क्र.१२११३......

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदय, मुंबईतील कोळीवाडयांबाबत सन २०१२ मध्ये आघाडी सरकारने निर्णय घेतला होता की, मुंबईत जेवढे कोळीवाडे आहेत, त्यांचे सीमांकन करायचे आणि त्यांना रेग्यूलराईज करायचे. परंतु आज दहा वर्षे झाली तरीही या कोळीवाडयांचे सीमांकन झाले नाही, रेग्यूलराईजेशन झालेले नाही. आजही हे सर्व कोळीवाडे आहे तसेच पेण्डिंग आहेत. ठाणे, रायगड, पालघर, येथील बरेचसे कोळीवाडे आहेत, त्यांचे देखील सीमांकन करण्याचे ठरविले होते.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२११३.....

श्री. रमेशदादा पाटील....

परंतु, आजपर्यंत एकही सीमांकन झालेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, ४१ पैकी ३१ कोळीवाड्यांचे सीमांकन झालेले आहे. मुंबईतील कोळीवाडे, मच्छीमार वसाहतीत केलेले सीमांकन, सन २०३४ चा मुंबई विकास आराखडा व सीझेएमपीएमध्ये समाविष्ट करावेत अशी माझी मागणी आहे. तसेच मागणीनुसार कोळीवाड्यांसाठी पालिकेने स्वतंत्र विकास नियमावली केली जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन २०१२ मध्ये मुंबई महानगरपालिकेने विकास आराखड्यातील सुधारणेमध्ये....अशा कोळीवाड्यांचे सर्व्हेक्षण झाले होते. परंतु, उर्वरित कोळीवाड्यांना वाडे किंवा गावांचा दर्जा देण्याबाबतीत चर्चा त्यावेळी होती. परंतु, त्यांचे सीमांकन झालेले नव्हते. त्यावेळी निर्णय घेण्यात आला आणि त्या पध्दतीने दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ रोजी सर्व्हेक्षण करण्यासाठी उप संचालक भूमी अभिलेख यांना जबाबदारी देण्यात आली होती आणि त्यांच्या अध्यक्षेखाली एकूण ६ सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. उपनगराचे २९ कोळीवाडे आणि मुंबई शहरातील १२ कोळीवाडे होते. उपनगरातील २९ कोळीवाड्यांपैकी २३ कोळीवाड्यांचे आणि शहरातील १२ पैकी ८ कोळीवाड्यांचे सीमांकन केलेले होते. सीमांकन आणि सर्व्हेक्षणमध्ये असा फरक आहे की, पूर्वीच्या काळात कोळीवाड्याच्या बाहेरील शेतजमिनीचे सर्व्हेक्षण झाले होते. उर्वरित कोळीवाडे होते. आतापर्यंत ३१ कोळीवाड्यांचे सीमांकन आणि सर्व्हेक्षण केलेले आहे. यासंदर्भात काही लोकांनी विरोध केल्यामुळे सीमांकन आणि सर्व्हेक्षण झालेले नाही. त्यांचा विरोध कमी झाल्यानंतर सीमांकन आणि सर्व्हेक्षण करण्याची आमच्या विभागाची तयारी आहे. नवीन विकास आराखड्यानुसार नियंत्रण नियमावली आलेली आहे. त्यानुसार कोळीवाड्यांना कोणकोणते फायदे देऊ शकतो हे सुध्दा निश्चित झालेले आहे. यामध्ये झालेच नाही असे नाही. ज्या ठिकाणी विरोध होता, त्या ठिकाणची कामे राहिलेली आहेत आणि उर्वरित कामे झालेली

ता.प्र.क्र.१२११३.....

श्री. बाळासाहेब थोरात.....

आहेत. विरोध कमी करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न केला तर पुढील कार्यवाही केली जाईल, असे मी सन्माननीय सदस्यांना आश्वासन देऊ इच्छितो. उपनगर आणि मुंबईमध्ये स्थानिक प्रश्नावरुन विरोध झालेला आहे. हे सुध्दा चांगल्या पध्दतीने करण्यासाठी आमच्या विभागाची तयारी आहे. नवीन विकास नियंत्रण नियमावली आलेली आहे. त्यानुसार कशा पध्दतीने एफएसआय दिला जावा यासाठीचा निर्णय झालेला आहे. नगरविकास विभागाचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेशदादा पाटील यांनी सदरहू प्रश्न अनेक वेळा विचारलेला आहे आणि पूर्वी यासंदर्भात चर्चा झालेली आहे. चर्चेअंती सन्माननीय सदस्य श्री. रमेशदादा पाटील यांना नेमके अपेक्षित काय आहे, हे माझ्या लक्षात आलेले नाही. माझे अधिकारी त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवतील एवढेच मी या निमित्ताने मी त्यांना सांगू इच्छितो.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, ठाणे आणि मुंबई या ठिकाणी कोळी बांधव वास्तव्यास आहे. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील माननीय महसूल मंत्री होते त्यावेळी सीमांकनाचा विषय सुरु झाला होता आणि त्यावेळी तो बऱ्यापैकी मार्गीही लागला होता. उर्वरित गावांचे सीमांकन लवकरात लवकर व्हावे अशी सन्माननीय सदस्य श्री. रमेदशदादा पाटील यांनी मागणी केलेली आहे. काही गावांमध्ये विरोध असेल तर अशा वेळी आपले अधिकारी त्यांना समजावून सांगण्यात कमी पडत आहेत. सीआरझेडमुळे त्यांना त्यांची घरे विकसित करता आली नाहीत. आज कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढल्यामुळे त्यांना एक मजली किंवा दुमजली घरे बांधावी लागत आहेत. माननीय मंत्री महोदय सीमांकनाचे काम टाईम बाऊंड पिरियमध्ये करतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सहा नावे आली होती. त्यामध्ये बाबरपाडा कोळीवाडा, छोटा डोंगरपाडा कोळीवाडा, मोठा डोंगरपाडा कोळीवाडा,

ता.प्र.क्र.१२११३.....

श्री. बाळासाहेब थोरात.....

मंडपादा कोळीवाडा, जामदारपाडा आणि धोरोली कोळीवाडा अशा ठिकाणी सीमांकन आणि सर्व्हेक्षणाची कामे झालेली नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांना सांगू इच्छितो की, त्यावेळी घेतलेल्या निर्णयानुसार सीमांकनाची कामे झालेली आहेत आणि आपण त्यानुसार पुढे कार्यवाही केलेली आहे. आपल्या सर्वांची इच्छा अशी आहे की, कोकणपट्टीचा विकास झाला पाहिजे. यापूर्वी देखील हा प्रश्न होता. पण काही कारणामुळे सदरहू प्रश्न चर्चेला आला नाही. मी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत की, अशा निकषाचे कोळीवाडे कोठे असतील तर ते आम्हाला अवगत करावे आणि त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कोकणातील सन्माननीय सदस्यांचा या प्रश्नाप्रती इंटरेस्ट असल्यामुळे अशा सर्वांसमवेत एकत्रित बैठक आयोजित करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, गावठाणे आणि कोळीवाडे हे मुळ मुंबईचे मालक आहेत. हा मालक आपल्या घराची दुरुस्ती करण्यासाठी निघाला तर...मी धानुरकरवाडी कांदिवली गावठाणाच्या बाजूला राहत आहे. त्या ठिकाणी इतरांना ३ किंवा ४ एफएसआय दिला जात आहे. परंतु, या लोकांनी घराची दुरुस्ती काढली तर त्यांच्या विरोधात ॲक्शन घेतली जाते. त्यांची दीडशे ते दोनशे वषापूर्वीची घरे आहेत. ते ज्यावेळी आपल्या घराची दुरुस्ती करतील त्यावेळी त्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. त्यांना देखील एक ठराविक एफएसआय देऊन त्यांना त्यांची घरे एक मजली किंवा दुमजली कशी बांधता येतील या

असुधारित प्रत

दृष्टीकोनातून देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. आता त्यांच्या कुटुंबांतील सदस्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तरी त्यांना घराची दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम करताना त्यांना वाढीव एफएसआय दिला जाईल काय ?

ता.प्र.क्र.१२११३.....

श्री. बाळासाहेब थोरात.....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आता सीआरझेडचे नियम बदलले आहेत. त्यामुळे त्याचा फायदा कोळीवाड्यांना होत नाही. कोस्टल झोन मॅनजेमेंटमध्ये पूर्वीचे नकाशे लोड केलेली आहेत. सीआरझेड लाईन डीमार्क पूर्णपणे केलेली आहे. उर्वरित ठिकाणी जैसे ते तैसे परिस्थिती आहे. फक्त खाडी लगचे क्षेत्र ५० मिटर केलेले आहे. दुरुस्ती करतेवेळी सीआरझेडचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे त्यांना अडचण येते. गावठाणाच्या संदर्भात निकष आहेत. तेथील रस्ता किती मोठा आहे त्यानुसार एफएसआय दिला जातो. ९ मिटर असेल तर २ एफएसआय दिला जातो. ६ मिटरचा रस्ता असेल तर.......

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, २ एफएसआय सर्व राज्यात आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. कोळीवाड्यांचे सीमांकन अर्ध्ये झाले किंवा झाले नाही यासंदर्भात दोनच मागण्या आहेत. माननीय सभापती महोदयांनी सदरहू प्रश्नाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्याबाबमत मंत्री महोदयांना निर्देश दिलेले आहेत. मंत्री महोदयांनी संयुक्तपणे बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी घर दुरुस्तीचा उल्लेख केलेला आहे. याबाबत माननीय मंत्री श्री. अस्लम शेख यांना माहीत आहे. त्यांच्या मतदारसंघातील विषय आहे. त्यांना घराची दुरुस्ती करावयाची असल्यास ती करता येत नाही. घराची दुरुस्ती करतेवेळी महानगरपालिकेतील अधिकारी येऊन त्रास देत असतात. गावठाण आणि

असुधारित प्रत

कोळीवाड्याच्या संदर्भात बैठक आयोजित करण्याची गरज आहे. तसेच सीमांकन विहित वेळेत पूर्ण करण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी निर्णय देणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्यांचा पुनर्विकास होत नाही. या दोन्ही विषयासंदर्भात माननीय सभापती महोदयांनी पुढाकार घेऊन बैठक आयोजित केल्याबद्दल आभार मानतो. कारण या विषयावर चर्चा होते. पण निर्णयाप्रती येत नाही.

ता.प्र.क्र.१२११३.....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित केली जाईल आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांना सदरहू बैठकीस उपस्थित राहण्याबाबत विनंती केली जाईल.

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदय, माझे दोनच स्पेसिफिक प्रश्न आहेत. कोकणातील कोळीवाड्यांचे सीमांकन करुन त्यांना आद्यगावठाणाचा दर्जा देणार काय, देणार असतील तर तो कधी पर्यंत दिला जाणार ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्याचे ठरले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील अर्धा भाग एमएमआरडीमध्ये आहे. त्यामुळै मुंबईबरोबर एमएमआरडीएचा समावेश मंत्री महोदय करतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संपूर्ण किनारपट्टीचा विचार....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, तो वेगळा विषय आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयासंदर्भात बैठकीत चर्चा केली जाईल त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना आमंत्रित केले जाईल.

असुधारित प्रत

**सभापती** : ठीक आहे. सदरहू प्रश्नावरील चर्चा संपलेली असल्यामुळे आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

--------------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**मौजे बारव्हा (ता.लाखांदूर, जि.भंडारा) परिसरातील**
**अवैध रेती चोरी रोखण्याबाबत**

**(५) * १२४६३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बारव्हा (ता.लाखांदूर, जि.भंडारा) परिसरातील चुलबंद नदी खोऱ्यातील घाट परिसरात रेती माफिया प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या रेती चोरी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध रेती चोरीमुळे शासनाचा महसूल बुडत असून रेती माफिया व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार अवैध रेती चोरी रोखण्याकरीता रेती माफिया व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बारव्हा परिसरातील चुलबंद नदी खोऱ्यातील घाट परिसरात अवैध रेती चोरीमुळे शासनाचा महसूल बुडत असून रेती माफीया व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीबाबतची निवेदने शासनास प्राप्त झालेली नाहीत.

लाखांदूर तालुक्यात माहे डिसेंबर, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत ३ गौण खनिजाच्या अवैध वाहतूक प्रकरणांमध्ये रुपये ०३.४४ लाख इतक्या दंडाची कारवाई करण्यात आली आहे.



असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरालाच माझी हरकत आहे. या लेखी उत्तरावरुन संबंधित अधिकारी/कर्मचारी या सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम करीत आहेत. रेती माफीया व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या रेती चोरी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे, काय असा लेखी प्रश्न विचारला होता. परंतु त्याला 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. तसेच रेती माफीया व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय, या प्रश्नाला 'रेती माफीया व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीबाबतची निवेदने शासनास प्राप्त झालेली नाहीत.' असे लेखी उत्तर दिलेले आहे. लाखांदूर तालुक्यात कोणत्याही प्रकारची रेती चोरी झालेली नाही असे लेखी उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, यापूर्वी मी सभागृहात अनेकदा लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे किंवा इतर आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तसेच पत्राच्या माध्यमातून सुद्धा भंडारा जिल्ह्यात होत असलेल्या रेती तस्करीबाबत सातत्याने मंत्री महोदयांच्या व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत एकाही दोषीवर कारवाई झालेली नाही. या भागात अवैध रेती चोरीच्या माध्यमातून हजारो, करोडो रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे. परंतु लेखी उत्तरात असा प्रकार कुठेही होत नाही असे नमूद केले आहे. भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर, पवनी, तुमसर, मोहाडी, साकोली या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रेती चोरी सुरु आहे. यामध्ये सत्ताधारी पक्षातील काही लोकप्रतिनिधी, तहसीलदार, एसडीओ, जिल्हाधिकारी यांच्यापासून मंत्रालयातील मोठ्या अधिकाऱ्यांपर्यंत या अवैध रेती चोरीचे पैसे पोहचविले जातात. या प्रकरणी माझा आरोप मंत्री महोदयांवरच आहे. कारण या माध्यमातून हजारो, कोटी रुपयांची महसूल चोरी होते. परंतु या प्रश्नाला रेती चोरी होत नसल्याचे लेखी उत्तर देण्यात आले आहे. मागे सुद्धा हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. सभापती

ता.प्र.क्र.१२४६३....
डॉ.परिणय फुके....

असुधारित प्रत

महोदय, भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील नांदेड, मोहर्णा, विरगांव, मारेगांव, धर्मपुरी, कोची, दांडेगाव या रेती घाटांमध्ये मागील सहा महिन्यांत जी रेती तस्करी सुरु आहे त्याची व्हीडीओ रेकॉर्डींग काढण्यात आली असून ती मी या पेनड्राईव्हच्या माध्यमातून सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे. तीन-चार महिन्यांपासून शासकीय रेती घाट बंद आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, तीन-चार महिन्यांपासून शासकीय रेती घाट बंद असताना त्या भागात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शासकीय बांधकाम कसे सुरु आहे ? मी स्पेसिफीक प्रश्न विचारतो की, या संपूर्ण प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांपासून एसडीओंपर्यंत सर्वांवर कारवाई करण्यात येईल काय, तसेच अवैध रेती चोरी बंद करण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कोरोनाच्या काळात रेती लिलावाच्या बाबतीत अनेक अडचणी आल्या होत्या. त्यातून ग्रामसभा, जनसुनावणी या संदर्भातील काही प्रश्न निश्चितपणे निर्माण झाले होते. राज्य सरकारने रेती लिलाव खूप सोपा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लाखांदूर पुरते सांगायचे झाल्यास शासनाकडे एकूण ७ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मंत्र्यांपर्यंत पोहचण्याचे काही कारण नाही. प्रत्येक तक्रारीवर काहीना काही कारवाई झालेली आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी "रेती माफीया व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या रेती चोरी करत असल्याचे...." असा जो प्रश्न विचारला त्याला 'हे खरे नाही' असे लेखी उत्तर दिले आहे. तसेच ज्या ठिकाणी रेती चोरी झालेली आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. लाखांदूरमध्ये एकूण ८ प्रकरणांमध्ये ७ लाख १६ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, त्यापैकी ५ लाख ९० हजार रुपये वसूल झाले आहेत. तसेच अवैध उत्खनन करणाऱ्यांची यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली आहे. अवैध रेती साठा सुद्धा जप्त करण्यात आलेला आहे. या बरोबरच पोलीस विभागाने तीन गुन्हे दाखल केले

ता.प्र.क्र.१२४६३....
श्री.बाळासाहेब थोरात....

असून ११ आरोपींना अटक केली आहे.

सभापती महोदय, रेती चोरी ही गेल्या दोन वर्षात सुरु झाली असे नाही. महसूल विभागापुढे जे इतर प्रश्न आहेत त्यातील हा एक प्रश्न आहे. हा प्रश्न मागील सरकारच्या पाच वर्षांच्या काळात सुद्धा होता. सरकार म्हणून ही रेती चोरी रोखण्याचा आमचा प्रयत्न असतो. तसेच रेती लिलावातून आवश्यक तेवढा निधी मिळण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असते. वाळूचा उपसा सहज पद्धतीने कसा होईल, त्यातून महसूल कसा प्राप्त होईल या दृष्टीने सरकार काळजी घेत आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, भारतातील एकही जिल्हा नसेल किंवा एकही वाळू घाट नसेल की त्या ठिकाणी अवैध रेती उत्खनन होत नसेल. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षकांचे पोलीस प्रशासन, स्थानिक पोलीस स्टेशन आणि राजकीय नेते या सर्वांच्या संगनमताने रेती घाटाचा धंदा चालतो. अवैध धंदा करणाऱ्या लोकांचा सर्वात आवडता धंदा हा अवैध रेती वाहतुकीचा आहे. मागच्या सरकारच्या काळात अवैध रेती चोरी झाली नाही असे नाही. २०१४ ते २०१९ या काळातील अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. या प्रकाराला खरोखरच आळा घालायाचा असेल तर त्या ठिकाणी जीपीएस प्रणाली आत्मसात करावी लागेल. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात डॅशबोर्ड लावावा लागेल. सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सीसीटीव्ही कॅमेरा आणि लिलावधारकाला किती ब्रासचा ठेका दिला, तो किती रेती उत्खनन करीत आहे, ट्रकमध्ये किती रेती भरत आहे, या संदर्भातील मॉनिटरींग जोपर्यंत करीत नाही तोपर्यंत रेती घाटांचा लिलाव करुच नये अशी माझी मागणी आहे. मी स्पेसिफक विचारतो की, या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य, जर रेती घाटांचा लिलाव केलाच नाही तर सर्वसामान्य माणसाला घरांची दुरुस्ती करण्यासाठी रेती मिळणार नाही. त्यामुळे आपण अशी मागणी करणे उचित होणार नाही. आपण जबाबदार नेते आहात. आपण बोलताना सांगितले की, या रेती चोरीमध्ये नेते मंडळीचे संगनमत आहे. यामध्ये तुमचेही संगनमत आहे काय ?

ता.प्र.क्र.१२४६३....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, महसूल विभागापुढे रेती चोरीचा प्रश्न कायमच आहे. मागील काळात सुद्धा कायम हा त्रास झालेला आहे. आताही

त्रास असून, आम्ही या बाबतीत पूर्ण काळजी घेत आहोत. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा जरुर विचार करण्यात येईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या भूमिकेबद्दल आम्हाला संशय नाही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील उत्कृष्ट काम करणारे ते एक मंत्री आहेत. परंतु माननीय मंत्र्यानी दिलेली दोन उत्तरे सभागृहाची दिशाभूल करणारी आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी रेती चोरीबाबतची व्हीडीओ रेकॉर्डींग पेनड्राईव्हच्या माध्यमातून दिली आहे. या संपूर्ण प्रकारात महसूल अधिकाऱ्यांचे संगनमत असलेले ते रेकॉर्डींग आहे. यामध्ये एक लाख टक्के संगनमत आहे. एसडीओ, ठाणेदार, तहसीलदार हे प्रती ट्रक २ हजार रुपयेप्रमाणे बांधले गेले आहेत. मला वाटते मंत्री महोदयांनी या प्रकरणाच्या थोडे खोलात गेले पाहिजे. आज या प्रश्नाला समर्पक उत्तर मिळू शकणार नाही आणि तशी अपेक्षाही नाही. परंतु आपल्याला या विषयाच्या खोलात जावे लागेल. माननीय मंत्री श्री.सुनील केदार यांना संपूर्ण प्रकरण माहीत आहे. सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांच्या प्रामाणिकतेबद्दल आम्हाला शंका नाही. परंतु मंत्रालयातून फोन जातात. सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा की, जेव्हा लिलाव जाहीर होतात तेव्हा एक विशिष्ट लॉबी त्या विरोधात माननीय उच्च न्यायालयात जाऊन लिलावाला स्टे मिळविते. रेती घाटांचे लिलाव होऊ देत नाहीत. उच्च न्यायालयाने स्टे दिल्यामुळे दोन-दोन वर्षे रेती घाटांचे लिलाव होत नाहीत, परिणाम हे धंदे सुरु होतात.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६३....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

उच्च न्यायालयात तुमची पॉलिसी वारंवार येते. उच्च न्यायालयात तुम्ही केलेले लिलाव पुन्हा स्टे होऊ नयेत.

**सभापती** : तुमचा प्रश्न नसेल तर माननीय मंत्री उत्तर कसे देणार आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सरकारचे वकील उभे न राहिल्यामुळे, सरकारची भूमिका उच्च न्यायालयात न गेल्यामुळे उच्च न्यायालयात एक मिनिटात स्टे होतात. मागच्या सरकारच्या काळात आणि या देखील सरकारच्या काळात असे होत आहे. मी काहीही सांगत नाही. उच्च न्यायालयात कोणतीही लिलाव पॉलिसी स्टे होणार नाही याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. संगनमत सुरु आहे. संगनमत आहे, याचा तपास माननीय मंत्री करतील का ?

**सभापती** : ठीक आहे. मी त्यांच्याकडे क्लिप दिलेली आहे किंवा दिली नसेल तर देईन, त्यांनी त्यांच्या क्लिपची सत्यता पाहून त्याची चौकशी करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदय, भंडाऱ्याहून किंवा राज्याच्या बाहेरुन जे रेतीचे ट्रक येतात, ते मोठ्या प्रमाणात चोरीचे ट्रक येतात, त्यावर किती कारवाई झाली आहे ? सावनेर तालुका, कळमेश्वर, कन्हान अशा रेती घाटांवर सीसीटीव्ही कॅमेरे होते. हे सर्व सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत का, ते केव्हा सुरु करणार आहात आणि ते सुरु होतील का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, प्रश्न स्पेसिफिक आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती घ्यावी लागेल.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण या विषयात सातत्याने गांभीर्याने सहभाग घेतल्याचे आम्हाला माहीत आहे किंवा निर्देश देखील दिले आहेत. वाळू तस्करीचा विषय फार मोठा आहे. माझ्या दोन स्पेसिफिक मागण्या आहेत. आता

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६३....

श्री. प्रवीण दरेकर ....

क्लिप दिलेली आहे. उत्तरात सांगितले आहे की, असे काही घडलेले नाही. पुरावा आहे. आपण निर्देश दिले आहेत की, त्यामध्ये सत्य असेल तर कारवाई करणार. आपले धोरण आहे. वाळूचे धोरण आणले की नाही मला माहीत नाही. वाळूचे धोरण चालू आहे. सर्वव्यापी महाराष्ट्रासाठी धोरण आले तर अशी तस्करी होणार नाही. मोठी रॅकेट चालतात. सभापती महोदय, या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, यापूर्वी सन २०१९ मध्ये धोरण आले होते. यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात गोष्टी आहेत. माननीय उच्च न्यायालय, माननीय सर्वोच्च न्यायालय, हरित लावाद या सर्वांचे निर्णय असताना आपल्याला हे धोरण ठरवावे लागते, ही सर्वात महत्त्वाची अडचणीची बाब कायम आहे. पूर्वीच्या काळात म्हणजे आपल्या मागील ५ वर्षे असतील किंवा मागील काळ असेल ही तर अडचण असते. मात्र तरीही आपण त्यामध्ये सहजता कशी येईल, सोपे कसे होईल हे पाहत आहोत. आपली अपसेट प्राईज पध्दत आहे. आता ती प्राईज खूप पुढे गेली होती, ती पुन्हा ६०० रुपयांवर आणली आहे. ग्राहकांना, नागरिकांना स्वस्तामध्ये वाळू मिळावी म्हणून ५ वर्षांचा कालावधी केला आहे. तसेच पर्यावरण मान्यतेकरिता खूप कालखंड जात होता. त्यामुळे त्यातील एक बदल केला आहे. लिलाव भरण्याचा कालखंड ३० दिवसांचा केलेला आहे. लिलावाचे क्षेत्र ५ हेक्टर असे काही बदल केले आहेत, जेणेकरुन त्यातून एक चांगल्या पध्दतीने सहजता येईल आणि चांगले नियंत्रण राहील, असे आम्ही प्रयत्न केले आहेत.

**सभापती** : मला एक चर्चा आठवत आहे. मी धोरणावर बोलत आहे. राज्यात सर्व सरकारांना हा प्रश्न पडलेला आहे. मी स्वत: महसूल राज्यमंत्री होतो, तेव्हापासून

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६३....

**सभापती ....**

हा प्रश्न ऐकत आहे. याचे समाधानकारक उत्तर येत नाही. सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी म्हणाले ती टेक्नॉलॉजी खरी असेल तर .... जीपीएसद्वारे क्वाँटिटी मोजता येईल की नाही याबाबत मला शंका आहे. ....(अडथळा).... तुम्ही तज्ज्ञ असाल. मी नाही. मी शंका असा शब्द वापरला आहे. मी तुमचे खोटे आहे असे बोललो नाही. माननीय मंत्र्यांनी हा एक प्रश्न तपासून घ्यावा. जे गुन्हेगार सापडतील त्यांना आवश्यक वाटले तर एमसीओ, मोका हा जो कायदा आहे, त्या मोका कायद्यात सरळ दुरुस्ती करावी आणि त्यांना मोका लावावा एवढी माझी सूचना आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, विचार केला जाईल. मोका कायद्याचे निकष आहेत, ते तपासूनच करावे लागते.

डॉ. परिणय फुके : सभापती महोदय, माझे सजेशन आहे.

**सभापती** : तुम्ही माननीय मंत्र्यांना लेखी द्यावे.

----

असुधारित प्रत

## शिक्षक पात्रता परिक्षेच्या (टीईटी) निकालामध्ये गैरप्रकार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(६) * १२१४१ श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.महादेव जानकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रविंद्र फाटक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक पात्रता परिक्षेच्या (टीईटी) निकालात फेरफार करुन गैरमार्गाने कोट्यवधी रुपयांची रक्कम गोळा केल्याप्रकरणी पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त आणि परिषदेच्या तांत्रिक विभागाचा सल्लागार यांना अटक केल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पात्रता परिक्षेच्या प्रश्नपत्रिका गैरव्यवहार प्रकरणी जी.ए. सॉफटवेअरचे संचालक आणि मुख्य एजंट व दोन शासकीय कर्मचाऱ्यांना सायबर पोलिसांनी नाशिकमध्ये अटक केली असून, त्यांचेकडून रुपये ४ कोटी ६८ लाख जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दलालांच्या माध्यमातून आलेल्या उमेदवारांकडून कोऱ्या उत्तरपत्रिका घेऊन, तिन्ही आरोपींनी मिळून खोलीतील सीसीटीव्ही बंद करुन प्रश्नपत्रिका सोडवून, संबंधितांच्या गुणांमध्ये फेरफार करुन अपात्र उमेदवारांना पात्र करण्याकरिता गैरमार्गाचा वापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भात सन २०१२ ते २०१७ या कालावधीत टी.ई.टी. प्रमाणपत्र नसलेल्या व बोगस प्रमाणपत्राच्या आधारे किती शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणात आणखी किती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळले आहेत, त्यांचेकडून किती रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१४१...

**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :**

(१) होय.

याबाबत सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे १) गु.र.नं. ५६/२०२१ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ३४, १२० (ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) सह महाराष्ट्र विद्यापिठाच्या, मंडळाच्या, इतर विनिर्दिष्ट परीक्षा गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (१९९० सुधारित) कलम ७, ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयामध्ये १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) सदर गुन्हयामध्ये संबधिताकडून एकूण रुपये ४,६८,४८,५४०/- इतका मुदेमाल तपासादरम्यान जप्त करण्यात आला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर खोलीमधील सीसीटीव्ही बंद असल्याचे व परिक्षार्थींच्या उत्तरपत्रिकेतील मूळ गुणांमध्ये फेरफार करुन अंतिम निकालामध्ये गुण वाढविल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

(४) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी टिईटी परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत मुदत दिली होती. दिनांक १३/०२/२०१३ नंतर रुजू झालेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षक पात्रता परीक्षेच्या मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीची कार्यवाही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सुरू आहे.

(५) याबाबत सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.र.नं. ५६/२०२१ सह आणखी एक गु.र.नं. ५८/२०२१ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ३४, १२० (ब), २०१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) सह महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या, इतर विनिर्दिष्ट परीक्षा गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (१९९० सुधारित) कलम ७, ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयामध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर दोन गुन्हयांचा पुढील तपास सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर यांचेकडून सुरु आहे.

ता.प्र.क्र.१२१४१...

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील ....

असुधारित प्रत

तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२६८/प्रशा-३, दिनांक २०/१२/२०२१ अन्वये सन २०१९-२०२० मधील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिक्षेमध्ये (टीईटी) झालेल्या गंभीर अनियमितता प्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. नागोराव गाणार : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे एक गंभीर प्रकरण आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा या राज्याला संदेश दिला आहे की, शिक्षण क्षेत्रातील प्रशासनावर शासनाचे नियंत्रण नाही. हे प्रकरण एका पोलीस ठाण्याकडे आहे, सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्र, गुन्ह्याचे स्वरुप, गुन्ह्याची व्याप्ती, गंभीरता, गुन्ह्यात सहभागी असलेले मंत्रालयातील मोठे अधिकारी, दलाल आणि तपासणी करणाऱ्यावर असलेला राजकीय दबाव यामुळे या प्रकरणात दोषींवर कारवाई होईल अशी शक्यता कमी आहे. फक्त ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पण तपास संथ गतीने चालविण्यात येऊन तपास दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे असा समज निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने दिनांक २०.१२.२०२१ अन्वये अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. २ महिने २३ दिवस झाले, समितीचे कामकाज योग्यप्रकारे सुरु झालेले नाही आणि त्यावरुन तपास यंत्रणा या गंभीर स्वरुपाच्या भ्रष्टचाराच्या प्रकरणात खऱ्या अर्थाने तपास करुन दोषींना केंद्रीय कारागृहात पाठवेल असे वाटत नाही. म्हणून ही चौकशी एसआयटीकडे सोपवणार का असा प्रश्न आहे.

सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यातील प्रभारी शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांनी सुमारे ११० बोगस नियुक्ती मान्यतांना मंत्रालयातील बोगस आदेशाच्या आधारावर मान्यता दिल्या. त्यामुळे त्या मान्यता रद्द कराव्यात अशी मागणी झाली. ५५ मान्यता रद्द झाल्या, पण प्रभारी शिक्षणाधिकारी व संस्थाचालक, ज्यांनी

अमुद्रित प्रत

ता.प्र.क्र.१२१४१...

श्री. नागोराव गाणार ....
मंत्रालयातील बोगस आदेशाच्या आधारे बोगस नियुक्त्या केल्या आणि पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली, त्या तक्रारीला योग्य तो न्याय पोलीस स्टेशन देत नाही. त्यामुळे पोलीस स्टेशन, गोंदियाला त्या तक्रारीची तपासणी करुन आणि प्रभारी शिक्षणाधिकाऱ्याला अटक करुन चौकशी करण्याचे आदेश दिले जातील का ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, पहिल्या प्रकरणात तक्रार आल्यानंतर ताबडतोब गुन्हे नोंदवून साबयरने कारवाई केली. तुकाराम सुपे, सुखदेव ढेरे, इतर सर्वच, सावरीकर किंवा सुशील खोडवेकर, उप सचिव या सर्वांवर ताबडतोब कारवाई केली. पहिल्यांदा या संदर्भातील तक्रार आली, त्यावेळी ओएमआरचे पेपर तपासणे आणि या सर्व गोष्टींची कार्यवाही करुनच जवळजवळ आतापर्यंत २६ लोकांना या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. एसीएस, शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. समितीने देखील आता त्यांचा अहवाल शासनाला सादर केला आहे की, भविष्य काळात .... आरटीई ॲक्टमुळे टीईटी बंधनकारक आहे. त्यामध्ये धोरणात्मक निर्णय कसा व्हावा या संदर्भात एसीएस, शिक्षण यांनी काही मुद्दे दिले आहेत, तेही शासन पाहील. शासनाकडे त्यांचा अहवाल आला आहे. शासन त्यावर देखील कार्यवाही करेल. परंतु या तपासात कोणतीही दिरंगाई नाही किंबहुना पुणे पोलिसांनी केलेल्या कारवाईचे कौतुकच सर्वांनी केले आहे की, ही तक्रार आल्यानंतर सुमोटो या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई करणे .... उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली, त्यांचे निलंबन, सेवेतून काढण्याची देखील कारवाई शासनाच्या वतीने करण्यात आली. आता या ८ दिवसांत त्याचे चार्जशीट देखील न्यायालयात जाईल. आपण निश्चिंत रहावे. या तपासात या सर्वांवर कारवाई निश्चिपतपणे होईल. शासन म्हणून आम्ही वैयक्तिकरित्या यामध्ये लक्ष ठेवून आहोत की, यामध्ये कारवाई होणे अभिप्रेत आहे. कारण चुकीच्या पध्दतीने या सर्व घटना घडल्या आहेत. पुढील काळात राज्यातील विश्वासार्हतेला तडा जाणे हे चुकीचे आहे. त्यामुळे याबाबत कायमस्वरुपी पायबंद घातला पाहिजे या दृष्टीने कडक कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा विषय गोंदिया संदर्भात

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१४१...

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील ....
सांगितला आहे. आजच्या विषयात तो नाही. आपण त्या संदर्भात लेखी माहिती द्यावी. गोंदिया पोलिसांना ताबडतोब त्या संदर्भातील चौकशी करुन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जातील.

----

असुधारित प्रत

## राज्यातील विशेषत: हिंगोली, बीड व परभणी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(७) * १२३५३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: हिंगोली, बीड, परभणी जिल्ह्यात माहे जून ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस, तूर इ. शेती पिकांचे व फळपिकांचे नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळण्याकरीता कृषी विभागाकडे तक्रार तसेच जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात शेतकऱ्यांनी आंदोलन करुनही पीक विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगाम २०२१ मध्ये नुकसानग्रस्त ३८ लाख शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या रकमेची मागणी केली असून यापैकी पात्र असलेल्या २१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर रुपये १५५५ कोटी मदतीची रक्कम दिवाळी पूर्वी जमा करण्याच्या सूचना शासनाने विमा कंपनीला देवूनही पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली नाही, तसेच दिनांक १० जानेवारी, २०२२ अखेर ८४ हजार शेतकरी पीक विम्याच्या मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२१ च्या पीक विम्याची मदत मिळाली नसून रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने नुकसान भरपाईचे पंचनामे व दावे प्रक्रिया पूर्ण केली नसल्यामुळे शेतकरी पीक विम्याच्या मदतीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे महसूल प्रशासनाने ५०% पेक्षा कमी आणेवारी झाली असल्याचे निदर्शनास आणूनही, केवळ लेखी आक्षेप नोंदविले नाहीत असे कारण देवून जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याची आर्थिक मदत नाकारणाऱ्या संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्याची मागणी परभणी येथील



असुधारित प्रत

स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्यासाठी पात्र शेतकऱ्यांचे पंचनामे दावे अपात्र ठरविणाऱ्या रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीवर कारवाई करुन राज्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप २०२१ मध्ये दिनांक २२/०२/२०२२ अखेर हिंगोली, बीड, परभणी जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत एकूण १२.७१ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ६७५.३१ कोटी व हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण ५.०७ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १७०.७६ कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत एकूण ०.४६३ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २४.५८ कोटी असे एकूण १८.२५ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये ८७०.६४ कोटी आजतागायत विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून १७ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये ८४१.६८ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच पुर्नरचित हवामान आधारीत फळपीक विमा योजना अंतर्गत हिंगोली, बीड व परभणी जिल्ह्यात मृग बहार २०२१ मध्ये एकूण ३९१३ शेतकऱ्यांना रुपये ४५७.१६ लाख रक्कम विमा नुकसान भरपाई देय असून यापैकी एकूण ३८२९ शेतकऱ्यांना रुपये ३६५.२४ लाख इतकी रक्कम अदा करण्यात आली असून प्रलंबित विमा नुकसान भरपाईची अदायगी विमा कंपनी स्तरावरुन सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखात दिसून येत नाही.

खरीप हंगाम २०२१ मध्ये परभणी जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी रिलायन्स जनरल इन्शुरन्स प्रा.लि. कंपनी मार्फत करण्यात येत आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३५३...

श्री. दादाजी भुसे ....
सदर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ३८२९८५ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३१०.५१ कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत ७१७९ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १०.०९ कोटी असे एकूण ३९०१६४ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३२०.६० कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ३७८७१५ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३१०.२० कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. प्रज्ञा सातव : सभापती महोदय, हिंगोली जिल्ह्यात पीक विमा मिळण्यासाठी शेतकऱ्यांकडून वारंवार आंदोलने व निवेदनबाजी केली जाते. उत्तरात असे दिले आहे की, आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर ८४१.६८ कोटी रुपये जमा झाले आहेत. मात्र असले तरी उर्वरित रकमेचे काय व ती कधीपर्यंत जमा होणार आहे आणि हे त्वरित जमा करण्यात यावे अशी विनंती आहे. जिल्ह्यात एचडीएफसी ॲग्रो या कंपनीमार्फत शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३५३....

डॉ.प्रज्ञा सावंत....

जवळपास ३ लाख ४३ हजार शेतकऱ्यांनी विविध पिकांचा विमा हप्ता भरला होता. मात्र सोयाबीन काढण्याच्या वेळी शेतकऱ्यांना मोठा नुकसानीचा सामना करावा लागला. अतिवृष्टीमुळे काही ठिकाणची पिके वाहून गेली तर काही पिके १० ते १२ दिवस पाण्यात राहिल्यामुळे जागेवर त्यांना कोंब फुटले. काही ठिकाणी रचून ठेवलेल्या गंजीमध्ये पाणी घुसल्यामुळे नुकसान झाले. अशा शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे तक्रार नोंदविली ज्यांनी तक्रारी नोंदविल्या त्यांना पहिल्या टप्प्यात मदत करण्यात आली. १५ टक्के रक्कम त्यांना देण्यात आली. दुसरा प्रश्न असा आहे की, पीक विमा कंपनीकडून याबाबत प्रस्ताव दाखल झाले आहेत काय ? प्रस्ताव दाखल झाले असतील तर शेतकऱ्यांना उर्वरित पीक विम्याची रक्कम कधीपर्यंत देण्यात येईल. यंदाच्या पीक विम्यासाठी घाई सुरु असताना मागील १४ ते १५ कोटी रुपये भरपाईचा प्रश्न कायम आहे. गेल्या वर्षी मंजूर झालेल्या पीक विम्याच्या रकमेपैकी काही रक्कम वाटप करायची बाकी आहे. त्यासाठी राज्य व केंद्र शासनाकडून मिळणारा हिस्सा कंपन्याना मिळाला नसल्याचे कारण पुढे केले जात आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचा दोन वर्षाचा पीक विमा रखडला आहे असे शेतकरी हातघाईवर आले आहेत त्यामुळे हा प्रश्न कसा सोडविण्यात येईल याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये खरीप हंगामाच्या सन २०२१ मध्ये हिंगोली जिल्ह्यात साडेतीन लाख शेतकरी बांधवांनी सहभाग घेतला होता. शेतकरी, राज्य व केंद्र शासनाचा हिस्सा मिळून ११६.४३ कोटी रुपये ही विम्मा हप्त्याची रक्कम होत आहे. पीक विमा योजने संदर्भात वेगवेगळे निकष आहेत. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई योजनेच्या माध्यमातून दोन लाख शेतकरी बांधवांना ६९ लक्ष रुपये देण्यात आले आहेत. प्रतिकूल हंगामातील परिस्थितीमध्ये झालेल्या लाभार्थ्यांची संख्या ४९ लाख ५० हजार आहे. त्यापैकी १९.८२ लक्ष कोटी रुपये नुकसान भरपाई निश्चित करण्यात

ता.प्र.क्र.१२३५३....

श्री.दादाजी भुसे....

आली आहे. असे एकूण १३८.६२ कोटी रुपये नुकसान भरपाई घोषित करण्यात आली.

**सभापती** : मंत्री महोदयांनी वेळेचे भान ठेऊन लवकरात लवकर उत्तर द्यावे जेणेकरुन या प्रश्नाला न्याय मिळेल.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, जी ऊर्वरित रक्कम बाकी आहे ती तातडीने देण्यात येईल. राज्य व केंद्र सरकारच्या वतीने दोन हप्त्यात ही रक्कम दिली जाते. पहिला हप्ता देण्यात आलेला आहे. दुसरा हप्ता राज्य सरकारकडून मंजूर करण्यात आला आहे. याची विहित पध्दत असते, राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे ही रक्कम एआयसीतर्फे जाते. केंद्र सरकार त्यामध्ये त्यांच्या हिश्याचा समावेश करतात. एआयसीतर्फे ती रक्कम कंपन्यांना देण्यात येते. ही पध्दत आता प्रोसेसमध्ये आहे. दुसरा हप्ता देऊन राज्य सरकारने जबाबदारी पूर्ण केली आहे. सन २०२० मधील रकमेची मागणी करण्यात आली आहे. सन २०२० मध्ये कोरोनाचे संकट होते, त्या काळात शेतकरी त्यांचे नुकसान विमा कंपनीला कळवू शकले नाही. त्यामुळे एनडीआरएफच्या निकषानुसार राज्य सरकारने शेतकरी बांधवांना नुकसान भरपाईची मदत दिली आहे. त्यावेळी ज्या शेतकऱ्यांनी विम्यात सहभाग घेतला त्या शेतकऱ्यांना विमा कंपनीने नुकसान भरपाई द्यावी असे केंद्र सरकारला व कंपन्यांना कळविण्यात आले आहे. कंपन्या ही बाब मान्य करीत नाही. कंपन्या म्हणतात की, आम्हाला शेतकऱ्यांनी कळविले नाही. त्यामुळे आम्ही ती नुकसान भरपाई देणार नाही. याबाबत केंद्र शासनाच्या संपर्कात राज्य सरकार आहे. कंपन्या ही बाब मान्य करीत नाही तोपर्यंत दुसरा हप्ता केंद्र व राज्य सरकारने राखून ठेवला आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास या प्रश्नाचे उत्तर होईस्तोवर वाढविण्यात आला आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३५३....

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, राज्याच्या कृषी खात्याने निश्चित यामध्ये सहभाग दर्शविला आहे. सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव यांनी उल्लेख केल्याप्रमाणे भोकरदन तालुक्यातील १०१७ शेतकऱ्यांनी ३४७०० हेक्टरवरील पिकांसाठी ११८ कोटी २८ लक्ष रुपयांचे विमा संरक्षण घेतलेले असताना अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम प्राप्त झाली नाही. १८९ तक्रारी करण्यात आलेल्या आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्नाला न्याय मिळण्यासाठी आपला प्रश्न मंत्री महोदयांना लेखी कळवावा त्यांना भेटून उत्तर घ्यावे व या प्रश्नातून लोकांना न्याय मिळवून द्यावा.

आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------

असुधारित प्रत

**नियम २८९ च्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज दिनांक १४ मार्च २०२२ रोजी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. प्रवीण दरेकर व इतर यांनी "महाराष्ट्रात घोटाळे निदर्शनास आणणाऱ्यांना चौकशीला सामोरे जावे लागणे" या विषयाबाबत नियम २८९ ची सूचना दिलेली आहे ती मी दालनात नाकारली आहे.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.मु.शी** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.अब्दुल सत्तार (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे एकोणीसावा,विसावा व बावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहामसोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.मु.शी** : नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज सोमवार दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी नियम ९३ अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी मी  मान्य केलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करीत आहे.

(प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत.)

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात शाळेतील विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसलेल्यांची नावे शाळेच्या पटावरुन कमी करण्याची सूचना शिक्षण विभागाने दिलेली असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे पालकांत निर्माण झालेला असंतोष याबाबत

ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

प्रा.वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक २ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. त्यामुळे आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो. आरटीई २००९ च्या कायद्यान्वे ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही घटनात्मक जबाबदारी शासनाची आहे. कोणत्याही कारणास्तव मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेता येणार नाहीत. मध्यंतरीच्या काळात याबाबत शासन निर्णय काढला आहे. त्यानुसार मुलांचे आधारकार्ड काढले नसेल, आधारकार्ड अपडेट नसेल तर संबंधित मुलाचे शिक्षण थांबेल काय असा प्रश्न निर्माण झाला. माझे तीन प्रश्न आहेत, आधारकार्ड संदर्भात जो शासन निर्णय काढण्यात आला त्यामुळे शंकेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या मुलांचे शिक्षण थांबेल काय त्यासाठी हा जीआर मागे घेण्यात येईल काय ? ज्या मुलांचे आधारकार्ड अपडेट नसतील किंवा ज्यांच्याकडे अद्याप आधारकार्ड नाही अशा विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित न ठेवण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर परिणाम करणारा हा शासन निर्णय परत घेण्यात येईल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. त्यांना थोडी पार्श्वभूमी सांगायची आहे. त्यांनी ही सूचना मांडताना असे नमूद केले आहे की, आधारकार्ड नसलेल्यांची नावे शाळेच्या पटावरुन कमी करण्याबाबत असे काहीही नाही. दिनांक २८/०७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार आधारकार्ड मागविण्यात येते.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड........

दिनांक १४.०६.२०१७ रोजी सरळ प्रणालीमध्ये अंतर्गत पोर्टलवर माहिती भरण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. आपण राज्यातील सर्व शाळांना सूचना दिलेल्या आहेत की, सर्व विद्यार्थ्यांनी सरळ प्रणालीमध्ये आधार क्रमांची अचूक नोंद करावी. त्या माध्यमातून एकूण विद्यार्थी संख्या किती आहे याबाबत माहिती मिळते. आपण पीजीआय इंडेक्समध्ये मागे येत आहोत. आधार क्रमांकाची नोंदणी नसणे हे त्या मागील एक कारण आहे. आपण ज्या पत्राचा उल्लेख करीत आहात त्या पत्राच्या आधारे आम्ही हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत की, दिनांक २८.०२.२०२२ व दिनांक ३१.०३.२०२२ अन्वये सरळ पोर्टलवर जे आधार क्रमांक नोंदविण्यात येणार आहेत त्याचा फायदा पुढील संच मान्यता किंवा इतर गोष्टीसाठी उपयोग होणार आहे. त्यामुळे तो डेटा आमच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सन २०२१-२२ मधील संच मान्यतेसंदर्भातील कामासाठी हा डेटा आवश्यक आहे. त्यामुळे आपण तशा सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल तर त्यांच्या बाबतीत कोणती भूमिका घेण्यात येणार आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छिते की, ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक नाही अशा विद्यार्थ्यांना शाळेतून बाहेर काढले जात नाही किंवा संच मान्यतेमध्ये त्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले जाते असे नाही. आपण त्यासाठी समिती गठित केलेली आहे. शिक्षण विस्तार अधिकारी त्या समितीने समिती प्रमुख असून केंद्र प्रमुख, नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी सदस्य सचिव, अंगणवाडी पर्यवेक्षिका व आरोग्य कर्मचारी समिती सदस्य आहेत. मुलांचे सर्वेक्षण होऊन त्यांना शाळेपर्यंत आणून त्यांचा आधार क्रमांक नोंदविण्यात यावा. मी सांगू इच्छिते की, आधार क्रमांकाची नोंद नाही म्हणून आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांप्रमाणे कोणतीही गोष्ट होत नाही. आपण या संदर्भात कोणताही गैरसमज करुन घेऊन नये. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी देखील या संदर्भात त्यांच्या भाषणात उल्लेख केला होता. विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ मिळावा, त्यांच्या विषयी संपूर्ण माहिती असावी आणि

प्रा.वर्षा गायकवाड........

असुधारित प्रत

सरळ पोर्टलच्या माध्यमातून जी माहिती पाहिजे ती या माध्यमातून मिळावी यासाठी आपण हे करीत आहोत. आम्ही कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणापासून किंवा योजनेपासून वंचित ठेवणार नाही.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, आधार कार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद शासनाला पाठविण्यात येणाऱ्या अहवाल करु नये असे निर्देश जिल्हा शिक्षणाधिकारी सर्व शाळेतील मुख्याध्यापकांना देत आहेत. त्यामुळे मुख्याध्यापक अशा विद्यार्थ्यांचे नाव हजेरी पटावरुन कमी करीत आहेत. आधार कार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात येत आहे. ज्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नाही त्यांना शाळेतून काढू नये असा शासनाचा आदेश आहे. परंतु शिक्षणाधिकारी मुख्याध्यापकांना निर्देश देत आहेत की, ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नाही त्यांचे नाव आम्ही शिक्षण विभागाकडे पाठविणार नाही. त्यामुळे शाळा अशा विद्यार्थ्यांचे नाव हजेरीपटावरुन कमी करीत आहेत. आधार कार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांचे नाव हजेरीपटावरुन कमी करण्यात येऊ नये. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी कारवाई करावी, असा स्पष्ट आदेश शासन शिक्षणाधिकाऱ्यांना देणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आधार क्रमांक लिंक करण्यावर आपला भर असला पाहिजे. आता पर्यंत ८७ टक्के विद्यार्थ्यांनी आधार क्रमांकाची नोंद केली असून १३ टक्के विद्यार्थ्यांची नोंद करावयाची राहिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तसे शासनाच्या वतीने सांगण्यात आलेले नाही. शिक्षणाधिकारी मुख्याध्यापकांना असे सांगत असतील तर ते चुकीचे आहे. म्हणूनच मी मघाशी सांगितले की, आम्ही समिती नियुक्त केलेली आहे. शिक्षण विस्तार अधिकारी त्या समितीचे अध्यक्ष आहेत. केंद्र प्रमुख, नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका व आरोग्य कर्मचाऱ्यांचा त्या समितीमध्ये समावेश आहे. उर्वरित १३ टक्के विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांकाची नोंदणी केलेली नाही.

प्रा.वर्षा गायकवाड........

असुधारित प्रत

त्यासाठी त्यांनी प्रयत्न करावयाचे आहेत. परंतु कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढणे किंवा त्याचे शिक्षण बंद करणे असा निर्णय शासनाने घेतलेला नाही. अशा प्रकारे कोणी करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय,....

**सभापती** : नियम ९३ अन्वये सूचनेच्या निवेदनावर इतर सन्माननीय सदस्यांना शक्यतो प्रश्न विचारण्याची संधी दिली जात नाही. आपण मंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटन आपले म्हणणे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. आता आपण लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : जि.बीड, ता.परळी येथील पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण झालेली नसणे

**मु.शी.** : जि.बीड, ता.परळी येथील पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण झालेली नसणे यासंबंधी श्री.संजय दौंड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये रा.मा.क्र.२३३ ते नंदनज तसेच इजिमा १०२ ते अस्वलंबा तांडा रोड तसेच प्र.जि.मा.५२ ते बहादूरवाडी प्र.जि.मा.५३ ते डाबी तांडा, रा.मा.क्र.२२१ ते बेलंबा तांडा रोड, रा.मा.क्र.२३५ ते लेंडेवाडी प्र.जि.मा. ५३ ते इंदपवाडी तांडा रोड, रा.मा.क्र. २३५ ते जिगानाईक तांडा, इ.जि.मा.१४१ ते कोलदरी तांडा, रा.मा.क्र.५५ ते खारी तांडा सर्व तालुका परळी, जि.बीड अशी एकूण ११ कामे मंजूर करण्यात आलेली असणे, सदर कामांचा प्रमुख उद्देश वर नमूद सर्व गावे ही बारमाही रस्त्याने जोडणे हा असणे, सदर कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन संबंधितांना दिनांक ७/९/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला असणे, तथापि सदर कामे अद्यापही पूर्ण झालेली नसणे, तसेच झालेल्या कामांचा दर्जा अत्यंत असमाधानकारक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आलेले असणे, अद्याप काही कामे सुरु देखील केलेली नसून कार्यारंभ आदेश देऊन सुमारे ३ ते ४ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधितांनी कामे पूर्ण केलेली नसणे, सदर बाबींमुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झालेला असून योजनेच्या मूळ हितास हरताळ फासला गेलेला असणे, परिणामी जनतेमध्ये

श्री.संजय दौंड.........

शासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री.अब्दुल सत्तार (ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, मी बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १० कामांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये एकूण १० कामांना मंजुरी मिळाली होती. त्यापैकी ७ कामे लमान तांड्यावर राहणाऱ्या गोरगरीब, ऊस तोड कामगारांच्या वसत्यांना जोडणारी आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी १२ महिन्यांचा कालावधी दिलेला असताना अद्याप कामे पूर्ण झालेली नाहीत. लक्षवेधी सूचनेला जे लेखी उत्तर दिलेली आहे त्याला माझी हरकत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केलेले आहे की, "राज्य गुणवत्ता निरीक्षक (SQM) यांनी वेळोवेळी पाहणी केली असून उक्त नमूद सर्व कामे मानकानुसार माहे मे, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे प्रयत्न आहेत." काही कामे अर्धवट असून काही कामे सुरुच झालेली नाहीत. जी कामे झालेली आहेत त्यापैकी ४ कामे असमाधानकारक आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सदर कामे पूर्ण करण्यासाठी १२ महिन्यांचा कालावधी दिलेला असताना ५ वर्षे होऊन सुद्धा कामे पूर्ण झालेली नाहीत. मे.अनुसया कन्स्ट्रक्शन कंपनीने सदर काम घेतले होते. परंतु त्यांनी ते काम सबलेट करुन दुसऱ्याला दिलेले आहे. संबंधित ठेकेदार काम करीत नाही. त्यामुळे मे.अनुसया कन्स्ट्रक्शन या मूळ ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे काय ? तसेच, सदर कामे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहेत ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सदर कामावर किती निधी खर्च झालेला आहे तसेच ही कामे बोगस असून ज्या अधिकाऱ्यांनी बिले रेकॉर्ड केली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेत प्रधानमंत्री ग्राम सडक योजना असा उल्लेख केलेला आहे. परंतु सदर कामे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत घेण्यात आलेली नसून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत घेण्यात आलेली आहेत. सदर लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्यानंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून उपरोक्त तांड्यांमध्ये कामे घेण्यात आलेली आहेत काय याबाबत शोध घेण्यात आला. विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती गोळा करताना बराच त्रास झाला. सदर प्रश्न मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत असावा असा आम्ही

श्री.अब्दुल सत्तार.....

अंदाज लावला. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या बरोबर आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी ३ वर्षे विलंब झालेला आहे. आपल्याला माहिती आहे की, कोरोना महामारीमुळे मागील २ वर्षात अनेक कामे थांबली होती, निधी अभावी देखील काही कामे थांबली होती. संबंधित ठेकेदाराला आता पर्यंत १५ लाख रुपयांच्या आत देयक अदा करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त देयक अदा करण्यात आलेले नाही. मी सांगू इच्छितो ४ कामे झालेली असून २ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित कामे मे महिन्यापर्यंत पूर्ण होतील असे मी सभागृहाला आश्वासित करतो. पुढील ३-४ महिन्यात ते काम पूर्ण होईल.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना किंवा मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील कामे असोत. सदर कामे ३-४ वर्षापासून प्रलंबित आहेत. ही परिस्थिती केवळ बीड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण राज्यात आहे. अशा ठेकेदारांची नावे काळ्या यादीत केव्हा पर्यंत टाकण्यात येतील आणि त्यांना पुन्हा टेंडर प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जाणार नाही याबाबत खबरदारी घेण्यात येईल काय ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, १० टक्केच निधी वितरीत केलेला असून उर्वरित काम मे महिन्यापर्यंत पूर्ण होईल. मागील ५ वर्षात जे काम पूर्ण झाले नाही ते ३ महिन्यात कसे काय पूर्ण होईल असा माझ्या सारख्या सदस्याला प्रश्न पडलेला आहे. सदर काम ३ महिन्यात कशा प्रकारे पूर्ण करण्यात येणार आहे व त्या कामाचा योग्य तो दर्जा राखला जाणार आहे काय ? तसेच राज्यातील इतर जिल्ह्यातील अपूर्ण कामे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहेत ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, कोरोना महामारीमुळे राज्यात अनेक ठिकाणी कामे संथगतीने सुरु आहेत. परंतु ज्या ठेकेदारांनी हेतुपुरस्सर चुका केल्या असतील किंवा त्यांची गुणवत्ता तपासताना ते दोषी आढळून आले तरच त्यांना काळ्या यादीत टाकता येईल. शासनाकडे निधी अपुरा असल्यामुळे अद्याप काम पूर्ण होऊ शकले नाही, हे मी मान्य करतो. कोरोना काळात शासनाकडे निधी कमी होता.

यानंतर श्री.सांगळे......

श्री.अब्दुल सत्तार...

दोन वर्षांच्या करोना काळात आरोग्य सुविधेकरिता जास्त निधी खर्च झाला. त्यामुळे उत्पन्न कमी झाले. दोन वर्षांच्या काळात ज्या कंत्राटदारांनी वेळेवर कामे केलेली नसतील, त्यांना शासनाच्या वतीने कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले जातील. आता दोन्ही तिन्ही लाटा संपलेल्या आहेत. आता राज्यात विकासाची लाट सुरु होईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या बाबतीत समर्पक उत्तर दिलेले असल्यामुळे माझ्या मनात कोणतीही शंका नाही. दिनांक ३१ मार्च पर्यंत सदर योजनेकरिता शासनाकडे किती निधी शिल्लक आहे ? सर्व जिल्हयांकरिता सदर निधीचे वाटप करीत असताना तो सारख्या प्रमाणात केला जाणार आहे का ? दोन वर्षांच्या काळात कंत्राटदारांनी कामे केलेली नसल्यामुळे त्यांना काळया यादीत टाकण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांनी प्रश्न विचारला होता. करोना काळात कामे विलंबाने झाल्यामुळे कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यासंबंधी मला काही सांगायचे नाही. नागपूर जिल्हयातील १९३ कि.मी. च्या कामासाठी १०३ कोटी रुपयांचा निधी मिळणे बाकी आहे. करोना काळ सुरु असल्यामुळे आमचे त्याबाबत काही म्हणणे नव्हते. करोना काळात निधी न मिळाल्यामुळे कंत्राटदारांनी कामे केलेली नाहीत. ३१ मार्च पूर्वी सर्व जिल्हयांकरिता सदर निधीचे वाटप सारख्या प्रमाणात केले जाणार आहे का ? तसेच सदर कामांसाठी किती निधी शिल्लक आहे ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रस्त्याच्या कामासंबंधी माहिती दिली आहे. त्यात एकुण १९३३ रस्त्याची कामे आहेत. त्यापैकी ८०८ कामे पूर्ण झालेली आहेत व ११२५ कामे प्रगतीपथावर आहेत. त्याकरिता ११५८ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. त्यापैकी फक्त ४९१ कोटी रुपये खर्च झाला आहे. उर्वरित ६६६ कोटी रुपयांच्या निधीपैकी काही निधी यंदा जाहीर झालेल्या अर्थसंकल्प व पुरवणी मागण्यांद्वारे मिळालेला आहे. आम्ही या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे संपूर्ण निधी मिळण्यासंबंधी मागणी केली असून सदर निधी देण्यासंबंधी त्यांनी "होय" असे सांगितलेले आहे. त्यानुसार आमच्या

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार...

विभागाला निधी मिळणार आहे. जशी कामे पूर्ण होतील त्यानुसार त्यांच्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला येईल. मी आणि माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्यासमवेत दोन वेळा बैठक घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी उर्वरित निधी देण्याचे कबुल केलेले आहे. पुरवणी मागण्या ४ दिवसांपूर्वी झाल्या आहेत. आता २५७ कोटी रुपयांचा निधी आमच्या विभागाला तातडीने देण्याबाबत त्यांनी सांगितलेले आहे. ११२२ कोटी रुपयांपैकी जेवढा निधी येईल त्यातून राज्यामधील सर्व जिल्हयांमध्ये जशी कामे पूर्ण होतील त्यानुसार निधी उपलब्ध करुन देता येईल. राज्यातील एकूण कामांकरिता ११५८ कोटी रुपयांच्या निधीची मागणी आहे. त्यापैकी ४९१ कोटी रुपये खर्च झाले असून ६६६.४५ कोटी रुपयांचा निधी शिल्लक आहे. ज्या जिल्हयांमध्ये जेवढी रस्त्यांची कामे झाली असतील त्यानुसार त्यांना समान निधी दिला जाईल. त्यात कोणताही दुजाभाव केला जाणार नाही.

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, सदर रस्त्यांची कामे कमी अंतराची आहेत. मंत्री महोदयांनी सदर रस्त्यांकरिता फार कमी निधी खर्च झाला असल्याचे सांगितलेले आहे. परंतु त्यामधील ४ रस्त्यांच्या कामांबाबत गुणनियंत्रक विभागाकडील रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. त्यांच्या रिपोर्टनुसार सदर ४ रस्त्यांची कामे असमाधानकारक झालेली आहेत. त्यामुळे सदर कामे पूर्ण करण्यापूर्वी ज्यांनी असमाधानकारक व निकृष्ट कामे केलेली आहेत त्यांच्याविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, कारवाई करण्यासंबंधी समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार समितीने आतापर्यंत किती कि.मी. रस्ते तयार झालेले आहेत, किती कामे झालेली आहेत याबाबतचा रिपोर्ट सादर केला आहे. त्यानुसार सदरहू ४ कामे झालेली आहेत. उर्वरित २ कामे अपूर्ण आहेत. ती कामे क्वॉलिटी कंट्रोलकडून तपासण्यात आली आहेत. त्यात जे काही दोष किंवा उणीवा असतील त्यानुसार

श्री.अब्दुल सत्तार...

संबंधित कंत्राटदारांविरुध्द कारवाई केली जाईल. तसेच त्यामध्ये कंत्राटदारांचा काही दोष नसल्याचे आढळून आल्यास आपल्याला पुढील कामे गतीमान पद्धतीने करावी लागतील.

**सभापती** : ठीक आहे.

--------------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होणे

**मु.शी.:** राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होणे. यासंबंधी श्र ी.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, असूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळा बाहय असणे, संचमान्यतेचे निकष बदलून गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तात्काळ सुरु करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकडयांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरु केलेली नेमणूक रद्द करून कायम स्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत

श्री.कपिल पाटील.....

तातडीने सोडवणूक न झालेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही".

प्रा.वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवत े.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांना लक्षवेधीच्या उत्तरामध्ये सुधारणा करायची आहे का ?

प्रा.वर्षा गायकवाड : नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माध्यमिक शाळांमधील कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्यासंबंधी प्रश्न विचारला असताना त्यावर निवेदनामध्ये प्राथमिक शाळांमध्ये नेमलेले अतिथी निदेशक कोर्टात गेल्यासंबंधी उत्तर देण्यात आलेले आहे. याचा अर्थ बादरायण संबंध जोडलेला आहे. त्यामुळे त्या उत्तरामध्ये दुरुस्ती करावी असे माझे म्हणणे होते.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री अनुभवी असल्यामुळे आपण त्यांना आपला प्रश्न विचारावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. त्या अतिशय सकारात्मक आहेत. परंतु खालचे अधिकारी त्यांची अडचण करतात. हा मूळ विषय आहे. त्यामुळे कोणत्या प्रश्नाला कोणते उत्तर द्यावयाचे हे लक्षात येत नाही. मंत्री महोदयांच्या आदरापोटी मी ही बाब निदर्शनास आणली आहे. सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचनेमध्ये ४-५ प्रश्न विचारले होते. त्यापैकी मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाला चांगले उत्तर दिलेले आहे. कोविड काळात ऑनलाईन शिक्षण असले तरी विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. ऑनलाईन शिक्षणाचे काही खरे नाही. केंद्र शासनाने Learning Recovery Programme आखून तो अंमलात आणावा असे निदेश दिलेले आहेत. राज्य आणि केंद्र शासनाकडील निधी एकत्रित करुन सदरहू कार्यक्रम करण्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? गणित आणि विज्ञान विषयासंबंधी मी दुसरा प्रश्न प्रश्न उपस्थित केला आहे. त्यावर लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आलेले आहे की, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. यापूर्वी सायन्स आणि गणित विषयांकरिता वेगवेगळे शिक्षक कार्यरत होते. परंतु आता ती पदे तसेच कला-क्रीडा शिक्षकांची पदे संपुष्टात आणली आहेत. त्यामुळे सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त

श्री.कपिल पाटील.....

करण्यात आली. शासनाला कायद्याच्या विसंगत शासन निर्णय करता येत नाही. त्यामुळे आपल्याला सन २०१५ मधील शासन निर्णय प्रथम रद्द करावा लागेल. सभापती महोदय, सन २०१५ मधील शासन निर्णयात सुधारणा करण्याचा प्रश्न येत नाही. आपल्याला कायद्यात सुधारणा करता येऊ शकेल. परंतु कायदा आपल्या बाजूचा आहे. स्वर्गीय मधुकरराव चौधरी तसेच राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या काळात यापूर्वी सदर कायदे झालेले आहेत. अशा प्रकारचे कायदे अस्तित्वात असताना विसंगत निर्णय रद्द करण्यासंबंधीचा माझा प्रश्न आहे. आपण तो विसंगत निर्णय रद्द करणार आहात का ? तसेच आपण समिती नेमली असल्यास समितीने कला-क्रीडा शिक्षक पुनर्स्थापित करणे, सायन्स आणि गणित विषयांकरिता वेगळे शिक्षक देणे, आयसीटी शिक्षकांचा समावेश करणे, तसेच ग्रंथपाल यांच्याकडे अर्धवेळ अध्यापनाचा भाग दिल्यास त्यांचाही शिक्षक पदात समवेश करणे शक्य आहे. ही बाब पार्ट टाईमवरुन फुल टाईम करणे शक्य आहे. जेणेकरुन आपले व शाळेचे ओझे कमी होईल. आपण यासंबंधी कार्यवाही करणार आहात का ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, अनुदानासंबंधी त्रुटींची पूर्तता करुनही अनेक शाळा प्रतिक्षेत आहेत. आपण त्या शाळांची यादी कधी जाहीर करणार आहात ? सभापती महोदय, त्यानंतर आपण मला २ प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनेमध्ये शिक्षण विभागातील संपूर्ण प्रश्नांचा समावेश झाला आहे असे आपल्याला म्हणता येईल. सन्माननीय सदस्यांनी गुणवत्तेसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. केंद्र शासनाने Learning Recovery Programme दिलेला आहे .त्या संदर्भात आपला थोडा लॉस झालेला असून सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत चांगली सूचना केलेली आहे. त्याबाबत निश्चितपणे अभ्यास करुन भविष्यात त्याचा कशा प्रकारे चांगला उपयोग करुन घेता येईल ? याबाबत आपण कार्यवाही करु. अशा प्रकारे हा प्रश्न संपला आहे. तसेच आसर रिपोर्टच्या माध्यमातून राज्याला दिलासा देणाऱ्या काही आल्हाददायक व

प्रा.वर्षा गायकवाड ....

चांगल्या गोष्टी घडलेल्या आहेत. यापूर्वी शासकीय शाळातील मुलांची पटसंख्या ६०.५ टक्के होती. आता ती पटसंख्या ६९.६० टक्क्यांपर्यंत वाढली आहे. अशा प्रकारे शासकीय शाळांमध्ये विद्यार्थी मोठया प्रमाणावर येत आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड .....

निजामकालीन शाळांना, आदर्श शाळांना या अर्थसंकल्पात मोठया प्रमाणावर निधी दिलेला आहे, अभ्यासक्रमात बदल करीत आहोत, काही गोष्टी नव्याने करीत आहोत, दर्जा सुधारला पाहिजे, शिक्षण चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांपर्यत पोहचवले पाहिजे हा पहिला प्रयत्न आहेत. कला व कार्यानुभव याबाबत सन्माननीय सदस्यांनी खूपदा प्रश्न विचारले आहेत. मला व त्यांनाही माहिती आहे की, याकरीता खूप वेळा कमिटी गठीत होऊन येथे बैठका झाल्या आहेत व आयुक्तांकडेही बैठका झाल्या आहेत. दुर्दैवाने शेवटी बैठक झाल्यावर नुकतीच आयुक्तांची बदली झालेली आहे. अनुभवानुसार लोक घेतले गेले पाहिजेत अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र आपण सादर केलेले आहे, सध्या प्रकरण उच्च न्यायालयात आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, न्यायप्रविष्ट प्रकरण पूर्णत: वेगळे आहे, मी त्याबद्दल विचारलेले नाही. तुम्ही अतिथी निदेशकांबद्दल उत्तर देत आहात. मी न्यायप्रविष्ट प्रकरणांबाबत कधीही प्रश्न विचारत नाही. मी कला, क्रीडा शिक्षक, गणित शिक्षक, विज्ञान शिक्षक, अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षक करणे, ग्रंथपाल, रात्र शाळा हे प्रश्न वेगळे आहेत. अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांकडे दिलेल्या उत्तरात गडबड होत आहे असे दिसते.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी संच मान्यतेबाबत प्रश्न विचारला आहे. गणित व भाषेचे शिक्षक वेगळे असले पाहिजेत, अशी आपली चर्चा झाली होती. मी काही गोष्टींचे टारगेट ठेवले आहे. अनुकंपा, अर्धवेळ ग्रंथपाल, संच मान्यता हे तीन विषय प्राधान्याने घेतले आहेत. अर्धवेळ ग्रंथपालाबाबतचा प्रस्ताव संचालक कार्यालयाकडून आमच्याकडे आलेला आहे. त्याबाबत आम्ही दोन दिवसात निर्णय घेऊ. ७७२ पदे त्यांनी या प्रस्तावात पाठविली आहेत, आवश्यक तर सन्माननीय सदस्यांशी एकदा बोलता येईल. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न अर्धवेळ ग्रंथपालांबाबतचा आहे. तुम्ही संबंधित सर्व सन्माननीय सदस्य उपलब्ध असाल तर त्यावर चर्चा करुन निर्णय घेऊ.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता कोणीही प्रश्न विचारु नयेत, मंत्री महोदयांनी बैठकीचे निमंत्रणच दिलेले आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अर्धवेळ ग्रंथपालांचा विषय संपेल. दुसरा महत्वाचा विषय अनुकंपाचा आहे. त्यावर आपण आज दुपारी चर्चा केल्यास तो विषयही संपेल.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आपणास वेळ असेल तर आजच या सन्माननीय सदस्यांना बोलवा.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आजच त्यांना बैठकीस बोलावत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृह सर्वोच्च आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, दोन विषयावर बैठक न घेता फायनल करुन टाकायचे आहेत. तिसरा विषय कला व कार्यानुभव शिक्षकांचा आहे. आयुक्त श्री.विश्वास सोळंकी असताना या विषयावर फार अभ्यास केलेला आहे. मांढरे यांचेशी मी एकदा चर्चा करते व त्यानंतर संच मान्यतेचा विषय मिटवून टाकू. म्हणजे तीन विषयावर चर्चा करुन निर्णयाप्रत येऊ. मी तुमच्या सर्व विषयाला न्याय दिलेला आहे. त्रुटीच्या पुर्ततेबाबत आपणास सर्व माहिती आहे, याबाबत आपल्या दालनात बैठक झाली, परवा देखील आम्ही येऊन बसलो होतो. सभापती महोदय, आता आपल्याकडे माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व संबंधितांची बैठक आयोजित करावी.

**सभापती** : ठीक आहे, तशी बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.अभिजित वंजारी : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, किमान आर्थिक भार ज्या विषयात आहे, ते विषय आपण लवकरात लवकर निकाली काढावेत. अपंग एकात्मिक शिक्षण योजनेमध्ये सर्व शिक्षकांना नियमित करण्याचा विषय आहे. समायोजन करण्याचा विषय आहे. क्रीडा व कला शिक्षकांना नियमित करणे, अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करणे हे चार-पाच विषय कमीत कमी

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी .....

आर्थिक भाराचे आहेत. या विषयांना लवकरात लवकर निकाली काढावेत अशी आमची विनंती आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वी सांगितले आहे की, काही प्रश्नाच्या बाबतीत शेवटच्या टप्प्यात आमच्याकडे आलेले आहेत. अर्धवेळ ग्रंथपालांचा प्रस्ताव आला आहे, संच मान्यता शेवटच्या क्षणापर्यत आली आहे, आता नवीन आलेल्या आयुक्तांशी चर्चा करु. तिसरा विषय अनुकंपाबाबत आहे. अपंग समस्यांविषयी खूप अभ्यास करावा लागेल कारण केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय आहे, त्यात अनेक बाबी आहेत त्या सभागृहाच्या पटलावर आणणे बरोबर नाही. याबाबत तपासणी करुन निर्णय घ्यावा लागेल.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे, बैठकही घेणार आहेत. बैठक झाल्यावर तुम्ही ती फाईल पुढे पाठविणार मग निर्णय होणार, ग्रंथपालांबाबत सांगतो, २०१० मध्ये मी पहिल्यांदा आमदार झालो त्यावेळी पहिला प्रश्न ग्रंथपालांबाबत विचारला होता पण आजपर्यत त्याचा निकाल लागलेला नाही. मंत्री महोदया दोन दिवसात निर्णय घेणार आहेत हे ऐकून आश्चर्य वाटले. पण त्या निर्णय घेणार आहेत हे ऐकून स्वागत करतो. आयसीटी शिक्षकांबाबत सन्माननीय सन्माननीय सदस्य श्री.अभिजित वंजारी यांनी विचारले आहे कारण ती २००५ ची योजना आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील सर्व शाळांना विशेषत: जिल्हा परिषद शाळेत संगणक शिक्षण मिळावे म्हणून हा प्रयोग केंद्र शासनाच्या मदतीने केला आहे. आज याबाबत दोन प्रश्न निर्माण झाले आहेत. केंद्र सरकारने त्यांचा पगार बंद केला आहे, ते शिक्षक निघून गेले आहेत. २००५ किंवा त्यानंतर जे संगणक घेतले आहेत ते आता भंगार झालेले आहेत. शासनाला काही तरी वाटायला पाहीजे. विशेषत: जिल्हा परिषदेच्या शाळेत अत्यंत कमकुवत घटकातील मुले शिक्षण घेत आहेत हे आपणास माहिती आहे. त्यांनी संगणक शिक्षण घेऊच नये का ?

श्री.सतिश चव्हाण .....

असुधारित प्रत

सभापती महोदय, आमदार निधीतून आम्ही संगणकाचे वाटप करतो, मागील १४ वर्षाचा माझा अनुभव आहे. या जुलै महिन्यात पत्र दिले तर पुढील जुलै महिन्यापर्यंत संगणक वाटप होत नाही. कारण तुमच्याकडे रेट कॉन्ट्रॅक्ट नाही. जिल्हाधिकारी कार्यालयास आम्ही पत्र दिल्यानंतर ज्या जिल्हा परिषद किंवा अन्य शाळेस मान्यता आहे त्या शाळेस संगणक दिले पाहिजे की नाही. जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवते, जिल्हा परिषद पंचायत समितीला पाठवते, ज्या शाळेस संगणक द्यायचे आहेत त्या शाळेचा पगार चालू आहे. पण एवढी माहिती मागवली जाते की, आमची माणसे व लिपिक थकून जातात. एक संगणकाचा पुरवठा केला तरी जिल्हा परिषदेकडे सहा सहा महिने त्याचे देयक मिळत नाही. माझी विनंती आहे की, आमदार निधीतून जिल्हा परिषदेच्या शाळेत आयसीटी स्कीम राज्य शासन राबविणार का. आमदार निधीतून आम्ही संगणक देतो, आम्ही पत्र दिल्यानंतर एक महिन्याच्या आत शाळांना संगणक पुरवठा करणार का. ती व्यवस्था तुम्ही कशीही करा.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, काही निर्णय घेण्यासाठी आपले सर्वांचे एकमत झाले पाहिजे. आपण सर्वजण एकमत करुन घेऊया. मी जाणीवपूर्वक ही बाब पटलावर आणली आहे. ज्या निर्णयामुळे आर्थिक भार पडणार नाही ते निर्णय घेण्यास अडचण येणार नाही फक्त आपल्यामध्ये एकमत झाले पाहिजे. ग्रंथपाल किंवा संच मान्यतेच्या विषयाकरीता आम्हाला वित्त विभागाकडे जावेच लागते. तो प्रोसीजरचा भाग आहे. आयसीडीएस शिक्षकांबाबत मी सांगू इच्छिते की, या शिक्षकांनी मुख्याध्यापक व शिक्षकांना पूर्णपणे प्रशिक्षण द्यावे असा उद्देश आहे. तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण ही योजना २००५ मध्ये झाली तेव्हा संगणक कर्मचारी कंत्राटी कामावर होते, त्यांना कायम करावे असे सर्व जण सांगत आहे. तुम्हाला माहिती आहे की, ही योजना केंद्र सरकारची आहे व बजेट त्यांचेच येत होते. केंद्र सरकारने ती योजना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. माननीय सभापती महोदयांकडे बैठक होईल तेव्हा हा विषय देखील आपण चर्चेला

प्रा.वर्षा गायकवाड .....

असुधारित प्रत

घेऊ. केंद्र शासनाचे कर्मचारी आपल्याकडे घ्यायचे की नाही याचा निर्णय त्या बैठकीत घेऊ त्या बैठकीस संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलावण्यात येईल. तसेच आमदार निधीतून संगणकाबाबतचा विषय थोडा तपासावा लागेल, तो मी तपासून घेते.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तरे दिली आहेत पण काही प्रश्न अजूनही अनुत्तरीत राहतात. अशा अनेक बैठका झालेल्या आहेत, पहिला प्रश्न कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांबाबत होता. वारंवार सांगितले गेले की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. कायद्यात तरतूदसुध्दा आहे. अनेक वर्ष ज्यांनी काम केले आहे अशा लोकांना आपणच घेतले आहे. वन फाईन मॉर्नींग आपण सर्वांना घरी पाठविले आहे. एका शाळेला एक देऊ शकत नाही म्हणून पुन्हा क्लस्टर करुन पटांच्या संख्येचा निकष लावला. आता ते सर्व शिक्षक घरी बसलेले आहेत. आपण म्हटले आहे की, हे न्यायप्रविष्ट आहे. याबाबत खुलासा व्हावा आम्हालाही माहिती हवी की, नेमके काय न्यायप्रविष्ट आहे. शासनाने सकारात्मक काही केले तर ते केस मागे देखील घेतील.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील......

जर त्यांना हे माहिती झाले की, आपल्याला आपल्या उदरनिर्वाहाचे साधन यातून मिळू शकते तर ती केसच जर तेवढयासाठी असेल तर त्यावर चर्चा करुन शासन यातून मार्ग काढू शकते.

सभापती महोदय, ग्रंथपालाच्या संदर्भात दोन दिवसात शासन निर्णय घेणार आहे, असे म्हटले गेलेले आहे. हे अधिवेशन संपण्याच्या आत या संदर्भात निर्णय घेतला गेला पाहिजे. जेणेकरुन राज्याच्या ग्रंथपालालाच्या.....अडथळा....

सभापती महोदय, त्रुटीपूर्ण अपात्र शाळांचा हा अतिशय भावनात्मक प्रश्न सबंध राज्याचा आहे. राज्यमंत्री महोदयांनी येथे त्या दिवशी सभागृहात सांगितले की, पंधरा दिवसांच्या आत यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. आता आपले उत्तर याबाबत वेगळे येत आहे. आपण म्हणत आहात की, हे आपण मुख्यमंत्री महोदय, वित्त मंत्री महोदयांकडे जाऊन याबाबत निर्णय घेऊ. राज्याचे मंत्री महोदय म्हणून सामुहिक जबाबदारी जाणून हे उत्तर आले नाही तर वारंवार याबाबत बैठका घेऊन काय करायचे, आपण जा ना ! त्यांच्याकडे, याबाबत शासनानेच जाहीर करावे की, या सर्व त्रुटीपूर्ण शाळांची पूर्ण तपासणी होऊन सर्व यादी आपल्यापर्यंत आलेली आहे. अधिवेशन संपण्याच्या आत आपण ज्यांच्याशी चर्चा करायची ती करावी, परंतु त्याबाबतचा निर्णय देखील हे अधिवेशन संपण्याच्या आत सकारात्मक घ्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, चौथ्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी कला शिक्षकांबाबत विचारलेला आहे. त्याचे उत्तर असे आहे की, याबाबत मी पूर्वी देखील सांगितलेले आहे की, संच मान्यतेबाबत चर्चा करत असताना त्यावेळी देखील आम्ही हेच पाहिले की, यांना यामध्ये कसे सामावून घेता येईल, त्यामध्ये शेवटपर्यंत प्रोसिजर आलेली आहे. संच मान्यतेचा प्रश्न एकदाचा संपला की, आयुक्तांकडे हा प्रस्ताव शेवटी होता. त्या आयुक्तांची बदली झालेली आहे, दुसरे आयुक्त जे आलेले आहेत, त्यांच्याशी याबाबत चर्चा करता येईल. सन्माननीय सदस्यांनी न्याय प्रविष्टाच्या बाबत जो नवीन प्रश्न विचारलेला आहे की,

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड

त्याबाबत मी आपल्याला माहिती पाठवित आहे. कुठे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, ज्याच्याबाबत आपण माहिती पाठविलेली आहे. याबाबत आमच्या काही क्वेरीज आहेत, त्या केवळ शासनाकडून पाठविल्या जातील. परंतु त्याबाबत देखील शासन सकारात्मक आहे. त्रुटीपूर्ण शाळांबाबत सन्माननीय सदस्य जे म्हणालेले आहेत, त्याचे उत्तर मी निश्चितच होय असेच दिलेले आहे. याबाबत शासन प्रयत्न करेल. यापूर्वी देखील याबाबत शासनाने प्रयत्न केले होते, यापुढेही शासन याकरिता प्रयत्नशील राहू.

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदय, मागील अधिवेशनात माननीय शिक्षण मंत्री यांनी सांगितले होते की, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या भरतीवरील बंदी एक महिन्याच्या आत उठविण्यात येईल. तीन महिने झाले तरीही याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. माननीय उच्च न्यायालयाने नेहमी निर्णय दिलेला आहे की, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या भरतीवर बंदी घालता येत नाही. याबाबत माहिती मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे. माझा एकच प्रश्न आहे की, ही बंदी केव्हापर्यंत शासन उठविणार आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आज या लक्षवेधी सूचनेमध्ये इतके विषय आहेत, परंतु हा विषय त्याच्यामध्ये नाही. मला असे वाटते की, ही लक्षवेधी सूचना म्हणजे आमच्या विभागावरील जणू काही पूर्ण चर्चा आहे. हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी मागील काळात हा प्रश्न विचारलेला आहे. आजची ही लक्षवेधी पूर्णपणे वेगळी आहे. सन्माननीय सदस्य आमचे सहकारी व स्नेही आहेत. आपल्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत, हे आपल्यालाही माहिती आहे. याबाबत आपण माझ्या दालनात यावे, यावर आपण चर्चा करुन याबाबतचा अंतिम निर्णय घेऊ.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी अतिशय वस्तुनिष्ठ प्रश्नातून मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधू इच्छित आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदय, या लक्षवेधीमध्ये जरी अनेक विषय असले तरीही अपंग समावेशित शिक्षक हा जो विषय आहे, त्याबाबत आम्ही आपल्याबरोबर तीन वेळा बैठक घेतलेली आहे. आपल्या अधिकाऱ्यांनी याची पूर्ण तपासणी केलेली आहे. याबाबत एकदा नाही तर चार वेळा तपासणी केलेली आहे. तपासणी अंती जे पात्र शिक्षक ठरलेले आहेत, त्यापैकी काही जणांना आपण सेवेमध्ये समाविष्ट करुन घेतलेले आहे. आता उर्वरित जे पात्र शिक्षक आहेत, त्यांना सेवेत समाविष्ट करुन घ्यायचे आहे, त्यांच्या बाबतीतील निर्णय शासन हे अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार का ? हा माझा वस्तुनिष्ठ प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, आयसीटी संगणक शिक्षकाच्या बाबतीत माझी तर मागणी नाही की, त्यांना तुम्ही सेवेत घ्या, कारण ते कंपनीने नेमलेले शिक्षक होते. ते शिक्षक शासनाने नेमलेले नव्हते. त्यामुळे त्यांची जबाबदारी शासनाची नाही. परंतु आता संगणकाचे ज्ञान किती महत्त्वाचे झालेले आहे, हे ऑनलाईन शिक्षणाने अधोरेखित केलेले आहे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात संगणक तंत्रज्ञान हा विषय आहे, आपण तो शिकवितो. परंतु तो विषय विना अनुदान असल्यामुळे आपल्याला जिल्हयातील लोक अनेक वेळा भेटतात. अनेक वेळा सभापती महोदय आपणही त्यामध्ये लक्ष घातलेले आहे. याबाबत मंत्रीमहोदयांनी मंत्रीमंडळापुढे तरी जा, जो काही निर्णय घ्यायचा आहे, तो निर्णय कॅबिनेट घेईल. लोक वारंवार आपल्याला भेटतात मागणी करतात की, अनुदान द्या. एवढया महत्त्वाच्या विषयाला अनुदान देण्याचा विषय अधिवेशनात मंत्रीमंडळापुढे सादर करणार का ?

सभापती महोदय, उर्वरित सर्व विषय हे संच मान्यतेशी जोडले गेलेले आहेत. संच मान्यतेच्या बाबत पुढे जाताना आज शारिरीक शिक्षण असेल, मध्यंतरीच्या काळात याबाबत मानधनावर नेमण्याबाबतचा प्रश्न असेल, मानधनावर एकदा नेमले, या नेमणूका तात्पुरत्या असतात, आपल्याला वाटते की, तात्पुरती नेमणूक एकदा का लोकांनी काम केले की, त्यांना वाटते की, शासनाने आपल्याला सेवेत सामावून

श्री.विक्रम काळे......

घ्यावे, याकरिता आंदोलने वगैरे सुरु होते. या पदाचा अंतर्भाव हा संच मान्यतेत करावा लागेल, त्या अनुषंगाने.....(अडथळा)..... हा निर्णय घेण्यासाठी एक व्यापक बैठक अधिवेशन झाल्यावर लगेच घेण्यात येणार आहे का ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसरा व तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. पहिल्या प्रश्नाच्या बाबत उत्तर देताना मी पूर्वीच सांगितले होते की, यावर अभ्यासपूर्ण निर्णय घेणे आवश्यक आहे. मला अनेक आमदार महोदय, खूप जण याबाबत विनंती करतात की, त्याच्याबाबत खूप वेगवेगळी मते विभागात आहे. याबाबत डेटामध्ये खूप फरक दिसलेला आहे. हा निर्णय अभ्यासपूर्वकच घ्यावा लागेल. हे संगणक कंत्राटी शिक्षक केंद्र शासनाने नेमलेले आहेत. संगणक विषयाबाबतचा हा प्रस्ताव कॅबिनेटपुढे नेण्यात येईल.

----------------------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : सांगली तालुक्यातील पलुस तालुक्यात पशुधनाच्या तुलनेत पशु वैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय

अधिकारी यांची रिक्त असलेली पदे यामुळे पशुधनावर विपरित परिणाम होणे.

**मु.शी.** : सांगली तालुक्यातील पलुस तालुक्यात पशुधनाच्या तुलनेत पशु वैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय अधिकारी यांची रिक्त असलेली पदे यामुळे पशुधनावर विपरित परिणाम होणे यासंबंधी श्री.अरुण लाड ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरुण लाड ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली तालुक्यातील पलूस तालुका हा संपूर्ण बागायती क्षेत्र असणारा तालुका असणे, तालुक्यातील ३४ गावांत तब्बल ५३ हजार पशुधन असून त्यात गाई,म्हशी,शेळी-मेंढी व इतर पशुधनाचा समावेश असणे, तसेच शेतीबरोबरच पशुपालनाचा व्यवसाय देखील मोठया प्रमाणात तालुक्यात करण्यात येत असणे, तालुक्यात ५३ हजार इतके पशुधन असताना उपचार करण्यासाठी तालुक्यात केवळ ७ पशुवैद्यकीय दवाखाने असून त्यासाठी नियुक्त करण्यात आलेले पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुवैद्यकीय अधिकारी यांचे एकेक पद तर पर्यवेक्षक ३, ड्रेसर ३ व परिचारक चार यापैकी पाच पदे रिक्त असणे, त्यामुळे पशुधनाचे उपचारांवर परिणाम होऊन उपचाराअभावी जनावरे दगावण्याची शक्यता नाकारता न येणे, त्यामुळे पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याची तालुकावासियांकडून होत असलेली आग्रही मागणी, तथापि, वारंवार मागणी करुनही अद्याप दवाखान्यांची संख्या वाढविणे व रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही न झाल्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व

नाराजीची भावना, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री.सुनील केदार ( पशुसंवर्धन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील पलुस तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाने वाढविणे आणि रिक्त पदे भरणे. शासकीय नोंदणीप्रमाणे पलुस तालुक्यातील ३४ गावात ५३ हजार इतके पशुधन आहे. असे असताना तेथे पशुवैद्यकीय दवाखाने केवळ सातच आहेत. या सातपैकी फक्त तीन दवाखाने अ वर्ग आहेत. उर्वरित चार दवाखाने ब वर्ग आहेत. अ वर्ग दवाखान्यात बीव्हीसी डॉक्टर्स असणे अपेक्षित आहे. या पशु वैद्यकीय दवाखान्यात तीन बीव्हीसी डॉक्टर्स असतात, परंतु तेथे दोनच बीव्हीसी डॉक्टर्स आहेत. असे असताना उर्वरित पदे ५० टक्के रिक्त आहेत. यामुळे दवाखाने चालत नाहीत. कुंडल गावात परिचारक पदे दहा वर्षापासून रिक्त आहेत. अशा अवस्थेत पशुधन वाढविणे अपेक्षित नाही. पशुधनापासून होणारे उत्पादन व व्यवसाय वाढला पाहिजे, असे आपले म्हणणे आहे. परंतु या दवाखान्यात कर्मचारी नाहीत. खाजगी दवाखान्यात हा व्यवसाय वाढत आहे. शासकीय दवाखाने बंद पडत आहेत. खाजगी डॉक्टर्स गोठयावर जाऊन औषध पाणी देत आहेत, ते त्याबद्दल पैसे घेत आहेत. शासकीय दवाखान्यातील पशुधन विकास व व्यवसाय वर्धन होणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष शासन दरबारी मात्र तसे होताना दिसत नाही. शासकीय पातळीवर संबंधित व्यवसाय केवळ ५० टक्के आहे. सन २०१८ ते २०२२२ पर्यंत पशुधन व्यवसायाच्या अहवालानुसार केवळ ५० टक्केच पशुधनाला औषधपान केलेले आहे. असे असताना असे वाटते की, नेमके पशुधन कमी झालेले आहे का ? दुध कमी झालेले आहे का ? दुध उत्पादन तर वाढलेले आहे. पशुधन देखील वाढलेले आहे. परंतु शासनदरबारीच केवळ पशुधन व्यवसाय व उत्पादन कमी झालेले आहे. कारण शासन आवश्यक ती सेवा पशुधनासंदर्भात देत नाही. पशुवैद्यकीय दवाखान्यात कामाला लोक नाहीत, आहे त्यांनाही परतावा व औषध पुरवठा दिला जात नाही. त्यामुळे पशुधन उत्पादन व व्यवसाय वृध्दी कमी झालेली दिसून येत आहे. एका म्हशीची किंमत एक-एक लाख रुपये झालेली आहे. याबाबत माझा एकच प्रश्न आहे की, उपलब्ध पशुधनानुसार मागणीप्रमाणे दवाखाने वाढविण्यात येणार आहेत का ? पशुवैद्यकीय दवाखान्यातील ५० टक्के रिक्त पदे तातडीने भरण्यात येणार आहेत का ?

असुधारित प्रत

श्री.सुनील केदार : सभापती महोदय, माननीय आमदारांनी जी चिंता व्यक्त केलेली आहे, ती शासनाला नाकारता येत नाही. ती चिंता मान्यच केली पाहिजे.

सभापती महोदय, या खात्याचा कारभार मंत्री म्हणून सांभाळल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, मागील पंचवार्षिक योजनेमध्ये भरत्या झाल्याच नव्हत्या. त्या भरत्या जवळजवळ बंदच होत्या. कोरोना काळातही निकडीची गरज लक्षात घेता तातडीने पदे भरण्याकरिता कार्यवाही केली होती. त्यावेळी एमपीएससीनुसार नियुक्त्या बंद असतानाही २६२ पदांची आऊटसोर्सच्या माध्यमातून भरती केली होती. आताच एक महिन्यापूर्वी ४२८ उमेदवारांना एलडीओ म्हणून नियुक्त्या दिलेल्या आहेत. आता पुन्हा याबाबतची जाहिरात एमपीएससीकडे दिलेली आहे, त्यातून विभागाला २१२ एलडीओ तातडीने मिळणार आहेत. परंतु सोबतच माननीय आमदार महोदय आपल्याला याबाबत सांगायला हरकत नाही की, या संदर्भातील जी पदे भरती केलेली आहेत, त्यापैकी टेक्नीकल सर्व पदे जवळ जवळ भरलेली आहेत. पशुधन विकास अधिकारी यांची तीन पदे मंजूर आहेत, त्यापैकी दोन पदे भरलेली आहेत, ती पुढील महिन्यात भरण्यात येईल. सहायक पशुधन विकास अधिकारी यांची चारपैकी तीन पदे भरलेली आहे. नेमका जो आकडा आपल्याला वाटत आहे, तो आकडा म्हणजे परिचारक (ड्रेसर)यांच्या पदाचा आहे. जिल्हापरिषद प्रशासन हा प्रश्न निकाली काढेल. यासोबतच महाविकास आघाडी सरकारने एक आगळी वेगळी योजना सुरु केलेली आहे, त्याचा फायदा सर्वांना नक्की होणार आहे. त्याचा फायदा पलुस तालुक्यात निश्चितपणे देण्यात येणार आहे. फिरता पशुवैद्यकीय दवाखाना पलुस तालुक्यात सुरु झालेला आहे.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

श्री. सुनील केदार....

१९६२ क्रमांकाचा टोल फ्री नंबर आहे. हा नंबर डाईल केल्यानंतर संबंधित डॉक्टर शेतकऱ्यांच्या दारात येऊन सेवा देणार आहे. आता नव्याने ८३ ॲम्ब्युलन्स दिल्या जाणार आहेत. ही सर्व व्यवस्था झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना कोणतीही अडचण येईल असे तरी मला वाटत नाही.

श्री. अरुण लाड : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी फिरत्या दवाखान्याची माहिती दिलेली आहे. पूर्वी बांधलेले अनेक दवाखाने आहेत. त्यासाठी शासनाने निधी दिलेला आहे. पण आता ते पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे तिकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परिचारीकेचे पद गेल्या १० वर्षापासून रिक्त आहे. महत्वाची पदे भरली जात नसल्यामुळे लोकांना सेवा मिळत नाही.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दवाखान दिल्यामुळे तो बंद करणार असे अजिबात नाही. हा दवाखाना सुरु राहणार आहे. आता एमपीएससीमार्फत २१२ एलडीओंची पदे भरण्यासाठीची जाहीरात दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांनी इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव दिल्यानंतर या आर्थिक वर्षात सदर दवाखान्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. तसेच आवश्यकता भासल्यास माननीय पालकंत्री महोदयांशी चर्चा करुन जिल्हा नियोजन समितीकडून अधिकचा निधी मिळवून देण्यासाठी आणि दवाखान्याची दुरुस्ती करण्यासाठी निधी मिळावा म्हणून सूचना दिल्या जातील.

श्री. अरुण लाड : सभापती महोदय, दवाखाना बांधून जवळपास ८ ते ९ वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्याचे उद्घाटन झालेले नाही. तसेच आवश्यक अधिकारी आणि कर्मचारी वर्गाचा स्टाफ नाही. सदरहू दवाखाना आता पडायला लागला आहे. सदर दवाखान्यासाठी आवश्यक तो अधिकारी आणि कर्मचारी वर्ग दवाखान्यासाठी मंत्री महोदय देतील काय ?

असुधारित प्रत

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना माझ्यासमवेत घेऊन त्या दवाखान्याची पाहणी करणार आहे. त्या जिल्ह्यामध्ये ५ वर्षे होऊनसुध्दा दवाखान्याचे उद्घाटन झाले नसल्यामुळे मला ते पहिल्याप्रथम तपासून घ्यावे लागेल.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, सुदैवाने माननीय मंत्री श्री. सुनील केदार जी हे माझे जवळचे मित्र आहेत. सर्व योजना या माझ्या काळातील आहेत. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या काळातील पशुवैद्यकीय दवाखान्याची योजना सुरु झाली होती. एमपीएसीची पदे भरण्याची प्रक्रिया ही देखील माझ्याच काळात झालेली आहे. मंत्री महोदय असे सांगतात की, पूर्वीच्या सरकारने काही केले नाही. म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांचा अभ्यास चांगला आहे. ५ वर्षापूर्वी दवाखान्याचे बांधकाम झालेले असून, उद्घाटन का झालेले नाही, याचा देखील कोठे तरी विचार करण्याची आवश्यकता आहे. विभागाने सर्व व्यवस्था निर्माण करुन दिलेल्या आहेत. पशुधन वाढविणे हे क्रमप्राप्त आहे. गेल्या अनेक वर्षापासून आपल्या राज्यात बळीराजाची शर्यत बंद होती. महाविकास आघाडी सरकारने बळीराजाच्या शर्यतील परवानगी दिलेली आहे. याचे देखील कौतूक केले पाहिजे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी लक्ष घातलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना असे विचारावयाचे आहे की, जे दवाखाने आहेत, ते जुन्या आराखड्यानुसार झालेले आहेत. आता दिवसेंदिवस पशुधनात वाढ होत आहे. त्या प्रमाणात दवाखान्यांची संख्या वाढायला नको काय, आरोग्य अधिकाऱ्यांची पदे वाढायला नको काय ? सरकार पदे कमी करण्यासाठी आढावा घेते. सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना असे म्हणावयाचे आहे की, दवाखाना आहे पण डॉक्टर नाहीत. माननीय मंत्री महोदय राज्याचा आढावा घेऊन पशुधनाच्या संख्येनुसार दवाखान्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतील काय ? तसेच आरोग्य अधिकाऱ्यांची पदे वाढविण्यासाठी माननीय मंत्री महोदय धोरणात्मक निर्णय घेतील काय ?

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागातील अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी आहे. त्या कमिटीकडून दोन महिन्यात अहवाल येण्याचे अपेक्षित आहे. त्यानंतच उचित निर्णय घेतली जाईल.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदय जर आपल्या जिल्ह्यात उद्घाटनासाठी आले नाही तर मी स्वत: येईन आणि उद्घाटनाचा कार्यक्रम करीन.

सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली असल्यामुळे आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेतली जाईल.

--------------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : मल्लखांब खेळातील खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीच्या आदेशाची महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारच्या आदेशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केलेली नसणे

**मु. शी.**: मल्लखांब खेळातील खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीच्या आदेशाची महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारच्या आदेशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केलेली नसणे या संबंधी सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. भाई गिरकर (विधानसभेने निवडेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय क्रीडा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मल्लखांब हा खेळ अस्सल पारंपारिक देशी खेळ असून महाराष्ट्राच्या लाल मातीत जन्मलेला हा अस्सल मराठमोळा खेळ आज भारतातील जवळजवळ सर्व राज्यात खेळला जात असणे, भारताच्या सीमा ओलांडून जगातील पाच पैकी ४ खंडात सुमारे ३५ देशात आता मल्लखांब पोहचला असणे, सन २०१९ साली मुंबईच्या शिवाजी पार्क येथे मल्लखांबाची पहिली विश्वचषक स्पर्धा पार पडणे त्यात भारत हा विश्वविजेता ठरला असल्याची बाब निदर्शनास येणे, सदर स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारा मुंबईचा खेळाडू कु.दिपक शिंदे हा विश्वविजेता (world Champion) ठरणे, त्याने इतर प्रकारात दोन सुवर्ण व तीन रौप्य पदक पटकावले असणे, केंद्र सरकारनेही मध्य प्रदेशचे मल्लखांब प्रशिक्षक श्री.योगेश मालवीय यांना ‘द्रोणाचार्य पुरस्कार’ तसेच पहिल्या विश्वचषक स्पर्धेत भारताचे

असुधारित प्रत

प्रतिनिधित्व करणारी विश्वविजेत◌ी मुंबईची खेळाडू कु.हिमानी परब हिला ‘अर्जुन पुरस्काराने’ सन्मानित

श्री. भाई गिरकर.....

करून मल्लखांब या खेळ◌ाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला असणे, मल्लखांब खेळातील खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दाखल घेऊन केंद्र सरकारने मल्लखांब हा खेळ राज्यातील थेट भरतीसाठीच्या खेळांमध्ये समावेश करण्यासाठी सर्व राज्यांना आदेश निर्गमित करणे, याची दखल घेत जवळजवळ देशातील सर्व राज्यांनी याची अ◌ंमलबजावणी केली असल्याची बाब निदर्शनास येणे, परंतु महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारच्या आदेशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केली नसल्याची धक्कादायक बाब समोर येणे, परिणामी विश्वविजेत्या ठरलेल्या कु.दिपक शिंदे व कु.हेमानी परब यांसारखे खेळाडू हक्काच्या रोजगारापासून वंचित राहत असणे, राज्य शासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे अनेक होतकरू खेळाडू परावृत्त होऊन खेळाडूंमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, मल्लखांब या खेळात राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देऊन प्रोत्साहित करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्रीमती आदिती तटकरे ( क्रीडा राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, मी सदरहू लक्षवेधी सूचेनच्या अनुषंगाने माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री महोदयांच्या संपर्कात आहे.

**सभापती** : मला सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांचे अभिनंदन करावयाचे आहे. हा ग्रामीण भागातील महत्वपूर्ण प्रश्न आहे. ग्रामीण भागात मलखांब अतिशय सहजपध्दतीने खेळला जातो. सन्माननीय सदस्यांनी चर्चा करण्यापूर्वीच मी शासनाला असे निर्देश देत आहे की, हा पारंपारिक खेळ असल्यामुळे तो टिकविण्यासाठी माननीय मंत्री महोदयांना जेवढे शक्य होईल तेवढे प्रयत्न करावेत.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, धन्यवाद. परवा गुजरात राज्यामध्ये खेळाडूंच महाकुंब पार पाडला होता. त्यावेळी लक्षावधी खेळाडू उपस्थित होते. त्यावेळी मलखांबाला प्राधान्य देण्यात आले. दूरचित्रवाहिनीवर मलखांबाची प्रात्यक्षिके दाखविली जात होती. माननीय पंतप्रधान महोदयांच्या भाषणात मलखांब हा विषय उपस्थित केला होता. राज्यामध्ये मलखांब खेळाला श्री. बाळमभट्टाने सुरवात केली होती. त्या खेळाची सुरुवात आपल्या राज्यात झाली होती. परंतु, दुर्देवाने गुजरात, मध्यप्रदेश आणि उर्वरित प्रांत मलखांब आणि खेळाडूस प्रोत्साहन देत असल्यामुळे ती पुढे गेलेली आहेत. शाळांमध्ये मलखांब खेळ आयोजित केला जात आहे. केंद्र शासनाने राज्य शासनाला असे सांगितले आहे की, मलखांब हा खेळ हा यादीमध्ये समाविष्ट करावा. परंतु, दुर्दैवाने महाराष्ट्र शासनाने गेल्या अनेक वर्षापासून तो यादीत समाविष्ट केला नाही. केंद्र शासनाने राज्य शासनाला असे निर्देश दिले आहे की, मलखांब हा खेळ हा यादीमध्ये समाविष्ट करावा आणि तसे केले तर राज्याला केंद्राच्या योजना लागू होतील. पण महाराष्ट्र शासनाने अशी कार्यवाही केलेली नाही. गेल्या दोन वर्षापूर्वी मलखांबचा वर्ल्ड कप झाला होता. त्यामध्ये २३ देशांनी भाग घेतला होता. मलखांबमध्ये श्री. दीपक शिंदे नावाच्या खेळाडूने वर्ल्ड कपमध्ये गोल्ड मेडल मिळविले होते. त्या खेळाडूला मी मंत्री महोदयांकडे नेऊन फोटो काढले होते. तसेच कुमारी हेमांगी परब यांनी यावर्षी अर्जून पुरस्कार मिळविला आहे. या दोन खेळाडूंना शासकीय सेवेत डायरेक्ट नियुक्ती देणार काय ? यासंदर्भात केंद्र शासनाचा जीआर आहे. पण या दोन खेळाडूंचा साधा सत्कार देखील केलेला नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांना सांगू इच्छितो की, आपण लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली असल्यामुळे माननीय मंत्री महोदय त्यासंबंधी यथोचित उत्तर देतील. ते निगेटिव्ह राहतील असे मला स्वत:ला काही वाटत नाही. माझी सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने अशी सूचना आहे की, श्री. दीपक शिंदे आणि कुमारी हेमांगी परब या दोन खेळाडूंच्या सत्काराचा किंवा अभिनंदनाचा प्रस्ताव आजच्या आज मांडावा.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार श्री. दीपक शिंदे आणि कुमारी हेमांगी परब या दोन खेळाडूंचा विभागाच्यावतीने स्वतंत्र सत्कार समारंभ आयोजित केला जाईल.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, मी दुसरा मुद्दा उपस्थित केला जातो. या दोन्ही खेळाडूंना शासकीय सेवेत डायरेक्ट नियुक्ती देण्याची आवश्यकता आहे. श्रीमती चानू यांना डीसीपी केलेले आहे.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

श्री.भाई गिरकर....

ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये सिल्व्हर मेडल मिळविलेल्या चानू यांना आसाम सरकारने डीसीपी पदावर नियुक्त केले. मल्लखांब खेळाचा आता ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये समावेश होणार आहे. मल्लखांब खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी भारताने ३५ देशात प्रशिक्षक पाठविले आहेत. मी मल्लखांब संघटनेच्या मुंबई उपनगर जिल्ह्याचा अध्यक्ष आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत मल्लखांब खेळाचा समावेश होण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. दीपक शिंदे हा झोपडपट्टीत राहणारा खेळाडू आहे. या दोन्ही खेळाडूंचा राज्य सरकारने सत्कार करण्याचे जाहीर केल्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. या निमित्ताने मी एवढेच विचारु इच्छितो की, या दोन्ही खेळाडूंना थेट नोकरीत सामावून घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल काय ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, केंद्र शासनाने २०१३ मध्ये गट क आणि ड मध्ये थेट नियुक्तीसाठी ग्राह्य धरावयाच्या ४३ खेळांची यादी निश्चित करण्यात आली होती. तद्नंतर २०२० मध्ये केंद्र शासनाकडून सुधारित ६३ खेळांची यादी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये मल्लखांब या खेळाचा समावेश आहे. २०१९ साली पहिली आंतरराष्ट्रीय मल्लखांब भारतात झाली. त्या स्पर्धेतील पुरस्कार प्राप्त विजेत्यांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी केला. मुळात मल्लखांब हा मातीतील खेळ असला तरी दुर्दैवाने त्याचा प्रचार आणि प्रसार आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेला नाही. राज्य सरकार आणि क्रीडा विभागाने सरळ सेवा नियुक्तीच्या ५ टक्के आरक्षणामध्ये मल्लखांब खेळाचा समावेश केला आहे. त्याचा लाभ मल्लखांब खेळाडूंना मिळणार आहे. २०१०, २०१३ मधील थेट नियुक्तीचे धोरण तसेच नवीन थेट नियुक्तीचे धोरण राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. परंतु तत्पूर्वीच क्रीडा विभागाने ५ टक्के आरक्षणामध्ये मल्लखांब खेळाचा समावेश केला आहे. त्यामुळे या खेळाडूंना आरक्षणाचा लाभ होईल.

असुधारित प्रत

श्रीमती आदिती तटकरे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार राज्य सरकारच्या वतीने महिनाभरात प्राविण्य मिळविलेल्या दोन्ही खेळाडूंचा सन्मान करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी महत्त्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. मंत्री महोदयांनी त्यावर अभ्यासपूर्ण उत्तर दिले आहे. माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. अर्जुन पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार आहे. ज्यांनी आंतराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळविला आहे त्यांना शासनाच्या सेवेत थेट नियुक्ती देणार काय ? माझ्या या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदया सकारात्मक देणार आहेत. त्यानुसार आपण ती घोषणा करणार काय ? मंत्री महोदयांनी देशी खेळांच्या बाबतीत "मातीतील खेळ" असा उल्लेख केला. या खेळांच्या विकासासाठी आपल्याला काही ठोस पावले उचलावी लागतील. काही खेळांचा समावेश प्रथम राज्याच्या यादीत करुन त्यानंतर केंद्र सरकारकडे जावे लागेल. उदाहरणार्थ आता नवीन पिकल बॉल नावाचा खेळ आला आहे. अशा खेळांचा समावेश राज्याच्या यादीत करण्यात येईल काय ? यापूर्वी कला, क्रीडा शिक्षकांच्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली आहे. राज्य सरकारकडून क्रीडा शिक्षक हटवून क्रीडा हा विषय अभ्यासक्रमातून बाद करण्यात आला आहे. जर क्रीडा शिक्षक बाद केला जात असेल तर खेळाडू कसे तयार होतील ? वास्तविक पाहता कायद्याने अजूनही क्रीडा शिक्षक हे पद अस्तित्वात आहे. परंतु एका साध्या शासन निर्णयान्वये आपण क्रीडा शिक्षक हे पद बाद केले आहे. मी स्पेसिफीक विचारतो की, क्रीडा शिक्षकांना पुनर्स्थापित करण्यासाठी क्रीडा विभाग शालेय शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करेल काय ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, २०१०, २०११, २०१३ च्या थेट नियुक्ती धोरणामध्ये ऑलिम्पिक स्पर्धा, एशियन स्पर्धा, कॉमनवेल्थ स्पर्धा किंवा काही ठराविक वर्ल्ड चॅम्पियनशीपचा समावेश करण्यात आला होता. त्यानंतर थेट नियुक्तीसंदर्भातील धोरण हे गेल्या सात-आठ वर्षांत झालेले नाही. ते धोरण आता क्रीडा विभागाच्या माध्यमातून विचाराधीन आहे. निश्चितपणे ज्या खेळांचा त्या वेळी

श्रीमती आदिती तटकरे....

समावेश होता त्यापेक्षा जास्त खेळांची वाढ थेट नियुक्तीच्या प्रस्तावामध्ये विचाराधीन असून ती केली जाईल. मी अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे मल्लखांब खेळाचा प्रचार व प्रसार दुर्दैवाने झाला नाही. क्रीडा विभागाला या खेळाची जाणीव झाली त्यावेळी सरळ सेवा नियुक्तीसाठी ५ टक्के आरक्षणामध्ये या खेळाचा समावेश करण्यात आला. ज्यावेळी थेट नियुक्तीबाबतचे नव्याने धोरण आखले जाईल त्यावेळी त्याचा सकारात्मक विचार केला जाईल. मातीतील खेळांच्या बाबतील या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी १ कोटी रुपयांची तरतूद ५ कोटी रुपये केली आहे. जिल्हा क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी २५ कोटी रुपये केली आहे, तसचे विभागीय क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी ५० कोटी रुपये तरतूद केली आहे. आतापर्यंत क्रीडा संकुलामध्ये ज्या सुविधा उपलब्ध नव्हत्या त्या सुविधा तेथे उपलब्ध करुन देण्यासाठी तो सकारात्मक निर्णय घेण्यात आला. सभापती महोदय, शासन आणि क्रीडा विभागाने अजून एक सकारात्मक प्रस्ताव ठेवलेला आहे. ज्या खेळाडूंची त्यांनी मिळविलेल्या प्राविण्याच्या आधारावरा शासन सेवेमध्ये नियुक्ती होते त्यांना क्रीडा विभागामध्येच कसे कार्यरत करता येईल, जेणेकरुन त्यांनी ज्या खेळामध्ये प्राविण्य मिळविलेले आहे त्या खेळाचा प्रसार आणि त्या संदर्भातील योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिरे त्यांच्या माध्यमातून झाली तर त्या क्षेत्रात अजून जास्त व चांगले खेळाडू निर्माण होऊ शकतील. या संदर्भातील सकारात्मक निर्णय क्रीडा विभागाच्या वतीने प्रस्तावित आहे.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी मल्लखांब या पारंपरिक खेळाचा उल्लेख केला. या खेळाप्रमाणेच लगोरी, शिवकालीन दानपट्टा, तलवारबाजी, शरीरसौष्ठव स्पर्धा, आट्यापाट्या इत्यादी पारंपरिक खेळ आज लुप्त होताना दिसत आहेत. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की,

श्री.अनिकेत तटकरे....

असुधारित प्रत

या पारंपरिक खेळांना शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये समाविष्ट करण्यात येईल काय ? तसेच अनेक आखाडे ५० वर्षांपेक्षा जुने झाले असून त्यांना शासनाकडून निधी देणे आवश्यक आहे. आपण नवनवीन व्यायामशाळा बांधून तेथे नवीन साहित्य देत आहात. मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकारकडून जुन्या आखाड्यांचा विचार करण्यात येईल काय, तसेच लगोरी, दानपट्टा, खो-खो इत्यादी पारंपरिक खेळांचा समावेश शालेय अभ्यासक्रमामध्ये करणार काय ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, खो-खो हा खेळ ५ टक्के आरक्षणाच्या यादीमध्ये समाविष्ट केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी या व्यतिरिक्त ज्या खेळांचा उल्लेख केला त्या बाबत सुद्धा विभागाच्या वतीने सकारात्मक विचार निश्चितपणे केला जाईल. शालेय क्रीडा स्पर्धामध्ये पारंपरिक खेळांचा समावेश केला पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग एकत्रित असला तरी स्वतंत्रपणे क्रीडा विभागाच्या वतीने शालेय शिक्षण विभागाला या संदर्भातील सकारात्मक प्रस्ताव पाठविण्यात येईल. शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये या खेळांचा समावेश करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव क्रीडा विभागाकडून शालेय शिक्षण विभागाला पाठविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या खेळांचा उल्लेख केला त्या खेळांचा ५ टक्के आरक्षणामध्ये समावेश करुन घेण्याबाबत विभागाकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. आखाड्यांच्या बाबतीत सांगू इच्छिते की, मंत्री महोदयांच्या दालनात या विषयी बैठक आयोजित करुन त्या बैठकीत राज्यात किती आखाडे आहेत, किती आखाड्यांमध्ये दुरुस्ती करता येऊ शकते, किती आखाडे कार्यरत आहेत याची सविस्तर माहिती घेऊन त्या संदर्भात निर्णय घेण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या मूळ प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री देतच नाहीत. तुम्ही त्या २ खेळाडूंना तातडीने घेणार आहात का ?

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, तुम्ही "क" व "ड" असे म्हणाला आहात. त्यांनी वर्ल्ड चॅम्पिअनशिप मारले आहे. दीपक शिंदे यांनी वर्ल्ड चॅम्पिअनशिप मारले आहे आणि गोल्ड मेडल मिळविले आहे. हेमांगी परब यांनी अर्जुन पुरस्कार मिळविला आहे. आपण विशेष बाब म्हणून यांना थेट नोकरीमध्ये संधी देणार का ? आपण "क" व "ड" करण्यापेक्षा त्यांची वरिष्ठ पदावर नियुक्ती करावी अशी मी विनंती करतो किंवा तसा प्रश्न विचारतो.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाप्रमाणे आणि संपूर्ण सभागृहाच्या भावना लक्षात घेता .... आम्हालाही माहीत आहे की, आपण यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे तरच खेळाची वाढ होईल. आपण नवीन धोरण आणत आहोत, त्या धोरणात सर्व समावेश करता येईल. मी या खात्याचा मंत्री असल्यामुळे माझ्या असे लक्षात आले आहे की, काही खेळाडूंना जरी बक्षिसे मिळाली तरी पण त्यांचे शिक्षण फार मोठे आहे. कोणी पोस्ट ग्रॅज्युएट झाले आहे. समजा त्यांनी स्टेट लेव्हलचे पदक जिंकले किंवा नॅशनल लेव्हलचे पदक जिंकले तर त्या हिशोबाने त्यांना पोस्ट लहान मिळते. एखाद्या माणसाने पोस्ट ग्रॅज्युएशन करावे आणि शिपाई म्हणून भरती व्हावे ....

**सभापती** : माननीय मंत्र्यांना मी एकच मिनिट थांबवितो. माननीय राज्यमंत्र्यांनी एक विषय मांडला आहे. मलाही सदनाचे लक्ष वेधायचे होते. त्या म्हणाल्या की, शक्यतो आम्ही क्रीडा खात्यामध्येच घेऊ. तुम्ही त्यांना क्रीडा खात्यात किंवा अन्य ठिकाणी नोकरी दिली तर हेही बंधन त्यांच्यावर घालावे, जसे आपण मेडिकलला बंधन घालतो की, पोस्ट ग्रॅज्युएटच्या आधी एक-दीड वर्षे त्यांनी काम करावे लागते, तसे त्यांच्या खेळात त्यांनी हे कोचिंग केलेच पाहिजे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे की, आम्ही नवीन क्रीडा धोरण लवकरच महिना, दोन महिन्यात अंतिम करीत आहोत. आमच्याकडून या सगळ्या गोष्टींचा अभ्यास करणे चालू आहे. पुष्कळदा असे होते की, त्याचे मन लागत नाही. त्याला ते अवमानित वाटते. तो पोस्ट ग्रॅज्युएट झालेला असतो. खालच्या शिपाई पदावर जातो, तेथे त्याला अवमानित वाटते. त्यामुळे आम्ही क्रीडा धोरण बदलत आहोत. त्यामध्ये योग्य नोकरीचे आहे. आपण दिलेल्या सूचना आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेता, आपण मल्लखांबबाबत सांगितले, त्याचा देखील त्यामध्ये समावेश करुन योग्य निर्णय करु. पण एकदा धोरण अंतिम झाल्यावर करता येईल एवढेच मी आपल्या सर्वांना सांगतो.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांचे पहिल्यांदा अभिनंदन करतो. कारण त्यांनी २ महिन्यांत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी देखील सांगितले आहे की त्यांना पुरस्कार देऊ.माझी विनंती आहे की, तुमचे धोरण पूर्ण करावे, निर्णय घ्यावा आणि पुरसकार येणार त्या दिवशी त्यांच्या हातात नियुक्ती पत्र द्यावे. आपण तसे देणार का ? सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विचारलेला प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे. तो क्रीडा विभागाशी संबंधित आहे. आज क्रीडा शिक्षक भरण्यास बंदी आहे. मग शिकविणार कोण ? ज्या पोर्टलमधून पारदर्शकपणे भरण्याचा दावा शासन करीत आहे, ते पोर्टल ३ वर्षांपासून बंद आहे. आताच कोणी तरी उल्लेख केला की, क्रीडा शिक्षक खेळाडूच पाहिजे. त्या पोर्टलमधून लेखी परिक्षेमध्ये तो पास होईल, नियुक्त होईल, पण त्याला खेळता येत नसेल तर तो कसा क्रीडा शिक्षक होईल ? तुम्ही त्याबाबत काही तरी ठेवले पाहिजे. शालेय शिक्षण विभागाकडे पाठपुरवा करुन अधिवेशन संपण्याच्या आत क्रीडा शिक्षकाबाबत धोरण जाहीर करणार का ? माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, तालुका क्रीडा संकुल किंवा इतर वगैरेसाठी भरपूर तरतूद केली आहे. मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. एकदम भरीव तरतूद केली आहे आणि ही खूप वर्षांनी झाली आहे. भरीव तरतूद केल्याबाबत अभिनंदन करतो.

श्री. सतीश चव्हाण ....

सभापती महोदय, परंतु माझ्या दोन क्वेरीज आहेत. आपण तेथे भौतिक विकास करणार आहात. आपण तालुका क्रीडा संकुलात जातो. माननीय राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार व मी कन्नडच्या तालुका क्रीडा संकुलात एकत्र गेलो होतो. तुम्ही ते दीड, दोन कोटी रुपये खर्च करुन बांधले आहे. पण तेथे विटी-दांडू देखील नाही. मग बाकीच्या गोष्टी जर दूरच राहिल्या. असे क्रीडा संकुल पांढरा हत्ती ठरु नये. त्यामुळे आपण तेथे दोन तरतुदी करणार का की, क्रीडा संकुलाच्या उद्घाटनाच्या आधी तुम्ही जे निकष ठरवाल ते सर्व साहित्य तेथे आले पाहिजे आणि तेथे प्रशिक्षक नियुक्त केले पाहिजेत. आपण तेथे प्रशिक्षकांची नियुक्ती करणार का आणि त्यासाठी येणारा आर्थिक भार राज्य शासन घेणार का ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मघाशी देखील याबातची माहिति दिली की, तालुका क्रीडा संकुलला आधी बांधकामासाठी १ कोटी रुपये निधी मिळायचा, तो ५ कोटी रुपये झाला. जिल्हा क्रीडा संकुलाला २५ आणि विभागीय क्रीडा संकुलाला २५.

सभापती महोदय, मी उल्लेख केल्याप्रमाणे ज्या खेळांसाठी सुविधा तेथे उपलब्ध नव्हती, ती सुविधा करुन देण्यासाठी आता ही वाढ केली आहे. दुर्दैवाने पूर्वीच्या काही काळात ज्यावेळी क्रीडा संकुलासाठी निधी उलपब्ध व्हायचा त्यावेळी जागेअभावी बऱ्याच क्रीडा संकुलाचे काम रहायचे. बऱ्याच वेळा क्रीडा संकुलला प्राधान्य नसल्यामुळे त्यांना जी जागा दिली जायचे त्याला कनेक्टिव्हिटी नसायची, जाण्याचा मार्ग नसायचा, लॅण्ड लेव्हलिंग म्हणजे सपाट जागा नसायची, त्यामुळे प्राप्त झालेल्या निम्म्यापेक्षा जास्त निधीचा खर्च क्रीडा संकुल बांधकामाऐवजी, इमारत बांधकामाऐवजी तेथील परिसर सुधारणा करण्यामध्ये जायचा. आता जो निधी उपलब्ध होईल तो निश्चितपणे ती इमारतीच्या विस्तारित पध्दतीने बांधकामासाठी वापरण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे, क्रीडा विभागाने प्रस्ताव ठेवला आहे की, आपण शासनामध्ये ज्यांना नियुक्ती देत आहोत त्यांना क्रीडा विभागात जेव्हा कार्यरत केले जाईल तेव्हा तालुका क्रीडा संकुल असतील, जिल्हा

श्रीमती आदिती तटकरे ....

क्रीडा संकुल असतील, ज्या खेळाडूंना थेट नियुक्ती मिळाली आहे किंवा ५ टक्के आरक्षणानुसार नियुक्ती मिळाले आहे त्यांना येथे प्रशिक्षक म्हणून कार्यरत केले जाईल.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले आहे. मी मान्य करतो की, संकुल बांधल्यानंतर संकुलामध्ये त्या सर्व व्यवस्था असल्या पाहिजेत. त्यामुळे सरकार हे धोरण करीत आहे.

**सभापती** : सदनातील सन्माननीय सदस्यांचे, शिक्षक आमदारांचे लक्ष स्पोर्ट्स एज्युकेशनच्या शिक्षकांची मान्यता गेली आहे यावर असून आपण या विषयावर बोलावे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी साहित्याबाबत विचारले आहे. आपण धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सुरुवातीला जिल्ह्याची क्रीडा समिती राहत होती आणि त्याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहत होते. आपण ते बदलून माननीय पालकमंत्री केले आहेत. जिल्ह्यातील आमदारांनी माननीय पालकमंत्र्यांना त्या गोष्टीची व्यवस्था समजून सांगितली तर डीपीडीसीतून चांगल्याप्रकारे पैसे उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे तुमचा हा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघेल. सभापती महोदय, आपण निर्देश दिले आहेत की, धोरणात्मक निर्णय घ्यावा. माननीय राज्यमंत्र्यांनी अगोदरच उत्तर दिले आहे. आम्ही तातडीने हे अधिवेशन संपण्याअगोदर माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर चर्चा करतो आणि धोरणात्मक धोरण तयार करुन मंत्रिमंडळापुढे जातो.

श्री. अमोल मिटकरी : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी या शिवकालीन खेळाकडे लक्ष वेधले आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांचे आभार मानतो. आता स्थानिक आमदार विकास निधींतर्गत कबड्डी चषक स्पर्धा घेता येतात, क्रिकेट स्पर्धा घेता येतात. या खेळांचे पुनर्जीवन झाले पाहिजे. हे मातीतले

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी ....

खेळ टिकले पाहिजेत, याकरिता बैलगाडा शर्यत असेल, मल्लखांब असेल किंवा शिवकालीन खेळ असतील यांचा विचार झाला पाहिजे. आम्हाला वाटले की, आपल्या जिल्ह्यात शिवकालीन खेळाचे पुनर्जीवन व्हावे तर स्थानिक आमदार विकास निधींतर्गत आपण जसे कबड्डी चषक स्पर्धा घेतो तशाप्रकारे निधी देण्याचे प्रावधान आहे का, नसेल तर, त्यासाठी काही तरतूद किंवा नवीन निर्देश काढता येतील का ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. संजय दौड : सभापती महोदय, मल्लखांब हा लक्षवेधी सूचनेचा विषय आहे. मी आपल्याला अभिमानाने सांगेन की, मी सन १९७५ चा मल्लखांबचा खेळाडू आहे. मला अभिमान आहे. आंबानगरीमध्ये मल्लखांब हा खेळ अत्यंत प्रसिध्द होता. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितले की, शाळांत क्रीडा शिक्षक भरती बंद आहे. मल्लखांब खेळ आहे. अनेक शाळा, कॉलेज येथे क्रीडा शिक्षक आहेत. आता वाळूसंदर्भात बोलताना सांगितले की, तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड....

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्या कॉलेजमध्ये शिक्षक उपलब्ध आहेत, तेथे मल्लखांब हा खेळ बंधनकारक करणार आहात काय ? राहूल आवारे नावाच्या खेळाडूने राष्ट्रकुल स्पर्धेतील कुस्तीमध्ये पदक जिंकले आहे. त्यांच्या वडीलांची पाटोदा येथे तालिम असून तेथे ५० मुले आहेत. अशी अनेक कॉलेज आहेत की, तेथे शासनाने मॅट दिलेल्या आहेत. त्या मॅट पडून आहेत. अशा खाजगी संस्थेत खरोखर खेळाडू तयार होतात. अशा लोकांना शासन मदत करणार काय ?

श्री.सुनील केदार : सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत ते तपासून पाहून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

-------------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : उत्तर महाराष्ट्रात दिनांक ८ व ९ मार्च,२०२२ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस गारपीटीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करणे

**मु.शी.** : उत्तर महाराष्ट्रात दिनांक ८ व ९ मार्च,२०२२ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस गारपीटीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करणे यासंबंधी श्री.नरेंद्र दराड ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र दराडे (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उत्तर महाराष्ट्रात दिनांक ८ व ९ मार्च, २०२२ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नाशिक, जळगांव व नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये द्राक्ष, कांदा, हरभरा, मका आणि गहू या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेल्या या पिकांचा नाश झाल्याने शेतकरी वर्गात पसरलेले चिंतेचे, असुरक्षिततेचे व असंतोषाचे वातावरण, तसेच नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील श्री.कैलास सुर्यभान कवडे या एका शेतकऱ्याचा वीज पडून दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी झालेला मृत्यू, शासनाने अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहिर करण्याची तसेच वीज पडून मृत्यू झालेल्या तरुणाच्या कुटुंबियांना नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

श्री. विजय वडेट्टीवार ( मदत व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदन दिलेले आहे. मार्च महिन्यात ८ व ९ तारखेला अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे जळगांव, नाशिक, धुळे व नंदुरबार या तालुक्यात नुकसान झाले आहे. निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, प्रचलित निकषानुसार अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे ३३ टक्के पेक्षा जास्त शेती पिकाचे नुकसान झाल्यास ही मदत अनुज्ञेय आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, ३३ टक्के नुकसान झाले हे कशा प्रकारे ओळखता येईल. विभागीय आयुक्तांनी असे सांगितले आहे की, मालमत्तेच्या नुकसानीबाबत अंतिम अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. येथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई केव्हा देण्यात येईल. अधिकारी असे सांगत आहेत की, ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येईल. ही बाब कशी तपासण्यात येणार आहे. नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात कैलास सूर्यभान कवडे या शेतकऱ्याच्या अंगावर वीज पडून त्याचा दिनांक ९ मार्च २०२२ रोजी मृत्यू झाला. नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने त्या व्यक्तींच्या वारसांना मदत केव्हा करण्यात येणार आहे. मालेगाव तालुक्यातील सर्व गावांना अनुदान देण्यात आले असून ४४ गावांना अद्याप अनुदान मिळालेले नाही तर ते अनुदान कधीपर्यंत देण्यात येईल ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ८ व ९ मार्च २०२२ रोजी अवकाळी पाऊस व गारपीट झाली होती त्यामुळे जवळपास १०३६५ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामध्ये एकूण १६२२७ शेतकरी आहेत हे निवेदनात नमूद केले आहे. पाच ते सहा दिवसापूर्वी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. एचडीआरएफच्या निकषाप्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ही मदत दिली जाईल. पंचनामे करण्याचे आदेश दिले असून पंचनामे सुरु झाले आहेत. प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे.चार जिल्ह्यातील जे शेतकरी संकटात सापडले आहेत त्या सर्वांना मदत केली जाईल. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. वीज पडून शेतकरी मृत्यूमुखी झाला ही घटना ९ मार्च रोजी घडलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या वारसांना १० मार्च रोजी धनादेश दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे सांगतात त्याप्रमाणे कोणी व्यक्ती सुटली असेल तर माहिती घेऊन तीन ते चार दिवसात त्यांना मदत उपलब्ध करुन देण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, निवेदनात असे नमूद केले आहे की, अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. मग त्यांना १० लाख रुपयांचा धनादेश कसा काय देण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, वीज पडून मृत्यूमुखी झाल्यास निकषाप्रमाणे चार लाख रुपये देण्यात येतात. ही मदत राज्य सरकार देते. ही मदत केंद्र शासनाच्या एचडीआरएफच्या निकषात बसत नाही. राज्य सरकारकडून एक वेगळी योजना म्हणून हा निधी देण्यात येतो. १० मार्च रोजी मदत देण्यात आली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी माझ्याकडे पत्र दिलेले आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक ६ पुढे ढकलण्यात आली आहे.

----------

असुधारित प्रत

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**सभापती** : आज सोमवार दिनांक १४ मार्च २०२२ रोजी प्राप्त झालेल्या व मान्य करण्यात आलेल्या म.वि.प.नियम १०१ अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना मी सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे घोषित करीत आहे.

-------

असुधारित प्रत

**पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, मला दोन विषय मांडायचे आहेत. कुस्ती परिषदबाबत राज्यातील काही पैलवान कुस्ती परिषदेत सदस्य आहेत. ते पाच दिवसापासून पुणे येथे उपोषणाला बसले आहेत मी त्यांना आता भेट देऊन आलो आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. सी.टी.कॉर्पोरेशन व कुस्ती परिषद महाराष्ट्र राज्य यांचा सन २०१९ मध्ये करार झालेला आहे. त्या करारानुसार महाराष्ट्र केसरीच्या स्पर्धा सी.टी.कॉर्पोरेशन कंपनी घेणार आहे. या परिषदेमध्ये ९० सदस्य आहेत. ४५ सदस्य इतर जिल्हयातून येतात व ४५ सदस्य अहमदनगर जिल्ह्यातून येतात. सी.टी.कॉर्पोरेशन कंपनी बरोबर करार केलेला असून २०२० मध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धा झालेली आहे. त्या स्पर्धेनंतर या कंपनीने सरकारकडून ४२ लाख १८ हजार रुपये अनुदान घेतले आहे. हा करार यासाठी केला होता की, सर्व खर्च कंपनीने करायचा आहे. २ कोटी ३९ लक्ष रुपयांचा खर्च दाखवून ४२ लक्ष रुपये त्यांनी शासनाकडून वसूल केले आहेत. हे सर्व सदस्य यासाठी उपोषणाला बसले आहेत की, कुस्ती परिषदेबरोबर कंपनीचा जो करार झाला तो सर्व सदस्यांना मिळायला पाहिजे. त्यांना तो करार दिला जात नाही. आपण त्यांना सूचना द्याव्यात की, तो करार त्यांना देण्यात यावा. ४२ लक्ष १८ हजार रुपये कोणत्या पध्दतीने देण्यात आले आहेत. त्यांच्याकडून ते पैसे वसूल करुन घेण्यात येतील काय ?

**सभापती** : ठीक आहे, पुढील विषय आपण मांडावा.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, माझा दुसरा विषय पॉईंट ऑफ प्रोसिजरनुसार आपल्या निदर्शनास आणून द्यायचा आहे. सभागृहात चर्चा करीत असताना एखाद्या सदस्यांच्या विरोधात बोलताना अगोदरच्या दिवशी नियम ३५ ची नोटीस देणे आवश्यक आहे. असे असताना मी या सभागृहात उपस्थित नसताना नियम २६० च्या कायदा व सुव्यवस्था या प्रस्तावात गोपिचंद पडळकर यांचा विषय नाही. गोपिचंद पडळकर यांच्यामुळे राज्यात कोठेही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली नाही.असे असताना माझ्या विरोधात कोणते गुन्हे दाखल आहेत याची माहिती वारंवार सभागृहात दिली जाते. त्यामध्ये मी निर्दोष आहे. मंत्री

श्री.गोपिचंद पडळकर....

महोदयांनी माझ्यावरील गुन्हे कारण नसताना वाचून दाखविले. या विषयात मी निर्दोष सुटलो आहे. परंतु माझी मानहानी व मला बदनाम करण्यासाठी सभागृहात असे उत्तर देणे अपेक्षित नाही. मागील कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेच्या वेळी मी या सभागृहात उपस्थित नसताना माझे नाव घेऊन माहिती कशी काय देण्यात येते. याबाबत सभापती महोदयांनी योग्य सूचना द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर विचारणा केली आहे. ते मी तपासून घेतो. मी तपासून निर्णय दिलेल्यावर मंत्री महोदयांनी बोलावे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, आपण तपासून घ्यावे परंतु माझे म्हणणे असे आहे की, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला त्याबाबत त्यांनी काल सभागृहात बोलताना स्वत:चा उल्लेख मी निर्दोष आहे असा केला होता. अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यासाठी माझ्यावर गुन्हा झाला. शेतकऱ्यांना पाणी मिळावे म्हणून माझ्यावर गुन्हा दाखल झाला. मी गुन्हेगार आहे असे त्यांनी स्वत: भाषणात सांगितले. नियम २६० च्या प्रस्तावावरील चर्चेत विषय आला त्याला अनुसरुन मी बोललो आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा सन्माननीय सदस्यांचा हक्काचा विषय आहे.

**सभापती** : मी तपासून घेतो. त्यांचा हक्क कोणीही नाकारीत नाही. सन्माननीय सदस्यांचा अवमान झाला असेल व ते गैरवाजवी असेल तर तपासून घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----

## पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ॲग्रो ट्यूरिझमच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील विषय या सभागृहात मांडत आहे. अलिबाग तालुक्यातील

४०० ते ५०० शेतकऱ्यांनी ॲग्रो ट्यूरिझम सुरु केले आहे. ॲग्रीकल्चरला टॅक्स, शेतसारा व कमर्शिअल टॅक्स नसताना अलिबाग तालुक्यातील तहसीलदार व प्रांत अधिकारी यांनी चौल, रेवदांडा या भागातील ॲग्रो ट्यूरिझमच्या हॉटेलना मोठ्या प्रमाणात कमर्शिअल टॅक्स लावला आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील........

तो ताबडतोब थांबविला पाहिजे. ते ३१ मार्चचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी हे करीत आहेत. मी मेहनतीने, कष्टाने माझ्या बँकेच्या माध्यमातून त्यांना उभे करण्याचा प्रयत्न केला. मौजे चौल येथील श्री.विश्वास जोशी व श्री.कनगुटकर सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अधिकाऱ्यांना भेटले. परंतु या संदर्भात योग्य ती कार्यवाही होत नाही. चौल, रेवदंडा येथील बागायतदार शेतकऱ्यांचे वादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. परंतु महसूल विभाग दादागिरी करुन दंडात्मक कारवाई करीत आहे. यापूर्वी अशा प्रकारे दंडात्मक कारवाई करण्यात येत नाही. शेतकरी हतबल झालेले आहेत. मध्यंतरीच्या काळात तेथील पर्यटन थांबले होते. आता तेथे पर्यटन नुकतेच सुरु झाले आहे. शासनाने सहानुभुतीपूर्वक विचार करुन तेथील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी २.४१ ते ३.३० वाजेपर्यंत मध्यंतर )

---------

यानंतर श्री.सांगळे.........

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

**उप सभापती :** आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविण्यात आलेले शासकीय विधानसभा विधेयक क्रमांक – ३९ यावरील चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. त्यामुळे सदर विधेयक आता चर्चेला घ्यावे अशी माननीय मंत्री महोदयांनी अशी विनंती केली आहे. मंत्री महोदय, सदर विधेयकाच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्याबाबत माहिती घेऊन आपण सदनामध्ये शासनाची भूमिका मांडावी. आता आपण सदर विधेयकावरील चर्चेला सुरुवात करु या.

श्री.बाळासाहेब पाटील : ठीक आहे.

--------------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०० अन्वये राज्यपालांच्या अधिसंमतीसाठी पाठविण्यात आलेले व राज्यपालांनी फेरविचारार्थ परत पाठविलेले सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था तिसरी सुधारणा ) विधेयक, २०२१ मधील खंड २२ बाबत म.वि.स.नियम १५३ अन्वये फेरविचार करणे.

( प्रश्न पुन: प्रस्तुत झाला...

श्री.बाळासाहेब थोरात ( सहकार मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक ३९ –महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक याबाबत राज्यपालांच्या संदेशानुसार विधेयकातील खंड २२ महाराष्ट्र विधानसभा नियम १५३ अन्वये फेरविचारार्थ घेण्यात यावा, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, सहकार कायद्यातील २० कलमांमध्ये सुधारणा करण्याबाबत आपण हिवाळी अधिवेशनामध्ये सदर विधेयक मांडले होते. सदर विधेयक दोन्ही सदनांनी संमत केल्यानंतर ते माननीय राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते. तथापि, माननीय राज्यपालांनी सदर विधेयकातील खंड २२ मधील कलम १५७ च्या फेरविचाराबाबत परत आपल्याकडे पाठविले आहे.

सभापती महोदया, मूळ ९७ वी घटना दुरुस्ती झाल्यानंतर सन १९६० पासून २०१३ पर्यंत कायद्यात सदर तरतूद होती. शासनाने सन २०१३ मध्ये संमत केलेल्या विधेयकामध्ये ९७ व्या घटना दुरुस्तीत सहकार कायद्यामध्ये बदल केला होता. ९७ व्या घटना दुरुस्तीबाबत गुजरात शासन उच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने ही बाब मान्य केली. त्यामुळे त्या कायद्यात पूर्वीची असलेली तरतूद

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात.....

लागू करण्यासंबंधी सदरहू विधेयक आहे. कायद्यातील कलम १५७ मध्ये तरतुदीला सूट देण्याचा अधिकार १९६० पासून होता तो अधिकार आपण पुन्हा घेण्यासंबंधी सदर विधेयक आहे. या विधेयकामुळे शासनाला पुन्हा तरतुदीला सुट देण्यासंबंधीचे अधिकार प्राप्त होणार आहेत.

सभापती महोदया, या विधेयकातील कलम २६ मध्ये सदस्यांचे व हक्क व कर्तव्ये नमूद केलेली आहेत. तसेच क्रियाशील व अक्रियाशील सदस्य ठरविणे. करोनाच्या पार्श्वभूतीवर आता सदर तरतूद पूर्वीच्या कायद्यात तरतूद करुन काढली आहे. ५ वर्षांमध्ये सर्वसाधारण सभा असो, अथवा त्या संस्थेची वाढ करणे असो, आपण या बाबी पूर्वीच वगळलेल्या आहेत. विशिष्ट प्रवर्गातील सदस्यांना एकाच वेळी दोन ठिकाणी सदस्य राहता येणार नाही. उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तो सदस्य एकाच संस्थेत राहू शकेल अशी विधेयकामध्ये तरतूद आहे. सभापती महोदया, कलम ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर ७३ अअअ मध्ये २१ पेक्षा जास्त संचालक राहणार नाहीत अशी तरतूद होती. त्यात एखादी मोठे फेडरल संचालक मंडळ, मोठी राज्य फेडरेशन किंवा बँक असो, तसेच काही जिल्हयांमध्ये तालुक्यांची संख्या जास्त आहे. त्यांना संधी मिळावी याकरिता राज्य शासन आपल्याकडे सदर अधिकार घेत आहे.

सभापती महोदया, अनुसूचित जाती व जमातीकरिता एक सदस्य, इतर मागासवर्गाकरिता एक सदस्य, भटक्या जमातीकरिता एक सदस्य राहणार आहे. एखाद्या वेळी एखादी संस्था फक्त आदिवासी लोकांची किंवा महिलांची असते. त्यावेळी त्या संस्थांना सुट देणे अपेक्षित असते. त्याकरिता या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारे कलम १५७ चा वापर करुन त्यांना तशा प्रकारची आपल्याला सुट देता येईल अशी या विधेयकामध्ये तरतूद आहे.

सभापती महोदया, अपात्रतेच्या बाबतीत सांगायचे झाल्यास कोणत्याही संस्थेतील एखादा सदस्य थकबाकीदार असेल किंवा कलम ८८ अन्वये त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केलेली असणे, दोन पेक्षा जास्त अपत्ये असणे, अशा सदस्यांना

श्री.बाळासाहेब थोरात.....

असुधारित प्रत

त्या संस्थेवर राहण्याचा अधिकार नसतो. कायद्याने हा अधिकार शासनाकडे आला तरी शासनाने तो अधिकार कधी वापरलेला नाही. शासनाने त्यांना आतापर्यंत याबाबत कधीही सवलत दिलेली नाही.

सभापती महोदया, राज्यात निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक प्राधिकरण आहे. सहकार संस्थांच्या सर्व निवडणुका घेणे, मतदारयाद्या तयार करणे, राज्य सहकारी संस्थांवरील पदाधिकाऱ्यांची निवडणूक याबाबत प्राधिकरणाला असलेल्या अधिकारामध्ये सुट द्यावयाची असल्यास त्यासाठी या अधिकाराचा वापर केला जातो. तसेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यांच्या आत अधिमंडळाची वार्षिक सभा घेणे क्रमप्राप्त आहे. कोल्हापूर, सांगलीमध्ये यापूर्वी महापूर आला होता. राज्यात मोठया प्रमाणात करोनाचा प्रार्दुभाव झाला होता. याकरिता आपल्याला कायद्यामध्ये बदल करुन त्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत अंमलबजावणी करावी लागली होती. सदर विधेयकामुळे याबाबतचे अधिकार पुन्हा शासनाकडे राहणार आहेत. त्यामुळे शासनाला कायद्यात बदल करण्याची गरज पडणार नाही. तसेच विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करणे, या विधेयकानुसार कलम ७८ नुसार समितीस काम करण्यापासून रोखून ठेवण्याचा निबंधकांना अधिकार राहणार आहे. त्यानुसार सहा महिन्यांपासून अधिक नसेल अशा तात्पुरत्या कालावधीसाठी अशा समितीला काम करण्यापासून रोखून ठेवता येऊ शकेल याकरिता निबंधकांना अधिकार राहतील. सदर अधिकाराचा आपण कधीही वापर केलेला नाही. या विधेयकातील कलम ७८ अ नुसार समितीस निष्प्रभावित करण्याचा किंवा तिच्या सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार राहणार आहे. समितीने किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने संस्थेच्या किंवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक होईल अशी कोणतीही कृती केली असेल, किंवा गंभीर, नियमबाह्य किंवा अफरातफर उघडकीस आली असेल किंवा तेथे गणपूर्ती होत नसल्यास अशा प्रसंगी समितीस किंवा तिच्या सदस्यांना निष्प्रभावित करण्याचा निबंधकांना अधिकार राहील.

यानंतर श्री.गागरे....

श्री.बाळासाहेब पाटील .....

त्याच पध्दतीने कलम ८१ नुसार लेखापरीक्षण करीत असताना आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्यात घेणे क्रमप्राप्त आहे. पण कोरोनाच्या काळात आपण त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. त्यासाठी कायद्यात आपण बदल केला होता. मग या वार्षिक सभा घेणे, ऑडीट करणे याबाबतचा उल्लेख या विधेयकात आहे. सन १९६० पासून २०१३ पर्यंत याचा कधीही गैरवापर झाला नाही. आता दुरुस्ती झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचा गैरवापर होणार नाही असे मी शासनाच्या वतीने येथे नमूद करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सदरहू विधेयक दोन्ही सभागृहाने मंजूर केले होते. त्यावर व्यवस्थित चर्चाही झाली होती. कोरोनाच्या काळात सभा व बैठका होत नव्हत्या. त्यातून हे विधेयक आणले हे ठीक आहे. राज्यपालांनी हे विधेयक परत पाठविताना त्यांना काय वाटले की, हे विधेयक मंजूर करु नये. मी याबाबत चर्चा करीत नाही तर केवळ माहिती करुन घेत आहे. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे जाणार आहे. या विधेयकाचा प्रवास दिल्लीपर्यंत होत आहे. राज्यपालांना काय आढळले की, हे विधेयक विधीमंडळाकडे परत पाठविले आहे. त्याकरीता हे थांबविले होते, दोन्ही सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर एकमुखी मान्यता दिल्यानंतर राज्यपालांना काय आढळले ते सांगावे, म्हणजे आम्ही येथे बसलो आहोत त्या आमच्या ज्ञानात किंवा अज्ञानात भर पडेल. आम्ही अज्ञानी आहोत हे त्यांनी सांगितले आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, माननीय सहकार मंत्री यांनी हे विधेयक चर्चेला घेण्याबाबत विनंती केली. वास्तविक अर्थसंकल्पावर माझे भाषण सुरु होणार होते. विधेयकात लहान सुधारणा होत्या व ते परत आले म्हणून आम्ही त्यास मान्यता देत आहोत. त्यावेळी राज्यपालांनी का केले नाही असे आता बोलले जाते. मी सांगू इच्छितो की, यावर सविस्तर चर्चा घेण्यात यावी. आम्हालाही त्या विषयी खूप काही बोलायचे आहे. असे असेल तर मंत्री महोदयांनी विधेयक मांडले आहे व आम्ही त्यास सपोर्ट करीत आहोत. त्या विधेयकाबाबत राज्यपालांचा अभिप्राय काय आहे हे नंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगावा.

असुधारित प्रत

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांची समन्वयाची भूमिका आहे, आता याबाबत अधिक चर्चा वाढवू नये. काही सन्माननीय सदस्य चर्चेच्या वेळी सभागृहात नव्हते, या विधेयकावर पूर्वी खूप चर्चा झालेली आहे.

श्री.शंभुराज देसाई (बसून) : सभापती महोदया, या सदस्यांनी दालनात भेटून सांगावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, दालनात भेटण्यासाठी वेगळी जागा आहे, खाली बसून मंत्री महोदयांनी मार्गदर्शन करु नये एवढी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. एखादे विधेयक सभागृहाने मंजूर केल्यानंतर माननीय राज्यपालांनी ते परत पाठविले असेल तर या सभागृहाला ते परत का पाठविले ते कळण्याचा अधिकार आहे. हे विधेयक पुन्हा तसेच मंजूर करायचे की त्यात सुधारणा कोणत्या कारणासाठी करीत आहोत हे स्पष्ट केले पाहिजे, त्यामुळे अत्यंत महत्वाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला आहे, त्याबाबतचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी द्यावे. मी माननीय विरोधी पक्ष नेते यांचेशी सहमत आहे त्यांनी व्यवस्थेचा मुद्दा व प्रोसीजरचा मुद्दा मांडला आहे. एक महत्वाची चर्चा बजेटवर सुरु होत आहे, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बोलणे हा त्यांचा अधिकार आहे. परंतु विधेयक आता घ्यायचे की नंतर घ्यायचे हा मुद्दा वेगळा आहे. विरोधी पक्ष नेत्यांशी चर्चा करुन तुम्ही ठरवा, विधेयक कधी घ्यायचे ते तुमचा अधिकार आहे. परंतु त्याची चर्चा झाली पाहिजे व सभागृहाला कळाले पाहिजे हे माझे म्हणणे आहे.

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छिते की, मंत्री महोदयांनी याबाबत सविस्तर मांडणी केलेली आहे. विधेयक उपस्थित केल्यानंतर मलाही अनेक शंका आल्या होत्या. पण मी विधिमंडळ सचिवालयाकडूनही माहिती घेतलेली आहे. त्या माहितीनुसार राज्यपालांनी खंड २२ च्या संदर्भात पुनर्विचार करावा असे असले तरी आपण ते आहे तसेच ठेवलेले आहे. राज्याचा अखत्यारीत हा विषय असल्याने आपणास मान्य करता येणार आहे. त्यामुळे आपण आपल्या मुद्यांवर ठाम आहोत.

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, ही बाब शासनाने सांगायला हवी. शासनाने याबाबतची भूमिका सभागृहाला सांगायला हवी.

**उप सभापती** : मी आपणास सांगू इच्छिते की, शासनाने ही भूमिका दोनदा सांगितली आहे, मी फक्त आता माझ्या आवाजात सांगितली आहे. त्यामुळे मी काहीही वेगळे सांगितलेले नाही. त्यांनी सांगितलेली बाब मी तुम्हाला थोडी उलगडून सांगितली आहे. मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छिते की, मला तुमच्या वेळेची जाणीव आहे, त्यामुळे हे विधेयक आपण पाच मिनिटात करुन घेऊ. सर्वांचे शंकानिरसन झाले असावे अशी माझी अपेक्षा आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** राज्यपालांनी विधेयकातील खंड २२ च्या फेरविचाराबाबत संदेश पाठविला असल्यामुळे आता फक्त खंड २२ विचारात घेण्यात येईल.

विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे खंड २२ हा विधेयकाचा भाग झाला.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक ३९ राज्यपालांच्या संदेशानुसार विधेयकातील खंड २२ फेरविचारार्थ घेण्यात येऊन विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे विधेयक पुन्हा संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** सन २०२१ चे वि.सि.वि.क्रमांक ३९ विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे पुन्हा संमत झाले आहे.

------------

असुधारित प्रत

**वि.स.वि. क्रमांक ३९ बाबत**

**उप सभापती** : आता आपणास अर्थसंकल्पावर चर्चा घ्यावयाची आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सदरहू विधेयक राज्यपालांच्या संदेशानुसार मंजूर झालेले नाही तर राज्यपालांच्या संदेशाची नोंद घेऊन झाले. राज्यपाल महोदयांनी खंड २२ नको असे सांगितले होते. म्हणून त्यांच्या संदेशाची नोंद घेऊन आता हे विधेयक राज्यपाल व राष्ट्रपतींकडे जाणार आहे. सचिवांनी तुम्हाला लिहून देताना चूक केली आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा मराठीचा खूप अभ्यास आहे. मी पण मराठीची एक सामान्य विद्यार्थीनी आहे. राज्यपालांच्या संदेशानुसार फेरविचारार्थ घेण्यात येऊन विधेयक कोणत्याही सुधारणेशिवाय संमत झाले याचा अर्थच असा होतो की, त्यांनी पाठविल्यावर आपण फेरविचार केला व कोणत्याही सुधारणेशिवाय आपण विधेयक संमत केले आहे. त्यामुळे आपण मला समजून घ्याल.

--------

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

**"राज्याचा अर्थसंकल्प – माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात"या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेतील मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन पुस्तिका स्वरुपात सर्व सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्याबाबत घोषणा**

**उप सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांना विदित आहेच की, दिनांक ५ व ६ऑक्टोबर,२०२१ रोजी "राज्याचा अर्थसंकल्प – माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात"या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले होते.

या कार्यशाळेतील मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन पुस्तिका स्वरुपात सर्व सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहे. शुक्रवार, दिनांक ११ मार्च,२०२२ रोजी सभागृहास सादर झालेल्या अर्थसंकल्पातील चर्चेत सहभाग घेण्यासाठी तसेच पुढील काळातही एक संदर्भसाहित्य म्हणून ही पुस्तिका उपयुक्त ठरणारी आहे.

तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी ही पुस्तिका आपल्या टपालखणातून प्राप्त करावी.

**पृ.शी. :** नियम स्थगित ठेवणे

असुधारित प्रत

**मु.शी. :** नियम स्थगित ठेवण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.शंभुराज देसाई (वित्त राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम २८९ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम २८८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन २०२२-२०२३च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:** सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**उप सभापती :** आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा आज सोमवार दिनांक १४ मार्च,२०२२ तसेच दिनांक १५ व १६ मार्च,२०२२ अशी एकूण तीन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचाअसेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

----------------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदया, सन २०२२ – २०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, एखाद्या राज्याची अर्थव्यवस्था कशी आहे, हे पाहण्याचे सर्वात महत्त्वाचे मानक म्हणजे राज्याचे एकूण स्थूल उत्पन्न व सदर उत्पन्नाशी राज्यावर असलेल्या कर्जाचे प्रमाण हे आहे. जेवढे कर्जाचे प्रमाण कमी तेवढी अर्थव्यवस्था चांगली आहे, असे समजले जाते. सन २०१४-२०१५ मध्ये जीडीपीशी कर्जाचे प्रमाण १८.१७ इतके होते. ज्यावेळी २०१८-२०१९ मध्ये माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे सरकार गेले, त्यावेळी मध्ये जीडीपीशी कर्जाचे प्रमाण १५.८३ वर आले होते. सन २०२०-२०२१ मध्ये हे जीडीपीशी कर्जाचे प्रमाण १९ टक्के इतके होते. सन २०२१-२०२२ मध्ये जीडीपीशी हे कर्जाचे प्रमाण १७ टक्के होते. सन २०२२-२३ मध्ये हे जीडीपीशी कर्जाचे प्रमाण १८ टक्के इतके वाढलेले आहे. एकंदर शासनाने या वर्षी मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये सदर जीडीपीशी असलेल्या कर्जामध्ये वाढ होण्यास सुरुवात झालेली आहे. सदर प्रमाण गत तीन अर्थसंकल्पापासून वाढण्यास सुरुवात झालेली आहे. सन २०१९-२०२० मध्ये माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला, त्यावेळी हे प्रमाण १५.८३ टक्के इतके होते. गेल्या तीन वर्षांमध्ये हे प्रमाण १८.१ टक्के इतके वाढलेले आहे. थोडक्यात म्हणजे महाविकास आघाडी सरकार आल्यापासून राज्याची अर्थव्यवस्था परत डबघाईला येण्यास सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदया, महसूली जमेच्या टक्केवारीनुसार व्याजाचे प्रावधानही मी उल्लेखणार आहे. सन २०१४-२०१५ मध्ये जी महसूली जमा व्हायची, त्याच्या साधारणत: १३.२० टक्के एवढे व्याजाचे प्रावधान होते. २०१९-२०२०मध्ये हे प्रावधान ११ टक्के इतके होते. सन २०२०-२१ मध्ये हे प्रावधान दहा टक्के इतके होते. सन २०२१-२०२२ मध्ये हे प्रावधान ११.४० टक्के इतके होते. सन २०२२-२३ मध्ये हे प्रावधान पुन्हा ११.४९ टक्के एवढे वाढलेले दिसून येत आहे.

श्री.प्रवीण दरेकर......

असुधारित प्रत

सभापती महोदया, सन २०२२-२०२३ मध्ये या व्याजाचे प्रावधान ११.४० पर्यंत वाढल्याचे दिसत आहे. एकंदरीत वेतन असेल,निवृत्ती वेतन असेल, व्याज प्रावधान असेल यावरील प्रमाणात भाजप सरकारच्या काळात घट झाल्याचे दिसून येईल. सन २०१४-२०१५ मध्ये महसूली जमेशी असणारे व्याजाचे प्रमाण १४ टक्के इतके होते. माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या सरकारच्या काळात ते ११ टक्क्यांपर्यंत खाली आले होते. महसूली जमेशी असलेले वेतनाचे प्रमाण, जसे व्याजाचे प्रमाण खाली आले, तसे वेतनाचे प्रमाण देखील सातवा वेतन आयोग असूनही माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस सरकारच्या काळात ३७ टक्क्यांवरुन ते ३४ टक्क्यांवर आले होते. एकंदरीत वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज यांचे महसूली जमेशी सन २०१४-२०१५ मध्ये असणारे प्रमाण ६२ टक्के इतके होते. हेच प्रमाण माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस सरकारच्या काळात ५७ टक्क्यांपर्यंत खाली आले होते. आपल्या रेड बुकमध्ये याचा संदर्भ पृष्ठ क्रमांक १५ वर उल्लेख आहे. हे सर्व आकडे त्या काळात राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ असल्याचे सांगत आहेत. तसेच, वित्तीय शिस्त पाळणारे असल्याचे निदर्शक आहेत.

सभापती महोदया, महसूली तूट कमी दाखविलेली असली तरीही वर्षा अखेरीस महाविकास आघाडीच्या कारभारामध्ये त्यामध्ये मोठी वाढ झाल्याचे इतिहास गेल्या तीन वर्षांचा आपल्याला पाहायला मिळेल. २०२०-२०२१ मध्ये अर्थसंकल्प सादर करत असताना दाखविलेली तूट ९५१० कोटी रुपयांची होती. वर्षाच्या शेवटी प्रत्यक्ष निर्माण झालेली महसूली तूट ही ४६,१७७ कोटी रुपयांची इतकी होती. ही वाढ एकूण पाच पटींमध्ये असल्याचे लक्षात येईल. सन २०२१-२०२२ मध्ये १०,२२५ कोटी रुपयांची महसूली तूट दाखविलेली होती. परंतु वर्षा अखेरीस प्रत्यक्ष तूट ही ३०,७२४ कोटी रुपये इतकी होती. साधारणत: ही तूट तिप्पट असल्याचे दाखविले गेलेले होते. सन २०२२-२०२३ मध्ये २४४५४ कोटी रुपयांची महसूली तूट दाखविलेली आहे. ही रक्कम अडीच पटीने गृहित धरता ६०,००० कोटी रुपयांपर्यंत वर्षाअखेरीस महसूली तूट जाऊ शकते.

श्री.प्रवीण दरेकर......

असुधारित प्रत

सभापती महोदया, राजकोषीय तुटीच्या बाबत अर्थसंकल्पीय अंदाज व प्रत्यक्ष वर्ष संपल्यानंतरची आकडेवारी यामध्ये मोठी तफावत आहे. महाविकास आघाडी सरकार राजकोषीय तूट देखील १,००,००० कोटींच्या वर नेण्याचा विक्रम प्रस्थापित करणार आहे.

सभापती महोदया, सन २०२०-२०२१ मध्ये अर्थसंकल्प सादर करताना दाखविलेली राजकोषीय तूट ५४६१८ कोटी रुपये इतकी होती. परंतु वर्षा अखेरीस प्रत्यक्ष झालेली राजकोषीय तूट ही ८७,६९६ कोटी रुपये इतकी होती. यामध्ये साधारणत: ३३,०७८ कोटी रुपयांची यामध्ये वाढ झालेली होती. सन २०२१-२०२२ मध्ये ६६,६४१ कोटी रुपये राजकोषीय तूट अर्थसंकल्प सादर करताना दाखविली होती.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर.......

प्रत्यक्षात वर्षाच्या शेवटी ८९ हजार ८१ कोटी रुपयांची म्हणजे २२ हजार २४० कोटी रुपयांची वाढ दिसते. गत दोन वर्षाचा इतिहास पाहिला तर राजकोषीय तूट २५ हजार कोटी रुपयांनी वाढलेली आहे. म्हणून ही तूट १ लाख १४ हजार ५९८ कोटी रुपयांपर्यंत जाईल असे मागील अनुभवावरुन दिसून येत आहे. राजकोषीय तूट ८९ हजार ८१ कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. ती तूट वाढण्याची कारणे काय आहेत ? राज्य शासनाने स्टॅम्प ड्युटीमध्ये माफी दिल्यामुळे मुंबई शहरामध्ये १६९६ कोटी रुपयांपासून शासनाला वंचित रहावे लागले आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यामधून ती रक्कम ४ हजार कोटी रुपयांपर्यंत आहे. पायाभूत सुविधांचे प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे २५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांच्या किंमती वाढलेल्या आहेत. एकट्या आरे कारशेडमुळे ५५०० कोटी रुपयांचा खर्च वाढलेला आहे. अशा प्रकारे, मेट्रो-२, मेट्रो-३, मेट्रो-४, मेट्रो-५, मेट्रो-६ आणि मेट्रो-७ रखडल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सरकारच्या निष्क्रीयतेचा फटका जनेला वाढीव कर्जाच्या रुपाने सोसावा लागत आहे. पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष केल्यामुळे सहकारी साखर कारखाने, इतर सहकारी संस्था, अनेक मंत्री मंडळातील मंत्री महोदयांच्या संस्था असल्यामुळे २ लाख १०५ कोटी रुपयांची थकहमी देण्यात आली. त्याचा उल्लेख आर्थिक पाहणी अहवालातील पृष्ठ क्रमांक-८३ वर दर्शविण्यात आलेला आहे. इतर सहकारी संस्थाना आणि उद्योगधंद्यांना का सवलती दिलेल्या नाहीत असा माझा प्रश्न आहे. सरकारच्या निष्क्रीयतेमुळे, विकासक धार्जिणांच्या निर्णयामुळे आणि स्वहिताच्या निर्णयामुळे राज्यातील जनतेवर कर्जाचा बोजा वाढून राजकीय तूट वाढलेली आहे. गेल्या दोन वर्षात राज्याच्या कर्जाचा बोजा हा २ लाख ८२ हजार ५४७ कोटी रुपयांनी वाढलेला आहे. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्प मांडला होता, त्यावेळी कर्जाचे प्रमाण ४ लक्ष ७ हजार १५२ कोटी रुपये होते. राज्यावरील कर्जाच्या प्रमाणात ५ लाख ७२ हजार ३७९ कोटी रुपयांनी वाढ झालेली आहे व पुढील वर्षात वाढीव कर्जाचा अंदाज हा एकूण कर्जाची रक्कम ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी रुपयांपर्यंत वाढणार आहे. केवळ ३ वर्षाच्या

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर.......

कालावधीत महाविकास आघाडी सरकारने राज्यातील जनतेच्या डोक्यावर कर्जाचा बोजा २ लाख ८२ हजार ५४७ कोटी रुपयांनी वाढविलेला आहे. राज्यात एकही नवीन योजना सुरु झालेली नाही. स्वत:च्या हितासाठी कर्जे काढलेली आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या पराक्रमामुळे प्रत्येक नागरिकावर गत दोन वर्षात २१ हजार ५८३ रुपयांचा बोजा वाढलेला आहे. ६५ हजार ६४७ कोटी रुपये कोठे गेले हे जाणून घेण्यासाठी मी पत्रव्यवहार करुन शोध घेतलेला आहे. एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीत प्रत्यक्ष पुरवणी मागण्यांसह अर्थसंकल्पीय अंदाज काय होता आणि त्या अनुषंगाने प्रत्यक्ष विभागांना किती निधी वितरित करण्यात आला याची माहिती मी वित्तविभागाकडून पत्राद्वारे घेतलेली आहे. अर्थसंकल्पीय अंदाज ५ लाख २४ हजार ९७७ कोटी रुपयांचा होता. ४ लाख ५० हजार ९२४ कोटी रुपयांचा वितरित निधी होता. परंतु, प्रत्यक्षात मार्च, अखेरपर्यंत झालेला खर्च ३ लाख ८५ हजार २८७ कोटी रुपये एवढा होता. अर्थसंकल्प ज्यावेळी मांडण्यात आला, त्यावेळी ३ लक्ष ५६ हजार ९६७ कोटी रुपये एवढाच खर्च अपेक्षित होता. पण नंतर झालेल्या अधिवेशनामुळे १ लक्ष ६८ हजार १० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आणि एकंदरित ५ लक्ष २४ हजार ९७७ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय मागण्या सदनाने मंजुर केल्या होत्या. ४ लक्ष ९५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. तो प्रत्यक्षात ३ लाख ८५ हजार २७७ कोटी रुपयांपर्यंत खर्च करण्यात आला. याचाच अर्थ वितरित केलेल्या खर्चापैकी ६५ हजार ६४७ कोटी रुपये हे अखर्चित राहिलेले असून, ते कोठे गेले असा माझा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणातून आम्हाला दिले पाहिजे. सन २०२१-२०२२ मध्ये ३ लक्ष ७९ हजार २१२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सदनाला सादर करण्यात आला होता. मी वित्त विभागाकडे अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती मागविली असता वित्त विभागाकडून ५ लक्ष २७ हजार ९६० कोटी रुपयांच्या विविध विभागांचा एकूण अर्थसंकल्पीय अंदाज व्यक्त करण्यात आला. वित्त विभागाने मला अशी माहिती दिली की, ३ लक्ष ६८ हजार ९४६ कोटी रुपये सन सन २०२१-२०२२

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर.......

मध्ये नोव्हेंबर, २०२१ अखेरीस वितरित करण्यात आला. सदर निधी नोव्हेंबर, २०२१ अखेरीस कसा वितरित झाला असा मला प्रश्न पडलेला आहे. नोव्हेंबर, २०२१ अखेरीस राज्य शासनाकडे विविध महसूली जमेद्वारे व कर्जाद्वारे किती निधी प्राप्त झाला ही माहिती मी मागविली. वित्त विभागाने दिलेल्या माहितीप्रमाणे ६९ हजार १२८ कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात आले व १ लक्ष ८८ हजार ८८८ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला होता. म्हणजे राज्य शासनाकडे २ लक्ष ५० हजार १६ कोटी रुपयांचा निधी जमा झाला आणि नोव्हेंबर, २०२१ अखेरीस ३ लक्ष ६८ हजार ९४६ कोटी रुपये कसे वितरित करण्यात आले असा माझा प्रश्न आहे. किमान समान कार्यक्रमातील एकही घोषणा महाविकास आघाडी सरकारला पूर्ण करता आल्या नाहीत. ३ लक्ष ६८ हजार ९४६ कोटी रुपयांचा निधी दर्शविण्यात आला. थोडक्यात १ लक्ष ८११ हजार ९४६ कोटी रुपये राज्य शासनाकडे प्राप्त झालेले नसताना वितरित झाल्याचे दर्शविण्यात आले. मग ही विविध विभागांची फसवणूक नव्हे काय ? जनतेला फसविले जात आहे. याच बरोबर आपल्या विभागांनासुध्दा फसविताना दिसून येत आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये शिवसेनेचा मुख्यमंत्री असताना आपल्या विभागाला किती कोटी रुपयांचा निधी मिळाला या प्रश्नाचे उत्तर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिले पाहिजे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर ....

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुलनेत शिवसेना पक्षाला केवळ १८ ते २० टक्के निधी देऊन एकप्रकारे त्यांची भलामण करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षात विविध विभागांना किती निधी मिळाला याचा हिशेब केला तर सर्व प्रकार आपल्यासमोर येईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विभागांना ६० टक्के, काँग्रेस पक्षाच्या विभागांना २७ टक्के आणि सर्वाधिक आमदार असलेल्या व पक्षाचे मुख्यमंत्री असलेल्या शिवसेना पक्षाच्या विभागांना केवळ १३ टक्के निधी मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जेवढा निधी मिळाला त्याच्या अर्धा निधी ४४ आमदार असलेल्या काँग्रेस पक्षाला मिळाला. शिवसेना पक्षाचे सर्वाधिक ५६ आमदार असूनही काँग्रेस पक्षाला मिळालेल्या निधीच्या ५० टक्के निधीवर शिवसेनेला समाधान मानावे लागले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुलनेत मिळालेल्या निधीच्या २० टक्के निधी शिवसेना पक्षाच्या विभागांना मिळाला आहे. शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री असताना शिवसेनेला अर्थसंकल्पात काय स्थान आहे, हे त्यांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, शिवसेना पक्षाला कमी निधी दिला इथपर्यंत मी समजू शकतो. परंतु विभागांना निधी दिल्यानंतर प्रत्यक्षात निधीचे वितरण व खर्च कमी झालेला आहे. शिवसेना पक्षाच्या विभागामार्फत २०२०-२१ या आर्थिक वर्षात ३.११ ते ३.७४ टक्के एवढाच निधी खर्च करण्यात आला. सर्वात कमी निधी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्या विभागात खर्च करण्यात आला. या विभागासाठी केवळ ४६३ कोटी रुपये निधीची तरतूद असताना फक्त १४ कोटी रुपये खर्च करण्यात आले. हा प्रकार चक्क माननीय मुख्यमंत्र्यांचे सुपूत्र असलेल्या आदरणीय श्री.आदित्यजी ठाकरे यांच्या विभागात होत असेल तर अन्य विभागात काय आलबेल असेल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. पर्यटन विभागासाठी १५५७ कोटी रुपयांची तरतूद असताना केवळ ३७६ कोटी रुपये खर्च करण्यात आला. शिवसेना पक्षाचे वरिष्ठ मंत्री असलेल्या माननीय श्री.सुभाष देसाई यांच्या विभागासाठी १४,०५० कोटी रुपयांची तरतूद असताना केवळ ४८०१ कोटी

श्री.प्रवीण दरेकर ....

रुपये खर्च करण्यात आला. हे प्रमाण केवळ ३४ टक्के आहे. खानदेशचे नेतृत्व करणाऱ्या जळगावच्या माननीय मंत्री श्री.गुलाबराव पाटील यांच्या विभागात प्राप्त निधीपैकी ३४ टक्के निधी खर्च करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी वरदान असलेल्या मृद व जलसंधारण विभागात केवळ ३८ टक्के रक्कम खर्च करण्यात आली. मराठी भाषा विभागामार्फत ३९ टक्के रक्कम खर्च करण्यात आली. परंतु माननीय मंत्री श्री.उदय सामंत यांच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागात प्राप्त निधीपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यात आली. मी अजून सविस्तर तपशीलवार सांगत नाही. परंतु महाविकास आघाडी सरकारमध्ये सामील असलेल्या पक्षांना समान निधीचे वाटप होत नसल्याचे यावरुन दिसून येते.

सभापती महोदया, मी वित्त विभागातील अनेक डेस्कमध्ये पत्र व्यवहार केला. वित्त विभागाकडे २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या नस्ती किती आहेत, त्या का थांबल्या या बाबतची माहिती मागितली होती. मंत्रालय परिसरात वित्त विभागाची एनओसी म्हणजे वित्त विभागाचा टोल आहे अशा प्रकारची चर्चा रंगल्याचे माझ्या कानावर आले. मी वित्त विभागाकडे २५ कोटी रुपयांच्या वर किती नस्ती प्राप्त झाल्या, त्यापैकी किती नस्त्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यात आले, किती नस्त्या नाकारण्यात आल्या या बाबतची माहिती मागितली होती. परंतु वित्त विभागाकडून माझ्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आली. या सभागागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या पत्राला वित्त विभागाच्या सह सचिवांनी २५ कोटी रुपयांवरील किती नस्त्या विभागाकडे प्राप्त झाल्या, अशा प्रकारची माहिती वित्त विभाग ठेवत नाही, असे उत्तर दिले. आज लाखो रुपयांचा खर्च अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पगारावर करणार असू आणि विरोधी पक्ष नेत्यांनी मागितलेली माहिती विभागाकडे उपलब्ध नाही असे जर विभागाचे सह सचिव कळवित असतील तर आम्ही नेमके काय केले पाहिजे याचे मार्गदर्शन आपण करण्याची आवश्यकता आहे.

श्री.प्रवीण दरेकर ....

सभापती महोदया, मंत्रिमंडळाच्या गेल्या दोन वर्षातील निर्णयावर नजर फिरविली तर महाविकास आघाडी सरकारने सत्तेचा वापर कशाप्रकारे केवळ स्वत:चे कारखाने व उद्योग टिकविण्यासाठी केला आहे हे दिसून येईल. महाविकास आघाडी सरकारने सत्तेचा वापर वाईन उद्योजकांसाठी, धनाढ्य बिल्डरांसाठी केल्याचे दिसून येते. जनतेसमोर जाताना दिलेली आश्वासने आणि प्रत्यक्षात मंत्रिमंडळात घेतलेले निर्णय याचा विचार केला तर राज्यातील जनतेला पूर्णपणे वाऱ्यावर सोडण्याचे काम या महाविकास आघाडी सरकारने केलेले आहे. यावरुन हे सरकार नेमके कोणासाठी काम करीत आहे हा प्रश्न उपस्थित होतो.

सभापती महोदया, निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस किंवा कॉंग्रेस पक्षाने काय आश्वासन दिले होते ? त्यांनी आश्वासन दिले होते की, राज्यात टोलच्या दरात पारदर्शकता आणण्यात येईल. परंतु टोलचे दर वाढविण्यात येतील असे आश्वासन त्यांच्याकडून कदापि देण्यात आले नव्हते. वास्तविक पाहता या पक्षांनी दिलेले आश्वासन न पाळता दि.१९ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत कंत्राटदाराच्या हिताची टोल दरवाढ करण्याचा निर्णय घेतला. दि.१९ नोव्हेंबर, २०२० रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रकल्पावर केवळ जड वाहनांसाठी पथकरात काही प्रमाणात वाढ, हलक्या वाहनांवरील सूट कायमच राहील, अशा प्रकारचा निर्णय केला. या निर्णयामुळे टोल कंत्राटदारांचा फायदा झाला. अशा प्रकारच्या निर्णयामुळे अप्रत्यक्षरित्या माल वाहतुकीचे दर आणि महागाईत भर पडते, परिणामी सर्वसामान्य जनतेवरच त्याचा भुर्दंड पडतो.

सभापती महोदया, सत्ता आल्यानंतर ताज ग्रुपला जमीन भाड्याने देण्यात येईल असे आश्वासन दिलेले नसताना सुद्धा शासनाच्या वतीने दि.९ जून, २०२० रोजी पर्यटनाच्या दृष्टीने, स्थानिक रोजगाराच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पर्यटन विभागाने मौजे शिरोढा, वेल्हागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्रासाठी ताज ग्रुपला भाडेपट्टयाने जागा देण्याचा निर्णय घेतला. त्या ठिकाणी हॉटेल उभे राहण्याची

श्री.प्रवीण दरेकर ....

आवश्यकता होती. परंतु या निर्णयाची काय प्रगती आहे हे मंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे. दोन-अडीच वर्षे केवळ जमिनीच्या बाबतीत परवानग्या देणार असू आणि या विलंबामुळे तेथे हॉटेल उभे राहणार नसेल तर विभागाच्या या निर्णयाचा काहीच उपयोग होणार नाही.

सभापती महोदया, या सरकारकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अधिकार कमी करुन निवड मंडळामार्फत पदे भरण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. लोकसेवा आयोग ही सध्या तरी राज्यातील गुणवत्ता जोपासणारी संस्था आहे. परंतु या लोकसेवा आयोगावर अविश्वास दाखवून निवड मंडळामार्फत प्राध्यापकांची पदे भरण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावरुन डॉक्टर घडविणाऱ्या प्राध्यापकांचा दर्जा घसरविण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केला आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. थोडक्यात सोईचे प्राध्यापक भरणे व त्या माध्यमातून वसुली करणे याचसाठी हा खटाटोप आहे काय, अशा प्रकारच्या शंकेला वाव मिळतो. मुळात ज्या बाबतीत आश्वासन देण्यात आले नाही त्या बाबतीत निर्णय घेण्यात आला. निवड प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्याबाबत निवडणुकीपूर्वी देण्यात आलेले आश्वासन मात्र हवेत विरले.

सभापती महोदया, माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. निवडणुकीपूर्वी शिवसेनेने वचननाम्यामध्ये विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती देण्यात येईल असे नमूद केले होते. परंतु विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती देण्यास अद्यापपर्यंत साधी सुरुवात देखील झालेली नाही. या वर्षीचा या सरकारचा हा तिसरा अर्थसंकल्प आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या छात्रवृत्तीबाबत निर्णय घेण्यासंदर्भात माझ्या ऐकिवात नाही. परंतु त्याच वेळी अतिश्रीमंत लोकांच्या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांच्या बाबतीत कोणतेही आश्वासन दिलेले नसताना त्यांच्यासाठी राज्य सरकारने रेड कारपेट अंथरले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.८ डिसेंबर, २०२१ रोजी घेतलेला निर्णय निदर्शनास आणून देतो. स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांना इरादा पत्रासाठी मुदतवाढ

श्री.प्रवीण दरेकर ....

देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु या निर्णयामुळे केवळ शिक्षण सम्राटांचा फायदा झाला. त्या निर्णयाचा जनतेला काहीच फायदा झाला नाही.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

कोणाला किती सवलती देत आहेत ते पहावे. स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना इरादा पत्र मिळविण्यासाठी २ वर्षांची मुदत असताना परत मुदतवाढ देण्याची गरज काय होती याचे उत्तर हवे आहे. कोट्यधीश शिक्षणसम्राटांच्या दबावाखाली माननीय उच्च शिक्षण मंत्री, सरकार झुकले आहे आणि असा निर्णय घेतला आहे. स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाच्या हिताचा निर्णय घेताना जी गतिमानता महाविकास आघाडी सरकारने दाखविली तीच गतिमानता सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या हितासाठी दाखविता आली नाही. शिक्षणसंस्था बळकट झाल्या पाहिजेत. परंतु त्या शिक्षणसंस्थांबरोबर तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आपण करीत आहात याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, माननीय राज्यपालांचे अर्धे पगार कमी करुन स्वत:च कुलपती होण्याचा निर्णय म्हणजे थेट शिक्षण व्यवस्थेमध्ये राजकीय हस्तक्षेप करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. स्वत:च्या हिताचे निर्णय घेत असताना आर्थिक दुर्बल घटक व शेतमजूरांच्या मुलांसाठी शिक्षण प्राप्तीसाठी झिरो टक्के दराने कर्ज योजना राबविणार हे सरकारचे आश्वासन हवेत विरले आहे. त्यांनी कोणत्याही प्रकारची त्या दृष्टीने हालचाल केली नाही. हे सरकार बिल्डरधार्जिण आहे. मी ते कसे ते सांगतो.

सभापती महोदया, सत्तेत आल्यानंतर मुद्रांक शुल्क कमी करणे हा निर्णय शंभर टक्के विकास धार्जिणा निर्णय आहे. या निर्णयामुळे एकट्या मुंबई जिल्ह्यात १६९६ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ठाणे, पुणे या परिसरात २५६८ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. मुंबई ग्राहक पंचायतीने मुद्रांक शुल्क सवलतीचा फायदा बिल्डरांनी तर घेतलाच पण तो ग्राहकांपर्यंत पोहोचला नाही अशी तक्रार करुन महाविकास आघाडी सरकारचे हे बिल्डरधार्जिण धोरण जनतेसमोर उघडे पाडले आहे. मग हा फायदा कोणासाठी ? वेगवेगळ्या प्रकारच्या ट्रस्टला जागा दिल्या. भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण केले. मी आता यादी वाचत नाही. आमदारांना त्यांच्या वैयक्तिक व्यवसायामध्ये विशेष बाब म्हणून दंड माफ करण्याचा निर्णय

श्री. प्रवीण दरेकर ....

देखील या सरकारने केला आणि ज्यावर वित्त विभागाने अनेक प्रकारची निरिक्षणे, ताशेरे ओढले होते. मी केवळ वित्त विभागाचे अभिप्राय वाचू इच्छितो. उपरोक्त निरीक्षण व प्रस्ताव पाहता अशा विशिष्ट प्रकरणी गुन्हा क्षमापन शुल्क माफ केल्यास भविष्यात त्याचा पूर्वोदाहरण म्हणून वापर केला जाण्याची शक्यता आहे. तुम्ही जर अशाप्रकारचा दंड माफ केला तर हाच प्रिसिडंट पडेल आणि सद्य:स्थितीत सदर प्रकरण उघडकीस आल्यामुळे प्रथम प्रकरण म्हणता येईल अन्यथा यापूर्वीची अशी अनेक प्रकरणे असण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.

सभापती महोदया, राज्यात पसरलेल्या कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्याचे महसुली उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटले आहे. ते अभिप्रायात सांगत आहेत. तसेच यासाठीच्या प्रतिबंधक उपाययोजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधीचा खर्च होत आहे. त्यातच सदर प्रकरणी दंड माफ केल्यास या मार्गाने प्राप्त होणारा महसूल देखील बुडणार आहे. हे ताशेरे आहेत. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेस प्राप्त होणारी रक्कम माफ करण्यास वित्त विभागास सहमती देता येणार नाही. नगरविकास विभागाचा प्रस्तुत प्रस्ताव अमान्य करण्यात यावा अशा प्रकारची टिप्पणी केलेली असतानाही मंत्रिमंडळाने व्यक्तिगत स्तरावर सरकारचा लाभ देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत आहे. सातारा मेषपालन व लोकर प्रक्रिया सहकारी संस्थेसाठी जमीन खरेदी व्यवहारातील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा अशाच प्रकारचा निर्णय घेतला. व्यक्तिगत संस्था डोळ्यांसमारे ठेवून, व्यक्ती डोळयासमोर ठेवून असे निर्णय घेत आहेत. सर्वसामान्य जनतेला याचा काय फायदा आहे याचे उत्तर द्यावे लागणार आहे.

सभापती महोदया, दुष्काळी मराठवाडा, विदर्भ यांच्याकडे दुर्लक्ष करुन सुजलाम, सुफलाम सांगली जिल्ह्यातील महागड्या उपसा सिंचन सुधारित योजनेस प्रशासकीय मान्यता दिली. आपण ती द्यावी. सांगलीचा विकास झाला पाहिजे. माननीय जलसंपदा मंत्री तेथील आहेत. आपण मोठ्या प्रमाणात निधी द्या. आमचे काही म्हणणे नाही. पण विदर्भ, मराठवाड्याला दुष्काळपासून मुक्त करण्यासाठी आश्वासन दिले होते, याचा अडीच वर्षांमध्ये महाविकास आघाडी सरकारला विसर

श्री. प्रवीण दरेकर ....

पडला आहे की काय असे चित्र आहे. सांगलीचे माननीय जलसंपदा मंत्री असल्यामुळे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी उपसा सिंचन योजनेसारख्या महागड्या व न परवडणाऱ्या योजनेस विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. विदर्भ, मराठवाडा दुष्काळाने होरपळलेला असताना, त्यांचा सिंचनाचा अनुशेष बाकी असताना अशा उपसा सिंचन योजनेसारख्या खर्चिक योजना होत आहेत. परंतु इतर लोकांकडे दुर्लक्ष होत आहे.

सभापती महोदया, मराठवाडा वॉटर ग्रिडकरिता सरकारकडे निधी नाही. कोकणातील वादळग्रस्तांसाठी सरकारकडे निधी नाही. कोकणातील अनेक प्रकल्प रखडलेले आहेत, त्यासाठी सरकारकडे निधी नाही. परंतु व्यक्तिगत, व्यक्तिकेंद्रीत आणि व्यक्तींसाठीच असा अर्थसंकल्प आहे की काय अशी माझ्या मनात शंका आहे. दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ व दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी कंत्राटदार हिताचे २ निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले. सन २०१२ ते सन २०१४ दरम्यान जलसंपदा विभागातील भ्रष्टाचार राज्यात प्रचंड गाजला. हा भ्रष्टाचार एवढ्या मोठ्या प्रमाणात होता की, एक हेक्टर जमीन सिंचनासाठी ८ ते १० लाख रुपयांचा त्या दरम्यान खर्च करण्यात आला होता. सन २०१५ मध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर जलसिंचनाचा खर्च १० लाख रुपयांहून थेट २ लाख रुपयांवर आला. या प्रकरणी दोषी कंत्राटदारांची देयके काढू नयेत असे स्पष्ट असताना कोकणातील ६ प्रकल्पांच्या निविदा विखंडनाचे आदेश रद्द करण्यात आले. कंत्राटदारांच्या भल्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. केवळ कंत्राटदारांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठीच महाविकास आघाडी सरकार आहे का असा प्रश्न माझ्यासमोर आहे.

सभापती महोदया, दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी जलसंपदा विभागाने निर्णय केला आणि कोकणातील ६ प्रकल्पांच्या निविदा विखंडनाचे आदेश रद्द केले. कोणाचा फायदा झाला ? कंत्राटदारांचा फायदा झाला. जनतेवर कररुपाने बोजा पडणार आहे. दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी पुन्हा जलसंपदा विभागाने निर्णय घेतला आणि १२ मान्यताप्राप्त जलसंपदा प्रकल्पांच्या निविदा मर्यादेत वाढ केली.

श्री. प्रवीण दरेकर ....

हाही कंत्राटदारांच्या हितासाठी निर्णय राहील. हीच गतिमानता तुमच्या जाहिरनाम्यात का दिसली नाही, दिलेल्या आश्वासनांविषयी का दिसली नाही ? बेरोजगारांना प्रत्येक महिन्याला ६ हजार रुपये बेरोजगार भत्ता देऊ म्हणाला होता. किती बेरोजगारांना किती भत्ता दिला ? शून्य टक्के व्याज दराने कर्ज देऊ म्हणाला होता. किती शून्य टक्के व्याज दराने कर्ज दिले ? प्रत्येक नागरिकाला आरोग्याचे विमाछत्र देऊ म्हणाला होता. किती लोकांना ते दिले ? कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन प्रति माह २१ हजार रुपये देण्याचे आपण जाहिरनाम्यात म्हणाला होता. ठिबक व तुषार यांसाठी १०० टक्के सबसिडी देऊ असे म्हणाला होता. मात्र त्याचा उल्लेख कुठे आहे ? दुधाला किमान हमीदर देऊ म्हणाला होता. किती हमीदर दिला ? इतर राज्यांच्या तुलनेत उद्योगासांठी विजेचे दर निश्चित करु असेही म्हणाला होता. परंतु काहीही केले नाही. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व कोकण भागात उद्योग यावेत यासाठी स्वतंत्र धोरण आखू असे म्हणाला होता. ग्रामीण व निमशहरी भागातील बेरोजगार पदवीधरांना किमान शंभर दिवसांच्या रोजगाराची हमी देऊ म्हणाला होता. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, बसेस व रेल्वे यामध्ये मोफत वायफाय सेवा अशी स्वप्ने दाखविली होती. ज्येष्ठ नागरिकांना दीड हजार रुपये पेन्शन देऊ म्हणाला होता. मात्र यातील एकही निर्णय आपल्या मंत्रिमंडळामध्ये झाला नाही. मग अर्थसंकल्पात नेमके कोणासाठी काय दिले ?

नंतर श्री. खर्चे ....

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, ही सर्व आश्वासने या सरकारच्या लक्षात नाहीत, परंतु महाराष्ट्राला मद्यराष्ट्र बनविण्याकडे हे सरकार फार गतीशील आहे. मागील दोन वर्षातील मंत्रिमंडळ बैठकीचे निर्णय पाहिले तर मद्य विक्रेते, मद्य निर्मिती करणाऱ्या लोकांवर या सरकारचे विशेष प्रेम दिसून येते. दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी मंत्रिमंडळात मद्यविक्रीच्या लायसन्स शुल्कात सूट देण्याचा निर्णय कोविड परिस्थितीमध्ये घेण्यात आला. यामध्ये मद्य विक्रेत्यांचा फायदा झाला आहे. जनतेचा फायदा न होता त्यांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होणार आहे. हे सरकार दारु विक्रेते व दारुच्या एजन्टांचे हीत जपत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात दारु विक्रेत्यांसाठी दारुबंदी उठविण्यात आली.

सभापती महोदया, आपण नेहमी दारुबंदीवर काम करतात, लोकांचे प्रबोधन करतात, त्यामुळे या विषयाची गांभीर्यता आपणाला जास्त आहे. महायुतीचे शासन असताना चंद्रपूर जिल्हात दारुबंदी करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी शिवसेना पक्ष भारतीय जनता पक्षाबरोबर सत्तेत सहभागी होता. आपण त्यावेळी दारुबंदीचा निर्णय घेतला व आता संगतीचा परिणाम कसा वाईट असतो हे यातून दिसून येते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपणाला माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांची संगत लाभली आहे. आपण मंत्रिमंडळात असताना दारुबंदीचा निर्णय घेतला होता. या सरकारच्या संगतीच्या परिणामामुळे ढवळ्या शेजारी पोवळा बांधला वाण नाही पण गुण लागला. दारुबंदी करावे या मताचे आपण असताना दारुबंदी उठविण्यासाठी आपण मान्यता दिली. आता आपण वाईन म्हणून त्या निर्णयाचे समर्थन करीत आहात. वाईन विक्री सुपर मार्केटमध्ये ठेवल्यामुळे सर्व सामान्य लोकांमध्ये काय चर्चा आहे ती आपण जाऊन बघावी. दारुमुळे सर्वसामान्य माणसांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. अशा वाईन उद्योगाला हे सरकार चालना देत आहे. वाईन कंपन्या कोणाच्या व किती आहेत त्या सांगून मी वेळ घेणार नाही. देशात ८२ वाईनरी आहेत. त्यातील महाराष्ट्रात ७४ आहेत. नाशिक जिल्ह्यात ३६ वाईनरी आहेत. नाशिकमध्ये एका बड्या नेत्याच्या चार वाईनरी आहेत. भुजबळ, शिराज, चंद्राई, अर्मस्ट्राँग अशी

श्री.प्रवीण दरेकर...

त्यांची नावे आहेत. यामध्ये मोठमोठ्या नेत्यांचे ४९ टक्के शेअर्स आहेत. युनायटेड स्पिरीट व इंडेज ग्रृप यामध्ये थेट सहभाग असल्याचे दिसून येते. वाईन उद्योगाला प्रेरणा देण्याचे काम हे सरकार करीत असल्याचे दिसते. शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्याचे काय झाले, शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा झाला काय ? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, हिंदुत्वाचा विसर शिवसेना पक्षाला कशा पध्दतीने पडला हे गेल्या दोन वर्षांच्या कारभारातून दिसून येते. दोन वर्षातील मंत्रिमंडळाच्या निर्णयाकडे नजर फिरविली तर सर्व निर्णय बिल्डरधार्जिणे व कंत्राटदाराला मदत करणारे, वाईन उद्योजकांना व्यवसाय वृध्दीसाठी सहाय्य करणारे आहेत. स्वत:च्या संस्थाना जमीन वाटप करणे, स्वत:च्या अधिकारात वाढ करुन जनतेच्या पैशाची लूट करणारे आहेत. जनता,शेतकरी,महिला कामगार हे वंचित घटक फक्त भाषणा पुरते मर्यादित राहिले आहेत. अर्थसंकल्पामध्ये व मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयात त्यांना कोणतेही स्थान दिसत नाही.

सभापती महोदया, स्व.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असते तर हिंदू मंदिरांकडे व तीर्थक्षेत्राकडे दुर्लक्ष झाले असते काय हा माझा प्रश्न आहे. आपण संगतीने हिंदुत्वाची कास सोडून दिली. अर्थसंकल्पीय भाषणात प्राचीन मंदिरांचे संवर्धन करण्यात येईल असा उल्लेख केला होता. या घोषणेमुळे शिवसेना पक्ष महाविकास आघाडीत राहून हिंदुत्वाचा अजेंडा राबवित आहे असे वाटले होते. दोन वर्षानंतर या घोषणेच्या अंमलबजावणीची परिस्थिती काय आहे याचे उत्तर द्यावे लागेल. राज्यात आठ प्राचीन मंदिरे आहेत. कोकणातील धुतपातेश्वर राजापूर,कोपश्वर शिरोळ, कोल्हापूर. मावळ येथील एकविरा देवी हे आदरणीच बाळासाहेब ठाकरे व आपणा सर्वांचे श्रध्दास्थान आहे. गोदेश्वर सिन्नर,खंडोबा सातारा जिल्हा संभाजीनगर, भगवान पुरुषोत्तम तालुका माजलगांव, जिल्हा बीड. आनंदेश्वर दर्यापूर जिल्हा अमरावती, शिवमंदिर मार्कंड चामोशी, जिल्हा गडचिरोली, या आठ मंदिरांसाठी १०१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पंरतु आतापर्यंत या सरकारने

श्री.प्रवीण दरेकर...

असुधारित प्रत

एकही रुपया खर्च केलेला नाही. इतकेच नाही तर सविस्तर प्रकल्प अहवाल गेल्या दोन वर्षात सरकारला करणे शक्य झाले नाही. वाईन उद्योगासाठी सरकारकडे वेळ आहे. प्राचीन मंदिरांचे जतन, संवर्धन व परिसर विकास याकडे लक्ष देण्यास सरकारकडे वेळ व पैसा नाही. तीर्थक्षेत्रे विकसित झाली तर पर्यटन वाढेल त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार वाढेल. यामध्ये फोटोग्राफी, गाईड, लॉजिंग, वाहन उद्योग रेस्टॉरंट वाढतील परिसरातील अनेक उद्योग त्यामुळे वाढतात. इतर करमणुकीचे उद्योग वाढल्यामुळे तेथील स्थानिक लोकांना रोजगार मिळू शकतो.

सभापती महोदय, प्राचीन मंदिराप्रमाणे चार ज्योर्तिलिंग मंदिरांकडे सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. महाराष्ट्रात चार ज्योर्तिलिंग आहेत, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येक वेळी हर हर महादेव अशी घोषणा देऊन मोहिमेवर जात होते. महाविकास आघाडी शासनाने केलेली घोषणा हे सरकार विसरले आहे. श्री क्षेत्र भिमाशंकर येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी ३० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. एकही रुपयाचा निधी अद्याप वितरीत झालेला नाही. श्री क्षेत्र घृष्णेश्वर वेरुळ, तालुका खुलताबाद जिल्हा औरंगाबाद, संभाजीनगर येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी ३० कोटी रुपयांची तरतूद केली होती. एक रुपया देखील या कामासाठी वितरीत झालेला नाही. मला येथे खेदाने सांगावेसे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावत आपले लक्ष याकडे आहे काय ? या सरकारची धुरा नेमके कोण चालवित आहे. स्टेअरिंग आपल्या हातात असताना नेमके काय होते ते मी आपल्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, किमान समान कार्यक्रमातील एकाही घोषणेची अंमलबजावणी या सरकारने अद्याप केलेली नाही. दुष्काळग्रस्त भागांना दुष्काळ मुक्त करणे असो. शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याचा विषय असो. वन रुपी क्लीनिक सुरु करण्याचा निर्णय असेल. अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढविण्याचा निर्णय असेल. झोपडपट्टीवासियांना ५०० स्क्वेअर फूट घर देण्याचा निर्णय असेल. शून्य टक्के दराने कर्ज देण्याचा निर्णय असेल. अडीच वर्षाच्या कालावधीत या सरकारने कोणतेही काम

श्री.प्रवीण दरेकर...

या विषयावर केलेले नाही. अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत सरकारने कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. राज्याची अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी दोन गोष्टी महत्वाच्या असतात. जास्तीत जास्त देशी अथवा विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात आणणे व त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर........

दुसरे म्हणजे राज्यात जास्तीत जास्त उद्योग यावेत यासाठी पायाभूत सुविधा बळकट करणे आवश्यक आहेत. परंतु या दोन्ही बाबतीत मागील २ वर्षात महाराष्ट्र सरकारचे प्रयत्न बघितले तर ठणठण गोपाळ असेच म्हणावे लागेल. पायाभूत सुविधांच्या बाबतीत बोलायचे म्हटले तर या सरकारने अद्याप पर्यंत कोणत्याही नवीन प्रकल्पाचे उद्घाटन केलेले नाही, जे प्रकल्प सुरु आहेत त्यांची गती मागील २ वर्षात थंडावलेली आहे. पायाभूत प्रकल्प पूर्ण करण्यात सरकारला पूर्णपणे अपयश आलेले आहे. मला लेखी आश्वासन देण्यात आले की, राज्य शासनामार्फत सुरु असलेले पायाभूत सुविधा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होणार नाही व होणारा अनावश्यक खर्च कमी करता येईल. माझ्याकडे प्रकल्पांची यादी आहे. मेट्रो-२(अ) व मेट्रो-७ हे दोन्ही मार्ग वेळापत्रकाप्रमाणे सन २०२२ पर्यंत पूर्ण होणार होते. परंतु ते अजूनही सुरु झालेले नाहीत. मेट्रो-७ व मेट्रो-९ करीता भाईंदर येथील जागा मिळविण्यासाठी सरकारला अद्याप यश आलेले नाही. सदर प्रकल्प रखडलेला आहे. मेट्रो-३, कुलाबा-वांद्रे-सीप्झ कारशेडसाठी आरेची निवड केली होती. पण राजकीय मुद्दा करुन कांजूर मार्ग येथे कारशेड करण्याचा हट्ट धरण्यात आला. आजही तो प्रश्न सुटलेला नाही. प्रकल्पाचे भवितव्य अधांतरी असून प्रकल्पाचा खर्च १०.५ हजार कोटी रुपयांनी वाढला आणि तो ३३ हजार कोटी रुपयांवर पोहोचला. न्यायालयीन वाद संपेपर्यंत जवळपास प्रकल्प ५० हजार कोटी रुपयांवर पोहोचेल. मेट्रो-६ करीता जागेची निवड केलेली नाही. त्यामुळे कारशेड कधी होईल हे सांगता येत नाही. सदर प्रकल्प देखील रखडणार आहे. मेट्रो-४, वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली प्रकल्पासाठी दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी २ कंपन्यांची नेमणूक करण्यात आली. आता आपण सन २०२२ मध्ये आहेत. मागील ३ वर्षात केवळ ३४ टक्के स्थापत्य काम झालेले आहे. मेट्रो-४(अ), कासारवडवली-गायमुख प्रकल्पसाठी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी मान्यता मिळालेली आहे. अडीच वर्षात केवळ २५ टक्केच स्थापत्य काम पूर्ण झालेले आहे. मेट्रो-५, ठाणे-भिवंडी-कल्याण प्रकल्पाचे स्थापत्य काम अद्याप सुरु झालेले नाही. मेट्रो-९, दहिसर-

श्री.प्रवीण दरेकर........

मिरा भाईंदर प्रकल्पासाठी दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी कंत्राटदाराची निश्चिती करण्यात आली. परंतु अद्याप स्थापत्य कामास सुरुवात झालेली नाही. मेट्रो-१०, गायमुख ते मिरारोडा प्रकल्पासाठी सल्लागाराची नियुक्ती झालेली नाही. मेट्रो-१२, कल्याण ते तळोजा प्रकल्पासाठी अद्याप सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली नाही. मग या प्रकल्पाचे काम केव्हा सुरु होईल ? वरळी ते शिवडी उन्नत मार्गाचे अद्याप भौतिक कामेच सुरु आहेत. सदर प्रकल्पाच्या स्थापत्य कामांना कधी सुरुवात होईल, हे सांगता येत नाही. मुंबई ते पारबंदर प्रकल्प सप्टेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणार होता. या प्रकल्पाचे काम देखील एका वर्षाने पुढे गेलेले आहे. आपण अर्थसंकल्पात जनतेला हमी दिली होती की, आम्ही प्रकल्प वेळेत पूर्ण करु, प्रकल्प खर्च वाढणार नाही याची काळजी घेऊ. परंतु नियोजन शून्य कारभारामुळे जनतेवर हजारो कोटी रुपयांचा भुर्दंड पडताना दिसत आहे आणि त्यासाठी पूर्णणे राज्य सरकारच जबाबदार आहे.

सभापती महोदया, नवी मुंबई विमानतळ विकास सुद्धा अशाच प्रकारे रखडलेला आहे. सन २००७ मध्ये विमानतळाला तत्वत: मान्यता देण्यात आली होती. परंतु, २००७ ते २०१४ या कालावधीत साध्या परवानग्याही विमानतळासाठी मिळू शकल्या नव्हत्या. माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर पर्यावरण मंत्रालयाने एप्रिल, २०१७ मध्ये ना-हरकत प्रमाणपत्र दिले. त्यानंतर स्थानिक नागरीकांनी विरोध केल्यानंतर समन्वयातून मार्ग काढण्यात आला आणि दिनांक १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी या विमानतळाच्या कामकाजाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर दिड वर्ष याच गतीने काम झाले. सन २०२२ अखेर या प्रकल्पाचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, सन २०२० नंतर कामकाज संथ गतीने सुरु आहे. थोडक्यात म्हणजे हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुद्धा अर्धवट अवस्थेत दिसून येतो.

अमुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर........

सभापती महोदया, आर्थिक पाहणी अहवालात सत्ताधाऱ्यांचा फोलपणा कसा आहे, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. केंद्र शासनाने मदत देऊनही या सरकारने त्यामध्ये कशा प्रकारे खोडा घातला हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेबाबतची माहिती आर्थिक पाहणी अहवालातील पृष्ठ क्र.५१ वर दिलेली आहे. मे ते जून, २०२१ या काळात केंद्र सरकारने ३.०८ लाख मेट्रीक टन तांदूळ राज्याला दिला. त्यापैकी राज्याने केवळ २.७१ लाख मेट्रीक टन तांदूळ उचललेला आहे. याच काळात केंद्र शासनाने ३.९२ लाख मेट्रीक टन गहू राज्याला देऊ केला होता. त्यापैकी राज्याने ३.५८ लाख मेट्रीक टन गव्हाची उचल केली. जुलै ते नोव्हेंबर, २०२१ या काळात केंद्र शासनाने ७.७० लाख मेट्रीक टन तांदूळ राज्याला देऊ केला. त्यापैकी राज्याने ८.४८ लाख मेट्रीक टन गहू उचलला. केंद्र शासनाने दिलेले २ लक्ष ८९ हजार मेट्रीक टन गहू व तांदूळ राज्य सरकारने उचललाच नाही. उलट केंद्र मदत करत नाही अशा प्रकारचे आरोप केले जातात.

सभापती महोदय, आपण आर्थिक पाहणी अहवालातील पृष्ठ क्र.७५ बघावे. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात सातत्याने वाढ झालेली आहे. केंद्र शासनाकडून सन २०१७-१८ मध्ये २१८२३ कोटी रुपये, सन २०१८-१९ मध्ये ३३६६२ कोटी रुपये, सन २०१९-१० मध्ये ४३७२५ कोटी रुपये, सन २०२०-२१ मध्ये ५६०८८ कोटी रुपये आणि सन २०२१-१२ मध्ये ५६८०३ कोटी रुपये अनुदान मिळाले. म्हणजे मागील ५ वर्षात केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात तिप्पट वाढ झालेली आहे. परंतु केंद्र शासनाच्या नावाने टीका करावयाची असे महाविकास आघाडी सरकारचे काम आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात व्यापाऱ्यांसाठी चांगली योजना सुरु करण्यात आली. १० लाख रुपये थकबाकी असणाऱ्या व्यापाऱ्यांना ८० टक्के रक्कम माफ करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. या घोषणेचा २ लाख २० हजार

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर........

व्यापाऱ्यांना फायदा होईल असे आपण म्हटले आहे. मी सरकारचे अभिनंदन करतो. कारण, कोरोनामुळे व्यापारी अडचणीत आलेले आहेत. त्यामुळे त्यांना सुद्धा मदत झाली पाहिजे. आपण सोन्या, चांदीच्या आयातीवरील मुद्रांक शुल्क माफ केल्यामुळे शासनावर १०० कोटी रुपयांचा आर्थिक बोजा पडणार आहे. व्यापाऱ्यांना ८० टक्के रक्कम माफ केल्यामुळे १७६०० कोटी रपयांचा बोजा पडणार आहे. आमची त्यासाठी हरकत नाही. शासनाने व्यापारी, सोनार अशा सर्व घटकांना मदत करावी. परंतु २ लाखापेक्षा जास्त संख्या असणाऱ्या शेतकऱ्यांच्या ओटीएस योजनेचे काय झाले ? आपण वन टाईम सेटलमेंट योजना पूर्ण केली काय ? इतर राज्यांनी पेट्रोलवरील व्हॅट कमी केलेला असताना आपल्या राज्याने व्हॅट कमी करण्यासाठी इतर राज्यांप्रमाणे एका दमडीची सुद्धा तरतूद केली नाही. आपण एकीकडे १७ हजार कोटी रुपयांची सूट देत आहात. परंतु राज्य शासनाला छोट्या-मोठ्या आंदोलकांकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. आपण मागील एका वर्षात झालेली आंदोलने बघावित ? राज्यात न्याय मागण्यासाठी कोण येते ? शिक्षक संघटना शासनाकडे किती कोटी रुपयांची मागणी करीत आहेत ? त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनावर १०० कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. संगणक परिचालकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी ५० कोटी रुपये, उमेदच्या मागण्यांसाठी ५० कोटी रुपये, मच्छिमारांच्या मागण्यांसाठी २५ कोटी रुपये, अंगणवाडी सेवकिांच्या मागण्यांसाठी ५० कोटी रुपये, शासकीय वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्यांसाठी ५० कोटी रुपये, बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी ५० कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. परंतु राज्य शासनाने या सर्व आंदोलनकर्त्यांकडे कानाडोळा केलेला आहे. मग हाच शाहू, फुले, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे काय ? आपण एका बाजूला काही लोकांना सवलती देतो, न्याय देतो, त्यांच्यासाठी कोट्यवधी रुपयांची खिरापत वाटतो आणि दुसऱ्या बाजूला सर्व सामान्य समाातील घटक आंदोलन करीत आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.......

शासनाकडे ते ५० कोटी रुपये, १०० कोटी रुपये, १५० कोटी रुपयांची मागणी करीत आहेत. परंतु त्यांना सदर रक्कम देण्यासाठी शासनाकडे वेळ नाही.

सभापती महोदया, आर्थिक पाहणी अहवालातील पृष्ठ क्रमांक १४२ नुसार मंजूर औद्योगिक प्रकल्पांच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार महाराष्ट्रात नोव्हेंबर, २०२१ अखेर १५ लाख ९ हजार ८११ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले. याच काळात शेजारच्या गुजरात राज्यात २० लाख ४२ हजार १८२ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार करण्यात आले. मी याबाबत सांगितल्यास गुजरातची भलामण करतो असे आपण म्हणणार आहात. परंतु जी प्रगती होत आहे ती आपण स्वीकारली पाहिजे. शेजारच्या कर्नाटक राज्यात याच काळात १५ लाख ६७ हजार २६७ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. अशा प्रकारे २ वर्षांमधील महाविकास आघाडीच्या नियोजन शून्य कारभारामुळे औद्योगिक गुंतवणुकीमध्ये आघाडीवर असलेला महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवालामध्ये तिस-या क्रमांकावर फेकला गेला.

सभापती महोदया, महाविकास आघाडी सत्तेवर आल्यापासून राज्यातील परकीय गुंतवणुकीमध्ये मोठया प्रमाणात घट झाली. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात राज्यामध्ये सन २०१७-१८ मध्ये ८६ हजार २४४ कोटी रुपयांची आणि सन २०१८-१९ मध्ये ८० हजार १३ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. अशा प्रकारे माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात दोन वर्षांमध्ये एक लाख ६६ हजार २५७ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. याउलट महाविकास आघाडीच्या काळात सन २०२० मध्ये २२ हजार ६१७ कोटी रुपयांची आणि सन २०२१ मध्ये १४ हजार ६३९ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. अशा प्रकारे महाविकास आघाडीच्या काळात दोन वर्षांमध्ये ३७ हजार २५६ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात २ वर्षांमध्ये झालेल्या गुंतवणुकीच्या तुलनेत महाविकास आघाडी शासनाने २ वर्षांच्या

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.......

काळामध्ये केलेली गुंतवणूक २२ टक्क्यांएवढी आहे. ही बाब आर्थिक पाहणी अहवालात नमूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदया, परदेशी गुंतवणुकीच्या झालेल्या सामंजस्य करारांमधून प्रत्यक्षात किती कंपन्या सुरु झाल्या, त्यांना किती जागा देण्यात आल्या, प्रत्यक्षात किती रोजगार निर्मिती झाली ? मी याबाबत सदनाला आकडेवारी देणार आहे. दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२१ या काळात महाराष्ट्रात आलेल्या ३७ हजार २५६ कोटी रुपयांच्या विदेशी गुंतवणुकीतून १५ हजार ४६८ रोजगार निर्मिती झाली असल्याचे मला उद्योग विभागाकडून एका पत्राद्वारे कळविण्यात आले. सभापती महोदया, मी या संदर्भात प्रत्यक्षात माहिती घेतली असता मागील २ वर्षांमध्ये परदेशी गुंतवणूक करणाऱ्या एकाही कंपनीमार्फत एकाही व्यक्तीला रोजगार प्राप्त झाले नसल्याचे वास्तव समोर आलेले आहे. परदेशी गुंतवणुकीची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे. २ वर्षांपूर्वी सामंजस्य करार झालेल्या Hengli, Isambe Loggistic तसेच Estec अशा तीन कंपन्याबाबत सांगायचे झाल्यास अद्याप त्यांच्याबाबत कोणताही निर्णय न घेता त्यांना होल्डवर ठेवण्यात आलेले आहे. त्या कंपन्यांना आतापर्यंत होल्डवर का ठेवले ? हा प्रश्न विचारण्याची आवश्यकता आहे. कंपनी आल्यानंतर त्यासंबंधी निर्णय घेतल्यानंतर रोजगार मिळू शकतो. यासंबंधी अद्याप कोणता व्यवहार व्हायचा बाकी आहे, त्या कंपन्यांना होल्वर का ठेवण्यात आले आहे ? हे समजण्यासाठी कोणताही मार्ग नाही. सदर कंपन्यांना होल्डवर ठेवल्यामुळे त्यांच्यामार्फत होणारी १ हजार ३४५ कोटी रुपयांची गुंतवणूक व जवळपास ४ हजारांपर्यंतची रोजगार निर्मिती अडचणीत आली आहे. मी सदनाला दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२१ या काळात महाराष्ट्रात आलेल्या परदेशी गुंतवणुकीची आकडेवारी देतो. चीन मधील Hengli कंपनीकडून २२५ कोटी रुपयांची पुणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून १५० रोजगार निर्मिती होणार होती. परंतु उद्योग विभागाने त्यासंबंधीच्या परवानग्या ऑन होल्ड करुन ठेवलेल्या आहेत. सिंगापूर येथील Isambe Loggistic कंपनीकडून एक हजार

श्री.प्रवीण दरेकर.......

कोटी रुपयांची रायगडमध्ये गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून अडीच हजारपर्यंत रोजगार निर्मिती होणार होती. परंतु उद्योग विभागाने त्यासंबंधीच्या परवानग्या ऑन होल्ड करुन ठेवल्या आहेत. तसेच साऊथ कोरिया येथील Estec कंपनीकडून १२० कोटी रुपयांची पुणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून ११०० रोजगार निर्मिती होणार होती. परंतु उद्योग विभागाने त्यासंबंधीच्या परवानग्या ऑन होल्ड करुन ठेवल्या आहेत. रँक बँक व एपीजी डीसी इन्फ्रा अशा सिंगापूरमधील कंपन्यांसमवेत २ हजार ६३२ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. परंतु मागील २ वर्षांमध्ये सदर कंपन्यांना जागा देण्यासाठी उद्योग विभागाला वेळ मिळू शकला नाही. अशा प्रकारे कंपन्यांना महाराष्ट्रात उद्योगासाठी जागा न मिळू शकल्यामुळे महाराष्ट्रात परदेशी गुंतवणूक कशी येऊ शकेल ? सिंगापूर येथील रँक बँक कंपनीकडून १ हजार ५०० कोटी रुपयांची पुणे, रायगड व ठाणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून ५० रोजगार निर्मिती होणार होती. सद्यस्थितीमध्ये त्याकरिता जमिनीचे शोध कार्य सुरु आहे. तसेच सिंगापूर येथील एपीजी डीसी इन्फ्रा कंपनीकडून १ हजार १३२ कोटी रुपयांची ठाणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून २०० रोजगार निर्मिती होणार होती. सद्यस्थितीमध्ये त्याकरिता जमिनीचे शोध कार्य सुरु आहे. स्पेनमधील मंत्रा डेटा सेंटर कंपनीसमवेत १ हजार १०३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला. परंतु दोन वर्षांच्या काळात त्या कंपनीकरिता जमीन संपादन करता आली नाही. परिणामी आपल्या राज्यात परदेशी गुंतवणूक येऊ शकली नाही. अशा प्रकारे दोन वर्षांपूर्वी घोषणा केलेल्या ५ हजार ८० कोटी रुपयांच्या परदेशी गुंतवणुकीबाबत अद्याप कोणतीही प्रगती झालेली नाही. सभापती महोदया, २ वर्षांपूर्वी ६ कंपन्यांसमवेत ११ हजार ४०४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आले. दोन वर्षांच्या काळात आतापर्यंत सदर कंपन्यांना फक्त जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. तेथे कोणत्याही प्रकारची बांधकाम देखील सुरु झालेली नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात उद्योगाचे कामे कधी सुरु होतील हा मूळ प्रश्न आहे.

श्री.प्रवीण दरेकर.......

असुधारित प्रत

सभापती महोदया, सिंगापूर येथील ERR India Investment Holding Private Limited कंपनीकडून ४ हजार ३१० कोटी रुपयांची पुणे, रायगड व ठाणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून १५५२ रोजगार निर्मिती होणार होती. सद्यस्थितीमध्ये त्याकरिता जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती कशी होणार ? आतापर्यंत फक्त ४ कंपन्यांचे बांधकाम सुरु झालेले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष एक वर्षात उद्योग सुरु होईल की नाही अशी शंका आहे. एक बाब खरी आहे की, २ वर्षांपूर्वी सामजंस्य करार केलेल्या २२ हजार ६१७ कोटी रुपयांपैकी एकाही कंपनीकडून प्रत्यक्ष उत्पादन सुरु झालेले नसल्यामुळे अद्याप एकाही व्यक्तीला रोजगार मिळू शकला नाही. जपान मधील Mitsubish कंपनीकडून ४९० कोटी रुपयांची पुणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून ३५० रोजगार निर्मिती होणार होती. सद्यस्थितीमध्ये कंपनीचे बांधकाम सुरु आहे. युके मधील Cold (Data Centre Investment Holding Private Limited कंपनीकडून ४ हजार ४०० कोटी रुपयांची ठाणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. त्या माध्यमातून १०० रोजगार निर्मिती होणार होती. सद्यस्थितीमध्ये त्याकरिता बांधकाम सुरु आहे. सिंगापूर येथील Ascendas कंपनीकडून ५६० कोटी रुपयांची पुणे, रायगड व ठाणे जिल्हयात गुंतवणूक केली जाणार होती. सद्यस्थितीमध्ये कंपनीचे बांधकाम सुरु आहे. रशिया येथील NLMK कंपनीची देखील याच प्रकारची परिस्थिती आहे.

सन २०२१ या वर्षात फक्त १४ हजार ६३९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामजंस्य करार करण्यात आले. यापैकी फक्त Mitsubish बेल्टींग कंपनीचे बांधकाम सुरु आहे. इतर कंपन्यांना बांधकामासाठी अद्याप जागा मिळालेली नाही. अशा प्रकारे १४ हजार ६३९ कोटी रुपयांपैकी एक रुपयाची गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आलेली नाही. तसेच त्यातून एकाही व्यक्तीला अद्याप रोजगार मिळालेला नाही. अशा प्रकारे विदेशी गुंतवणुकीबाबत सांगायचे झाल्यास २०२० व २०२१ अशा २ वर्षांमध्ये सामजंस्य करार केलेल्या ३४ हजार २५६ कोटी रुपयांच्या रकमेतून महाराष्ट्रातील

श्री.प्रवीण दरेकर.......

असुधारित प्रत

एकाही व्यक्तीला रोजगार मिळू शकला नाही. सभापती महोदया, मी आपल्याला विविध परदेशी कंपन्यांची नावे सांगितलेली आहेत.

यानंतर श्री.गागरे.......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

सभापती महोदय, या सरकारने खूप जाहिराती केल्या. मुख्यमंत्री महोदयांनी मॅग्नेटीक महाराष्ट्र-२ च्या माध्यमातून १ लाख १२ हजार ९३९ कोटी रुपयांची विदेशी गुंतवणूक राज्यात झाल्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात परिस्थिती आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली आहे ती मांडत आहे. आर्थिक पाहणी अहवालात डिसेंबर २०२१ पर्यत १५२६० कोटीचे २५ सामंजस्य करार तसेच ५०५१ कोटीचे बारा सामंजस्य करार करण्यात आले. पृष्ठ क्रमांक १४२ वर ही माहिती आहे. थोडक्यात घोषणा १ लाख १२ हजार ९३९ कोटींची झाली, प्रत्यक्षात २० हजार कोटीचेच सामंजस्य करार करण्यात आले. त्यामुळे बोलाचीच कढी बोलाचाच भात अशी या सरकारची गत झालेली आहे. गत दोन वर्षात अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीबाबत सरकारने नियोजित केलेले कामकाज सांगण्यासाठी चक्क दोन पृष्ठ वापरण्यात आले व महाराष्ट्र शिकावू उमेदवारीची घोषणा करण्यात आली. या योजनेच्या सुलभ पण प्रभावी व जलद पारदर्शक अंमलबजावणीसाठी, सनियंत्रणासाठी नवीन संकेतस्थळ तयार करण्यात येईल असेही सांगण्यात आली. या योजनेकरीता आगामी पाच वर्षासाठी ६००० कोटी इतका अंदाजित खर्च आहे. अशी भव्य घोषणाही करण्यात आली, ही योजना १५ ऑगस्ट २०२० पासून सुरु करण्यात येईल हे देखील पुढे नमूद करण्यात आले आहे. वस्तुस्थिती काय आहे, सरकारने नेमके काय केले, सभागृहाला व महाराष्ट्रातील बेरोजगारांना मी सांगू इच्छितो की, हे सरकार केवळ पोकळ घोषणा देणारे सरकार आहे. या सरकारला बेरोजगारांसाठी काहीही करायचे नाही. केवळ घोषणा करुन डोळयात धुळ फेकायची आहे. ६ मार्च २०२० रोजी अर्थमंत्री महोदयांनी घोषणा केली व रितसर वर्णन काय असणार आहे याचे वर्णन त्यांच्या भाषणात मोठया प्रमाणावर झाले, पण १८ फेब्रुवारी २०२२ पर्यत या योजनेचे संकेतस्थळही अद्यापपर्यत निर्माण झालेले नाही, योजनेची अंमलबजावणी तर फार दूरची गोष्ट आहे. जनतेच्या डोळयामध्ये धुळफेक आपण का करीत आहात. विमानतळांच्या विकासाबाबत सभागृहात घोषणा करण्यात आली. कोल्हापूर, रत्नागिरी, अकोला, अमरावती या जिल्हयात सुरु असलेल्या विमानतळ विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. शिवाय सोलापूर व पुणे येथे नवीन

श्री.प्रवीण दरेकर .....

विमानतळ उभारण्यात येईल, त्याकरीता २०२०-२१ मध्ये ७८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावीत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, कोल्हापूर, रत्नागिरी, सोलापूर व पुणे विमानतळासाठी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. अकोल्याचा फिजीबिलीटी रिपोर्ट, व्यवहार्यता अभ्यास अहवाल अद्याप आलेला नाही. ज्यांचे नावाचा वापर आपण मते घेण्यासाठी करता त्या महात्मा गांधी यांच्या संदर्भातील घोषणेला देखील विसर यांना पडलेला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती असल्याने गत अधिवेशनात घोषणा करण्यात आली की, राष्ट्रपिता महात्मा गांधीचे विचार व तत्वे यांचा प्रचार व प्रसार करण्याकरीता विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मुंबईतील राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या वास्तव्याने पावन झालेल्या मनीभवन या वास्तु व संग्रहालयाचे नुतनीकरण करण्याचा मानस आहे. त्याकरीता २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात २५ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे. याची वस्तुस्थिती काय आहे. महात्मा गांधी यांचे नाव वापरुन काँग्रेस भारतावर ६० वर्षे राज्य केले. प्रत्यक्षात महात्मा गांधी यांचे नातू व पणतू राजकारणात कोठेच नाहीत. परंतु त्यांचे मनी भवन या वास्तुसंग्रहालयाच्या नुतनीकरणासाठी आपण २५ कोटीची घोषणा केली पण प्रत्यक्षात १ एप्रिल २०२० पर्यंत एक रुपयाही या इमारतीसाठी वितरीत करण्यात आलेला नाही. ज्या गांधीजी यांच्या नावाने मत मागता त्यांना तरी किमान विसरु नका.

सभापती महोदय, मागील दोन वर्षापूर्वी अर्थसंकल्पीय अधिवेशनात छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाकरीता घोषणा करण्यात आली होती. सातारा येथील शिवाजी संग्रहालयास १२ कोटी रुपये उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे. वस्तुस्थिती अशी आहे की याकरीता अद्याप एकही रुपया निधी दिलेला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विसर या सरकारला पडलेला दिसतो. या अर्थसंकल्पात एक रुपयाची तरतूद सरकारने केलेली नाही. त्याच प्रमाणे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मील येथील स्मारकाचेही कामही अद्याप रखडलेले आहे. अर्थसंकल्पात याबाबत तरतुदीचा उल्लेख नाही.

श्री.प्रवीण दरेकर .....

असुधारित प्रत

सभापती महोदय, कर्नाटक सिमेवरील मराठी शाळांना १० कोटी रुपये देण्याची घोषणाही कागदावर राहिली. मंत्री महोदयांनी जाहिर केले होते व मी आपणास धन्यवादही दिले होते. पोलादपूरला छत्रपतींचा निष्ठावंत मावळ नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जन्मस्थळाचे सुशोभीकरणासाठी आपण ५ कोटी निधी दिला व तरतूदही केली  पण तेथे प्रस्ताव करण्यासाठी तुमच्या प्रशासनाला वेळ नाही. ही जबाबदारी कोणाची आहे. अर्थसंकल्पात ५ कोटीची घोषणा केली जाते व प्रत्यक्षात तेथे कृती होणार नसेल तर तुमच्या या घोषणेचा अर्थ काय आहे. संभाजी महाराजांच्या जन्मस्थळी स्मारक करण्याची घोषणा केली. परंतु दोन वर्षापूर्वी केलेल्या घोषणेची अद्याप पूर्तता नाही. संभाजीनगरवर तुमचे प्रेम आहे पण आपले मुख्यमंत्री महोदय असतानासुध्दा अद्याप औरंगाबादचे संभाजीनगर झालेले नाही. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेची अंमलबजावणी कशा पध्दतीने होत आहे याचा मी उल्लेख करतो. दोन वर्षापूर्वी अधिवेशनात घोषणा करण्यात आली. राज्यात विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत मात्र त्यांच्या देखभाल व दुरुस्तीअभावी या योजनांतून आवश्यक तेवढा जलसंचय होत नाही अशा सुमारे ८ हजार जलसंधारण योजनांचे पुनर्जीवन केल्यास विक्रेंदीत जलसाठे निर्माण होतील, भूजल पातळीत वाढ होईल व संरक्षित सिंचन क्षमता निर्माण होईल. यासाठी मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना हा नवीन कार्यक्रम राबविण्याचे ठरविल्याचे आपण सांगितले आहे. वस्तुस्थिती काय आहे, दिनांक ६ मार्च २०२० रोजी ही घोषणा करण्यात आली व दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ रोजी या योजनेचा शासन निर्णय काढण्यात आला. दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ व आज फेब्रुवारी २०२२ मध्ये या योजनेअंतर्गत किती रक्कम खर्च झाली, याची माहिती मी पत्राद्वारे मागितली असता केवळ ७ कोटी रुपये फेब्रुवारी अखेर मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आले असे मला उत्तर दिले आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या नावाने ही महत्वाकांक्षी योजना आहे, तेथे अशी गतिमानता असेल तर बाकी योजनांचे काय होत असेल, यावरुन लक्षात येईल. १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत ९०,९३९ कोटीचे करार झाले. गुंतवणुकीच्या माध्यमातून २,८२,४६० रोजगार निर्मिती होईल असे सांगितले

श्री.प्रवीण दरेकर .....

असुधारित प्रत

होते. परंतु गोयलगंगा व किर्तीकुमार स्टील उद्योग या दोन उद्योगांच्या संदर्भात सामंजस्य करार होऊन दोन वर्षात कोणतीही कार्यवाही नाही. सर्व प्रकल्प ऑन होल्ड आहेत. ८५०० कोटीची गुंतवणूक ७० हजार रोजगार देणारा हा उद्योग देखील सुरु होऊ शकला नाही. अनेक उद्योगांचा मी उल्लेख करणार नाही. ६०-७० सामंजस्य कराराच्या ठिकाणी एकही उद्योग सुरु झाला नाही. एकाही रोजगार मिळाला नाही. कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही. केवळ पंचसुत्री सांगायचे, उद्योग त्या पंचसुत्रीमध्ये घ्यायचा व कोणत्याही प्रकारचे काम करायचे नाही. त्याच घोषणा पुन्हा या अर्थसंकल्पात आहेत. मागील अर्थसंकल्पात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, रेवस ते रेडी सागरी मार्ग, पुणे रिंग रोड,

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

हायब्रीड ॲन्युयीटी योजना, नवी मुंबई बेलापूर ते पेंढार मेट्रो प्रकल्प, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पुणे येथील स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड आणि वनाझ ते रामवाडी मेट्रो प्रकल्प, अमरावती विमानतळ, कोल्हापूर विमानतळ, पुस्तकाचे गाव प्रत्येक जिल्हयात, नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन, अष्टविनायक विकास आराखडा, त्याच त्याच घोषणा गेल्या अर्थसंकल्पापासूनच्या आता पुन्हा या वर्षी देखील केलेल्या दिसून येत आहेत.

सभापती महोदया, या ठिकाणी वैधानिक विकास महामंडळे होती, वैधानिक विकास महामंडळाच्या बाबतीत काय स्थिती आहे ? मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ असेल, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ असेल,याबाबत अर्थसंकल्पात कोणतेही भाष्य नाही.

सभापती महोदया, कोकणासाठी काजू महामंडळाची घोषणा झाली. काजू कोकणात आणि काजू महामंडळाचे मुख्यालय मात्र कोल्हापूर येथे स्थापित करण्यात आलेले आहे. लोकप्रतिनिधींनी याबाबत योग्य मागणी करुनही कोकणात हे काजू महामंडळाचे मुख्यालय हलविले गेलेले नाही. फळ प्रक्रिया उद्योगासाठी मागणी होत आहे, मत्स्यशेतीला कृषी दर्जा द्यावा, असे आम्ही सातत्याने म्हणत आहोत. कोकणासाठी विशेष पॅकेज द्यावे, असेही आम्ही म्हणत आहोत. परंतु या ठिकाणी मराठवाडा, विदर्भ, खानदेश,कोकण या भागाला अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारचे स्थान सरकारने दिलेले नाही. कोकणासाठी गेल्यावेळी १५ कोटी रुपयांचा निधी काजी प्रक्रियेला देण्यात आला होता. यापैकी एक नवी दमडी देखील याकरिता खर्च झालेली नाही. आज कोकणामध्ये पर्यटन, मत्स्योद्योग या उद्योगांना चालना देण्याची आवश्यकता आहे. मला अशी मागणी करायची आहे की, कोकणासाठी ५००० कोटी रुपयांचे पॅकेज शासनाने द्यावे. कोकणात पर्यटन, हॉटेल उद्योग, रेस्टॉरण्ट, किरकोळ विक्रेते, वाहतूक उद्योग, मनोरंजन उद्योग याकरिता स्कोप आहे. यातून कोकणात रोजगार उपलब्ध करण्याकरिता पर्यटन उद्योग विकास आवश्यक आहे. याकरिता कोकणात पर्यटनाला चालना मिळणे अत्यावश्यक आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर......

महाबळेश्वर ते दापोली अशा प्रकारच्या दोन पर्यटन स्थळांना जोडणारा एक समुद्र-किनारा आणि दुसरे थंड हवेचे ठिकाण अशा प्रकारची रस्त्यांची मागणी करत आहे, याकरिता मी अनेक दिवस पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा याबाबत प्रतिसाद मला सरकारकडून मिळालेला नाही. महाबळेश्वरला येणारा पर्यटक पोलादपूर मार्गे दापोली-हर्णे बंदरावर जाऊ शकतो. बद्राकडे येणारा पर्यटक महाबळेश्वरला जाऊ शकतो. परंतु अशा प्रकारचा विचार करायला सरकारला वेळ नाही. मत्स्यव्यवसायाकरिता अधिकचा निधी देण्याची आवश्यकता आहे. मत्स्य उत्पादनामुळे महत्त्वाचे परकीय चलन मिळेल, त्यातून रोजगार निर्मिती देखील होईल. पर्यटन उद्योग, आंबा-काजू प्रक्रिया उद्योग, मत्स्य उद्योगाकरिता,पायाभूत सुविधांच्या निर्मितीकरिता किमान ५००० कोटी रुपयांचे पॅकेज कोकणासाठी द्यावे, अशी मागणी मी करीत आहे.

सभापती महोदया, शेवटचे दोन मुद्दे मी मांडणार आहे. सभापती महोदया, आपण महिलांकरिता देखील सातत्याने काम करीत असता. अंगणवाडी सेविकांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद नाही. शासकीय रुग्णालयातील नर्सेसचे प्रश्न सोडविले नाहीत. आशा सेविकांच्या मागण्या आजही प्रलंबित आहेत. बचत गटांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा, याकरिता कोणत्याही प्रकारची तरतूद नाही. कोविड काळात विधवा महिलांसाठी शासनाने पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना सुरु केली होती. मागील वर्षी शासनाने मिशन वात्सल्य योजना सुरु केली होती. त्यामध्ये एवढा गोंधळ आहे की, अनेक जिल्हयांमध्ये याबाबतच्या समित्या देखील नाहीत. ठराविक संस्थांना दोन-तीन जिल्हयांची कामे दिलेली आहेत. सोलापूर जिल्हयात एकही विधवा महिला नाही, असे सरकारी अहवाल सांगत आहे. आता ज्या योजना शासनाने सुरु केलेल्या आहेत, त्यांच्यावर जनतेने कसा विश्वास ठेवावा ? किमान १००० कोटी रुपयांच्या निधीची मागणी असताना सारथी या संस्थेला केवळ २५० कोटी रुपये देण्याची घोषणा शासनाने अर्थसंकल्पात केलेली आहे.

**उप सभापती :** माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो सोलापूर जिल्हयाबाबतचा मुद्दा मांडलेला आहे. सोलापूर जिल्हयामध्ये एकही विधवा महिला नाही, असे सरकारी अहवाल सांगत आहे, असे ते म्हणत आहेत. मी स्वत: देखील सोलापूर जिल्हयाची माहिती घेत असते. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण यावर उत्तर तर तीन दिवसांनी देणार आहात, परंतु उद्या रोजी सभागृहात येताना याबाबतची आकडेवारी आपण औचित्य म्हणून आणावी. रेकॉर्डवर याबाबत चुकीचे राहू नये. याबाबत बाहेर मेसेज जात आहे. याबाबतचे पत्र माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे असले तरीही माननीय मंत्रीमहोदयांनी देखील याबाबत तपासून उद्याच निवेदन करावे.

श्री.शंभुराज देसाई **:** सभापती महोदया, ठीक आहे.

श्री.प्रवीण दरेकर **:** सभापती महोदया, सोलापूर जिल्हयामध्ये एकही विधवा महिला नाही, असे सरकारी अहवाल सांगत आहे. महाज्योतीला शासनाने १५९ कोटी रुपये दिलेले आहेत. महाज्योतीचे काम पूर्णपणे ठप्प आहे. तेथे अधिकारीही नाहीत. यामुळे निधी देखील खर्च होणार नाही. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला निधीची चणचण आहे, याकरिता मोठया तरतुदीची आवश्यकता आहे. नव्याने ओबीसी आयोग नेमलेला आहे. त्याकरिता आवश्यकतेनुसार निधी दिला जाईल, असे भाषणात सांगितले मागील आयोगाला शासनाने नऊ महिने पैसे दिले नव्हते, त्यामुळे इम्पिरिकल डेटा तयार झाला नाही. याही आयोगाची तुम्ही तीच गत करणार असाल तर ओबीसी आरक्षणाचे काय होईल, शे-पाचशे कोटीची तरतूद त्याकरिता शासनाने करायला काय हरकत आहे, असे माझे म्हणणे आहे. आदिवासी समाजालाही अशा प्रकारच्या भुलथापा मारल्या गेलेल्या आहेत. खावटीची मदत अजून मिळालेली नाही. सभापती महोदया, विकास पंचसुत्र केवळ कागदावरच, प्रत्यक्षात भ्रष्टाचाराची पंचमहाद्वारे कशी उघडतील याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. यापूर्वी अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळया घोषणा करण्यात आल्या. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना भ्रष्टाचाराची पंचमहाद्वारे कशी उघडतील अशा पध्दतीने राज्यकारभार शासनाकडून करण्यात आलेला आहे. सत्तेचा वापर स्वत:च्या संस्थांसाठी केलेला आहे. सहकारी साखर कारखानदारांसाठी हजारो कोटी रुपयांची

श्री.प्रवीण दरेकर......

थकहमी, विहंग रियालिटीसाठी शेकडो कोटींचा दंड माफ शासनाने केलेला आहे. सत्तेचा वापर बिल्डरांसाठी मुद्रांक शुल्कामध्ये सवलत, वाईन वापर उद्योगांसाठी सवलत शासनाने दिलेला आहे. शासनाने सत्तेचा वापर काळया यादीतील कंत्राटदारांची देयके काढण्यासाठी केलेला आहे. या शासनाने अभय योजना म्हणजे वाटाघाटीद्वारे स्वत:चे खिशे गरम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसामान्यांसाठी काही असेल असे वाटेल, असे वाटले होते. परंतु केवळ धनाढय आणि मोठी लोक यांच्यासाठी हा अर्थसंकल्प समर्पित असल्याचे दिसून येत आहे. मी ज्या ज्या मागण्या केलेल्या आहेत, त्यावर मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे, ज्या गोष्टी मी निदर्शनास आणलेल्या आहेत, त्याचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामदास आंबटकर )**

डॉ.मनिषा कायंदे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकारने मांडलेल्या तिसऱ्या अर्थसंकल्पावरील चर्चेत माझे

काही महत्त्वाचे मुद्दे मी खालीलप्रमाणे मांडत आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील पंचसुत्रीचा सुयोग्य वापर करत माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री.अजित पवार, माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.शंभुराज देसाई यांनी पाच महत्त्वाच्या विभागांवर अधिक भर दिलेला आहे. इतर विभागांवर देखील भर दिलेला आहेच. परंतु कृषी,आरोग्य मनुष्यबळ विकास, दळणवळण, उद्योग हे पाच विभाग घेऊन हा सुत्रांचा धागा गुंफलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करत आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी सरकारने घोषणा केली होती, ती महत्त्वाची घोषणा म्हणजे "अनाथ मुलांसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात येईल."अशी होती. सुरुवातीलाच मला हे सांगायलाच आनंद वाटतो की, एस.बी.सुंदरी ही लोणावळयाची जी अनाथ मुलगी आहे, तिला या कोटयातून सरकारी नोकरी मिळालेली आहे. ती पहिली अनाथ मुलगी पीएसआय झालेली आहे. हे एक मोठे उदाहरण आहे की, सरकार महिलांच्या बाबतीत, अनाथांच्या बाबतीत किती गंभीर आहे, आज एका अनाथ मुलीला पीएसआय होण्याची संधी मिळालेली आहे. त्याचप्रमाणे माझी अशीही मागणी आहे, कोरोनामध्ये अनेक मुले अनाथ झालेली आहेत, त्यापैकी मुलांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावे. हे आरक्षण किमान एक टक्का असेल, अर्धा टक्का असेल परंतु हे आरक्षण त्यांना मिळेल, या मा माझ्या मागणीची नोंद घ्यावी.

सभापती महोदय, २०२२ चा हा अर्थसंकल्प आहे. वन ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था गाठणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल, याबाबत माझ्या मनात शंका नाही. सन २०२२ हे महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. यामध्ये केवळ घोषणाच नाही तर सरकारने महिला शेतकऱ्यांकरिता राखीव असलेली ३० टक्कक तरतूद ५० टक्क्यांपर्यंत नेलेली आहे. ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना याचा निश्चितपणे लाभ होणार आहे.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे..........

विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य नेहमीच बोलत असतो की, महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांसाठी काय करते ? परंतु, अशा प्रकारची भरीव तरतूद करुन सरकारने एक प्रकारे ग्वाहीच दिलेली आहे.

सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकारने पत्नीच्या नावे घर घेतल्यास स्टॅम्प ड्यूटीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला होता आणि त्याच धर्तीवर महिलेच्या नावे शेती असल्यास तिला कृषीपंप विजजोडणी देताना विशेष सवलत द्यावी अशी मी आग्रही मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आपण रस्त्यांचे जाळे विणत असल्यामुळे अपघात होत आहेत. एखाद्या वेळी महामार्गावर अपघात झाल्यास जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करता आले पाहिजे आणि त्या ठिकाणी ट्रामा केअर सेंटर उभारण्याचे ठरविले आहे. ठाणे, पुणे, मुंबई, संभाजीनगर, नांदेड, अमरावती, जळगाव, जालना, भंडारा, सातारा आणि अहमदनगर अशा जिल्ह्यांमध्ये ट्रामा केअर सेंटर उभारण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, पूर्वी उच्चभ्रू लोकांना किडनी स्टोनसारखे आजार होत असल्यास समज होता. मधुमेह रोग हा खूप सामान्य रोग झालेला आहे. किडनी स्टोनसाठी लिथोट्रीप्सी उपचार पध्दत आहे. ही गरीबांना देखील मिळावी यासाठी देखील महाविकास आघाडी सरकारने उपाययोजना केलेल्या आहेत. फेको पध्दतीने नेत्रचिकित्सा आणि नेत्रशस्त्रक्रियेसाठी निधीची तरतूद केलेली आहे. १६ जिल्ह्यामध्ये प्रत्येक १०० खाटांचे स्त्रीरुग्णांच्या हॉस्टिलचे नियोजन केलेले आहे.

सभापती महोदय, भारतातील पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी यांनी एमडीची पदवी धारण केलेली होती. त्या विदेशात गेल्या होत्या. या गोष्टीला आज १३६ वर्षे पूर्ण झालेली आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये महिलांसाठी हॉस्पिटल्स उभारली जात आहे. त्याची यादी वाचून मी सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. याचबरोबर पीजीच्या सिट्स वाढविणे हा देखील सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. युक्रेनमधील भारतीय विद्यार्थ्यांना परत मायदेशी परतावे लागले होते. त्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात

असुधारित प्रत

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे..........

माननीय श्री. अमित देशमुख यांनी एक बैठक आयोजित केली होती. अशा विद्यार्थ्यांचे कमीत कमी शैक्षणिक नुकसान होऊन त्यांचे पुनर्वसन कसे करता येईल याबाबत सदर बैठकीत विचारविनिमय करण्यात आला होता. पीजी आणि मेडिकलच्या सिट्स वाढविल्या पाहिजे अशी मी मागणी करीत आहे. पेशंट टू डॉक्टर किंवा पॉप्युलेशन टू डॉक्टरचा जो रेश्यो आहे तो सुधारण्यासाठी अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकलच्या सिट्स वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आपल्या सरकारचा महसूल हा आपल्या सरकारकडेच राहणार आहे. त्यामुळे आपले विद्यार्थी आपल्या भारत देशामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात शिकतील आणि युक्रेनसारखी दुर्दैवी परिस्थिती आपल्या भारतावर येणार नाही.

सभापती महोदय, मुंबईमध्ये सेंट जॉर्ज पदव्यूत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था तसेच नाशिक येथे आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकीय पदव्यूत्तर संस्था तर नागपूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था स्थापन करण्यात यावी अशी माझी गेल्या अनेक वर्षापासूनची आग्रही मागणी होती आणि ती या अर्थसंकल्पात पूर्ण झालेली आहे. राज्यात सरकारी रुग्णालये आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. परंतु, अत्याधुनिक पध्दतीने गरीब रुग्णांना मदत किंवा सर्व प्रकारचे उपचार एकाच ठिकाणी मिळावेत यासाठी इंद्रायणी मेडीसिटीचा निर्णय आमच्या शासनाने घेतलेला आहे आणि त्यामध्ये सर्व उपचारपध्दतीने एकाच ठिकाणी उपचार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यावरील उपचार फी ही गरीबांना परवडेल अशीच ठेवण्यात यावी, अशी देखील माझी आग्रही मागणी आहे.

सभापती महोदय, जागतिक डिजिटल क्रांतीच्या युगात राज्यातील युवक-युवतींमध्ये कौशल्य वाढ व्हावी आणि त्यांना रोजगार मिळावा यासाठी राज्यातील प्रत्येक महसूल विभागात एक इनोव्हेशन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला असून, तो अतिशय स्तुत्य आहे. आज मेक ईन इंडियाची परिस्थिती काय आहे याची सर्वांना कल्पना आहे. राज्यातील तरुण मुला-मुलींमध्ये क्रिऐटीव्हीटी असून, त्याला

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे..........

वाव मिळावा म्हणून हे इनोव्हेशन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. मुंबई येथील सिडनॅम, एलफिस्टन महाविद्यालय आणि श्रीमती दामोदर ठाकसी महिला विद्यापीठांचे नूतनीकरण करावे म्हणून गेल्या अनेक वर्षापासूनची प्रलंबित मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो निधी दिलेला आहे. महिला धोरण या अधिवेशनात येणार होते. परंतु, यामध्ये आणखी काही मागण्या वाढल्यामुळे किंवा विविध मतमतांतरे झाल्यामुळे..... महिला धोरण पुढे येणारच आहे. मी महिला आणि तृतीयपंथांसाठी वेगळे धोरण असावे म्हणून मागणी केली होती. जरी शासनाला आता महिला धोरण आणि तृतीयपंथांसाठी वेगळे धोरण आणता आले नाही. तरी देखील तृतीयपंथांना ओळखपत्र आणि शिधापत्रक देण्याचा संकल्प केलेला असून, तो अत्यंत स्वागतार्ह आहे. त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार मिळणार आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये अमृत महोत्सवी महिला बालभवन उभारण्याचा निर्णय महत्वाचा आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागात कूपोषित अतितीव्र बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र असतात. पूर्वी एक सर्व्हे झाला होता. मुंबईमध्ये देखील कूपोषित बालके आहेत. शहरी भागातील कूपोषित बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र असावे आणि त्याची स्थापना होणार असल्यामुळे मी त्याचे स्वागत करते. वसतीगृहात शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी शारीरिक आरोग्याची काळजी घेणे हा एक मोठा जिकरीचा व जटील प्रश्न असतो. सॅनिटरी नॅपकिन वापरले जात नाहीत आणि त्याची उपलब्धता नसल्यामुळे आदिवासी व सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहांमध्ये मोफत सॅनिटरी नॅपकिनचे मशिन बसविण्याचा क्रातीक्रारी आणि स्तुत्य उपक्रम शासनाने घेतलेला असून, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. त्याचप्रमाणे त्याचे विघटन करणारी जी मशिनरी आहे ती देखील कार्यान्वित केली पाहिजे. राज्यातील अनेक भाग मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. उदाहरणार्थ भंडारा, गोंदीया आणि गडचिरोली. माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे या दुर्गम भागात सतत जात असतात. सरकारचा लाभ प्रत्येकाला मिळावा म्हणून हा समृध्दी महामार्ग गोंदिया, भंडारा

डॉ. मनिषा कायंदे..........

आणि गडचिरोलीपर्यंत एक्सटेंड केला जाणार असल्यामुळे राज्यतील इतर भागातील लोकांना जे फायदे मिळणार आहेत तेच फायदे त्यांनासुध्दा मिळणार आहेत. राज्याचे दैवत असलेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक लवकरच पूर्ण व्हावे अशी मी सरकारकडे अपेक्षा व्यक्त करते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उहापोह केलेला की, सरकार महिलांच्या बाबतीत गंभीर नाही.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये निर्भया पथक स्थापन करण्यात आलेली आहेत. एखादी दुर्देवी घटना घडल्यानंतर त्याचे पडसाद पडल्यानंतर कोणत्याही माहिलेवर अन्याय होणार नाही. हा छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र आहे. यामध्ये महिला सुरक्षित राहिल्याच पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. महिलांसाठी ९१ निर्भया पथकांची नियुक्ती केलेली आहे आणि त्याची सुरुवात देखील झालेली आहे. मुंबईमध्ये निर्भया पथक सतत गस्त घालित असल्याचे निदर्शनास येते. त्यावेळी क्यूआर कोडच्या स्कॅनिंगच्या माध्यमातून पथक आले किंवा कसे याची माहिती मिळते. निर्भया पथक हे केवळ मुंबईपुरते नसून इतर मोठ्या जिल्ह्यामध्ये म्हणजे संभाजीनगर, पुणे आणि नागपूरमध्ये देखील त्याची स्थापना व्हावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय पर्यावरण मंत्री महोदयांनी एक अतिशय चांगला आणि स्तुत्य निर्णय घेतलेला आहे. डोंबिवली हे एक उपनगर आहे. त्या ठिकाणी सामान्य आणि मध्यमर्गीय मराठी माणूस वास्तव्यास आहे. त्यांना मुंबई सोडून दूर वास्तव्य करावे लागले. डोंबिवली हे राज्यातील एक सांस्कृतीक केंद्र असून, अनेक मुले-मुली त्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी जातात.

यानंतर श्री. बोर्डे....

डॉ.मनिषा कायंदे....

मध्यमवर्गीय लोक त्या ठिकाणी राहतात. त्या भागात प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण झाली होती. तेथील एमआयडीसीतील कारखाने इतरत्र हलविण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला. महाविकास आघाडी सरकारच्या या निर्णयामुळे डोंबिवलीकरांना मोकळा श्वास घेता येणार आहे. त्याबद्दल मी राज्य सरकारचे आभार मानते.

सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकारने पेट्रोल व डिझेलवर लावलेले अतिरिक्त शुल्क तसेच रस्ते व कृषी सेसमधून वाटा देण्याबाबत केंद्र सरकारकडे मागणी केली होती. या माध्यमातून केंद्र सरकारला ४६,४६२ कोटी रुपयांचे उत्पन्न एकट्या महाराष्ट्र राज्यातून मिळाले आहे. ही मोठी बाब आहे. राज्य सरकार केंद्र सरकारकडे विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कर जमा करते. परंतु त्या तुलनेत राज्याला परतावा देताना मात्र केंद्र सरकारचे हात तोकडे पडतात. आजपर्यंत राज्याच्या हितासाठी विरोधी पक्ष किंवा त्यांचे शिष्टमंडळ केंद्राकडे गेले नाही. त्यांनी केंद्राकडे मागणी केली नाही की, आम्ही ज्या राज्याचे प्रतिनिधित्व करतो, ज्या राज्यातील जनतेने आम्हाला निवडून दिले त्या राज्याला हक्काचा निधी दिला पाहिजे. जर भविष्यात राज्याच्या हितासाठी विरोधी पक्ष आमच्या सोबत केंद्र सरकारकडे आला तर आम्ही त्यांचे स्वागत करु. महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारला सुमारे ४८ हजार कोटी रुपये जीएसटीपोटी दिले, परंतु केंद्र सरकारने राज्य सरकारला ५,५०० कोटी रुपये परतावा देऊन एकप्रकारे राज्याच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

सभापती महोदय, मुंबईतील अनेक पोलीस स्टेशनच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. माझी मागणी आहे की, पोलीस स्टेशनच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजे. किंबहुना प्रत्येक पोलीस स्टेशनच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे असलेच पाहिजेत अशी आग्रही मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करते. तसेच पोलीस स्टेशनच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे असावेत या बाबत न्यायालयाचे देखील आदेश आहेत. माझी मागणी आहे की, या दृष्टीने लवकरात लवकर अंमलबजावणी केली पाहिजे.

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे....

सभापती महोदय, मुंबईतील अनेक पोलीस स्टेशनमधील लँडलाईन आज बंद अवस्थेत आहेत. मला मुंबईत आलेला अनुभव मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते. मला ध्वनी प्रदुषणाच्या बाबतीत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करावयाची होती. मी पोलीस स्टेशनच्या लँडलाईनवर फोन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथील लँडलाईन बंद होती. एमटीएनएलच्या लँडलाईनच्या बाबतीत ही फार मोठी समस्या आहे. केंद्र सरकारच्या आस्थापनेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर पोलीस स्टेशनमधील लँडलाईन सुरु नसतील तर सामान्य नागरिकांनी पोलिसांशी संपर्क कसा साधावा ? या निमित्ताने मी निदर्शनास आणून देते की, मुंबई पोलिसांचे ट्विटर हँडल अतिशय उत्कृष्ट आहे. मी त्या ट्विटर हँडलवर मला भोईवाडा पोलीस स्टेशनशी संपर्क साधायचा आहे असे ट्विट केले. माझ्या ट्विटला एका क्षणात त्वरित प्रतिसाद देऊन मला रात्री गस्तीवर असलेल्या दोन पोलीस कॉन्स्टेबलचा मोबाईल नंबर देण्यात आला. माझी विनंती आहे की, अशा गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. सामान्य माणसांना ट्विटर वगैरे हाताळता येत नाही. त्यामुळे एमटीएनएलच्या बंद असलेल्या लँडलाईन ताबडतोब सुरु केल्या पाहिजेत. केंद्र सरकारने बीएसएनएल, एमटीएनएल विकण्यासाठी काढले असले तरी त्याचे दुष्परिणाम काय होत आहेत हे तरी त्यांनी आता लक्षात घ्यावे.

सभापती महोदय, प्रत्येक वेळी महाराष्ट्रावर आणि महाविकास आघाडी सरकारवर विरोधी पक्षाकडून टीका केली जाते. आताच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला की, निदान मुख्यमंत्र्यांच्या नावाची योजना तरी नीट चालविली पाहिजे. मी विचारु इच्छिते की, पी.एम.केअर फंड या योजनेला देशाच्या पंतप्रधानांचे नाव आहे. परंतु माहितीच्या अधिकारात त्या योजनेच्या बाबतीत कोणतीच माहिती मिळणार नसेल तर त्यातून एकप्रकारे देशाच्या पंतप्रधानांचे नाव खराब होते. आपली सर्वांची जबाबदारी आहे की, त्यांचे नाव खराब होऊ देता कामा नये. विरोधी बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांचा पगार, निधी पी.एम.केअर फंडमध्ये जमा केला ही बाब हा महाराष्ट्र कधीच विसरणार नाही.

डॉ.मनिषा कायंदे....

असुधारित प्रत

सभापती महोदय, एसआरए टॅक्सच्या बाबतीत मला एक मागणी करायची आहे. एसआरएच्या खोल्या विकत घेणारे लोक अतिशय सामान्य वर्गातील असतात. नवीन जागा वा घर खरेदी करताना रजिस्ट्रेशन फी व स्टॅम्प ड्यूटी भरतो. परंतु दुसऱ्यांदा भरण्यात येणारी फी ट्रान्सफर फी असते. परंतु ट्रान्सफर फी ही स्टॅम्प ड्यूटी इतकीच आकारली जाते. माझी या निमित्ताने मागणी आहे की, एसआरएच्या घरांच्या बाबतीत ट्रान्सफर फी कमी आकारण्यात यावी. रजिस्ट्रेशन फी आणि ट्रान्सफर फी यामध्ये काही तरी फरक असावा, जेणेकरुन गरीब लोकांना त्याचा फायदा होईल.

सभापती महोदय, केंद्र सरकार हे महाराष्ट्रावर सतत कसा अन्याय करीत आहे तसेच नागरिकांच्या खिशावर कसा डल्ला मारत आहे याचे उदाहरण मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देते. EPFO म्हणजेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर देण्यात येणारे व्याज बघितले तर २०१४-१५ मध्ये ८.७५ टक्के होते. त्यानंतर ८.८ टक्के , ८.६५ टक्के, ८.५५ टक्के, ८.६५ टक्के, ८.५ टक्के, पुन्हा ८.५ टक्के आणि २०२१-२२ मध्ये ८.१ टक्के इतके कमी झालेले आहे. ज्यांचा पगार १५ हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्या कर्मचाऱ्यांचे पैसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये गुंतविले जातात. परंतु या निधीवरील व्याज इतके कमी करुन केंद्र सरकार सामान्य लोकांच्या हक्काच्या निधीच्या व्याजावर डोळा ठेवणार आहे काय ? तब्बल ६ कोटी कर्मचाऱ्यांचा EPFO हा केंद्र सरकारकडे जमा असतो. परंतु त्याचे व्याज कमी करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

सभााती महोदय, केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला सापत्न वागणूक दिली जात आहे. राज्य सरकारला केंद्र सरकारकडून जीएसटीचा परतावा मिळत नाही. केंद्रीय अर्थसंकल्पात गुजरातवर सवलतींचा पाऊस पाडला गेला. यादबद्दल कोणाला वाईट वाटण्याचे काही कारण नाही. महाराष्ट्र आणि गुजरात हे आई-मावशी आहेत असे आपण म्हणतो. परंतु आमच्या खिशातले काढून, आमच्या हक्काचे काढून जर इतर राज्यांना निधी दिला जाणार असेल तर ते महाराष्ट्र कदापि खपवून घेणार नाही. महाराष्ट्रातील उद्योगधंदे, पोर्ट, कार्यालये इत्यादी आर्थिक व्यवहाराची केंद्रे

डॉ.मनिषा कायंदे .....गुजरातला नेण्यात आली. या माध्यमातून केंद्र सरकारकडून

असुधारित प्रत

हळूहळू मुंबई व महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्याचा जो घाट घातला जात आहे त्याचा मी निषेध करते.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

सभापती महोदया, महाविकास आघाडी सरकारने खूप चांगली कामगिरी केलेली आहे. राज्य सरकार कोरोना काळात विकास दर वाढवू शकले नाही तरी तो कमी देखील झाला नाही. सरकारचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी झाले असताना सर्व समाजातील सर्व घटकांना न्याय देता येईल याकडेच सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळेच राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे नाव गेले तीन वर्षे देशात पहिल्या पाच मुख्यमंत्र्यांमध्ये आहे, हे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. तसेच केंद्र सरकारच्या सुशासनाबाबतीत जो अहवाल आहे त्यामध्ये सुद्धा महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे. विरोधी पक्षाने कितीही आरडोओरडा केला तरी वस्तुस्थिती लपून राहत नाही. सर्वात महत्त्वाची बाब अशी की, हे सर्व्हे राज्य सरकारचे नसून ते केंद्र सरकारचे आहेत. त्यातून हे निश्चितपणे दिसून येते की, महाराष्ट्रातील जनता ही महाविकास आघाडी सरकारसोबत आहे.

मी सरकारचे पुन्हा एकदा अभिनंदन करते. तसेच आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानते.

धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

अप्रकाशित प्रत

रामेश्वर खरात या मुलाचा झालेला मृत्यू, या संबंधी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी आपला पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडावा.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदया, १२ मार्च, २०२२ रोजी होळकर नगर, ता.अंबड, जि.जालना येथील धनगर समाजाचा रामेश्वर अंकुश खरात नावाचा गरीब मुलगा पोहण्यासाठी विहिरीवर गेला होता. त्याची आणि समोरच्या मुलांची कोणतीही दुश्मनी नसताना किरकोळ वादातून रामेश्वर खरात या मुलाला प्रचंड मारहाण करण्यात आली. मारहाण झाल्यानंतर १२ तारखेलाच एमएलसी आली. वास्तविक पाहता या प्रकरणी कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करणे अपेक्षित होते. परंतु तो गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्या मुलाला जबरदस्त मारहाण करण्यात आली होती. त्या मुलाला उपचारार्थ जालना येथील खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले होते. परंतु काल १३ मार्च रोजी सायंकाळी ६.०० वाजता त्या मुलाचा मृत्यू झाला. त्या मुलाचा मृत्यू झाल्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल झालेला आहे.

सभापती महोदया, आपण माननीय गृह मंत्र्यांना निदेश द्यावेत की, या प्रकरणी वेळेत गुन्हा का दाखल करण्यात आला नाही याची चौकशी करावी. सदरहू खुनाचे प्रकरण जलद कृती न्यायालयात चालविले पाहिजे. तसेच मृत मुलाच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी नामांकित सरकारी वकिलाची नेमणूक केली पाहिजे. तो मुलगा आई-वडिलांसाठी एकुलता एक मुलगा होता. मृत मुलाच्या कुटुबिंयाना पुढील आयुष्य जगण्यासाठी काही आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेता आला तर तो राज्य सरकारने घ्यावा अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी या घटनेची दखल घ्यावी.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, होय.

------ नंतर श्री.कांबळे.....

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु ....

श्री. शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. मी राज्याच्या अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये भाग घेणार आहे. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी विधानसभेत तर माननीय वित्त राज्यमंत्री यांनी विधानपरिषदेत अर्थसंकल्प सादर केला. मागच्या कालावधीमध्ये कोरोनाची महामारी असताना, जनतेच्या, लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे शिवधनुष्य महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून उचलणे, आर्थिक तुटीचा अर्थसंकल्प सादर करीत असताना फार अवघड होते. गेल्या २ वर्षांमध्ये राज्यातील जनतेच्या माफक अपेक्षा पूर्ण करणारे अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून करण्यात आला. शंभर टक्के अपेक्षा पूर्ण होतील अशी वल्गना मी करणार नाही. परंतु सामान्य जनतेला, लोकांना अपेक्षित असलेला अर्थसंकल्प देण्यात आला याबाबत मी आघाडी सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मी फार विस्तृतपणे बोलताना एक उहदारण म्हणून सांगेन. केंद्र सरकारमध्ये कोरोनाच्या काळात खासदार विकास निधी देखील थांबविण्यात आला होता. पण राज्यात कोरोना काळात आमदार विकास निधी वाढविण्याचा इतिहास महाराष्ट्र राज्याने करुन दाखविला. ३ वर्षे खासदार निधीला बंधन होते. परंतु राज्य शासनाने आमदारांना कामे करण्यासाठी विकास निधीत वाढ करण्याच्या संदर्भातून फार चांगला निर्णय घेतला. बऱ्याच लोकांनी अपेक्षा व्यक्त केली आणि विश्वास दाखविला. आम्ही सर्वजण २०-२५ वर्षे विधीमंडळात काम करीत असताना दर दोन वर्षांनी आमदार विकास निधी वाढावा म्हणून मागणी करायचो. कधी ५० हजार रुपये तर कधी १ लाख रुपये अशी अपेक्षा करताना कधी तरी ५० लाख रुपये

श्री. शशिकांत शिंदे ....

वाढावेत अशी अपेक्षा असायची. आदरणीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार, माननीय वित्त राज्यमंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी सध्याची महागाई पाहता, युक्रेन व रशिया युध्द सुरु आहे हे पाहता, लोखंडापासून अनेक वस्तुंच्या संदर्भात महागाईचे अनेक उच्चांक गाठले जात असताना येणाऱ्या काळात देखील आमदार विकास निधीला मदत करावी आणि वाढ द्यावी अशी अपेक्षा मी सदनामध्ये करतो.

सभापती महोदया, मागच्या काळात एक नव्हे तर अनेक संकटे राज्यावर आली. कोरोनाचे महाभयंकर संकट होते. मी टीका करणार नाही. पण केंद्र सरकारने किती मदत केली, राज्य सरकारने किती मदत केली, केंद्र सरकारने महाराष्ट्राबाबतचे प्रेम किती आखडते घेतले ते पहावे. मघाशी गुजरातचा विषय निघाला. गुजरातमध्ये उद्योग का वाढत आहेत, येथे का वाढत नाहीत असे विचारण्यात आले. शेवटी ज्यांच्या हातामध्ये सत्ता असते तो प्रत्येक जण सत्तेचा उपयोग करण्याचा प्रयत्न करीत असतो. देशाचे माननीय पंतप्रधान असतील, आपल्या राज्यात निश्चिपतपणे चांगला विकास व्हावा, गुजरात राज्य प्रथम क्रमांकावर यावे अशी अपेक्षा त्यांनी करणे याला मी चुकीचे म्हणणार नाही. पण दुर्दैवाने महाराष्ट्राचे, मुंबईचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न होतो त्याबाबत मला खंत व्यक्त करावीशी वाटते.

सभापती महोदया, मुंबईतील अनेक व्यावसायिक, अगदी हिरेबाजारापासून अनेक व्यवसाय स्थलांतरित करण्याचा प्रयत्न होतो. गुजरातमध्ये औद्योगिक हब उभे करण्याचे स्वप्न देशाच्या अर्थसंकल्पात माननीय अर्थमंत्री सांगतात. मुंबईसारख्या आर्थिक महानगरीतून सर्वात जास्त उत्पन्न देशामध्ये जाते, त्याचे महत्त्व कमी होते का याची चिंता मला वाटते. मी या संदर्भात माननीय मंत्र्यांना सांगेन की, मुंबईच्या सर्व सुविधांना त्यांच्यासारखे प्राधान्य देऊन मुंबईला देखील आंतरराष्ट्रीय स्तरापेक्षा मोठी बाजारपेठ करण्याचे आव्हान अर्थसंकल्पाच्या माध्यमातून स्वीकारणे गरजेचे आहे. कोरोनाच्या काळात लसीकरणापासून सर्व गोष्टी

श्री. शशिकांत शिंदे ....

असुधारित प्रत

पोहोचविण्यापर्यंत, सुविधा देण्यापर्यंत राज्य सरकार कुठेही कमी पडले नाही याचा मला उल्लेख करावा लागेल.

सभापती महोदया, निधीसंदर्भात उल्लेख केला की, फक्त कागदावर तरतूद केली. प्रत्यक्षात पैसे त्या खात्याला मिळाले नाहीत, असा उल्लेख केला जातो.

सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांना अचानक आजच शिवसेनेचा कसा पुळका आला याचे मला आश्चर्य वाटू लागले आहे. पहिले एवढे प्रेम दाखविले असते तर आमची आघाडीच झाली नसती.

श्री. प्रवीण दरेकर (बसून) : तुम्हाला वाईट का वाटत आहे ?

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, मी तुमच्या मनातील हेतू सांगत आहे.

श्री. प्रवीण दरेकर (बसून) : आमच्या मनात शिवसेनेबाबत प्रेम आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, आनंद आहे. मग सर्व चौकशा थांबवा म्हणजे तुमचे प्रेम आपोआप दिसून येईल.

श्री. प्रवीण दरेकर (बसून) : त्यांनी सांगावे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी आजच प्रश्न काढला. मघाशी एका कॅबिनेटमध्ये कोणता निर्णय कसा घेतला, एका विकासकाला कशी मदत केली याबाबत सांगितले. आमची सोयरीक बघत जा, काळजी घेत जा. निधी वाटप, खर्च या संदर्भातील विषय आहे. शेवटी हा कामकाजाचा परिणाम असतो. राष्ट्रवादी काँग्रेसला झुकते माप दिले, यांना दिले नाही असे म्हटले जाते. मात्र तुम्ही कितीही प्रयत्न करा, तुम्ही जेवढे आमच्यामध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करता, तेवढी महाविकास आघाडी मजबूत होते असा सध्या तरी आम्हा सर्वांना विश्वास आहे. महाविकास आघाडीची तशा पध्दतीने कुठेही काहीही हालचाल होणार नाही. आपण स्वप्न पहा. मी एक उदाहरण देतो. खरे की खोटे मला माहीत नाही. पण मला असे समजले की, मध्यंतरी केंद्र सरकारकडे आपले

श्री. शशिकांत शिंदे ....

असुधारित प्रत

काही लोक गेले होते आणि सरकार पाडण्याचे नियोजन करण्यासंदर्भात बसले होते, तेव्हा आपल्या श्रेष्ठींनी सांगितले की, आपण सरकार पाडण्याच्या भानगडीत पडू नका. कोरोनाची परिस्थिती आहे. कोरोनाच्या परिस्थितीबाबत त्यांना अनुभव चांगला आहे. त्यांना हे सरकार चालवू द्या. कोरोनाची स्थिती संपल्यानंतर निश्चितपणे सरकार पाडण्याचा प्रयत्न करु. आमच्या कानावर अशी चर्चा आली. पण ती चर्चा खरी किंवा खोटी हे माहीत नाही.

सभापती महोदया, मी आज अभिमानाने सांगेन. कोरोना काळात या सरकारने सर्व सुविधा दिल्या. कोरोना लढ्यात लागणाऱ्या सर्व यंत्रणांना अर्थसहाय्य करण्याचे काम महाराष्ट्र राज्याने शंभर टक्के करुन दाखविले. सर्व राज्यांशी स्पर्धा म्हणून मी हे सांगत नाही. केंद्र सरकारमधील कोणीही, कितीही आरोप करु द्यावेत. निवडणुकीच्या राजकारणामध्ये आरोप, प्रत्यारोप होतात. महाराष्ट्रातून देशामध्ये कोरोना पसरला असे सांगितले गेले. मी सांगू इच्छितो की, त्यावेळी केलेल्या केंद्राच्या दिरंगाईमुळे कोरोना पसरला हा थेट आरोप मी करतो. महाराष्ट्राने राज्यातील गरिबांना देखील मदत करण्याचा प्रयत्न करुन कोरोना काळात राज्यात अडकलेल्या लोकांना शिवभोजन थाळीपासून, अन्नधान्य पुरविण्याचा निश्चय नियम बाजूला ठेवून केला. आपल्याला हा इतिहास विसरता येणार नाही. तसेच हे सर्व करीत असताना दुसऱ्या बाजूला लगेच चक्रीवादळ आले, अतिवृष्टी झाली. एक संकट नव्हे तर सातत्याने महाराष्ट्रावर संकटे येत होती. त्यावेळी सर्वांकडून मागणी होत होती आणि तरीही सर्व मागण्यांची पूर्तता करण्याचा प्रयत्न माझ्या महाविकास आघाडी सरकारने केला.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.शशिकांत शिंदे....

तेथील घरे पाण्यामध्ये गेली होती त्यासाठी मदत जाहीर करण्यात आली होती. १०० टक्के मदत देण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी शासनाने केला आहे. याचा उल्लेख मला येथे करावा लागेल. एखादे वेळी अचानक संकट येते अशा वेळी तरतुदीमधील १० ते २० हजार कोटी रुपये द्यावे लागतात. त्याचा समतोल राखण्याचे काम सरकारला करावे लागते.

सभापती महोदया, माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रावर असलेला आर्थिक बोजा व आर्थिक गाडा चांगल्या पध्दतीने चालविण्याचा प्रयत्न केला त्याबाबत त्यांचे कौतुक करणे गरजेचे आहे. हे सर्व करीत असताना बऱ्याच लोकांनी  वेगवेगळी चर्चा केली. शेतकऱ्यांच्या काही अपेक्षा असतात, विरोधी पक्ष शासनाकडे अनेक मागण्या करतात. आर्थिक तूट व तुटीचा अर्थसंकल्प कशा पध्दतीने कमी करावा याचे नियोजन करणे गरजेचे असते. दारुबंदीबाबत अनेक विषय मांडण्यात आले. महसूल वाढीसाठी दारुविक्री करणे हा पर्याय होऊ शकत नाही. अनेक राज्य सरकारे महसूल वाढीसाठी निर्णय घेत असतात. भाजपच्या नेत्या माजी केंद्रीय मंत्री उमा भारती यांनी काल स्वत: मध्य प्रदेशमध्ये जाऊन दारुबंदी करावी म्हणून त्यांनी दारुच्या दुकानावर हल्ला केला. अशी घटना आपण पाहत आहोत. महसूली तूट भरुन काढण्यासाठी राज्याचे उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे एका बाजूला उद्योगपतींना व विकासकांना सवलत दिल्याचे विरोधी पक्ष नेते सांगत आहेत, मुद्रांक शुल्काच्या सवलतीचा उल्लेख करण्यात आला. विरोधी पक्ष नेत्यांनी प्रामाणिकपणे सांगावे की, राज्यातील उत्पन्नाची तूट भरुन काढायची असेल तर उत्पन्नाचे स्त्रोत आपण सांगायला पाहिजेत. टीका करण्यापेक्षा उत्पन्न कसे वाढवू शकतो याबाबत सूचना करायला पाहिजे. अर्थसंकल्पीय तूट भरुन काढण्यासाठी विरोधी पक्ष नेत्यांनी मार्ग सांगायला पाहिजे.

सभापती महोदया, मागील सरकारमध्ये माननीय श्री.एकनाथ खडसे महसूल मंत्री होते त्यावेळी आम्ही विरोधी पक्षात होतो. ५० हजार कोटी रुपये कर्ज काढण्याची परिस्थिती राज्यात निर्माण झाली होती त्यावेळी सरकारचे उत्पन्न वाढविण्यासाठी

श्री.शशिकांत शिंदे....

त्यांनी प्रस्ताव आणला होता की, भोगवटा क्रमांक १ चे भोगवटा क्रमांक २ करावे. शासकीय जागा नियमित करताना उत्पन्न वाढविण्याचा कायदा प्रस्तावित केला होता. सभागृहात सांगितले होते की, उत्पन्न वाढवून सरकारला स्वत:च्या ताकदीवर उभे करण्यासाठी भोगवटा क्रमांक १ चे भोगवटा क्रमांक २ करण्यासाठी कायदा करणे गरजेचे आहे. नवी मुंबईचे माजी मंत्री श्री.गणेश नाईक यांनी एक प्रस्ताव आणला होता की, नरीमन पॉईंच्या समोरील बाजूला समुद्रात भराव टाकून जमीन निर्माण करुन त्या जमिनीची विक्री करुन महाराष्ट्राची आर्थिक घडी व्यवस्थित व्हावी. असे प्रस्ताव सदनात व मंत्रिमंडळात चर्चेला आले होते. कोरोना काळात सामान्य माणूस भरडला गेला नव्हता, त्यावेळी कोणत्याही क्षेत्रातील उद्योगपती व विकासक अडचणीत आले होते. त्यांना चालना देण्यासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने सवलती दिल्या होत्या. मुद्रांक शुल्क कमी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. मार्च अखेरपर्यंत ही सवलत देत असताना रेकॉर्ड पाहिले तर त्या कालावधीत सर्वात जास्त खरेदी विक्रीचे व्यवहार झाले आहेत.

सभापती महोदया, टोल नाक्यांचा विषय उपस्थित करण्यात आला आहे. माननीय श्री.नितीन गडकरी केंद्रात मंत्री झाल्यावर त्यांनी देशात चांगल्या प्रकारे रस्त्याचे जाळे उभारले हे मी अभिमानाने सांगतो. प्रचंड प्रमाणात त्यांनी निधी दिला. रस्ते तयार झाल्यावर टोल लागला. त्यांनी असे सांगितले होते की, टोल लावल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. मी व अनेक मंडळी खेड-शिवापूर येथून आणेवाडीच्या टोलनाक्यावरुन येतो. रिलायन्स कंपनीला हे काम देण्यात आले आहे. रिलायन्स कंपनीने निकृष्ठ दर्जाचे काम केले व अनेक अपघात झाले आजपर्यंत त्या रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही. पुणे कॉन्सील हॉलमध्ये सर्व लोकप्रतिनिधींनी केंद्रीय मंत्री माननीय श्री.नितीन गडकरी यांच्याकडे विनंती केली होती की, पुणे-बंगलोर रस्त्यासंदर्भातील निर्णय घ्यावा व तोपर्यंत टोल आकारणी करु नये. परवा माननीय न्यायालयाने निर्णय दिला व सरकारच्या वतीने असे सांगण्यात आले की, आता आम्ही टोल वसूलीचे काम सदर कंपनीला न देता सरकार स्वत: टोल वसूल करणार

श्री.शशिकांत शिंदे....

आहे. तेथे कोणीही असले तरी टोलमाफी व टोलबंदी करण्याचा निर्णय घेण्यात येत नाही. कोणत्याही सुविधा नसतांना वर्षानुवर्षे लांबत गेलले हे करारनामे करुन टोल वसुली करण्यात आली. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, हा प्रश्न केंद्र शासनाचा असला तरी राज्य शासनाने हस्तक्षेप करुन खेड-शिवापूर व आणेवाडी येथील लोकांसाठी रस्ता पूर्ण होईपर्यंत टोलमाफी करण्याचा निर्णय आपणाला घ्यावा लागेल. शेतकऱ्यांबाबत दोन चांगले निर्णय झाले असे माझे मत आहे. नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना प्रोत्साहन रक्कम ५० हजार कधी देणार अशी तक्रार होत होती. अर्थमंत्री व सरकारने सांगितले होते की, ज्यावेळी आर्थिक बाजू भक्कम होईल तेव्हा या शेतकऱ्यांबाबत निर्णय घेतला जाईल. काल जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यामुळे मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, भूविकास बँकेचा प्रश्न अनेक ठिकाणी होता. त्यांची प्रॉपर्टी विकण्यात आली. ९५० कोटी रुपये कर्मचाऱ्यांची देणी द्यायची आहेत असे चित्र निर्माण करण्यात आले. अनेक लोकांच्या मागण्या होत्या,उपसा सिंचन योजना होत्या. या योजनासंदर्भात निर्णय करताना शेतकऱ्यांबाबत भूविकास बँकेबाबतचा शिक्का होता तो उठविण्याबाबची मागणी होती. तो निर्णय काल जाहीर झालेल्या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. वीज देयकाबाबत तक्रार आहे. एस.टी.महामंडळ, वीज महामंडळ यांना आर्थिक सहाय्य केल्याशिवाय ही महामंडळे व्यवस्थित चालू शकत नाही. ही वस्तुस्थिती आपल्या समोर असताना मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, मुख्यमंत्री महोदयांनी वीज महामंडळ व शेतकऱ्यांच्या वीज कपातीबाबत काय निर्णय घेता येईल याबाबत सूचना केलेल्या आहेत. काही योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. सरकारला माझी विनंती आहे की, वीज सवलत देत असताना जो नियमित वीज भरतो, त्यांना काही सवलत देता येते काय ? त्यांना व्याजात काही सवलत देता येते काय या संदर्भातील निर्णय घ्यावा लागेल.

श्री.शशिकांत शिंदे...

सभापती महोदया, राज्य सरकारने पंचसुत्रीच्या माध्यमातून वेगवेगळे कार्यक्रम व वेगवेगळ्या उपाययोजना करण्याचे प्रयत्न केले आहेत. मराठी भाषा असेल, महाराष्ट्र भवन असेल कशी अनेक कामे करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांचे स्मारक व तेथील परिसराचा विकास करण्याचा निर्णय घेतला. अनेक गडकिल्ल्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. मंत्री महोदय श्री.शंभूराज देसाई हे साताऱ्याचे आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.............

संगम माऊली येथील स्मारकाचा, समाधी स्थळाचा विकास करण्यात यावा. नाशिक येथील त्र्यंबकेश्वर प्रमाणे राज्यातील कानाकोपऱ्यातून लोक संगम माऊली येथे येतात. तेथे दशक्रिया किंवा वेगवेगळ्या प्रकरचे धार्मिक कार्य होतात. राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या लोकांसाठी तेथे धर्मशाळा किंवा धार्मिक कार्य करण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. लोक माती, रेतीवर बसून धार्मिक कार्यक्रम करतात. मला कल्पना आहे की, तेथे शाहू महाराजांपासून अेनक लोकांच्या स्मृती व समाधी स्थळ आहेत. आपण मागील वेळी त्या स्मृती स्थळांचा विकास करण्याचे जाहीर केले होते. शासनाने या संदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, मघाशी मेट्रोचे काय झाले हे सांगण्यात आले. शासनाने जल वाहतूक, दळणवळ व मेट्रोसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिलेले आहे. अर्थमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पात तसा उल्लेख केलेला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमानाने सरकार निश्चितपणे मेट्रोचे जाळे उभे करण्यासाठी प्रयत्न करील याची मला खात्री आहे.

सभापती महोदया, मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मंत्री महोदयांना विनंती करतो की, अर्थसंकल्पात तरतूद करताना विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांनी सूचविलेल्या विकास कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. मग रस्त्यांची कामे असतील किंवा इतर विकास कामे असतील. आम्ही शंभर टक्के म्हणत नाही, परंतु विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांनी सूचविलेल्या विकास कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. आपण पंतप्रधान ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी करण्यात आलेल्या तरतुदीचा उल्लेख केला. विधानसभेतील लोकप्रतिनिधी असो किंवा विधानपरिषदेतील लोकप्रतिनिधी असो. लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या विकास कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे, असे मला वाटते. शासनाने तशा प्रकारचा निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे............

सभापती महोदया, तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत अनेक मंदिरांचा विकास करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण कोरोना काळात घंटानाद करीत होता आणि आम्ही आरोग्य मंदिराचे काम करीत होतो.....

**उप सभापती** : आपले भाषण सुरु होऊन २०-२२ मिनिटे झालेली आहेत. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत ३५ सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी वेळ ठरवून दिलेली आहे. सुरुवातीला बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी जास्त वेळ घेतला तर शेवटी बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, जलसंपदा विभाग उपसा सिंचन योजनेच्या बाबतीत सांगली जिल्ह्याला झुकते माप देते, इकडे देत नाही असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. मंत्री महोदय त्या संदर्भात उत्तर देतील. सांगली जिल्ह्यात दुष्काळी भाग आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर सभागृहात उपस्थित आहेत. आपण त्यांच्याकडे विचारणा करावी. सातारा जिल्ह्यातून दुष्काळी भागाला पाणी मिळते, आपण सांगली जिल्ह्याला फायदा देतो. उपसा सिंचन योजना महागड्या असल्या तरी त्या गरजेच्या आहेत. उपसा सिंचन योजनेचा लाभ दिल्यानंतर तो भाग सुपीक होऊ शकतो. मला आठवते की, मी मंत्री असताना स्व.आर.आर.पाटील साहेबांकडे कार्यक्रमासाठी गेलो होतो. ज्यावेळी २३ गावाच्या योजनेचे पाणी माळरानावर आले त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आम्ही बघितला होता. त्यांनी स्वत: कॅनॉलच्या पाण्यात डुबकी घेऊन माझी २० वर्षाची प्रतिक्षा संपली असे आनंदाने सांगितले. म्हणजे दुष्काळाची दाहकता किती होती हे यावरुन आपल्या लक्षात येईल. विदर्भ, मराठवाडा अशा ठिकाणी या नियोजनाच्या माध्यमातून १९ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शासनाने त्याचे बॅलन्सिंग करण्याचा प्रयत्न करावा. खरोखर जेथे गरज आहे त्या गाभागातील दुष्काळ कमी करण्यासाठी नियोजन करणे खूप गरजेचे आहे.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.............

सभापती महोदया, बैलगाडी शर्यत आयोजित केली जाते. बैलगाडी शर्यतीसाठी कोणी परवानगी घेतली याबाबत मी बोलणार नाही. परंतु बैलगाडी शर्यतीबाबत मी माननीय श्री.सुनील केदार साहेबांचे निश्चितपणे कौतूक करतो. मी राज्य शासनाचा देखील उल्लेख करतो. बैलगाडा शर्यतीसाठी प्रत्येकाने प्रयत्न केले. माननीय श्री.सुनील केदार यांनी बैलगाडा शर्यतीसाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी शासनाच्या वतीने सरकारी वकिलांच्या दालनात जाऊन चर्चा केली. ते दिल्ली येथे गेले आणि बैलगाडा शर्यत सुरु करण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने महसूल वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, महसूल विभागाच्या संदर्भात परवानगी घेणे आवश्यक आहे, २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या नस्त्या अडविल्या जातात. आपल्याला कल्पना आहे की, माननीय श्री.अजित पवार साहेबांकडे वित्त विभागाची कमान आहे, ते जो निर्णय घेतात त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड होत नाही. ते जागच्या जागी निर्णय घेतात याची विरोधकांना सुद्धा कल्पना आहे. शासन अतिशय चांगले काम करीत आहे.

सभापती महोदया, मी कोरेगाव पंचायत समितीच्या इमारतीसंदर्भात मागणी केली होती. पंचायत समितीचे काम २-३ ठिकाणी सुरु आहे, २-३ ठिकाणी इमारती भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत. आता पंचायत समितीच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध झालेली आहे. कोरेगाव येथे पंचायत समिती निर्माण करण्यासाठी मागणी केलेली असताना देखील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नाही. हे सार्वजनिक काम आहे. महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून हे काम व्हावे. शासनाने सदर काम मंजूर करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्र स्वाभिमानाने उभा राहिला पाहिजे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुरळीत चालली पाहिजे. मी अभिमानाने सांगतो की, सरकार देशाची

श्री.शशिकांत शिंदे............

अर्थ व्यवस्था व राज्याची अर्थ व्यवस्था स्वत:च्या ताकदीवर उभी करण्याचा प्रयत्न करीत असताना, सर्व गोष्टींना सामोरे जाताना, सर्व सामान्य लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. शासन येणाऱ्या संकटांना ताकदीने उत्तर देईल. राज्यातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करील. माननीय वित्त मंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित प्रत

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत ३५ सन्माननीय सदस्य भाग घेणार आहेत. जे सन्माननीय सदस्य शेवटी बोलतात, जे सदस्य ज्येष्ठ नाहीत त्यांनी दोन मिनिटात भाषण संपवावे असे आम्हाला नाईलाजास्तव सांगावे लागते. प्रत्येक पक्षाच्या वतीने सुरुवातीला जे सन्माननीय सदस्य बोलले त्यांनी २०-२५ मिनिटे भाषण केलेले आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी स्वयंशिस्त पाळून १० मिनिटात भाषण पूर्ण केले तर शेवटी बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्याची पुरेशी संधी मिळेल. अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी ३ दिवसाची अवधी निश्चित करण्यात आलेला आहे. आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी आग्रह करु नये. आपण सर्वांनीच बोलताना वेळेची मर्यादा पाळली तर बरे होईल. (...अडथळा...) अधिवेशन २५ तारखेपर्यंत चालणार असले तरी आपल्याला अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा ३ दिवसात पूर्ण करावयाची आहे. आपण तसा निर्णय घेतलेला आहे. आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दुपारी ३.३० वाजता सुरु केली. म्हणजे आता पर्यंत ४-५ सन्माननीय सदस्यांची भाषणे व्हावयास पाहिजे होती. ठीक आहे, माननीय विरोधी पक्षनेत्यांचा तो सन्मान असतो. आपण मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासाठी सुद्धा वेळ ठरवून देतो. परंतु सन्माननीय सदस्य भाषणे करताना वेळेची मर्यादा पाळत नाहीत. मी कितीही वेळा बेल वाजविली तरी ते ऐकत नाहीत, आम्हाला न्याय मिळत नाही आणि १५-२० मिनिटे बोलण्याची संधी मिळाली तरी आम्हाला बोलण्यासाठी थोडाच वेळ मिळाला असे सांगितले जाते. आपल्या सर्वांची परिणामकारकता चांगली आहे, सर्वांचा चाहता वर्ग आहे. सन्माननीय सदस्यांनी १० मिनिटात भाषणे संपविली तर दुसऱ्या सदस्यांवर अन्याय होणार नाही. जे सन्माननीय सदस्य शेवटी बोलतात त्यांच्यावर अन्याय होतो. मी अनेक दिवस शेवटच्या बाकावर बसत होते. मी आपल्याला सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा करते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपण नेहमीच सन्माननीय सदस्यांचे प्रबोधन व त्यांना बोलण्यासाठी वेळ कसा मिळेल यासाठी प्रयत्न करीत असतात. माझी आपल्याला विनंती आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांना कामकाजात स्वारस्य

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर......

आहे ते रात्री उशिरापर्यंत सभागृहात उपस्थित असतात. आपण सभागृहाची वेळ वाढविली तरी आमची सर्वांची उशिरापर्यंत बसण्याची तयारी आहे. जे सन्माननीय सदस्य शेवटी बोलतात त्यांना बोलण्यासाठी जास्त वेळ मिळत नाही. सन्माननीय सदस्यांना मतदारसंघातील मुद्दे मांडावयाचे असतात, आपले म्हणणे मांडावयाचे असते. सन्माननीय सदस्यांची सभागृहात उशिरापर्यंत थांबण्याची तयारी आहे.

**उप सभापती** : प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी २० मिनिटे भाषण केले तर २५ तारखेपर्यंत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पूर्ण होणार नाही, असे चालणार नाही.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

**उप सभापती...**

आज आपण संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत किंवा रात्री ८.०० वाजेपर्यंत सदनात उपस्थित राहिलो तरी आपल्याला उद्या सकाळी १०.०० वाजता सदनामध्ये यावे लागणार आहे. आपल्या सदनामध्ये ७८ सदस्य असले तरी विधानसभा सदनातील २८८ सदस्यांपेक्षा येथे जास्त चर्चा होत असते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर आपापले विचार व्यक्त करीत असताना १०-१० मिनिटांची मर्यादा पाळल्यास ते योग्य होईल.

असुधारित प्रत

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय वित्त मंत्र्यांनी सदनामध्ये सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करीत असताना महाराष्ट्राची इकॉनॉमी एक ट्रिलियन डॉलर्सची होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मी शासनाचे एका गोष्टीकडे आवर्जून लक्ष वेधू इच्छितो की, राज्याची इकॉनॉमी एक ट्रिलियन डॉलर्सची झाली पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. आपल्या देशात एक बिलीयन डॉलर्स म्हणजे साडेसात हजार कोटी रुपयांपर्यंत उलाढाल असलेल्या केवळ ८८ स्टार्ट अप कंपन्या कार्यरत आहेत. आपण त्यांना युनीकॉन असे म्हणतो. सदर ८८ कंपन्यापैकी महाराष्ट्रात किती कंपन्या आहेत हा संशोधनाचा विषय आहे. याबाबत सदनाला माहिती मिळाल्यास बरे होईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सर्व आकडेवारी नमूद केलेली असल्यामुळे मी त्या आकडेवारीमध्ये जाणार नाही. आपल्या राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आयआयटीसारखे केंद्र तसेच जगविख्यात शैक्षणिक संस्था आहेत. त्या माध्यमातून अनेक शास्त्रज्ञ व संशोधन करणारे मान्यवर झालेले आहेत.....

(सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह हे सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांना क्रॉस करुन जातात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह यांना सांगू इच्छिते की, आपण नवीन सदस्य आहात. सदनामध्ये सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु असताना आपण त्यांना क्रॉस न करता त्यांच्या मागे जावयास पाहिजे होते. किंवा फिरुन मागे बसावयास पाहिजे होते.

श्री.राजहंस सिंह : सभापती महोदया, ठीक आहे.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदया, आपण मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केलेले आहे. ॲग्री प्रोसेसिंग युनिटमध्ये काही व्हॅल्यू ॲडेड केलेले आहे का ?

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

आपल्या राज्यात जवळपास सव्वाकोटीपर्यंत पशुधन आहे. त्या पशुधनाकरिता आवश्यक असलेले वैद्यकीय उपचार व दवाखाने यांची मोठया प्रमाणात कमतरता भासत आहे. आपल्या राज्यात पशुवैद्यकीय डॉक्टर्सची संख्या ६ हजारांपेक्षा कमी आहे. आपण प्रगतशील राज्य, कृषीप्रधान देश अशा प्रकारचा उल्लेख करीत असताना माझ्या माहितीप्रमाणे आपल्या राज्यातील कृषी महाविद्यालयांमध्ये अद्याप ऑर्गेनिक शैक्षणिक कार्यक्रम सुरु नाहीत. आज देखील आपल्याला सेंद्रीय शेती करण्यासाठी ऑर्गेनिक सर्टिफिकेट घ्यावयाचे असल्यास ते कुठे मिळते याची कोणालाही माहिती नसते. माझी आई शेती करते. मी माझ्या आईला असे विचारले होते की, आपण सेंद्रीय शेती का केली नाही ? यावर तिने मला सांगितले की, त्याकरिता आवश्यक असलेले ऑर्गेनिक सर्टिफिकेट कोठून घ्यावयाचे याबाबत मला काही माहीत नाही. कोल्हापूर येथील श्रीमती मोनिका मोहिते माझ्या परिचयाच्या आहेत. त्या अतिशय उत्तम प्रकारची सेंद्रीय शेती करतात. मी त्यांच्याकडे याबाबत विचारणा केली होती. त्यांच्याकडे प्रायव्हेट ऑर्गेनिक सर्टिफिकेट मिळते, शासकीय ऑर्गेनिक सर्टिफिकेट मिळत नाही. त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या प्रायव्हेट ऑर्गेनिक सर्टिफिकेटकरिता २५ हजार रुपये खर्च येतो. गारपीट झाल्यास शासनाकडून शेतकऱ्यांना एकरी ३ ते ४ हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाते. याउलट सेंद्रीय शेती करण्यासाठी प्रायव्हेट ऑर्गेनिक सर्टिफिकेटकरिता २५ हजार रुपये खर्च करावे लागतात. सभापती महोदया, आपल्या राज्यात देशी वान, देशी गायी, देशी शेळया मेंढया घ्यावयाच्या झाल्यास त्या उपलब्ध होत नसतात. तसेच देशी वान कुठे उपलब्ध होते, याची आपल्याकडे कोणतीही माहिती नाही. त्यामुळे आपल्या राज्याची इकॉनॉमी एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत न्यायची असल्यास उपरोक्त सर्व गोष्टी व्हॅल्यू ॲडेडमध्ये आणणे अत्यावश्यक आहे. आपण राज्यात चीज तयार करण्यासाठी किती उपक्रम, प्रशिक्षण केंद्र सुरु केली आहेत, त्या संदर्भात आतापर्यंत किती शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली, त्याचे मार्केटिंग करण्याबाबत शेतकऱ्यांपर्यंत किती ज्ञान पोहोचविण्यात आले ? मी येथे मूलभूत गोष्टी सांगत आहे. मला शासनाच्या चुका सांगत असताना कोणतीही वेगळी टीका-टिप्पणी करुन

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

राजकारण करायचे नाही. आपल्याला महाराष्ट्र पुढे न्यायचा आहे. ही आपल्या सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे.

सभापती महोदया, पोल्ट्री फार्मसंबंधी सांगायचे झाल्यास देशी कोंबडया व देशी अंडयांची बाजारात मोठी मागणी असते. करोना काळात त्यासंबंधी काही अपप्रचार झाला असेल. परंतु आज देशी कोंबडया मिळत नाहीत. देशी कोंबडयांची मागणी सातत्याने वाढत असताना बायब सारखी संस्था देशी कोंबडयांचे वान तयार करीत आहे. परंतु ते किती प्रमाणात उपलब्धता होणार आहे, त्याकरिता भविष्यात कशाप्रकारे औषधोपचार करायचा ? याबाबत कोणीही माहिती देण्यासाठी तयार नाही. संपूर्ण जग तसेच आपला देश स्टार्ट अपबाबत चर्चा करीत आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब त्यासंबंधी मोठा प्रचार करीत आहेत. महाराष्ट्र स्टार्ट अपमध्ये कोठे आहे ? हैद्राबाद येथे तेथील राज्याने स्टार्ट अपकरिता इमारत बांधून दिली. तसेच त्यांना २ वर्षांकरिता आवश्यक असलेल्या भांडवलाकरिता तेथील शासनाकडून त्यांना मदत केली जाते. मुंबई ही राज्याची आर्थिक राजधानी असून मुंबईत सर्व जागतिक बँका आहेत. परंतु शासनाने स्टार्ट अपकरिता भांडवल उभारणीसाठी कोणत्या प्रकारची मदत केली किंवा प्रोत्साहन दिले आहे ? आपल्याला या सर्व गोष्टी कराव्या लागतील. जेणेकरुन राज्याची इकॉनॉमी एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचू शकेल. अन्यथा भाषणे, मीडिया, वर्तमानपत्रांसाठी सर्व काही होत राहील. परंतु आपल्याला त्या मूलभूत प्रश्नाच्या खोलवर जावे लागणार आहे. अशी मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदया, मी कोकणातील सन्माननीय सदस्यांना बंदरांच्या कनेक्टीव्हीटी संबंधी सांगू इच्छितो की, आपल्या येथील जयगड बंदरावर दळणवळणाच्या साधनांअभावी मोठया प्रमाणात वाहतूक होऊ शकत नाही. याकरिता सर्वांना जेएनपीटी किंवा मुंबईच्या बंदरांवर येण्याची गरज नाही. आपल्या राज्याला साडेसातशे कि.मी. समुद्र किनारा लाभला आहे. त्यावर असलेली बंदरे आपण विकसित केली पाहिजेत. जयगडच्या बंदरावर फक्त एक तार असल्यामुळे

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

असुधारित प्रत

तेथून मोठे कंटेनर जाऊ शकत नाही. मी दिलेल्या माहितीमध्ये काही चूक असल्यास आपण त्यात दुरुसती करावी. ती तार कोणी टाकली आहे, याची कोणालाही माहिती नाही. ही मोठी शोकांतिका आहे. अशा प्रकारे किरकोळ कारणांमुळे बंदरांवरुन वाहतूक होत नसल्यास ही बाब योग्य नाही. शासनाने औरंगाबाद तसेच नागपूर येथे विमानतळे सुरु करुन कार्गोहबची निर्मिती केली आहे. तेथे अनेक लहान गोष्टींमुळे अडचणी येत असतात. आपल्याला त्या माध्यमातून जगाच्या बाजारपेठेत औद्योगिक किंवा शेतीमाल पाठविण्यासाठी बारकाईने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी मघाशी सन्माननीय सदस्यांनी युक्रेन रशिया युद्धासंबंधी उल्लेख केला होता. जवळपास २ लाख विद्यार्थी त्या देशांच्या परिसरामध्ये वैद्यकीय शिक्षण घेत होते. त्यात भारताच्या इतर राज्यांमधील विद्यार्थी असू शकतील. अशा प्रकारे त्या देशामध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे महाराष्ट्रातील विद्यार्थी परत आल्यानंतर ते युक्रेन किंवा रशियामध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी पुन्हा जाऊ शकत नसल्यास त्यांच्याकरिता पुढील वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? आपण राज्यात २ वर्षांपासून करोना परिस्थिती बघत आहोत. त्या अनुषंगाने शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्हयामध्ये पीपीपी तत्त्वावर वैद्यकीय शैक्षणिक संस्था, वैद्यकीय कॉलेज किंवा रुग्णालये निर्माण केली पाहिजेत. या संदर्भात शासनाने सर्व कार्यवाही करावी असे नाही. या बाबतीत पीपीपी मॉडेल तयार करुन प्रत्येक जिल्हयाला एक वैद्यकीय शैक्षणिक संस्था दिली पाहिजे असे न ठेवता उपरोक्त विद्यार्थ्यांसाठी आणि नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वैद्यकीय शिक्षण उपलब्ध होण्यासाठी शैक्षणिक साधन उभे राहण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, पर्यटन क्षेत्रात गोवा राज्य एक पाऊल पुढे जात आहे. तेथे हाय एंड पर्यटन टुरिझम करण्यासाठी धोरण आखले जात आहे. आपल्या महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र, समुद्र किनारा, विविध जंगले असो तसेच तुळजा भवानी मंदीर, पंढरपूर, अक्कलकोट क्षेत्र असो, सोलापूरमध्ये चारही बाजूने तीर्थक्षेत्र आहेत.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

असुधारित प्रत

सोलापूरमध्ये एका वर्षामध्ये जवळपास २ कोटी पर्यटक येत असतात. तेथे उजनीसारखे मोठे जलाशय आहे. तेथे मोठया प्रमाणात पर्यटनाची साधने निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस पावले टाकली पाहिजेत. जेणेकरुन आपण राज्यातील इकॉनॉमी एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पल्ला गाठू शकतो. अशा प्रकारे मी शासनाला विनंती करतो व माझे मनोगत पूर्ण करतो, धन्यवाद.

-----------

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी वेळेत व मुद्देसुद भाषण केले आहे. मी अभिप्राय देते असे नाही, पण आपण खरोखर कौतुकास्पद मांडणी केली आहे. मंत्री महोदय त्याची दखल घेतील याची मला खात्री आहे.

-----

असुधारित प्रत

श्री.राजेश राठोड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री, विकासप्रिय माननीय उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, माननीय अर्थ राज्यमंत्री यांचे मी मनापासून आभार मानतो की, आपण मजबूत, विकासप्रिय व महाराष्ट्राच्या भविष्याला चालना देणारा अर्थसंकल्प मांडला आहे. त्याचबरोबर दोन वर्षाच्या कठीण काळामध्ये उत्कृष्ट अशी आरोग्य सुविधा देणारे सार्वजनिक आरोग्य मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेदेखील मी महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आभार मानतो व अभिनंदन करतो. या अर्थसंकल्पात मनुष्यबळ विकास, दळणवळण, उद्योग, कृषी, आरोग्य या सर्व क्षेत्रास अतिशय चांगला निधी या अर्थसंकल्पात महाविकास आघाडीने दिलेला आहे. कृषी व संलग्न क्षेत्रासाठी २३ हजार कोटी रुपये, सोयाबीन कापूस विकास विशेष कृती योजनेसाठी तीन वर्षात एक हजार कोटी रुपये, मुख्यमंत्री शास्वत सिंचन योजनेअंतर्गत शेततळयाचा समावेश करुन अनुदानाच्या रकमेत ५० टक्के वाढ या व अशा काही ठळक बाबी मी मुद्दाम उल्लेख करीत आहे. दळणवळणाच्या बाबतीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन अंतर्गत १० हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी ७५०० कोटी, पुणे नाशिक मध्यम व अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी १६३९ कोटी, त्याचबरोबर नांदेड जालना बुलेट ट्रेन, परिवहन महामंडळास नवीन ३ हजार बसगाडया खरेदीचा विषय असेल, १०३ बसस्थानकांचे आधुनिकीकरण करणे या अत्यंत महत्वपूर्ण बाबीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्राच्या विकासामध्ये दळणवळणाची अत्यंत महत्वाची भूमिका आहे, कृषी विभागाची व सिंचन क्षेत्राचीही आहे. बार्टी, सारथी व महाज्योती या संस्थांना विविध योजनेसाठी प्रत्येकी २५० कोटी रुपये या शासनाने अर्थसंकल्पात दिलेले आहेत. मी मनापासून अर्थमंत्री व अर्थराज्यमंत्री यांचे आभार मानतो. त्याचबरोबर माझ्या विभागासाठी विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पेवा पाटी नळडोह ते किर्तापूर गावाला जोडणाऱ्या रस्त्यावरील पूल, किर्तापूर ते किर्तापूर तांडा यास जोडणारा पूल आणि रस्त्याची सुधारणा नाबार्ड अंतर्गत व्हावी. नायगाव टोल ते जयपूर रस्त्याची सुधारणा रुंदीकरणासह व्हावी. उस्वद ते मंठा रस्त्याचे रुंदीकरण व्हावे, उमरखेडा ते मेसखेडा जोडरस्त्याचे डांबरीकरण पुलासह सुधारणा करणे, मंठा ते माळकिणी रस्त्याची सुधारणा करणे, मंठा शहराचे बाहय वळण रस्ता डांबरीकरण

असुधारित प्रत

श्री.राजेश राठोड .....

करणे, मंठा उस्वद रोड ते शासकीय कार्यालय परिसर बांधकाम करणे, शेगाव पंढरपूर रस्ता, पिंपरखेडा पाटी ते मुरुमखेडा पर्यत डांबरीकरण करणे, लावणी, आर्डा तोलाजी सावरगाव या जोडरस्त्याचे काम करणे याबाबत या कामांचा समावेश या अर्थसंकल्पात करण्यासाठी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात मराठवाडा विभाग मागासलेला आहे, मराठवाडयात जालना जिल्हा व त्यातील मंठा तालुका हा मानव विकास निर्देशांकामध्ये सर्वात खाली आहे, त्यामुळे या भागातील डोंगराची उंची कमी असल्याने डोंगरी क्षेत्राचा लाभ मिळत नाही. जमीन हलकी असल्याने उत्पन्नाची साधने व प्रमाण कमी आहे. तरीसुध्दा या विभागात दुधाचे क्लस्टर, रेशीम क्लस्टर, चारा निर्मिती, पशुखाद्य निर्मिती क्लस्टर, सोयाबीन क्लस्टर, सुतगिरणीचे क्लस्टर शासन उभारु शकते. येणाऱ्या काळात महाविकास आघाडीने येथेसुध्दा मास्टर प्लॅन तयार करावा, जेणेकरुन या विभागातील शेतकरी, गोरगरीब जनतेचा सर्वांगीण विकास होऊन दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. मंठा येथे रेणुकादेवी तिर्थक्षेत्र निळकंठेश्वर तिर्थक्षेत्र, हेलस तिर्थक्षेत्र, कोकरसा तिर्थक्षेत्र, गोखोरेश्वर तिर्थक्षेत्र यांच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा. या सर्व तिर्थक्षेत्रांना जोडणारा रस्ता निर्माण करावा, अशी मी महाविकास आघाडी सरकारला विनंती करतो. या भागातील विकासाकरीता निश्चित महाविकास आघाडी प्रयत्नशील राहील. गाव तेथे गोदाम, गाव तेथे स्मशानभूमी याची सुरुवात मंठा तालुक्यातून व्हावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, उत्कृष्ट अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल पुनश्च आभार मानतो व अखेरची विनंती करतो की, एखादा पायलट प्रोजेक्ट राबवितो तशा प्रकारे मंठा तालुक्याच्या विकासासाठी महाविकास आघाडी सरकारने नवीन योजना आखली तर मंठा भविष्यासाठी ते चांगले राहील. मायक्रो प्लॅनिंगने एक बृहत आराखडा तयार करावा ज्यामध्ये २० वर्षाच्या विकासाचे नियोजन असावे. त्यात आवश्यक त्या निधीचे नियोजन केले तर उत्कृष्ट आयएसएस अधिकाऱ्यांची टीम तयार करुन कार्यान्वीत केली तर मला विश्वास आहे की, येणाऱ्या काळात मंठा हा मजुरांचा,

श्री.राजेश राठोड.....

गरीबांचा तालुका आहे तो देखील महाराष्ट्रातील इतर प्रगत तालुक्यांप्रमाणे व दरडोई उत्पन्न जास्त असलेल्या मध्यम व श्रीमंतवर्गीयांच्या प्रमाणात होणार असल्याचे आपण पाहूया. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद व महाविकास आघाडी सरकारचे आभार व्यक्त करतो.

------

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे (नाशिक स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करीत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदय, वित्तमंत्री महोदय, पर्यावरण मंत्री महोदय यांचे मी स्वागत व अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा ४ लाख ३ हजार ४२७ कोटी रुपये, महसूल खर्च ४ लाख २७ हजार ७८० कोटी रुपये अंदाजित केलेला आहे. परिणामी २४३५३ कोटीची महसूली तूट आहे. अर्थव्यवस्थेची गती मंदावली असली तरी मंत्री महोदयांनी विकासाची पंचसुत्री सादर करीत असताना मला अभिमान वाटते.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे......

सभापती महोदया, ज्यावेळी युतीचे सरकार होते, त्यावेळी त्यांनी दीड लाख रुपये कर्जमाफीची घोषणा केली होती. परंतु प्रत्यक्ष कर्जमाफी देत असताना दर पंधरा दिवसाला यासंबंधीचे जी.आर. युतीचे सरकार बदलत होते. परंतु असे काही महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये झालेले नाही. माननीय मुख्यमंत्री आणि सहकार मंत्री यांनी कर्जमाफी २,००,००० रुपयापर्यंत दिलेली आहे. आणि यावेळी महाविकास आघाडी सरकारने एक देखील जी.आर.बदलला नाही. याकरिता मला या सरकारचा अभिमान वाटत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी शेतकरी कर्जमाफी बाबतची वचनपुर्ती केलेली आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी २,००,००० पर्यंतचे पैसे सरकारने माफ केलेले आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५०,००० रुपये देण्याचे घोषित केले, त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. तसेच, या लाभक्षेत्रात २०,००,००० शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे. भू-विकास बँकेच्या बाबत जर म्हटले तर या माध्यमातून सरकारने ३४,७८८ शेतकऱ्यांची ९६४.१५ कोटी रुपयांची कर्जे केलेली आहेत.

सभापती महोदया, शासनाने माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्राकरिता १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, याकरित देखील मी सरकारचे अभिनंदन करत आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करणारे हे सरकार आहे. सोयाबीन व कापूस पिकासाठी विशेष कृती योजना करिता तीन वर्षांमध्ये १००० कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे,त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. महिला शेतकरी, शेतमजूर, सन्मान वर्ष सन २०२२ मध्ये या सर्व शेतकरी हिताच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत. या योजनेमध्ये महिला शेतकरी व शेतमजूर यांना फायदा होणार आहे. राज्यातील ३०६ कृषी बाजार समित्यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करण्यासाठी २००० कोटी रुपये या योजनेकरिता सरकारने घोषित केलेले आहे.

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे......

सभापती महोदया, या महाराष्ट्रामध्ये सतत दुष्काळ पडत असताना अतिवृष्टी देखील सातत्याने होत असते. पुरग्रस्त भागांना मदत करण्यासाठी सरकारने ५,४४४.१० कोटी रुपये निधी शेतकऱ्यांकरिता उपलब्ध करुन दिलेला आहे. भुषणाची गोष्ट तर ही आहे की, आमचे माननीय मुख्यमंत्री यांनी अतिवृष्टी होतेवेळेस स्वत: बांधावर जाऊन शेतकऱ्याला आश्वासने दिलेली आहेत. ती आश्वासने त्यांनी पूर्ण देखील केलेली आहेत.

सभापती महोदया, महाविकास आघाडीचे सरकार यांनी लता दीनानाथ मंगेषकर आंतरराष्ट्रीय शास्त्रीय संगीत महाविद्यालय निर्माण करुन त्याकरिता १०० कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. मुला-मुलींकरिता शासकीय वसतिगृहांची योजना शासनाने राबविलेली आहे. शबरी घरकुल योजना तसेच, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकरिता ५०० कोटी रुपयांहून ७०० कोटी रुपयांपर्यंत निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेतून या महाराष्ट्रात फळबागा लागवड योजनेमध्ये केळी, द्राक्षे आदि फळ पीके अन्य महत्त्वाच्या पिकांना नाविन्याने यामध्ये समाविष्ट करण्याचा मान दिलेला आहे. १,००,००० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शासनाने ठेवलेले आहे. या महाराष्ट्रात कोविडसारख्या महामहारीच्या काळात सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ या वर्षात महामारीच्या नियमांकरिता महाविकास आघाडी सरकारने ९०५.१९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच, या कोविड काळात ज्यांचा मृत्यू झालेला आहे, त्यांच्या पश्चात त्यांच्या विधवेला पाच लाख रुपयांचा मदत निधी दिलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या सोबतच्या नातेवाईकांना देखील ५०,००० रुपयांची मदत शासनाने केलेली आहे. या काळामध्ये अतिशय मोठमोठी संकटे राज्यावर आलेली आहेत, या संकटाच्या काळात महाविकास आघाडीच्या सरकारने आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शिव-भोजन थाळी, गोर-गरिबांना अन्नधान्य पुरविण्याचे काम केलेले आहे.

श्री.नरेंद्र दराडे......

सभापती महोदया, या राज्यामध्ये सारथी संस्था म्हणजेच छत्रपती शाहु महाराज संशोधन, शिक्षण व मानव विकास संस्था या करिता २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपण नेहमी नियमाने चालणाऱ्या म्हणून ओळखल्या जातात. तसेच, हे सभागृह देखील नियमानुसारच कामकाज करीत असते, असा संकेत आहे. अर्थसंकल्पावर वरिष्ठ सभागृहामध्ये चर्चा चालू असताना एकही कॅबिनेट मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाही, हे विधानपरिषद या वरिष्ठांच्या सभागृहाच्या गरिमेला शोभणारे नाही. आपल्या सभागृहाला आपण एवढेही अंडर-एस्टीमेट करु नये. सभागृहात मंत्री अनुपस्थित या कारणाकरिता पाच मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकुब करण्यात यावी, ही माझी विंनती आहे. आता तर विधानसभा सभागृहाची बैठक देखील संपलेली आहे, त्यामुळे मंत्रीमहोदय तेथे व्यस्त आहेत, असेही सांगण्याचे काही कारण नाही. कृपया मंत्री अनुपस्थित या कारणाकरिता पाच मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकुब करण्यात यावी, ही मी विनंती करीत आहे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** संबंधित कॅबिनेट मंत्रीमहोदय मला सांगून पाच मिनिटांकरिता पाणी पिण्यासाठी सभागृहाबाहेर गेलेले आहेत. ते पुढील पाच मिनिटांमध्ये सभागृहात उपस्थित होतीलच.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपल्या या सभागृहाला एवढेही अंडरएस्टीमेट करु नये, अशी मी विनंती करीत आहे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक ५ मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६.३५ ते ६.४० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**उप सभापती** : मी आजचे कामकाज येथेच थांबविते. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी, मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत